कन्नड परमार्थसोपान

प्रा. रा.द. रानडे यांच्या

Pathway to God in Kannada Literature

याचा सहायक ग्रंथ

तथा

मूळ कन्नड पदांचा मराठी भावानुवाद

अनुवादिका

सौ. पद्मा कुलकर्णी

१९९२

भारतीय विद्या भवन

मुंबई ४०० ००७

कन्नड परमार्थसोपान

प्रा. रा.द. रानडे यांच्या

Pathway to God in Kannada Literature

याचा सहायक ग्रंथ

तथा

मूळ कन्नड पदांचा मराठी भावानुवाद

अनुवादिका

सौ. पद्मा कुलकर्णी

१९९२

भारतीय विद्या भवन

मुंबई ४०० ००७

पहिली आवृत्ती १९९२

© सर्व हक्क स्वाधीन

मूल्य रुपये दहा

प्रकाशक
सु. रामकृष्णन, कार्यसचिव,
भारतीय विद्या भवन,
डॉ. के. एम. मुनशी मार्ग, मुंबई ४०० ००७
सौ. सुनंदा शिंत्रे व सौ. अश्विनी जोग,
११४/८ मुरारजी पेठ, २ इंदिरा अपार्टमेंटस्
सोलापूर ४१३००१ यांच्याकरिता

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
शिव-पार्वती, पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

	उपोद्घात	पाच
	प्रस्तावना	सहा
	हृद्गत	आठ
	निवेदन	तेरा
१	तात्त्विक पूर्वपीठिका	१
२	परमार्थप्रेरणा	१०
३	आणखी काही प्रेरणा व त्यांची परिणती	२२
४	नैतिक तयारी	३४
५	सद्गुरूंची लक्षणे	४४
६	सद्गुरूंचे कार्य	५६
७	गुरुशिष्यसंबंध — भाग १	६८
८	गुरुशिष्यसंबंध — भाग २	८४
९	संतांची लक्षणे	९८
१०	देवभक्तांचा संबंध	११२
११	परमात्म्याचे स्वरूप	१२४
१२	नाममाहात्म्य — भाग १	१४०

१३ नाममाहात्म्य — भाग २ १५२
१४ ध्यानपद्धती १६४
१५ पारमार्थिक अनुभवाचा उगम व त्याची प्रमाणे १८२
१६ रूपतेजनादादी पारमार्थिक अनुभव १९८
१७ संमिश्र पारमार्थिक अनुभव २१०
१८ उच्चतर पारमार्थिक अनुभव २२४
१९ साक्षात्काराचे परिणाम — भाग १ २३८
२० साक्षात्काराचे परिणाम — भाग २ २५०

परिशिष्टे

१ मूळ इंग्रजी ग्रंथात उल्लेखिलेली काही जास्तीची पदे २६६
२ टिपणे ३०२
३ काही कवींचा अल्प परिचय ३३६
४ पदांची सूची ३५६
५ कवींची सूची ३६२
६ संदर्भग्रंथ ३६६

उपोद्घात

कर्नाटक विश्वविद्यालयाच्या विद्यमाने डॉ. रा. द. रानडे यांनी कन्नड परमार्थसोपान या विषयावर १९५४ ते १९५६ या अवधीत चौदा व्याख्याने दिली. भारतीय विद्या भवन, मुंबई, यांनी कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, यांच्या सहकार्याने 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' नावाचा जो ग्रंथ १९६० साली प्रसिद्ध केला, त्यात ही चौदा व्याख्याने अंतर्भूत झाली आहेत. या ग्रंथाचे कन्नड भाषांतर 'कन्नड संतर परमार्थपथ' या नावाने कर्नाटक विश्वविद्यालयाने यंदाच प्रसिद्ध केले. वीरशैव व वैष्णव संतांच्या आनुभविक पदांतून, त्याचप्रमाणे तात्त्विक पदांतून विवरणासाठी निवडलेल्या काव्य-पंक्तींनी डॉ. रानडे यांचा उभा ग्रंथ नटला आहे. या पदांचे महत्त्व ओळखणाऱ्यांना साहजिकपणेच अशी जिज्ञासा उत्पन्न होते की ही संपूर्ण पदेच पाहावयास मिळावीत. शिवाय यांतील काही पदे अजून प्रसिद्धीस आली नाहीत. गाणाऱ्या लोकांच्या मुखांतून हे अमोल साहित्य ऐकून डॉ. रानडे यांनी या पदांचा संग्रह केला व त्यांवर अभ्यासपूर्ण टिपणे लिहून ठेवली. 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' याचा सहायक ग्रंथ म्हणून संपूर्ण पदांचा हा संग्रह कन्नड परमार्थसोपान या नावाने आम्ही आज वाचकांच्या हाती देत आहोत. कर्नाटक विश्वविद्यालयाने हाती घेतलेले कार्य ह्या तिन्ही ग्रंथांच्या प्रकाशनाने सिद्धीस गेले आहे हे पाहून मला संतोष वाटतो.

'कन्नड संतर परमार्थपथ' हा कन्नड अनुवाद डॉ. रानडे यांचे एक निकटवर्ती श्री म. श्री. देशपांडे यांनी केला. डॉ. रानडे यांनी तयार केलेला पदांचा संग्रह श्री देशपांडे यांनी दिवाकर समितीच्या साहाय्याने संपादित करून दिला. विश्व-विद्यालयाच्या प्रकाशन समितीचे सदस्य, डॉ. एस. सी. नंदीमठ, प्रा. एस. एस. माळवाड व श्री व्ही. बी. नायक, यांनी हस्तलिखित पाहून काही सूचना केल्या. विश्वविद्यालय या सर्वांचे ऋणी आहे.

कर्नाटक विश्वविद्यालय,
धारवाड, १-५-१९६२

दा. चिं. पावटे
उपकुलपती

प्रस्तावना

(श्री म. श्री. देशपांडे यांच्या प्रस्तावनेचा सारांश)

प्रा. रा. द. रानडे हे एक अलौकिक पुरुष होऊन गेले. ते जसे प्रकांड पंडित होते तसेच श्रेष्ठ अनुभवी होते. आपल्या तैलबुद्धीने ते ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत लीलेने विहार करीत. अनेक भाषांवर प्रभुत्व हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य. मातृभाषा मराठी असली तरी जमखंडि (जि. विजापूर) येथे वाढल्यामुळे त्यांचा कन्नड भाषेशी लहानपणापासूनच परिचय होता. कन्नड ही त्यांच्या गुरुपरंपरेची भाषा. आपले सद्‌गुरू श्री भाऊसाहेब महाराज यांच्या सांगण्यावरून पुढे प्रा. रानडे यांनी कन्नड भाषेत प्राविण्य मिळविले व त्या भाषेतील अनुभवभांडाराचा लाभ करून घेतला. श्रेष्ठ संत श्री निंबरगि महाराज (गुरुदेव रानडे यांचे परमगुरू) यांची वचने १९०८ साली श्री बाबाचार्य काव्य यांनी 'महाराजरवर वचन' या नावाने प्रसिद्ध केली. भाषा कन्नड आणि लिपी देवनागरी अशा या ग्रंथाचा कन्नड भाषेच्या अभ्यासासाठी गुरुदेवांना फार उपयोग झाला. याच ग्रंथातील शिकवण विषयवार मांडून बोधसुधे हा संक्षिप्त ग्रंथ त्यांनी आपल्या नजरेसमोर तयार करवून घेतला.

गुरुदेवांचा कन्नड संतकवींचा अभ्यास चालूच होता. अनेक पदे परंपरेतून आली होती. लोकांच्या मुखांतून ऐकलेल्या अधिक पदांची त्यांत भर पडली व ती एकत्र आणून पारमार्थिक पदांचा संग्रह त्यांनी तयार केला. आपल्या आध्यात्मिक अनुभवाच्या जोरावर ते सहजगत्या या पदांच्या पोटात शिरत. वैचारिक नाविन्य व पारमार्थिक प्राधान्य हे दोन निकष वापरून या असंख्य पदांतून काही निवडून त्यांवर 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' हा ग्रंथ लिहिण्याची योजना गुरुदेवांनी तयार केली. धारवाड व बेळगाव येथे त्यांची व्याख्याने झाली. कर्नाटक विश्वविद्यालयाच्या उपकुलगुरूंनी कन्नड भाषेतील साक्षात्कारशास्त्र या विषयावर एक व्याख्यानमाला गुंफण्याचे गुरुदेवांना निमंत्रण दिले; तसेच व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची

जबाबदारीही स्वीकारली. एकूण वीस व्याख्यानांची योजना होती पण गुरुदेवांच्या निर्याणापर्यंत त्यांतील चौदा व्याख्याने दिली गेली. या व्याख्यानांवरील चौदा प्रकरणे व उरलेल्या सहा व्याख्यानांच्या टिपणांवरून पुढे त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी तयार केलेली सहा प्रकरणे मिळून 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या इंग्रजी ग्रंथाचा सहायक ग्रंथ म्हणजे 'कन्नड परमार्थसोपान'. इंग्रजी ग्रंथात विवरणासाठी घेतलेली पदे प्रकरणविल्हे कन्नड परमार्थसोपानात छापली आहेत. रचना मूळ ग्रंथानुरूप आहे.

गुरुदेवांनी तयार करून ठेवलेल्या पदांचे संपादन करण्याची संधी मला दिल्याबद्दल संपादक समिती व कर्नाटक विश्वविद्यालय यांना माझे अनंत प्रणाम.

शांतिकुंज, विक्रमपूर — **म. श्री. देशपांडे**
अथणि
३०–५–१९६२

हृद्‌गत

संतांचे संगतीं मनोमार्गें गति। आकळावा श्रीपती येणें पंथें॥

दुर्लभ मानवजन्माची सार्थकता ईश्वरप्राप्तीत आहे. ईश्वरप्राप्ती सद्‌गुरूंच्या अनुग्रहाशिवाय आणि सत्संगाशिवाय शक्य नाही असे सगळे संत कंठरवाने आजपर्यंत सांगत आले आहेत. उसाची चव, फणसाची चव, आंब्याची चव निरनिराळी असते पण त्या सगळ्यांत एक गुण मात्र सामायिक असतो आणि तो म्हणजे गोडवा. तद्वतच सर्व संत एकच सत्य सांगतात. त्यांचा धर्म, त्यांची भाषा, त्यांचा देश, त्यांचा काल वेगवेगळा असेल पण तत्त्व एकच. निसर्गात प्रत्येक गोष्टीला अपवाद आहे. पण एकच गोष्ट निरपवाद आहे आणि ती म्हणजे संतवचनांची शाश्वतता. वाचेतील कवित्व व कवित्वातील रसिकत्व सर्व साहित्यात असते पण रसिकत्वाला परतत्त्वस्पर्श होतो तो संतसाहित्यात. त्यामुळेच संतसाहित्य अमर होते.

निंबरगि संप्रदायात नामस्मरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. चोवीस तासांपैकी जास्तीत जास्त वेळ ध्यानात, नामस्मरणात गेला पाहिजे. 'टाकी तू माप सळ धरिली विठ्ठलें' यानुसार लोभाने, प्रेमाने, वेळप्रसंगी रागानेसुद्धा प्रत्येक श्वासागणिक नाम घ्यावे. नामाची आठवण विशेषकरून साधक बंधुभगिनींच्या सहवासात राहते म्हणून संतसंगतीत नामस्मरण करण्यावर फार कटाक्ष असतो. निंबरगि महाराजांच्या वेळेपासून, अनेक साधकांनी एकत्र बसून ध्यान करण्याची पद्धत चालत आली आहे. दिवसभराच्या कामामुळे, शारीरिक, मानसिक थकव्यामुळे, जरा कुठे ध्यानाच्या वेळी शरीरस्वास्थ्य मिळाले की निद्रादेवी चटकन शरीराचा ताबा घेते. अशा वेळी साधकाला जागे करणे अत्यावश्यक असते. तसेच नवीन साधकांच्या मनातील शंका कुशंका दूर व्हाव्यात म्हणून सामुदायिक नेमाच्या (ध्यानाच्या) वेळी एखादे पारमार्थिक पद म्हणण्याची पद्धत आहे. श्री भाऊसाहेब महाराज नेहमी दुपारी जेवणानंतर काही मुलांकडून पारमार्थिक पदे म्हणवून घेत असत, असा उल्लेख, १९४५ साली अलाहाबादहून

श्री गुरुदेवांच्या सांगण्यावरून श्री बाबासाहेब संगोराम यांनी इंचगेरीस श्री काकासाहेब तुळपुळे यांना लिहिलेल्या एका पत्रात आहे. श्री अंबुराव महाराज व गुरुदेव रा. द. रानडे यांनी नेमाच्या वेळी पदे म्हणण्याची परंपरा पुढे चालविली. संप्रदायात म्हटली जाणारी ही पदे टिकवणे जरूर होते. ती पदे सद्गुरूंच्या कानांवर पडली असल्यामुळे त्यांना विशिष्ट पावित्र्य आलेले आहे. ह्याही कारणासाठी गुरुदेवांनी ती पदे जमवून वरीचशी पदे प्रसिद्ध केली. '.. सत्पुरुषांच्या आनुभविक पदांतून अनुस्यूत असलेले ज्ञानाचे बोल यांचे परिशीलन केले असता दासबोध व ज्ञानेश्वरी यांचे अध्ययन केल्याप्रमाणेच श्रेयस्कर होत आहे' असेही वर उल्लेखिलेल्या पत्रात म्हटले आहे. एका आनुभविक पदाबद्दल तर तिथे असेही म्हटले आहे की अशी पदे ही त्या व्यक्तीची स्वकल्पित कृती नसून देव त्याच्या मुखाने हे बोल बोलत असतो. या सर्वांवरून आनुभविक पदांकडे पाहण्याचा गुरुदेवांचा दृष्टिकोन लक्षात येईल. यांपैकी काही कन्नड पदांवर त्यांनी 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' (भारतीय विद्या भवन, मुंबई ७, १९६०), नावाचा ग्रंथ लिहिला. साक्षात्काराच्या दृष्टिकोनातून कन्नड पदांचे वर्गीकरण करून, ती विषयवार मांडून त्यांवर संश्लेषणात्मक भाष्य करण्याचा ओनामा गुरुदेवांनीच केला. त्या भाष्यात त्यांनी केलेले पदांचे विवरण व अनेक आनुषंगिक विषयांची चर्चा आहे. ती वाचकांनी मुळातून वाचणे अगत्याचे आहे गुरुदेवांनी आपल्या इंग्रजी ग्रंथाला आधार म्हणून जी पदे निवडली त्यांचे संपादन श्री म. श्री. देशपांडे, अथणि, यांनी केले. ते कर्नाटक युनिव्हर्सिटी, (धारवाड), यांनी 'कन्नड परमार्थसोपान' या नावाने कन्नड लिपीत १९६२ साली प्रसिद्ध केले. परंतु या पदांचा अर्थ मराठी भाषकांना कळत नाही व त्यांतील पारमार्थिक अनुभवांचा आनंद लुटता येत नाही. त्यातून कन्नड पदांना संगीताचा साज चढलेला असल्याने स्वरगंगा व देवगंगा यांच्या प्रयागस्थानी न्हाऊन आल्यावर वाचे बोलता न ये अशी जी धन्यता लाभते तिला ते मुकतात. कन्नड लिपी व कन्नड भाषा न जाणणाऱ्या साधकांसाठी प्रस्तुत ग्रंथात या पदांचा मराठी भावानुवाद दिला आहे. ग्रंथाचे 'कन्नड परमार्थसोपान' हे नाव कायम ठेवले आहे. डाव्या पानावर देवनागरी लिपीत कन्नड पदे व उजव्या पानावर त्यांचा मराठी भावानुवाद आहे. गुरुदेवांनी स्वतः दिलेले पदांचे इंग्रजी मथळेही दिले आहेत.

कन्नड साहित्यात तीन प्रवाह दिसतात. जैन, वीरशैव व ब्राह्मण. किंबहुना हे साहित्य म्हणजे जिनभक्ती, शिवभक्ती व विष्णुभक्ती या तीन सरांचा हार आहे. बाराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जैनयुग होते. त्यानंतर वीरशैव युग येते. याचा काल पंधराव्या शतकापर्यंत. पंधरा ते एकोणिसाव्या शतकांपर्यंत दोनशेपणे ब्राह्मणयुग. जैन वाङ्मय प्राधान्येकरून चंपूकाव्य किंवा गद्यपद्यात्मक रचना असलेले आहे. यात लौकिक व धार्मिक दोन्ही तऱ्हेचे साहित्य आहे. यांपैकी पहिल्यात आश्रयदात्या राजांची चरित्रे वर्णिली आहेत. दुसऱ्यात तीर्थंकर व महापुरुषांची चरित्रे असून त्याचा उपयोग जैन धर्माच्या

प्रसारासाठी केला आहे लौकिक काव्यात त्यांनी वीर-रौद्र रसांचा व आगमिक किंवा धार्मिक काव्यात अद्‌भुत-शांत या रसांचा परिपोष केला. ज्योतिष-वैद्यक शास्त्रे तसेच काव्यशास्त्र म्हणजे व्याकरण, छंद यांचीही रचना या काळात झाली. जैन कन्नड साहित्य अत्यंत दर्जेदार असून काव्यगुणांनी भरलेले आहे. वीरशैव तत्त्वज्ञानात गद्याचा भाग जास्त आहे. पद्यात्मक भागात लालित्य व रसपूर्णता दिसते. वीरशैव संतकवींच्या वचनातील उपदेश अखिल जगाला उपयोगी पडणारा आहे. त्यात मानवप्रेम, नीति-निष्ठा, शिवभक्ती व समभाव हे प्रकर्षाने दिसतात. या सुमारास नवसमाज निर्माण होत होता व विचारस्वातंत्र्याला प्राधान्य आले होते. या वेळी वचनसाहित्याचा उदय झाला. यात नीती, तत्त्वज्ञान व अनुभव यांचे चित्रण आहे. भक्तिरसाचा इथे उत्कर्ष झाला. वीरशैव साहित्याचा अधिकांश भर कर्तव्यावर होता. 'कायकवे कैलास' (कर्तव्य हाच स्वर्ग) हा त्यांचा महत्त्वाचा सिद्धान्त. ब्राह्मण साहित्याचा भर इतिहास, पुराणे व वेदान्तविवेचन यांवर आहे. भागवतधर्म किंवा भक्ती यांचा गौरव करणारे विपुल वाङ्मय या काळी निर्माण झाले. भागवतधर्माची एक शाखा दासकूट म्हणून प्रसिद्धी पावली व सामान्य मनुष्याच्या मनातील नीति-भक्तीचे रोप इथे वाढीस लागले. दास-साहित्य सुबोध, सुरस, सरळ भाषेत असल्याने ते अंतःकरणास भिडते. एकूण मूळ द्राविड भाषेला संस्कृतचे खतपाणी मिळाल्याने कन्नड साहित्याला एक आगळे वैभव प्राप्त झाले आहे. इथे वैदिक-अवैदिक, शैव-वैष्णव, द्वैत-अद्वैत या मतांत कधी संघर्ष तर कधी समन्वय होत राहिल्याने वाङ्मयातही त्याचे प्रतिबिंब दिसते.

संतांच्या समन्वयदृष्टीचे भाषिक क्षेत्रातील दोन ठळक नमुने पाहू. यांपैकी एका उदाहरणात कन्नड-मराठी असा दुपेडी व दुसऱ्यात कन्नड-मराठी-हिन्दी असा तिपेडी गोफ विणलेला दिसतो.

(१) सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी सिंदगि येथे जक्कप्पय्य नावाचे मोठे संत होऊन गेले. त्यांनी लिहिलेल्या श्रीरामचंद्रअनुसंधान या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे यातील कथा कन्नड-मराठी अशा दोन भाषांच्या मिश्रणातून सांगितली आहे. त्याचे मंगलाचरण मराठीत आहे व पुढे कन्नडमध्ये षट्‌पदि छंदात कथा चालू होते. नंतर मराठी श्लोक, आर्या येतात. लगेच कन्नड कंद, त्रिपदि हे छंद येतात.

गणेश अंबा विष्णु सांबा सुरकदंब वंदुनी
आग बळिकाळिंद कपिलवृन्दमं कूडि
राघवेंद्रं तेंकडल तीरक बरलु
..... बिभीषणगे लंकाधिपत्य कोट्टा ।

(त्या वेळी कपिवृंदासमवेत दक्षिणसागराच्या तीरावर येऊन श्रीरामांनी..... बिभीषणाला लंकाधिपत्य दिले).

दहा कन्नड परमार्थसोपान

(२) दुसरे उदाहरण काखंडकि येथील महिपति या संतकवींचे आहे.

बाट पकडो सीधा ।
न लगे तूतें बाधा ॥ प. ॥
इदुवे निज गुरुबोधा ।
सन्मत सुखवादा ॥ अ. प. ॥

जान बूझकर चलना भाई ।
लक्ष लावुनि गुरुपायी ॥
एल्लरिगू इदु तिळियद न्यायि ।
समझे बिरला कोई ॥ १ ॥

(सरळ वाट धर. तुला बाधा होणार नाही. हाच संतांनी मान्य केलेला व आनंदमय गुरूपदेश आहे.

समजून उमजून हा मार्ग धर. गुरुपदांकडे लक्ष असू दे. सर्वांना हा योग्य मार्ग समजतोच असे नाही. क्वचित एखाद्याला समजतो).

स्वतःच्या साहित्यातून संत आपल्याला ऐहिक व पारमार्थिक लाभाचा मार्ग दाखवितात. ती शिकवण आपल्या कृतीत उतरायला हवी, तरच जीवनाचे सार्थक होईल. संतविचारांचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे. त्यासाठी भक्तिवाङ्मय नव्या पिढीपर्यंत पोचवण्याची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव हे अध्यात्माच्या माध्यमातूनच साध्य होतील. फक्त भक्तियुक्त अंतःकरणच आप-परभाव, श्रेष्ठ-कनिष्ठ, जातीपातीचा भेद, धर्म-वंश भेद ह्यांना पळवून लावते. सर्वत्र एक आत्मा ही शिकवण भक्तिद्वाराच शक्य आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या सिद्धतेसाठी कोणाकोणाचे, किती व कसे साहाय्य झाले हे सांगितले तर नमनालाच घडाभर तेल लागेल. अनेक विद्वान, व्यासंगी मंडळी व संस्था यांची परोक्ष-अपरोक्ष मदत मिळाली. खारूताईचे व्रत घेतलेल्या अनेकांचे तन-मन-धन या सत्कारणी लागले. त्याचा निदान ऋणनिर्देश करणे आमचे कर्तव्य आहे. कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड यांनी 'कन्नड परमार्थसोपान' या पुस्तकाचा मराठी भावानुवाद करून तो प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठी भारतीय विद्या भवन, मुंबई, यांनी पहिले पाऊल टाकले. त्यांच्याबद्दल हार्दिक कृतज्ञता वाटते.

प्रिन्सिपल पि. के. भागोजि व डॉ. व्हि. ए. दिवाणजि यांनी कित्येक ओळींचा अर्थ सुबोध केला. श्री योगीश यड्रावि, श्री आर. बि. कंठि (सहजानंद स्वामिगळु), डॉ. बि. बि. पुजार, श्री जि. के. जोशि, सौ. सुषमा अग्निहोत्री, डॉ. सौ. अचला

कुलकर्णी, श्री अशोकराव आद्य, श्री विश्वनाथ शास्त्रि ति. नरगुंद, यांनी विविध कामांना हातभार लावला. त्यांचे उपकार विसरणे शक्य नाही. श्री निंबरगि महाराजांचे नातू श्री नागप्प हे श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचे शिष्य होते. या आपल्या गुरुबंधूकडून गुरुदेव अनेक घटनांची अचूकता पडताळून घेत. कोणत्याही गोष्टीची नागप्पांकडून मिळालेली माहिती किंचितही तिखटमीठ न लावलेली असणार अशी गुरुदेवांची खात्री होती. श्री नागप्प यांचा आवाज फार सुरेल असून, पोथी-वाचन, पदे म्हणणे, भजन रंगवणे वगैरेंत ते निष्णात होते. पदे लिहिलेली नागप्पांची एक वही असे; तिच्यात कन्नड, मराठी, हिंदी पदे लिहिलेली असत. अनुभवपदे, नीतीची पदे असे नागप्पांनी पदांचे आणखी वर्गीकरण केले होते. या वहीतील पदे जरूर लागेल तेव्हा गुरुदेव मागवून घेत. ८०–९० वर्षांपूर्वीची ही वही नागप्पांचे चिरंजीव श्री गुरुसिद्धप्प यांच्याकडे पाहावयास मिळाली. या वहीतील एका पदाचा ब्लॉक या पुस्तकात घालण्यास परवानगी दिल्याबद्दल श्री गुरुसिद्धप्प यांचे आमच्यावर ऋण आहे. साधक बंधुभगिनींचा नामोल्लेख केला नसलातरी त्यांच्या आधाराची जाणीव मनात सतत आहे.

सोलापूर
गुरुदेव रानडे जयंती
३ जुलै १९९१

सौ. सुनंदा शिंत्रे
सौ. अश्विनी जोग

निवेदन

सत्-चित्-आनंद असे निजस्वरूप असलेला मनुष्यप्राणी अज्ञानाने व्यवहारात अडकला आहे, हे तत्त्वज्ञान एकदा स्वीकारले म्हणजे आपली मूळ स्थिती पुन्हा प्राप्त करणे हीच त्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे हे ओघानेच येते. अपूर्णाकडून पूर्णाकडे जाण्याची एक अनोखी ओढ माणसाला असते. असतो मा सद्गमय ही त्याच्या अंतर्मनातली हाक त्या ओढीला साक्ष आहे. शाश्वत तत्त्वाकडे माणसाला नेणारी वाट परमार्थपथ किंवा परमेश्वरप्राप्तीचा मार्ग म्हणून ओळखली जाते. ही वाट प्रत्येकाला एकट्यानेच तुडवावी लागते. ती बहुशः खाचखळग्यांची व काट्याकुट्यांची असलीतरी मळलेली आहे. जगातील असंख्य साधुसंतांनी अनादी कालापासून तीवर यात्रा केली आहे व आपल्या पाऊलखुणा मागच्या लोकांसाठी ठेवल्या आहेत. या रस्त्यावर बराच प्रवास झाला की तेजाची उधळण, सुगंधाचा दरवळ, नादाचा झंकार अथवा अमृताचा स्वाद यांच्या पाणपोया लागतात. परंतु आपल्या मूळ घराचा पूर्ण विसर पडलेला माणूस सहजासहजी या वाटेकडे वळत नाही, उलट आयुष्यातील बरे-वाईट प्रसंग त्याला तिकडे खेचेपर्यंत तो निर्धास्त राहतो. असे प्रसंग किंवा कारणे कोणती? परमार्थपथावर पायपीट करताना साधकाची कशी परवड होते? बरोबर कोणती शिदोरी लागते? मार्गावर लागणारे मैलाचे दगड कोणते? त्याला हाती धरून कोण चालवते? या वाटचालीची परिणती कशात होते? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानात मिळतात. संतांनी याबद्दल काढलेल्या उद्गारांच्या नोंदी जगातील प्रत्येक भाषेतील साहित्यात आहेत.

सर्व संतांचे अनुभव व अनुभवांचा शाब्दिक आविष्कार यात कमालीचे साम्य आढळते. तरीही प्रत्येक भाषा व प्रत्येक प्रांत यांची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी भिन्न असल्याने त्या त्या ठिकाणच्या साहित्यात तिचे प्रतिबिंब दिसते. म्हणून त्या साहित्यात पुन्हा पुन्हा दिसणाऱ्या काही संकल्पनांचा स्थूलमानाने तरी परिचय हवा. प्रस्तुत संग्रहात भक्तिमार्गावरील पदे जशी घेतली आहेत तशीच हठयोगावरीलही

आहेत. मराठी संतवाणी पचवलेल्या वाचकांचा नवविधा भक्ती व त्या ओघाने आलेले विषय यांच्याशी दृढ परिचय असतो. (१) मनुष्याला परमार्थ मार्गावर वळवणाऱ्या प्रेरणा, (२) त्या मार्गावर प्रगती होण्यासाठी अत्यावश्यक असणारी नैतिक तयारी म्हणजे दुर्गुणत्याग व सद्गुणसंपादन याचा विचार, (३) सद्गुरूंचे या संदर्भातील स्थान, सद्गुरूंची लक्षणे व कार्य, (४) प्रत्यक्ष वाटचाल म्हणजे ध्यानप्रक्रिया व नामाचे महत्त्व आणि (५) साधनाची परिणती किंवा विविध पारमार्थिक अनुभव व त्यांचा साधकावर होणारा परिणाम, अशा पाच पायऱ्या भक्तिमार्गात अनुस्यूत आहेत. या पाच पायऱ्या म्हणजे गुरुदेव रा. द. रानडे यांनी दिलेली साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानातील पंचसूत्रीच आहे. संतसाहित्याच्या अभ्यासकांना हे नव्याने सांगायला नको. अर्थातच कन्नड साहित्यातील भक्तीचा गौरव करणारे दासकूटातील संतांचे बोल मराठी वाचकाला घरगुती संवादाप्रमाणे वाटतील. पण हठयोगाची गोष्ट तशी नाही. हठयोगाची भाषा सुरू झाली की सशाच्या पाठोपाठ बिळात शिरून आश्चर्यमय जगात प्रवेश करणाऱ्या ॲलिसप्रमाणे आपणही एका विलक्षण जगात शिरतो. बागेच्या दरवाजाची टेबलावर असलेली सोनेरी किल्ली ठेंगू झालेल्या ॲलिसच्या हाती न लागल्याने दरवाजाच्या आतल्या नंदनवनात तिला प्रवेश मिळाला नाही. आपली तशी गत होऊ नये म्हणून हठयोगविषयक पदांच्या अंतरंगात प्रवेश करण्यापूर्वी हठयोगाच्या परिभाषेची किल्ली हातात मिळवली पाहिजे. हठयोगाची आनुभविक बाजू सर्वच अनुभवांसारखी व्यक्तिनिष्ठ असून तिथे 'ज्याची त्याला पदवी इतरां न साजे' हाच नियम असतो. घटकाभर अनुभव बाजूला ठेवून फक्त हठयोगाचे वर्णन समजावून घेणे इतकाच माफक उद्देश ठेवलातरी काही प्राथमिक कल्पनांचा अर्थ कळणे आवश्यक आहे. हठयोगाचे वर्णन हे एक शब्दशिल्प आहे. अभिजात शिल्पशास्त्रात – किंबहुना सर्वच शास्त्रांत – विशिष्ट अर्थ सांगणारे आणि विशिष्ट संदेश देणारे काही संकेत असतात. ते कळले नाहीत तर परवलीचा शब्द विसरल्याची गत होते. अशा केविलवाण्या परिस्थितीत अनभिज्ञ माणसाच्या लेखी, जीव ओतून खोदलेले शिल्प व जात्याला लावलेली टाकी एकच! हठयोगाची परिभाषा समजली नाहीतर असेच होणार. पदांचा फक्त सकृद्दर्शनी दिसणारा अर्थच लक्षात घेतला जाईल. इडा-पिंगळा-सुषुम्ना यांचा संगम हा गाबचा तिठा बनेल आणि योगी लोकांनी दीर्घकाळ खडतर साधन करून मिळवलेली अनुभवरत्ने कवडीमोलाने तोलली जातील. हठयोगाचे तपशीलवार वर्णन देण्याची महत्त्वाकांक्षा मात्र इथे बाळगलेली नाही, कारण त्या विषयाचा सखोल अभ्यास नाही. पदांच्या अर्थाचा मागोवा घेता यावा म्हणून ढोबळमानाने खालील माहिती दिली आहे. त्यात त्रुटी आहेत, त्याबद्दल वाचकांनी क्षमा करावी.

हठयोग. योगशिखोपनिषद्, योगकुंडल्युपनिषद्, ध्यानबिंदूपनिषद्, घेरंड ऋषींची घेरंडसंहिता, गोरक्षनाथांची सिद्धसिद्धान्तपद्धति, स्वात्मारामस्वामींची हठयोगप्रदीपिका

हे हठयोगावरील प्रमुख ग्रंथ आहेत. आसनमुद्रादी क्रियांचे वर्णन करणारे इतरही छोटे मोठे ग्रंथ आहेत. हठात् (अकस्मात् किंवा शक्तिपूर्वक या दोन्ही अर्थी) मोक्षद्वार खुले होणे म्हणजे हठयोग असे मानले जाते. पतंजलींनी योगाची व्याख्या चित्तवृत्ति-निरोध अशी केली आहे. चित्तवृत्तींचा निरोध अनेक उपायांनी साधता येतो. त्या सर्वांत प्राणजयाला हठयोगाने महत्त्वाचे स्थान दिले आहे. प्राणजय करून मनोलय साधणारा योगविशेष म्हणजे हठयोग. हठ या शब्दात दोन अक्षरे आहेत. गोरक्ष-नाथांच्या सिद्धसिद्धान्तपद्धतीत हठयोगाचे लक्षण दिले आहे :—

हकारः कीर्तितः सूर्यः ठकारश्चंद्र उच्यते।
सूर्यचंद्रमसोर्योगात् हठयोगो निगद्यते ॥

(हकार म्हणजे सूर्य, ठकार म्हणजे चंद्र. जिथे ह व ठ किंवा चंद्रसूर्यांचे मिलन होते तो हठयोग). चंद्रसूर्य म्हणजे इडा व पिंगला या नाड्या. यांचे एकत्र येणे, प्राण व अपानयांचे ऐक्य होणे यांचा हठयोगात अंतर्भाव होतो. हठयोगात प्राणजय हे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याने शारीरिक क्रियांवर अधिक भर असणे ओघाने येते. शरीरावर ताबा मिळवण्यासाठी अत्यंत कष्टदायक मार्गांचे अवलंबन सांगितलेले आढळते. इतके की हठयोग म्हणजे शरीरदंडनाचा मार्ग अशी सामान्यतः समजूत झालेली आहे. प्राणाचा जय प्रथम जबरदस्तीने केला जातो. त्यासाठी विविध आसने, बंध किंवा मुद्रा यांची पद्धतशीरपणे योजना आखलेली आहे. या विधींनी शरीर रोगमुक्त होते. या बाबतीत हठयोग व राजयोग या दोन्हींत बराच फरक दिसतो. "शरीरांतील सर्व विकृति नाहींशा होऊन पूर्ण आरोग्य प्राप्त झाल्यावर अष्टांगयोगाचा अभ्यास सुकर होत असतो... विकृत अवयवांस व्यायाम घडून त्यांची विकृति नाहींशी व्हावी आणि ते अवयव सुदृढ आणि निरोगी व्हावेत हाच हठयोगातील आसनांचा मुख्य हेतु असतो."[1] राजयोगात आसनांबद्दल बरीच सवलत आहे. "अष्टांगयोगाचा मुख्य भर चित्ताची एकाग्रता संपादन करून पुढें वृत्तिनिरोध करणें यावर आहे. हें साधण्याला आसन सुखकर असणें आवश्यक असतें, आणि तें आसन शरीर आणि मन ह्यांना स्थिरता प्राप्त करून देणारेंहि असावें लागतें. त्यामुळें योगाभ्यासाला अमुक आसन घालावें असें कांहीं न सांगतां ज्या योगानें शरीर आणि मन ह्यांना स्थैर्य आणणें सुलभ होईल असें कोणतेंहि आसन या कामीं विहित होय असें या सूत्रानें[2] सूचित केलें आहे."[3]

---

१ कृ. के. कोल्हटकर, पातंजलयोगशास्त्र, पृ. २९४
२ योगसूत्र २.४६
३ कृ. के. कोल्हटकर, पातंजलयोगशास्त्र, पृ. २९५.

यावरून कुणीही अशी समजूत करून घेऊ नये की हठयोग व राजयोग (अष्टांग-योग) ह्यांत मूलभूत फरक आहे. हठयोगात प्राणजयातून मनोलय साधला जातो. राज-योगात परमेश्वराचे ध्यान करून किंवा जपाच्या अभ्यासाने चित्ताची एकाग्रता संपादन केली जाऊन मनोलय साधला जातो, पण त्याचबरोबर प्राणलयही आपसुकच होत असतो हे विसरून चालणार नाही. दोन्ही एकमेकांना पूरक आहेत.

प्लेटोच्या गॉर्जिअस नावाच्या संवादात Soma (शरीर) व Sema (थडगे) या शब्दांवर काहीसा श्लेष करून, शरीर हे थडगे असून आत्म्याला त्यात पुरले आहे, असा एक उल्लेख आला आहे. ह्या कल्पनेचा उगम पायथागोरस व ऑरफिक गूढ धर्ममतात (Orphic mystery religion) सापडतो. या दोन्हींचा प्लेटोच्या मनावर फार परिणाम झाला होता हे गुरुदेवांनी नमूद केले आहे. गॉर्जिअसमधील वरील मतात शरीराच्या लाडाला स्थान नाही. शरीरातून आत्मा मुक्त होणे महत्त्वाचे आहे. याउलट शरीराला अनेक विचारवंतांनी आत्म्याचे देऊळ म्हटले आहे. देहवे देगुलवय्य असे बसवेश्वर म्हणतात, तर जितकी शरीरे आहेत तितकी आत्म्याची देवळे आहेत असे रामदास म्हणतात. ह्या देवळाचे लाड करणे योग्य नसेल पण ते स्वच्छ व शुद्ध ठेवणे अगत्याचे आहे. ज्या शरीराकडून साधन करून घ्यावयाचे, त्याचे आरोग्य उत्तम राखल्यास साधन सुकर होत असल्याने शरीरशुद्धी महत्त्वाची आहे हे उघडच आहे. अर्थातच शरीरशुद्धी व देहदार्ढ्य संपादणाऱ्या हठयोगाला पूर्ण टाकाऊ समजणे रास्त नाही. हठयोगाचा योग्य उपयोग करून घेण्यावर काही आक्षेप घेण्याचे कारण नाही. श्री भाऊसाहेब महाराजांनी आपल्या पत्रात हठयोगप्रदीपिकेतील एका श्लोकाचा उल्लेख केला आहे.[1] मात्र हठयोग साधणे हेच सर्वस्व न मानता त्यापलीकडे जाणे महत्त्वाचे आहे. या संदर्भात Hathayoga is a good servant but a bad master (हठयोग हे साधन म्हणून ठीक आहे पण त्याच्या आधीन होता कामा नये) हे श्रीगुरुदेवांचे मत लक्षणीय आहे.

'सर्वे हठलयोपाया राजयोगस्य सिद्धये'[2] (हठयोगात सांगितलेले लयाचे सर्व उपाय राजयोगाच्या सिद्धीसाठी आहेत) किंवा 'केवलं राजयोगाय हठविद्योपदिश्यते'[3] (हठयोगाचा उपदेश राजयोगासाठीच आहे) असे स्वात्मारामस्वामींनी स्वतःच म्हटले आहे. हठयोगप्रदीपिकेवरील ब्रह्मानंदांच्या ज्योत्स्ना या टीकेतही स्पष्ट म्हटले आहे की हठयोगाचे मुख्य फल राजयोग असून केवल सिद्धी मिळवणे हे नाही. राजयोगाचे उद्दिष्ट कैवल्य असल्याने हठयोगाचे अंतिम उद्दिष्ट पर्यायाने कैवल्य हेच ठरते. प्राण-

---

१ श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांची जावक पत्रे व टिपणे, पृ. ७८
२ हठयोगप्रदीपिका, ४.१०३
३ तत्रैव, १.२

जयातून मनोलय साधला म्हणजे अद्वैतानुभव उरतो असे हठयोगप्रदीपिका म्हणते. तत्पदमेति वस्तु परमम्[१] (तो परमवस्तूप्रत पोचतो). द्वैतं नैवोपलभ्यते[२] (द्वैत उरत नाही). मनसो विलये जाते कैवल्यमवशिष्यते[३] (मनोलय झाला की फक्त कैवल्य उरते). तद्विष्णोः परमं पदम्[४] (हे श्रीविष्णूचे परम पद आहे). या व अशाच उल्लेखांवरून अद्वैतानुभूती हे हठयोगाचेही अंतिम साध्य आहे हे स्पष्ट होईल. हठयोग-प्रदीपिकेच्या अखेरी अखेरीस नादानुसंधानावर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. अतः हठयोगाची उडी नाडीशुद्धीच्या म्हणजे शरीरशुद्धीच्या पलीकडे जात नाही असे म्हणणे अन्यायाचे ठरेल.

बहुशः प्रत्येक वीरशैव संतकवीच्या पदात हठयोगाचा उल्लेख असतो हे कसे? याला उत्तर म्हणजे शिवयोग हे वीरशैव तत्त्वज्ञानाप्रमाणे परमसाध्य असून मंत्रयोग, लययोग, हठयोग व राजयोग हे चार त्याचे आधारस्तंभ आहेत. मंत्रयोग इष्टदेवतेच्या प्रीत्यर्थ, लययोग मनाचे चांचल्य कमी करण्यास, हठयोग शरीरशुद्धीसाठी व राजयोग बुद्धीच्या मार्गाने जाऊन बुद्धीच्या पलीकडे जाण्यास योजिले जातात. म्हणून शिवयोगी हठयोग सांगतात यात आश्चर्य नाही. यौगिक प्रक्रियांचे हुबेहूब चित्रण करणाऱ्या संतांनी हठयोगाचा पूर्वाभ्यास केला आहे हे उघड आहे. त्यांनी हठयोगावर प्रभुत्व मिळवून पुढे जे साधन केले त्याला त्यांचे उच्च पारमार्थिक अनुभव साक्ष आहेत. शिवाय केवळ देहदंडनाच्या मागे लागू नका अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. पण प्राथमिक उपयोग करून घेतलेला हठयोग आहे तरी काय, ही जिज्ञासा साहजिक असल्याने त्याचा एक स्थूल आराखडा पुढे दिला आहे.

(अ) षट्चक्रे.[५] हठयोगात ठराविक शब्दातच शरीराचे वर्णन केलेले असते. त्यात चक्रांचा उल्लेख येता जाता येतो. आपल्याला ज्ञानेंद्रियांमार्फत जगाचे ज्ञान होते व आपल्या प्रतिक्रिया आपण कर्मेंद्रियांमार्फत व्यक्त करीत असतो. शरीराच्या व्यापारांपैकी काहींवर आपल्या इच्छाशक्तीचे आधिपत्य चालते. आपण आपल्या इच्छेप्रमाणे डोळे उघडे ठेवतो, मिटतो, चालतो किंवा स्वस्थ बसतो. काहींवर आपला अर्धवट वाटा असतो. श्वास किंचित् काळ आपण दाबून धरू शकतो. इतर काहींवर म्हणजे हृदय, मूत्रपिंड किंवा अनेक अंतरिंद्रियांवर मात्र आपल्या इच्छाशक्तीचा सुतराम ताबा नसतो.

---

१ तत्रैव, ४.४१
२ तत्रैव, ४.६१
३ तत्रैव, ४.६२
४ तत्रैव, ४.१००
५ श्री. म. वैद्य, षट्चक्र-दर्शन व भेदन, या पुस्तकात या विषयाची शास्त्रोक्त चर्चा आहे. इथे त्याचा सारांश दिला आहे. जिज्ञासूंनी हे पुस्तक जरूर वाचावे.

हे सर्व व्यवहार मेंदू व त्यापासून निघालेले अगणित ज्ञानतंतू कसोशीने करत असतात. ज्या क्रियांवर इच्छाशक्तीचा अर्धवट ताबा आहे त्यावर पूर्ण ताबा मिळविणे व हळूहळू इच्छाशक्तीच्या ताब्यात नसलेल्या इंद्रियांच्या क्रियांवरही ताबा मिळवणे याला योगशास्त्रात फार महत्त्व आहे.

या व्यवस्थेखेरीज शरीरात एक स्वायत्त मज्जासंस्था (autonomous nervous system) असते. तीमधील ज्ञानतंतूंवर आपला मुळीच ताबा चालत नाही. हृदय, यकृत, फुफ्फुस वगैरेंसारख्या महत्त्वाच्या अवयवांकडे हे ज्ञानतंतू जातात. या व्यवस्थेचे शरीरात फार महत्त्व असूनही तिचे पूर्ण कार्य अजूनही शास्त्राला आकळलेले नाही. (मेंदूचेही पूर्ण कार्य कळलेले नाही हे शास्त्रज्ञ कबूल करतात). ही संस्था म्हणजे काही ज्ञानतंतूंच्या ग्रंथी (Ganglia) व त्यांची जाळी (plexuses) होत. ही पाठीच्या कण्याच्या पुढच्या बाजूस म्हणजे पोटाच्या आतील अंगास कमरेपासून मानेपर्यंत पसरली आहेत. ती विशिष्ट जागी असतात व त्यांत असलेल्या बारीक गाठींपासून सूक्ष्म ज्ञानतंतू महत्त्वाच्या ठिकाणी जातात. वैद्यकशास्त्रात सांगितलेल्या या ठिकाणांना योगशास्त्राच्या भाषेत षट्चक्रे म्हणावयास हरकत नाही. कारण या ज्ञानतंतूंचे कार्यक्षेत्र किंवा त्यांची दले यांचे दोन्हीकडचे वर्णन तंतोतंत जुळते. उदाहरणार्थ, योगशास्त्रान्वये मणिपुर या चक्रावर विष्णुदेवतेचे वास्तव्य मानले असून देहाचे रक्षण, पोषण ही कार्ये त्याच्याकडे आहेत. वैद्यकशास्त्रान्वये मणिपुरचक्र म्हणजे Solar plexus. यामधून निघालेल्या ज्ञानतंतूंचा ताबा अन्नपचन, शोषण, रसोत्पादन, प्रजोत्पत्ती व काही प्रमाणात श्वास व रुधिराभिसरण क्रियांवर चालतो. हे साम्य डोळ्यांत भरण्याजोगे आहे. तसेच आज्ञाचक्राची दोन दले योगात धरली आहेत व वैद्यकशास्त्रान्वये याच भागात दोन लांबट आकाराचे मज्जातंतूंचे भाग आहेत (Optic thalami). सर्वच चक्रांच्या दलांचे शरीरशास्त्र व वैद्यकशास्त्र यांच्या परिभाषेत वर्णन करता येते. असो. ही चक्रे साधारण कमलाकार असल्याने त्यांना कमल हीही संज्ञा आहे.

(१) मूलाधार चक्र (Pelvic plexus). गुद व जननेंद्रिय यांमध्ये असलेल्या शिवणीच्या ठिकाणी हे चक्र आहे. आसन घालून ताठ बसल्यावर शरीराच्या मध्यरेषेवर व बरोबर खाली हे येते म्हणून त्याला आधारचक्र म्हटले आहे. याला चार दले आहेत. याच्यावर ध्यान धरल्यास आरक्त वर्णाचा अनुभव येतो. या चक्राची अधिष्ठात्री देवता गणपती आहे. कटिप्रदेशातील क्रियांवर याचा ताबा असतो.

(२) स्वाधिष्ठान चक्र (Aortic plexus). लिंगस्थानाच्या पातळीत पाठीच्या कण्याच्या पुढील बाजूस हे असून मोठ्या शुद्ध रक्तवाहिनीचा (aorta) पोटातील जो भाग आहे त्याच्या पुढच्या अंगात असलेले ज्ञानतंतूंचे हे जाळे आहे. याला सहा दले आहेत. याचा वर्ण पीत असून अधिष्ठात्री देवता ब्रह्मा आहे. यातून बरेचसे ज्ञानतंतू मोठ्या आतड्याचा बराचसा भाग, गुदप्रदेश व अंडकोशाकडे जातात.

(३) मणिपुर किंवा नाभिकमल (Solar plexus or abdominal brain). याचे स्थान बेंबी. हे चक्र सर्वांत मोठे आहे. हे सूर्यासारखे तेजस्वी आहे. छाती व पोट यांतील पडदा (diaphram) याच्या पुढे हे पसरलेले आहे. याला दहा दले आहेत. या कमलाचा वर्ण नील असून देवता विष्णू आहे. पचन, शोषण, मूत्राशयासंबंधी क्रिया वगैरेवर ताबा.

(४) अनाहत चक्र किंवा हृत्कमल (Cardiac plexus). हे पृष्ठवंशरज्जूच्या (Spinal chord) छातीच्या भागातील जे बारा मणके आहेत त्यांतील पाचव्या व सहाव्या मणक्यांच्या पुढील अंगास असून त्याला बारा दले किंवा भाग आहेत. रंग धवल असून याची देवता शंकर आहे. हृदय व फुफ्फुस यावर ताबा असतो.

(५) विशुद्ध चक्र (Cervical plexus). हे कंठस्थानी असते. कंठामधील कॅरोटिड नावाच्या रोहिण्या व काही नीला किंवा थायरॉइड वगैरे महत्त्वाच्या ग्रंथींकडे यातून ज्ञानतंतू जातात. याला १६ पाकळ्या किंवा दले आहेत. याचा वर्ण धूम्र. जीवात्मा ही इथली देवता.

(६) आज्ञाचक्र किंवा अग्निचक्र (Optic thalamus). हे भ्रूमध्याचे ठिकाणी आहे. म्हणजे भ्रूमध्याला समांतर अशा मस्तकार्तील स्थानी आहे. याची दले दोन. ती म्हणजे ज्ञानतंतूंचे गड्डेच आहेत. त्यातून मेंदू, नेत्र वगैरे अवयवांकडे ज्ञानतंतू जातात. शरीराच्या बाह्य भागाकडून येणारे संदेश मेंदूकडे जाण्याच्या मार्गावरील हे एक स्टेशन आहे. इथे संदेश घेऊन पुढे पाठवले जातात म्हणून या चक्रावर ताबा मिळविल्यास बहुतेक शरीरव्यापारांवर ताबा मिळवल्यासारखे होते भ्रूमध्यदृष्टीला हठयोगात दिलेले महत्त्व सकारण आहे. नासाग्रदृष्टीने एकाग्रता लवकर होते असे मानसशास्त्राने आता सिद्ध केले आहे. या चक्राचा वर्ण शुभ्र व आत्मा हे दैवत. कधी कधी भ्रूमध्यामागील चक्राला आज्ञाचक्र असे संबोधून नेत्रांच्या जागी आणखी एक द्विदलचक्र मोजतात. तसेच मेंदूतील सहस्रार चक्र किंवा सहस्रार कमल असे आणखी एक धरून एकूण आठ चक्रे सांगतात.[1] परंतु षट्चक्रे या संज्ञेने वर दिलेली चक्रेच प्रधानतः गृहीत आहेत.

(आ) इडा-पिंगळा-सुषुम्ना. शरीरातील ७२००० नाड्यांपैकी या तीन मुख्य नाड्या. मूलाधार चक्रापासून निघून डाव्या नाकपुडीतून वारा वाहणारी नाडी म्हणजे इडा, चंद्र, गंगा किंवा शशी; तसेच उजव्या नाकपुडीतून वारा वाहणारी नाडी म्हणजे पिंगळा, सूर्य, यमुना किंवा रवी. इडा भगवती गंगा। पिंगला यमुना नदी ॥ असे हठ-योगप्रदीपिकेत म्हटले आहे.[2] इडा-पिंगला या स्वायत्त मज्जासंस्थेतील (Autono-

---

१ रा. ना. वेलिंगकर, ज्ञानेश्वरीचें शब्द-भांडार, पृ. १५३
२ ३.११०

mous nervous system) पाठीच्या कण्याच्या दोन्ही बाजूच्या नाड्या आहेत.[1] त्या पाठीतून पार खाली माकडहाडापर्यंत पोचलेल्या असून सामान्यतः मनुष्याचे ज्ञानसंपादन यांच्यामार्फत होते. बाह्य संवेदना यांच्यामार्फत मेंदूकडे पाठवल्या जातात व मेंदूचे संदेश यांच्यामार्फत इंद्रियांना जातात. इडा व पिंगला यांमधील पोकळीला सुषुम्ना म्हणतात.

सुषुम्ना शून्यपदवी ब्रह्मरंध्रं महापथः ।
श्मशानं शांभवी मध्यमार्गश्चेत्येकवाचकाः ॥[2]

(सुषुम्ना, शून्य, ब्रह्मरंध्र, महापथ, श्मशान, शांभवी किंवा मध्यमार्ग ह्या सर्व संज्ञा एकाच अर्थी वापरतात). हिला ब्रह्मनाळ, अमृतनाडी किंवा शिवधर्मनाळ असेही म्हणतात. सुषुम्नेचे एक टोक मूलाधारात असून दुसरे सहस्त्रारात असते. मनोलय साधण्यासाठी इडा-पिंगला या नाड्यांतून होणारे वायूचे स्पंदन थांबवून त्याचा सुषुम्नेत प्रवेश करवून त्याला स्थिर केले जाते. हाच निष्पंदभाव.[3] हठयोगात सुषुम्नेला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. ही मोक्षमार्गावर प्रतिष्ठित झालेली आहे व सर्व विश्वाचा आधार आहे असे योगशिखोपनिषद् म्हणते[4]. प्राणाच्या आधारे मनाचे संकल्पविकल्पादी व्यापार चालतात म्हणून मनोजयासाठी प्राणजय करण्यास हठयोग सांगतो.

(इ) कुंडलिनी. सुषुम्नेच्या मूलाधाराजवळील टोकाला कुंडलिनी शक्ती साडेतीन वेटोळी घेऊन निजलेली असते. " हिची साडेतीन वेटोळी म्हणजे प्रणवाच्या ३॥ मात्रा होत. अकार, उकार, मकार व अर्धमात्रा मिळून प्रणवाच्या साडेतीन मात्रा. यांनाच वेटोळी कल्पिली आहेत. ही वेटोळी क्रमाने सुटतात. म्हणजे एका एका मात्रेचा लय होत जातो...प्रणव हे ब्रह्माचे मूळ स्फुरण आहे म्हणून ही मूळमाया होय."[5] हिला कुटिलांगी, कुंडलिनी, भुजंगी, शक्ती, ईश्वरी, कुंडली, अरुंधती अशी पर्यायवाचक नावे आहेत.[6] सर्पिणी, नागिणी किंवा सर्पशक्ती असेही तिला संबोधतात. सामान्य मनुष्याच्या बाबतीत ही शक्ती बहुशः सुप्तच राहते. मनुष्याच्या वृत्ती स्वभावतः बहिर्मुख असतात. म्हणून कुंडलिनीला अधोमुख म्हटले आहे. अभ्यासाने तिला अंतर्मुख करावे लागते. योगाभ्यासाने प्राण वर खेचून हिला जागृत केले जाते. मग वलये सुटत जाऊन ती

---

१ R. D. Ranade, Pathway to God in Kannada Literature, P. 116
२ हठयोगप्रदीपिका, ३.४
३ तत्रैव, ४.४१
४ २.११९, ६.१३
५ श्री. म. वैद्य, षट्चक्र–दर्शन व भेदन, पृ. ८५
६ हठयोगप्रदीपिका, ३.१०४

सरळ होते व सुषुम्नामार्गाने वर जाऊ लागते. यालाच द्वार उघडणे किंवा कुंडलिनीचे उत्थापन म्हणतात. कुंडलिनी जागृत करणे हे हठयोगाचे एक मुख्य लक्षण आहे. मनोलयाच्या कोणत्याही अभ्यासाने, भक्तीच्या वेहोषीने म्हणजे चित्त पूर्ण एकाग्र झाले असता कुंडलिनीचे उत्थापन होते. षट्चक्रांना जोडणाऱ्या ज्ञानतंतूंतून व चक्रांच्या मध्यातून ती वर जाऊ लागते. यालाच षट्चक्रभेदन हे नामाभिधान आहे. साधकाला नाद-तेजरूपादी विविध अतींद्रिय अनुभव येऊ लागतात. ही शक्ती सहस्रार कमलात पोहोचेपर्यंत सर्व मात्रांचा लय झालेला असून ती परब्रह्मस्वरूपात लीन होते. सहस्रार कमलालाच ऊर्ध्वगिरी किंवा ऋषिगिरी म्हणतात.[1] सहस्रारस्थ परमशिवाबरोबर एकरस होऊन कुंडलिनी आनंदरसात बुडून जाते. या अवस्थेत सर्व कामनांची निवृत्ती होते असे म्हणतात. ही स्थिती महासुखाची दिवाळी असून तिचा आनंद बोलून दाखवता येत नाही.[2] कुंडलिनी जागृतीच्या अभ्यासाने योग्याचा कायापालट होतो. त्याचे अनुपम वर्णन ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात मिळते. शरीर कृश होणे, वदनावर प्रसन्नता येणे, डोळे निर्मल होणे, रोगजय, नाडीविशुद्धी वगैरे हठयोगाचे परिणाम सांगितले आहेत.[3]

(ई) पूर्वमार्ग –पश्चिममार्ग. उपरिनिर्दिष्ट मार्गाला ज्ञानेश्वरांनी एका अभंगात सोपा मार्ग म्हटले असून तिथे आधार, मणिपुर, अनाहत आणि अग्निचक्राचा उल्लेख करून अखेरीस सहस्रदळ व ब्रह्मरंध्राचा उल्लेख केला आहे. स्वाधिष्ठान व विशुद्ध चक्रांचा उल्लेख नाही. याखेरीज एक पश्चिममार्ग म्हणून सांगितला जातो व त्यात त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भम्ररगुंफा व ब्रह्मरंध्र अशी चक्रे सांगितली जातात.[4] यांची स्थाने ज्ञानेश्वरांच्या नावावर जे पंचीकरण आहे त्यात मिळतात. मुखात त्रिकूट, रसनेजवळ श्रीहाट, चक्षुस्थानी गोल्हाट; यांच्या त्रिअग्रावर औटपुण्यगिरी, श्रोत्रस्थानी भ्रमरगुंफा व सहस्रदळी ब्रह्मरंध्र.[5] इथे औटपुण्यगिरी असा एकत्र उल्लेख असला तरी 'काय सांगू या समर्थाची थोरी' या एका पदात पुण्यगिरी व औटपीठ असे वेगवेगळे उल्लेख आहेत व दोन्हींच्यामध्ये भम्ररगुंफेचा निर्देश आहे. पूर्व म्हणजे त्रिकूट आणि पश्चिम म्हणजे श्रीहाट व गोल्हाट असे गुरुदेवांनी एका ठिकाणी म्हटले आहे.[6] आत्ताच उल्लेखिलेल्या पदात पूर्वद्वाराने त्रिकूट पाहिले (पूर्वद्वारें त्रिकूट देखियेलें) असेच म्हटले असून मग पश्चिममार्ग पाहण्याचा (?) उल्लेख आहे (तेथुनि ऊर्ध्वपंथें पश्चिम-

---

१ R. D. Ranade, Pathway to God in Kannada Literature, P.16
२ पाहा, शं. दा. पेंडसे, ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृष्ठे २३२–२४४
३ हठयोगप्रदीपिका, २. ७८
४ शं. दा. पेंडसे, ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृ. ३८९
५ तत्रैव, पृ. ३९०
६ Pathway to God in Kannada Literature, P. 16

मार्ग पाहे). नंतर पश्चिमार्गातील श्रीहाट, गोल्हाट, भ्रमरगुंफा, औटपीठ ही चक्रे मोजली आहेत. शेवटी 'ब्रह्मदृष्टींत पावलों निजविश्रांत' अशी ओळ आहे. ब्रह्मरंध्र असा शब्द नाही. मध्येच एकदा अधिष्ठान येऊन जाते. असेही एक मत आहे की[1] ध्यानधारणादी मनोलयाचा राजयोगानुरूप अवलंब करणाऱ्यांचा प्राण विशुद्ध चक्रावरून पूर्वमार्गाने आज्ञाचक्रावर येतो व हठयोगाचा अवलंब करणाऱ्यांचा प्राण विशुद्धापासून पश्चिम मार्गाने श्रीहाट, गोल्हाट, भ्रमरगुंफा असा आज्ञाचक्रावर येतो. दोन्ही उपायांत आज्ञाचक्रावर प्राण येऊन मग तो सहस्रदल कमलात प्रवेश करतो.

(उ) ब्रह्मरंध्र. ज्ञानेश्वरांनी एका अभंगात ब्रह्मरंध्र हे नयनाचे शेजारी आहे असे म्हटले असले[2] तरी त्यांच्या नावावर जे पंचीकरण प्रसिद्ध आहे त्यामध्ये ब्रह्मरंध्राची जागा सहस्रदलात आहे असे म्हटले आहे.[3] ब्रह्मरंध्र या शब्दाचा अर्थ प्राण शरीर सोडून जाताना ज्या रंध्रातून जातो ती मस्तकातील जागा असा कोशामध्ये दिला आहे. ब्रह्मरंध्रालाच दशमद्वार (शरीराला बाहेर उघडणारी नऊ द्वारे आहेत हे सर्वश्रुत आहे) म्हणतात. 'जाय हंस पच्छिम दिसा खिरकी खुलवावो' असा कबीरांनी 'अजर अमर इक नाम है' या पदात ब्रह्मरंध्राचा खिडकी म्हणून उल्लेख केला आहे. त्रिवेणी-संगम या कल्पनेने इडारूपी गंगा, पिंगलारूपी यमुना व सुषुम्नारूपी सरस्वती तिथे एकत्र येतात, असे कबीर या पदात सुचवितात. या संगमाला शिवतीर्थही म्हणतात. कुंडलिनी सहस्रारात स्थिर होऊन परमात्म्यात विलीन होते. हेच ऐक्य. हेच जीवात्मा व परमात्मा यांचे सामरस्य.

ब्रह्मरंध्राच्यावर एक शिंशुमारचक्र असते असे सांगितले जाते हे परम प्रकाशमय असते. योगारूढ अवस्थेला जे पोचतात त्यांना तुरीयावस्थेत याचा अनुभव येतो.

(ऊ) हठयोगातील आणखी काही संज्ञा. सुषुम्नेतून कुंडलिनी मस्तिष्कापर्यंत गेल्यावर चौरस्ता लागतो त्याला शृंगाटक म्हणतात. एक रस्ता पुढच्या बाजूस, दुसरा मागच्या बाजूस व उरलेले दोन दोन्ही बाजूंना फुटतात. चार रस्त्यांच्या मध्यभागी असणाऱ्या जागेला वेदिका म्हणतात. वेदिकेलाच पीठ, पीठिका, सदर, अवनी, त्रिकूट हीही नावे आहेत.[4]

या संग्रहातील पदात आणखी काही संकल्पना व स्थाननिर्देश वारंवार येतात. त्यांचीही तोंडओळख सुरुवातीस झाल्यास पदे समजणे सुलभ जाईल.

---

१ श्री. म वैद्य, षट्चक्र–दर्शन व भेदन, पृष्ठे ३६–३७
२ शं. दा. पेंडसे, ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृ. ३८८
३ तत्रैव, पृ. ३९०
४ R. D. Ranade, Pathway to God in Kannada Literature, P. 111 P. 118

शून्य. वीरशैव संतांच्या शब्दभांडारात शून्य या शब्दाला अग्रपूजेचा मान आहे. शून्य म्हणजे निराकार ब्रह्म. शून्य म्हणजे अभाव नव्हे. बौद्ध तत्त्वज्ञान अभाववाची म्हटले जाते खरे, पण त्यातही सद्वस्तू मानली आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. परमात्मा हा शून्यमहाशून्याच्या पलीकडे आहे व वर्णनातीत आहे असा योगातला शेवटचा अनुभव आहे.[१] शून्य हा शब्द नाथपंथात विशेष प्रचलित असून हठयोगप्रदीपिका या नाथपंथाच्या ग्रंथात परात्पर सत्य या अर्थी हा शब्द अनेकदा योजला जातो. सुषुम्ना नाडीला हठयोगप्रदीपिकेत[२] शून्यमार्ग म्हटले आहे. परंतु शून्य शब्द अशून्याला सापेक्ष असल्यानें परमतत्त्वाचे शून्य हे वर्णनही खालच्या पायरीवरचे आहे. अंतिम तत्त्व हे 'आहे', 'नाही', 'दोन्ही आहे', 'दोन्ही नाही' अशा चारी तार्किक कोटींच्या पलीकडे (चतुष्कोटिविनिर्मुक्त) असल्याने त्याला शून्याच्या पलीकडचे असे म्हणावे लागते. परतत्त्वाचे वर्णन शून्यापलीकडचे असे ज्याप्रमाणे करता येते, तसेच परतत्त्व सर्वत्र आहे हा सिद्धान्तही सर्वच शून्य आहे म्हणून सांगता येतो. शून्याला कशातच बांधता येत नाही. ते शब्दाला व्यापून दशांगुळे उरते. सर्वं खलु इदं ब्रह्म[३] हाच तो सिद्धान्त. प्रभुदेव किंवा अल्लमप्रभु या श्रेष्ठ वीरशैव संतांना त्यांचे गुरू अनिमिषदेव यांचे दर्शन कसे झाले त्याचे वर्णन पाहा :–[४]

> "ऊर्ध्वशून्यं अधःशून्यं मध्यशून्यं निरामयम्
> सर्वशून्यं अनाभासं समाधिस्तस्य लक्षणम्"।

(वर शून्य, खाली शून्य, मध्ये शून्य, निष्कलंक, सर्वत्र शून्य, आभासरहित असणे हे समाधीचे लक्षण आहे) हा सिद्धान्तच जणू मूर्त रूप घेऊन गुहेत स्वस्थ पद्मासनावर बसला होता. अमृतलिंग हातावर घेऊन बसलेल्या तेजःपुंज व वर, खाली, मध्ये, सर्वत्र परमेश्वराचा अनुभव घेतलेल्या ध्यानावस्थित अनिमिषदेवांचे प्रभुदेवांना दर्शन झाले. अनिमिषदेवांचे येथील वर्णन 'फळलें भाग्य माझें' या आरतीतील साक्षात्कारी पुरुषाच्या वर्णनावरहुकूम आहे. आत्मा एव अधस्तात्, आत्मा उपरिष्टात्...आत्मैवेदं सर्वमिति[५] (आत्माच खाली, वर...सर्वत्र भरलेला आहे. जे आहे ते सर्व आत्माच आहे) या उपनिषदातील वर्णनाची ही प्रतिरूपे आहेत. ऐक्याच्या अवस्थेला कमलसिंहासनावर किंवा शून्यसिंहासनावर बसणे अशी संज्ञा आहे.

---

१ शं. दा. पेंडसे, ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, पृ. ३९१ पासून पुढे
२ ३.४
३ छांदोग्य उपनिषद्, ३.१४.१
४ शून्यसंपादने, खंड १, पृ. ७८
५ छांदोग्य उपनिषद् ७.२५.१

बयलु. कन्नड संतवाङ्मयात पुन्हा पुन्हा येणारी आणखी एक संकल्पना म्हणजे बयलु. बयलु म्हणजे आकाश किंवा शून्य, निर्बयलु म्हणजे निराकाश, किंवा निःशून्य. 'बयलिगे बयलु निर्बयलु' हा वाक्प्रचार वीरशैव साहित्यात गजेंद्राच्या ऐश्वर्याने मिरवितो. याचा शब्दशः अर्थ म्हणजे 'आकाशाचे आकाश म्हणजे निराकाश'. आपल्या आकाशाच्या पलीकडे दुसरे आकाश आहे (बयलिगे बयलु). याही पलीकडे असणारे ते निराकाश (निर्बयलु). निरंजन, निज, घन, निर्वाण, परा, निराल, निरालंब, निर्बयलु या सर्वच शब्दांनी अंतिम तत्त्वाचा निर्देश होतो. त्याला कोणतेही नाव द्या. इथे अभावाची सूचना नाही, इतकेच नव्हे तर आनंदमयत्व आहे.[१]

श्रीशैल पर्वत व कदलीवन. श्रीशैल हे आंध्रप्रदेशातील एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे. बारा ज्योतिर्लिंगांत श्रीशैलावरील मल्लिकार्जुनाची गणना आहे. आद्य शंकराचार्यांनी तिथे तपश्चर्या केली. गोरक्षनाथ व प्रभुदेव यांची भेट श्रीशैल पर्वतावर झाली. प्रभुदेव व अक्क महादेवि हे दोघेही या पर्वतावरील कदलीवनात शिवरूपात विलीन झाले असा इतिहास आहे. साहजिकपणेच वीरशैव संतकवींचे एका जननांतरसौहार्दाने या स्थानांशी नाते जडले आहे. या जागा तपस्वी जनांना निरंतर वाहत असतात. कदलीवन म्हणजे घोर संसार-अरण्य असा रूपकात्मक अर्थही केला जातो. कदलीवनात भवहराचे (संसारनाश करणाऱ्या परमेश्वराचे) दर्शन झाले असे अक्क महादेवींनी म्हटले आहे.[२] या कदलीवनातून म्हणजे विविध उलाढालींनी भरलेल्या व्यवहारातून मनुष्याला मार्ग काढावा लागतो व ते ओलांडल्यावर मल्लिकार्जुनाचे दर्शन होते.[३]

नाथपंथी संत व पुष्कळसे वीरशैव संत योगी होते. या दोन्ही पंथांचे तात्त्विक गोत्र एकच आहे. संतांचा उल्लेख दोन्ही प्रकारांनी केला जातो. उदाहरणार्थ रेवणनाथ किंवा रेवणसिद्ध. हठयोगप्रदीपिकेत अल्लमप्रभूंचे नाव आलेले आहे.[४] गोरखनाथ व अल्लमप्रभु यांची प्रत्यक्ष भेट झालेली आहे.[५] दोन्ही पंथांत सिद्धान्तांची देवाणघेवाण आहे. पारिभाषिक संज्ञांचा समानार्थी वापर आहे हठयोगाबद्दल विलक्षण आस्था आहे. हे दोन्ही शैव पंथ शतकानुशतके गुण्यागोविंदाने शेजारी शेजारी नांदले. यौगिक कल्पनांनी

---

१ R. D. Ranade, Pathway to God in Kannada Literature, Pp. 18-19

२ शून्यसंपादने, खंड ४, पृ. ३३८

३ तत्रैव, पृ. ४०५

४ १.८

५ गोरक्षांचे गर्वहरण करून त्यांना प्रभुदेवांनी निजमार्ग दाखवला हा उल्लेख शून्यसंपादने खंड ५, पृ. ३८७ वर आहे. आणखी पाहा, गुरुमाऊली, संपादक, रा. चिं. ढेरे, १९८९, पृ. ११७–१२७

तत्कालीन वातावरण सांद्र झाले होते आणि परिणामतः त्यावर पोसल्या गेलेल्या संत-कवींच्या भाषेत अतोनात साम्य उदयाला आले. वीरशैव कवींनी हटयोगाचा अभ्यास केला होता हे खरे. परंतु त्याच्या जोडीला ज्या वातावरणात ते वाढले, ज्याने त्यांचा पिंड जोपासला तिथल्या कल्पना सहजगत्या त्यांच्या जिभेवर नाचू लागल्या हेही खरे.

अशा विविध संकल्पनांची लेणी लेऊन कन्नड साहित्य संपन्न झाले आहे. आपल्या वाङ्मयकृतींतून कन्नड संतांनी आपले हृदय उकलून दाखवले आहे. कन्नड परमार्थ-सोपान या प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केलेल्या पदांबद्दल म्हणता येईल की त्यांतून या संतांचे पारमार्थिक अनुभव घणाघात करीत आपल्या अंतरंगात शिरतात. इथल्या शब्दांना वजन आहे, भावनांना भारदस्तपणा आहे, भक्तीला खोली आहे, अनुभवाला उंची आहे आणि आविष्कारात प्रामाणिकपणा आहे. अस्थिमांसाचा गोळा चर्मात गुंडाळून वळलेला हा देह अनेक आडवाटांनी जाऊ शकतो हे दुःख इथे आहे, पण मानवी जन्म श्रेष्ठ असल्याने इथे साधन करून मुक्तीची जोड करता येते ही आशाही आहे. 'दिसो परतत्त्व डोळां' ही तळमळ आहे, नामस्मरण दृढ भक्तीने व गुपचूप करीत राहण्याचा आदेश आहे, तसेच संतांची खोडी काढली तर सर्वनाश चुकत नाही ही धोक्याची सूचना आहे. नामधारकाला नरक नाही हे आश्वासन इथे आहे, परमात्मा सर्वकर्ता असून चांगल्या-वाईटाचा धनी तोच आहे असा आग्रह आहे, कृपेच्या महतीचे रेखीव चित्रण आहे, कुशल शब्दमेळातून झिरपणारे जिवंत अनुभवांचे दर्शन आहे आणि ईश्वराचा अनुग्रह अंगभर पांघरून कृतकृत्य झाल्याचे धन्योद्‌गार आहेत.

प्रा. रानडे यांच्या 'पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर' या पुस्तकातील 'ए फिलॉ-सॉफिकल प्रिलिमिनरी' या पहिल्या प्रकरणाचा भावानुवाद इथे 'तात्त्विक पूर्वपीठिका' म्हणून दिला आहे. गुरुदेव असेपर्यंत इंग्रजी पुस्तकाचे काम पूर्ण झाले नव्हते. पुस्तका-साठी आणखी पदे त्यांनी काढून ठेवली होती आणि बहुधा त्यांचा उपयोग केला असता. कित्येक संतकवींची पदे इथे का नाहीत याला हे कारण आहे.

गुरुदेवांकडे असलेली पदे बहुशः मौखिक परंपरेतून आली होती. तेच पाठ प्रस्तुत ग्रंथात ठेवले आहेत. या पदांपैकी बरीचशी आता छापील पुस्तकांतून मिळू लागली आहेत. त्यात पाठभेद आहेत. तुका म्हणे किंवा कहत कबीर या धर्तीवर अनेक कवींच्या मुद्रिकाही मौखिक पाठात व छापील पाठात बदललेल्या दिसतात. आता मिळालेल्या छापील पाठांप्रमाणे मूळच्या पदात किरकोळ दुरुस्त्या केल्या. पण पाठात बराच फरक दिसला ते नवीन मिळालेले पाठ टिपणांत दिले आहेत. पदांपैकी काही लोकगीते असून ती छापलेल्या स्वरूपात कुठे मिळत नाहीत. परिणामतः एखादे पद अमक्याच कवीचे आहे असे छातीठोकपणे सांगता येत नाही. कधी कधी अर्थ नीट लागला नाही. त्यामुळे भावानुवादात चुका होणे अपरिहार्य होते. वाचकांनी क्षमा करावी. अनेक कवी अज्ञात आहेत व त्यांच्या चरित्राबद्दल हीच

कथा आहे. तरी वऱ्याच दिशांनी प्रयत्न करून व मित्रमंडळींची मदत घेऊन होतील तितक्या कवींची चरित्रे मिळवून ती परिशिष्ट ३ मध्ये दिली आहेत. उच्च पदवीला पोचलेल्या संतकवींचा त्रोटकसुद्धा इतिहास मिळू नये हे दुर्दैव आहे. या विषयावर खूपच अभ्यास होणे आवश्यक आहे. आणखी एका गोष्टीने यात भर घातली आहे. कवींच्या मुद्रिकांनी त्या त्या कवींची पदे ओळखण्यास मदत केली खरी, पण या मुद्रिकांनी इतरत्र घोटाळा वाढवण्यास हातभार लावला. संतकवींचे स्वत्व परमेश्वरात किंवा त्यांच्या सद्गुरूंमध्ये विलीन झाले होते. आपल्या नावाच्या दिंड्यापताका त्यांनी मिरविल्या नाहीत. म्हणून कित्येकदा कवी कोण ते कळत नाही. चिदानंद मुद्रिका असेलतर ते पद चिदानंद कवीचे म्हणता येईल. पण गुरुचिदानंद (प्र. १५ पद ७) असेल तर ते चिदानंदांच्या शिष्याचे असू शकते. अशी इतर कवींचीही पदे आहेत. त्यामुळे पद कोणाचे हे निश्चित सांगणे अशक्य आहे. गुरुलिंगजंगम अशी मुद्रिका प्र. ७ पद ७ इथे आहे. गुरुलिंगजंगम ही खरे तर निंबरगि महाराजांची मुद्रिका आहे पण निंबराग महाराजांची म्हणून गुरुदेवांनी जी तेरा पदे सांगितली आहेत त्यांत हे पद नाही. म्हणून ते स्वतंत्रपणे 'गुरुलिंगजंगम' या नावाखाली घातले आहे.

मूळ इंग्रजी पुस्तकामध्ये काही पदांचे विवरण आहे परंतु ती पदे कन्नड लिपीतील कन्नड परमार्थसोपानात नाहीत. अशांपैकी जेवढी पदे मिळू शकली तेवढी परिशिष्ट १ मध्ये घातली आहेत. गुरुदेवांनी या पदांना दिलेल्या इंग्रजी मथळ्यांचे कागद मिळाले नाहीत. त्यामुळे परिशिष्टात घातलेल्या या पदांना इंग्रजी मथळे नाहीत. वऱ्याच विषयांवर स्पष्टीकरणार्थ टिपणे लिहिणे जरूर आहे असे वाटले. तशी माहिती जमवून परिशिष्ट २ मध्ये शे-सव्वाशे नवीन टिपणे घातली आहेत.

कन्नड लिपीत ए व ओ यांचे प्रत्येकी ऱ्हस्व व दीर्घ असे दोन दोन स्वर आहेत. देवनागरीत ते लिहिण्याची सोय नाही. मुळातले ऱ्हस्व व दीर्घ दोन्ही स्वर कायम ठेवणे जरूर असल्याने पदांची सूची करताना आधी ऱ्हस्व एकाराची सर्व पदे घेऊन मग दीर्घ एकाराची घेतली आहेत. ओचेही तसेच. मराठी भाषेतील सूचीत गोपालदासराय (७.३) हे पद आधी व गोल्लरो नाबु (१४.३) हे पद नंतर येईल. परंतु कन्नड भाषेत गोल्लरोमधील 'गो' ऱ्हस्व असल्याने व गोपालमधील 'गो' दीर्घ असल्याने कन्नड सूचीत गोल्लरो नाबु हे पद आधी येते. या बाबतीत इतिहास म्हणून एका गोष्टीची नोंद करायला हवी. देवनागरी लिपी वापरूनही ए आणि ओ हे ऱ्हस्व व दीर्घ दोन्ही प्रकारांनी लिहिण्याची एक युक्ती कन्नड व मराठी उत्तम जाणणाऱ्या गुरुदेवांच्या निकटवर्तीयांनी काढली होती. ऱ्हस्व एकार व ओकार दाखवण्यास अक्षरावरील मात्रा उलटी म्हणजे मात्रेची गाठ खाली करून लिहावी व दीर्घ एकार व ओकार नेहमीप्रमाणे लिहावेत अशी ही कल्पना होती. उदाहरणार्थ गोल्लरोमधील गो ऱ्हस्व व गोपालमधील गो दीर्घ आहे. १९४५ साली प्रसिद्ध झालेल्या नित्यनेमावलीत शेवटी जे अनुभवशतक

छापले आहे त्यात कन्नड पदे या पद्धतीने लिहिली आहेत. यातील पृ. (१०) वरील शेवटची ओळ पाहा.

यारू इल्लद नोडि बेरेन्न करेदोय्दु।

इथे रे ऱ्हस्व व बे दीर्घ आहे तसेच दो ऱ्हस्व व नो दीर्घ आहे. या पद्धतीने कन्नड भाषा न जाणणाऱ्यांनाही मजकूर शुद्ध वाचणे शक्य होते. परंतु काही कारणांनी ही पद्धत सोडून दिली गेली. कन्नड भाषेत व्यक्तींची व गावांची इकारान्त नावे ऱ्हस्वान्त असतात. म्हणून कन्नड व्यक्तींची नावे (अक्क महादेवि, जोशि) व कर्नाटकातील गावांची नावे (काखंडकि, मानवि) ऱ्हस्वान्त लिहिली आहेत.

श्री बाबासाहेब संगोराम अथणि, यांच्या निधनाने संप्रदायाचे किती नुकसान झाले आहे हे भावानुवादाचे काम चालू असताना पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवले. आज ते असते तर पुष्कळ गोष्टींचा उलगडा झाला असता. सखोल साक्षेपी अभ्यास व गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक घटना, पाठभेद, तसेच नावाचा किंवा स्थलकालाचा निर्देश पडताळून पाहून मगच विधान करण्याची त्यांची सवय यांचे या ग्रंथाला अमोल साहाय्य झाले असते. आता त्यांचे मार्गदर्शन मिळणे नाही. असो.

कन्नड परमार्थसोपान हे साधकदशेचे सर्वांगीण चित्रण आणि घसघशीत पारमार्थिक अनुभव यांच्या ताण्याबाण्याने विणलेले एक वस्त्र आहे. मुलायम धागे व हलकेफुलके कलाकुसरीचे काम केलेली ही मलमल नाही तर तेजस्वी रंगांची उधळण असलेली व अस्सल सोन्याचे विणकाम केलेली भरजरी पैठणी आहे. ती नजरबंदी करते. आणि त्यातूनच आत्मानंदाची झलक आपल्या अनुभवास येते. हा अनुभव क्षितिजासारखा आहे. त्याला चार दिशा असतात पण पलीकडचा किनारा नसतो. त्यामागे धावताना ते मागे सरकते. सद्गुरुकृपेने एखाद्या क्षणी दूरवरून साद घालणारे हे क्षितिज साधकाच्या हातात गवसते. पण बघता बघता स्थल व काल यांच्या मर्यादांसकट हे क्षितिज नाहीसे होते व अथांग निर्विषयलुरूप अनंत आनंदमय परमतत्त्वात भक्त समरस होतो.

सोलापूर
गुरुदेव रानडे पुण्यतिथी
२१ जून १९९१

सौ. पद्मा कुलकर्णी



तिळियबेकु निजसुखद निलय (पृ. ४०) या पदाचे एक हस्तलिखित.
हे हस्ताक्षर श्री निंबरगि महाराजांचे नातू श्री नागप्पा यांचे आहे.

१ तात्त्विक पूर्वपीठिका

कन्नड साहित्यात पारमार्थिक अनुभवांच्या वर्णनाच्या ओघात अनेक ईश्वर-साक्षात्कारविषयक प्रमेये प्रकट झाली आहेत. त्यासंबंधीचे माझे विचार आपल्या-समोर मांडण्याची ही अमूल्य संधी मला दिल्याबद्दल कर्नाटक विद्यापीठाचा मी अत्यंत ऋणी आहे. १९२१ साली मैसूरहून परत येत असताना धारवाड येथे कर्नाटक कॉलेजमध्ये 'भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास' या विषयावर मी एक व्याख्यान दिले होते, त्याची मला या क्षणी आठवण येत आहे. मी त्या व्याख्यानाची टिपणे केली होती. सध्या कॉलेजमध्ये प्राध्यापक झालेला माझा एक विद्यार्थी माझे कागदपत्र चाळत होता; त्याला तो टिपणांचा कागद सापडला. तिथे मी नमूद केले होते की धारवाडला विद्यापीठ निघेल. वास्तविक धारवाडला विद्यापीठ निघेल असे म्हणणे त्या वेळी 'तरी हा कल्पनेतीत विचारु' म्हणण्यासारखे होते. पण आज ती गोष्ट प्रत्यक्षात उतरली आहे. इथे विद्यापीठ निघाल्याचा मला खरोखर हर्ष होतो.

विद्यापीठाच्या उपकुलगुरूंनी साक्षात्कारशास्त्राची नेमकी रूपरेखा आपल्यासमोर मांडली आहे. साक्षात्कार म्हणजे मनुष्यमात्राला एकत्र आणणारा एक जीवनयोग आहे. विविध तत्त्ववेत्त्यांनी आणि ख्रिश्चन, मुस्लिम, जैन, बौद्ध, वैष्णव किंवा लिंगायत या धर्मपंथांनी परमेश्वरप्राप्तीच्या मार्गाबद्दल जे काही सांगितले आहे तेवढ्याचाच अभ्यास करून आपले भागणार नाही. तात्त्विक विचार व धार्मिक आचार यांची छाननी करून त्यांच्या गंगोत्रीपर्यंत आपल्याला पोचायचे आहे. तेव्हा लक्षात येईल की मुळात या सगळ्यांचा आध्यात्मिक पाया एकच आहे. 'मिस्टिसिझम इन महाराष्ट्र' (१९३३) आणि 'पाथवे टु गॉड इन हिन्दी लिटरेचर' (१९५४) या दोन पुस्तकांत मी हेच मत मांडले आहे आणि कन्नड

संतांच्या परमार्थमार्गालाही ते सहीसही लागू आहे, हे मी आता दाखवणार आहे.

साक्षात्कार व त्याची लक्षणे

कन्नड साक्षात्कारशास्त्रावर धारवाड (१९५०), बेळगाव (१९५१) व दिल्ली (१९५४) या ठिकाणी तीन व्याख्याने मी दिली होती. पण कन्नड संतांकडून साक्षात्कारशास्त्राला जी भरीव देणगी मिळाली आहे, तीवर आणखी सखोल विचार करणे आवश्यक आहे. मला स्वतःच्या अपुऱ्या शक्तीची पुरेपूर जाणीव आहे. भाषाशास्त्रीय किंवा व्युत्पत्तिशास्त्रीय दृष्टिकोणातून या विषयाचे मोठमोठ्या विद्वानांनी केलेले विवरण घ्या त्या बाबतीत मी त्यांच्या पासंगालाही पुरणार नाही. पण गेली उणीपुरी चाळीस वर्षे मी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात घालवली आहेत आणि माझी एक ठाम भूमिका तयार झाली आहे. तदनुसार निष्पन्न होते की उपरिनिर्दिष्ट धर्मपंथच काय पण इतरही अनेक भिन्नभिन्न विचार-धारांचा समन्वय करता येण्यासारखा आहे.

साक्षात्काराच्या लक्षणांपासून मी सुरुवात करणार आहे. त्यावरून जगामधील साक्षात्कारशास्त्रीय विचारांच्या नकाशावरील कन्नड संतांचे स्थान तर निश्चित होईलच, शिवाय डोळ्यांत भरण्याजोगी जी उच्च पदवी त्यांनी गाठली आहे तिचाही प्रत्यय येईल. तौलनिक अभ्यासाच्या क्षेत्रात मी सध्या खोलवर शिरणार नाही. मी जे आपल्यापुढे मांडणार आहे त्यावरून तुलनेचे काम आपण स्वतःच करू शकाल. कन्नड संतांचे सिद्धान्त मी संक्षेपाने सांगणार आहे. मराठी व हिंदी संतांच्या अभ्यासाने माझे असे प्रांजळ मत झाले आहे की, कन्नड संतांची योग्यता या संतांपेक्षा तसूभरही कमी नाही. उलटपक्षी काही बाबतींत त्यांचे पारडे जडच आहे. माझ्या व्याख्यानांवरून या गोष्टी हळूहळू स्पष्ट होत जातील.

साक्षात्कार म्हणजे काय ? साक्षात्कारशास्त्र म्हणजे ईश्वरप्राप्तीचे किंवा पारमार्थिक अनुभवांचे शास्त्र, हे उपकुलगुरूंनी सांगितलेच आहे. साक्षात्काराला 'इंटुइशन'ची (ज्ञानदृष्टीची) आवश्यकता असते. ज्ञानदृष्टी म्हणजे काय ? ती बुद्धी, भावना, क्रियाशक्ती यांहून भिन्न कशी ? मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांची या तीन शक्तींशी चांगली ओळख असते पण ज्ञानदृष्टीबद्दल अनेकांना काही कल्पना नसते. कांटने इंटुइशन हा शब्द ऐंद्रिय अनुभव या अर्थी वापरला आहे, पण साक्षात्काराच्या

कोशातला या शब्दाचा रूढार्थ म्हणजे अपरोक्षानुभूती. सद्गुरूंकडून नाममंत्र घेऊन साधन केल्यावर, ती अधिक कार्यक्षम होते. याबाबतीत अनेक जाणत्यांशी व विद्वानांनी मी चर्चा केली. शरीरशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर ज्ञानदृष्टीचे लागेबांधे आंतरिक उद्दीपकांशी जुळलेले असतात. बाह्य उद्दीपकांचे तिला सोयरसुतक नसते. म्हणजेच पारमार्थिक अनुभव अंतःस्फूर्त असतात. इंद्रियांद्वारे येणाऱ्या अनुभवांशी इथे आपल्याला काही कर्तव्य नाही. अंतःस्फूर्त अनुभव, किंवा एकाग्रतेने देवाचे ध्यान करत असताना ज्ञानदृष्टीला येणारे अतींद्रिय अनुभव, हेच आपले लक्ष्य आहे. ज्ञानदृष्टी ही बुद्धी, भावना व क्रियाशक्तीच्या क्षेत्रात वावरत नाही. हृदेशात स्थित असणाऱ्या अंतरात्म्यापासून प्रेरित झालेले अनुभव इतकीच शरीरशास्त्राची झालर तिला आहे. या अनुभवांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे अतींद्रियत्व. आपले दैनंदिन व्यवहार ऐंद्रिय ज्ञानावर अवलंबून असतात; पण दिव्य अनुभव हे अतींद्रिय असतात. 'अंधळ्यानें देखिलें, बहिऱ्यानें ऐकिलें, पांगळ्यानें पाठलाग केला रे' असे त्यांचे एका मराठी संताने चित्रण केले आहे. 'बिनु पग चलै सुनै बिनु काना' (पाय नसताना चालतो, कान नसताना ऐकतो) असे तुलसीदास आणि 'अंधे कूं सब कुछ दरसाई' (अंधळा सर्वच पाहतो) असे सूरदास म्हणतात. कन्नड साक्षात्कारी संतांचे सांगणे याहून वेगळे नाही. एवंच ज्ञानदृष्टी, अंतःस्फूर्तता व अतींद्रियत्व ह्यांचा साक्षात्कारात अंतर्भाव होतो.

मानसशास्त्रीय, सत्ताशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीय लक्षणे

पारमार्थिक अनुभवांच्या मानसिक वैशिष्ट्यांत सातत्य हे प्रमुख आहे. साधकाला येणाऱ्या दिव्य अनुभवांत खंड पडता कामा नये. एखादा अनुभव सटीसामासी आला आणि पुन्हा आलाच नाही, पुन्हा पुन्हा येत राहिला नाही, तर त्याला पारमार्थिक अनुभव म्हणता येणार नाही. अनुभवात सातत्याबरोबर वाढही असते. एकदा अनुभव आल्यावर आपण तेवढ्यावर समाधान मानून आळसाच्या आहारी जाणे अनुचित आहे. अनुभव दिसामासाला, वर्षावर्षाला वाढायला हवा. या वाढीचे पर्यवसान क्रममार्गात म्हणजे कणाकणाने व क्षणाक्षणाने ईश्वराच्या जवळ जाण्यात होते. विशिष्ट वक्ररेषा (hyperbole) अनंत स्पर्शरेषेला (asymptote) कधीच मिळत नाही; ती जसजसा मार्ग आक्रमत जाते तसतसे तिच्यातील व अनन्तस्पर्श-

रेषेतील अंतर कमी कमी होत जाते. ती अनंतस्पर्शीरेषेला अनंत अंतरानेच मिळते. याच रीतीने साधक परमेश्वराच्या जवळजवळ जात राहतो. तो पूर्णत्वाला पोचतो की नाही कुणी सांगावे ? साडेपंधरा कसाच्या सोन्यात व सोळा कसाच्या सोन्यात जसा फरक राहतो, तसा कितीही श्रेष्ठ साधक असलातरी त्याच्यात व ईश्वरात किंचित का होईना फरक राहतोच असे ज्ञानेश्वर सांगतात. अर्थात या तात्त्विक चर्चेत मी आता शिरणार नाही. क्रमयोग किंवा अखंड वाटचाल हा पारमार्थिक अनुभवाचा आणखी एक विशेष आहे एवढे पाहिले की पुरे.

ही झाली मानसशास्त्रीय बाजू. सत्ताशास्त्राच्या दृष्टिकोणातून पाहिलेतर ज्या अनुभवात सार्वत्रिकता (universality) किंवा अवश्यंभावित्व (necessity) नाही, तो अनुभव सत्य (real) नाही हे कांटच्या अभ्यासकांना माहीत आहे. कांटच्या मते ज्यात सार्वत्रिकता व अवश्यंभावित्व आहे तो अनुभव वस्तुनिष्ठ (objective) असतो. सार्वत्रिकता, वस्तुनिष्ठता, अवश्यंभावित्व व सत्य यांत सुसंवाद आहे असे कांटने ठासून सांगितले आहे. ही सर्व लक्षणे पारमार्थिक अनुभवात दिसतात. साक्षात्कारी संतांनी प्रसंगोपात्त जगापुढे मांडलेल्या पारमार्थिक अनुभवांत विलक्षण सारखेपणा दिसतो. पण साक्षात्कारी संत सहसा आपले अनुभव बोलून दाखवत नसतो. आपल्या अनुभवाचा बावटा उभारण्यात काय तथ्य आहे ? लोकांना त्यात अतिशयोक्ती दिसेल, कुणा एखाद्याला नुसता शब्दगौरव आढळेल, तर याच्या डोक्यात काहीतरी बिघाड झाला आहे, असे म्हणण्यासही एखादा महाभाग धजावेल. Varieties of Religious Experience या आपल्या ग्रंथात विल्यम जेम्सने पारमार्थिक अनुभवांचे संकलन केले आहे. असे अनुभव एकत्र केले तर त्यात ढळढळीत साम्य दिसते.

पारमार्थिक अनुभवाची सर्वाधिक विश्वसनीय कसोटी पाहण्यासाठी आपल्याला ज्ञानशास्त्रातील चिद्वाद (Idealism), वास्तववाद (Realism) व अर्थ-क्रियावाद (Pragmatism) या तीन सिद्धान्तांकडे वळावे लागेल. पहिला सिद्धान्त सुसंगती (Coherence) ही कसोटी मानतो. दुसरा संवादीप्रवृत्ती (Correspondence) ही कसोटी वापरतो, तर तिसरा तुष्टी (Satisfaction) या कसोटीचा अवलंब करतो. तुष्टीचा विचार केला तर असे दिसते की एका बाजूला ती सुखवादातील (Hedonism) सुखकल्पनेशी संलग्न आहे, तर

दुसऱ्या बाजूला साक्षात्कारी पुरुषाच्या आनंदाशी जुडलेली आहे. एका ग्रंथात तत्त्वज्ञाने म्हटले आहे की, मूर्खाच्या पातळीवर राहून तिथले ऐंद्रिय सुख मिळवण्यापेक्षा सॉक्रेटिसच्या बौद्धिक पातळीवर राहावे, मग तिथले सुख पदरात न का पडेना. त्याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, सॉक्रेटिसच्या बौद्धिक पातळीवर समाधान मानण्यापेक्षा साक्षात्कारी संतांच्या आध्यात्मिक पातळीकडे डोळे लावावे. तिथला आनंद हातात आला नाही तरी हरकत नाही. साक्षात्कारी संतांच्या या आनंदाला आत्मानंद, ब्रह्मानंद किंवा परमानंद म्हणतात.

आत्मानंदवादामध्ये एक प्रकारचे दृढीकरण (catalepsia) दिसून येते. एका हाताचे एक बोट, पाच बोटे, उघडा तळहात, किंवा संपूर्ण हात दुसऱ्या हातात पुरतेपणी गुंतवून टाकणे म्हणजे दृढीकरण किंवा सर्वांगसमन्वितता (integration). ही साक्षात्कारात दिसून येते. पारमार्थिक वस्तूचे दर्शनस्पर्शनादी किंवा नादरसादी विविध अनुभव येतात व परिणामतः अनुभवांचे विविध इंद्रियांकडून दृढीकरण होते, यालाच स्टोइक तत्त्वज्ञ पकड घेणे (catalepsia) म्हणत. सर्व प्रकारचे अतींद्रिय अनुभव साकल्याने एकदम ग्रथित झाले की ते सत्याची पकड घेतात. सत्याची पकड घेणे, सत्याचे अचूक ग्रहण करणे, त्याच्याशी एकात्मता साधणे हा आनंदवादाचा गाभा आहे. इथे आपल्याला तो विषय हाती घ्यावयाचा नाही. पण एवढे खरे की आनंदवाद हा एक स्वतंत्र तात्त्विक सिद्धान्त आहे. आनंदमीमांसेवर एक ग्रंथ लिहावा अशी माझी फार दिवसांची मनीषा आहे. सहा दृष्टिकोणांतून आत्मानंदवादाचा विचार करता येईल. सत्ताशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीय, मानसशास्त्रीय व साक्षात्कारशास्त्रीय आणि नीतिशास्त्रीय व मूल्यशास्त्रीय. दृष्टिकोण कुठलाही असो, जीवनाचे चरम उद्दिष्ट आत्मानंद आहे. उभ्या जगातल्या साक्षात्कारी पुरुषांना तो खुणावत असतो. हा शाश्वत आनंद मिळवणे हे सर्वच साक्षात्कारी संतांचे एकमेव ध्येय असल्याने त्या सर्वांचे कुलगोत्र एकच आहे.

आतापर्यंत आपण साक्षात्काराची सामान्य लक्षणे पाहिली. आपण जसजसा कन्नड संतांचा विचार करू तसतसे आपल्या लक्षात येईल की त्यांचे अनुभव या सर्व कसोट्यांना उतरतात.

कन्नड संतांत सर्वसामान्यपणे दोन संप्रदाय दिसतात : एक शैव, दुसरा वैष्णव. खरा साक्षात्कारी संत अर्थातच शैव किंवा वैष्णव अशा संकुचित कल्पनांनी

बांधलेला नसतो. तो त्यांना पोटात घेतो. अलाहाबाद जसे गंगायमुनांचे संगम-स्थान आहे तसेच धारवाड शैव-वैष्णव मतांचे प्रयागस्थान ठरेल. या दोन्ही पंथांत शेषाला मानाचे पान आहे. शेष शिवाच्या गळ्यात हारासारखा शोभतो; विष्णू तर शेषशायीच आहे. शेष असा दोन पंथांतला दुवा आहे. या पंथांतील मतभेद आपल्याला लक्षात घ्यायचेच नाहीत, अनुभवांतील साम्य पाहायचे आहे. त्यांचे अनुभव व त्या अनुभवांचे शब्दचित्र यामुळे साक्षात्कारविषयक विचारांना जी सुसूत्रता आली तिचा आपल्याला आढावा घ्यायचा आहे.

कर्नाटक संत व ग्रीक तत्त्वज्ञ

इथे कर्नाटकातील संत व जगातील श्रेष्ठ संत यांची तुलना करणे फायद्याचे होईल. सॉक्रेटिस, प्लेटो व फीडो हे ग्रीक तत्त्वज्ञ जणू काही कल्याण येथील अनुभवमंटपात हजर आहेत. प्रभुदेव सॉक्रेटिसाचे स्थान भूषवतात तर बसवेश्वर हे प्लेटोची व चेन्नबसव हे फीडोची जागा घेतात. मी जेव्हा शून्यसंपादने वाचत होतो, तेव्हा माझ्या मनात विचार आला की अनुभवमंटपातील संतांच्या संवादांवर एक बृहत् ग्रंथ लिहिता येईल. प्लेटोच्या संवादांवर अशा तऱ्हेचे फार अभ्यासपूर्ण लिखाण जोवेट किंवा बर्नेट यांनी केले आहे. शून्यसंपादने हा एक अद्भुत ग्रंथ आहे. त्यातले संवाद प्लेटोच्या संवादांच्या धर्तीवरच लिहिलेले आहेत. सर्वज्ञ हा कन्नड संत ग्रीसमधील हेराक्लायटसचा वाङ्मयीन अवतार आहे. दोघांच्या लिखाणात विरोधाभासात्मक चुटकुले आढळतात. श्री अरविंद घोषांना हेराक्लायटसचे फार आकर्षण होते. हेराक्लायटसवर फेब्रुवारी १९१६ मध्ये मी एक लेख लिहिला होता, त्यावर श्री अरविंदांनी सात लेख लिहिले. ते लेख १९४१ साली ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले आहेत.

कर्नाटक संत व ख्रिश्चन संत

ख्रिश्चन परंपरेतील जीजस क्राइस्ट, सेंट पॉल, सेंट ऑगस्टाइन व मार्टिन ल्यूथर ही मंडळी पाहिली की अनुभवमंटपातील प्रभुदेव, बसवेश्वर, सिद्धराम व चेन्नबसव यांची आठवण होते.

कर्नाटक संत आणि महाराष्ट्रातील संत

कर्नाटकातले बसवेश्वर म्हणजे महाराष्ट्रातील संत तुकाराम. दोघांतही भक्तीची उत्कटता दिसते. या भक्तीच्या जोरावर त्यांनी देवाला प्रत्यक्षच साद घातली. चेन्नबसवांना रामदास म्हणता येईल. ते अत्यंत क्रियाशील असून त्यांचे संघटना-चातुर्य ठळकपणे दिसते. रामदासांप्रमाणेच त्यांनी संप्रदायाचा विस्तार केला. एकनाथ जसे साक्षात्कारी संत होते तसेच मेधावी तत्त्ववेत्तेही होते, आणि वैष्णव संतांमधील जगन्नाथदास व वीरशैव संतांतील निजगुणशिवयोगि यांच्यामध्ये हीच वैशिष्ट्ये दिसतात. कनकदास म्हणजे चोखामेळा; दोघेही मोठे अनुभवी असून आपल्या पारमार्थिक अनुभवांचे त्यांनी सुस्पष्ट वर्णन केले आहे. कनकदासांनी अनुभवांना चढवलेला शब्दांचा पेहराव चोखामेळ्यांपेक्षाही सरस आहे. कर्नाटकात एक महीपति आहेत व महाराष्ट्रातही एक आहेत आणि दोघांची योग्यता एकच आहे. काखंडकीचे महीपति व ग्वालियरचे महीपति या भिन्न व्यक्ती आहेत पण त्यांचे साक्षात्कारविषयक विचार एकच आहेत. मी दोघांचीही समाधिस्थाने पाहिली आहेत व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे. दोघेही प्रकांड पंडित असून थोर संत व महान कवी आहेत. दुर्दैवाने दोघांबद्दलही फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्यांच्या लिखाणाचा व्हावा तसा अभ्यासही झालेला नाही. आता तरी होईल तितक्या लवकर तसा अभ्यास होणे अगत्याचे आहे.

कन्नड संत आणि हिन्दी संत

कन्नड व हिन्दी संतांतही अशीच तुलना करता येईल. तुलसीदासांना हिन्दी साहित्यात जे स्थान आहे, तेच पुरंदरदासांना कन्नड साहित्यात आहे. कवित्व व रसिकत्व ह्या गुणांत त्यांची बरोबरी करणे कठीण आहे. तुलसीदास साधारणतः सगुणातच रंगून जातात पण पुरंदरदास एक पाऊल पुढे जातात. अलीकडे मी पुरंदरदासांचे काही साहित्य वाचले. त्यातून त्यांच्या विचारांचे तीन टप्पे स्पष्ट दिसले. सुरुवातीस ते सगुणाचे भक्त असून नंतर सगुण-निर्गुण एकच मानू लागतात, व अखेरीस सगुण-निर्गुणाच्या पलीकडील साक्षात्कारी योग्याच्या अवस्थेला पोचतात. या यौगिक किंवा तुर्यावस्थेतील अनुभवांबद्दल त्यांनी दर्जेदार पदे लिहिली आहेत. या प्रकारची पदे तुलसीदासांच्या लिखाणात सहसा आढळत

नाहीत; त्यांच्या साहित्याचा बराचसा धांडोळा घेतल्यावर एखाददुसरे पद मिळाले इतकेच. कर्नाटकाचे विजयदास म्हणजे हिन्दी साहित्यातील सूरदास. दोघेही सगुणाचे भक्त व दोघेही संगीतविशारद. रैदासांच्या तोडीचे कन्नड संत म्हणजे कनकदास. रैदासांना आपल्या इकडे रोहिदास म्हणतात. दोघेही थोर विभूती असून प्रतिभावान कवी व अनुभवी संत आहेत. धारवाडजवळील शिग्गावीचे शरीफसाहेब व उत्तरेतील कबीर यांतही काहीसे साम्य आहे. दोघेही मुस्लिम आहेत व त्यांच्या अनुभवविश्वात सारखेपणा आहे. अर्थात कबिरांची योग्यता विशेष आहे, हे मानावेच लागेल. आणखी दोन कवींतील साम्य पाहू. ह्यांची वार्ता फारशी कुणाच्या कानावर आलेली नाही. गुरुसिद्ध ही मुद्रिका असणारे सर्पभूषण-शिवयोगि हे श्रेष्ठ कन्नड संतकवींत मोडतात. ह्यांच्या जोडीचे हिन्दी संत म्हणजे चरणदास. चरणदासांनी कबिरांची परंपरा पुढे चालविली, तशीच सर्पभूषणांनी कन्नड साहित्यात अद्वैतयोगाची परंपरा राखली.

खगोलशास्त्रीय रूपक

माझ्या एका मित्राने खगोलशास्त्रातील एका रूपकाकडे माझे लक्ष वेधले. हुबळी येथील श्री. सिद्धरामप्प पावटे यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की प्रभुदेव हे व्योम किंवा आकाश असून बसवेश्वर हे तेथील सूर्य आहेत. हेच रूपक पुढे चालवावे असे मला माझ्या मित्राने सुचविले. चेन्नबसवांना चंद्र किंवा गुरू म्हणता येईल आणि अक्कमहादेवि या अरुंधती होतील. हे रूपक कसे साधते हे आपणच ठरवा. एवढे मात्र खरे की नभस्थ प्रकाशगोलांप्रमाणे या चार-पाच संतांनी आध्यात्मिक मार्ग उजळून टाकला.

एकमेकांना साहाय्य केल्याशिवाय कोणतेच मोठे कार्य तडीस जात नसते. आपल्यापैकी प्रत्येकाला जे आध्यात्मिक ध्येय गाठायचे आहे त्याच्याबद्दल हेच म्हणता येईल. परस्पर सहानुभूती व परस्पर सहकार्य यांची ध्येयपूर्तीला नेहमीच गरज असते.

व्याख्यानांचा आराखडा

माझ्या व्याख्यानांचा आराखडा मी आपल्यापुढे मांडतो. ज्या काही मथळ्यांच्या

अनुषंगाने कन्नड संतांच्या कल्पनांचा विकास स्पष्ट करता येईल ते मथळे मी ठरवले आहेत. पहिला विषय म्हणजे तात्त्विक पूर्वपीठिका. यात ज्ञानशास्त्र, मानसशास्त्र किंवा सत्ताशास्त्र यांतील मुद्दयांचा आढावा येतो, तो आपण आतापर्यंत घेतला. कर्नाटकातील संतांचे जगातील संतांशी असलेले साम्यही आपण पाहिले. त्यानंतर आपण परमार्थप्रेरणांकडे वळतो. अनेक कारणांमुळे मनुष्य परमार्थमार्गाकडे ओढला जातो. हिन्दी व मराठी संतांच्या बाबतीत ज्या प्रेरणांचा विचार केला त्यांचाच इथे करायचा आहे. यानंतर येणारा विषय म्हणजे नैतिक तयारी. नैतिक तयारीविना साधकाची परमार्थमार्गावर प्रगती होत नाही. सद्गुरूंची लक्षणे कोणती तसेच शिष्यासाठी सद्गुरू काय करतात ते यानंतर पाहायचे. सहजीच आपण गुरुशिष्यसंबंधापर्यंत पोचतो. मग संत व ईश्वर यांतील संबंध व ईश्वरस्वरूप हे विषय क्रमाने येतात. उत्तर भारत, महाराष्ट्र किंवा कर्नाटक येथील संतांनी ज्यावर भर दिलेला आहे ते नाममाहात्म्य पाठोपाठ येते. त्यानंतर ध्यानप्रक्रिया. कन्नड संतांनी सांगितलेली प्रक्रिया वैशिष्ट्यपूर्ण आहे. कबिरांनी त्या पद्धतीचा पुरस्कार केला आहे; पण तुलसीदास, सूरदास किंवा मीराबाई यांत ती विशेष दिसत नाही. ज्ञानेश्वर, एकनाथ व तुकाराम यांनी ध्यानप्रक्रियेचा आवर्जून विचार केला आहे. आध्यात्मिक साधनाची परिणती म्हणजे अतींद्रिय अनुभव. अनुभवांचे तपशिलवार व हुबेहूब चित्र रेखाटण्यात कन्नड संतांचा हात कोणी धरू शकत नाही. या संदर्भात आपण पारमार्थिक अनुभवाच्या कसोट्यांचा मागोवा घेऊ आणि अनुभवाचा उगमही पाहू. तदनंतर विविध अनुभव, म्हणजे रूप, तेज, नाद हे अनुभव, संमिश्र अनुभव व उच्चतर अनुभवांकडे वळू. अखेरीस अतींद्रिय अनुभवाचे श्रेष्ठ संतांवर काय काय परिणाम होतात ते लक्षात घेऊ.

या आराखड्याने व्याख्यानांच्या मांडणीची एक रूपरेषा आपल्यापुढे उभी राहील. कन्नड पदांची शब्दशः चिकित्सा करण्याचा माझा उद्देश नाही. कन्नड संतांनी जागतिक संतांच्या दरबारात जे बहुमानाचे स्थान भूषविले आहे त्याचा परामर्श घेण्याचा माझा मानस आहे. कन्नड संतांची महती अपूर्व आहे आणि ती तुमच्या नजरेसमोर आणण्याचे कार्य मी अंगीकारले आहे. ते पार पाडण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न करीन.

2 Incentives to Spiritual Life

२ परमार्थ-प्रेरणेगळु

1 The great spiritual ideal of losing oneself in the glory of God

परमात्मन वैभवदल्लि मैमरेव हिरिय पारमार्थिक आदर्श

(राग–भैरवि; ताल–दादरा)

बहु दोड्डदी जन्म जंबुद्वीपांतरदि
बहु दोड्डदी जन्मवु ॥ प. ॥
भाळाक्षहरन स्तुति बिडदे कोंडाडिदरे
बहु दोड्डदी जन्मवु ॥ अ. प. ॥

मूडल दिक्किनोळु मूडित्तु ई चिक्कि
नाडेल्ल बेळकादितो तम्मा ।
एड बल मध्यदि शोभिसि कंडितिदु
पडेदु बंदवरिगो तम्मा ॥ १ ॥

ऐदरोळगैदु हृदुगिकोंडिहुदु
ऐदरोळगैदु कलसो तम्मा ।
कायविरहितनागि प्रभुमहिमेयोळु सिलुकि
लयवागबेको तम्मा ॥ २ ॥

पश्चिमदिक्किनलि मिंचि केंडव करेदु
किच्चेदु अडगितल्लो तम्मा ।
सच्चिदानंदन ध्यानदोळु इरलिक्के
निश्चितनागबेको तम्मा ॥ ३ ॥

हसरु हळदि केंपु हसनागि तोरुत
ऋषिगिरियिंद उदुरितल्लो तम्मा ।
सूसुव मन ओब्बुळियागि गुरु–
धोपदोळगे लयवागबेको तम्मा ॥ ४ ॥

२ परमार्थप्रेरणा

पद १

'अहंता सांडूनि स्वानंदें। सुखी झाले'।

जंबुद्वीपातला[1] हा जन्म (नरजन्म) धन्य धन्य होय.

त्रिनेत्र शिवाचे निरंतर ध्यान केलेतर या नरजन्माचे सार्थक होईल.

पूर्व दिशेला उगवलेल्या ह्या चांदणीने दशदिशा उजळून टाकल्या. ज्यांना देवाची कृपा लाभली त्यांना डाव्या-उजव्या बाजूंना आणि मध्यभागी ही तेजस्वी चांदणी दिसली ॥ १ ॥

पाचांची पाच[2] (पंचमहाभूतांची पंचतन्मात्रे) सारभूत तत्त्वे आहेत. पाचांचा पाचांत (पंचमहाभूतांचा पंचतन्मात्रांत) लय करून टाक बाबा (स्थूलाकडून सूक्ष्माकडे जा). देहभान विसरून प्रभूच्या माहात्म्यात लय पाव बरं ॥ २ ॥

पश्चिम दिशेला विजेचा लोळ पडून ज्योत प्रज्वलित झाली आणि अदृश्य झाली. प्रपंचाची चिंता सोडून निश्चिंत झाल्यावर सच्चिदानंद परमात्म्याचे ध्यान लागेल ॥ ३ ॥

ऋषिगिरीपासून लखलखणाऱ्या हिरव्या, पिवळ्या, लाल रंगांचा पाऊस पडला. दिगंतरात भटकणारे मन एकाग्र करून अनाहत नादाच्या घोषात विरून जावे बरं का ॥ ४ ॥

बैलिगे बैलु निर्बैलु तोरुतलिदे अदु
मूल ब्रह्म तिळियवेको तम्मा ।
रेवगीपुरद श्री सिद्धलिंगेशन
शरणनेनिसवेको तम्मा ॥ ५ ॥

ಜ

2 Poetical fancies concerning the oblivion and the vision of God by a child

परमात्मन अरिवु-मरवुगळिंद मगुविनल्लि उंटागुव परिणामगळन्नु कुरितु कविकल्पनेगळु

(राग-भैरवि; ताल-दीपचंदि)

अळुतिद्या कंदा अळुतिद्या । नीनु ।
तिळियदे मर्त्यक्के मरेतु बंदेनेंदु ॥ प. ॥

मायद तोट्टिलोळु कैकालु ओत्तुत ।
मोहद सिंबियोळु होरळाडुत ॥
जीव मनसु एंब तगणि उंगुटक हत्ति ।
देहक्के एळळष्टु सुखविल्लेंदु ॥ १ ॥

तंदे तायिगळिंद बंधनदोळु बिद्दे ।
मुंदेनु गतियेंदु केडुवेनेंदु ॥
अंद छंददि बंदु मोले कोट्टु हालेरेदु ।
बंदंथ विषयक्के बलिय हाकुवरेंदु ॥ २ ॥

नावु मगनिगे मदुवे माडुवेवेंदु ।
तावु विद्द कुणियल्लि एन्न नूकुवरेंदु ॥
जाव जावके ओम्मे नोडि हिग्गुतलि ।
देव कूडलूरेश कूडिको एनुतलि ॥ ३ ॥

ಜ

शून्याचे शून्य जे महाशून्य त्याचे दर्शन घडले. तेच मूलब्रह्म असे जाणावे. रेवगीपुरवासी श्रीसिद्धलिंगेशाचा दास होऊन राहिले पाहिजे हं ॥ ५ ॥

पद २

'स्मरण मुळींचें सर्व विसरला।
सोहं कोहं रडूं लागला'।

बाळा, का बाबा रडतोस ? चुकून आपण या मर्त्यलोकात येऊन पडलो असे समजून रडतोस की काय ?

मायारूपी पाळण्यात हातपाय आपटत, मोहरूपी गिरदीवर त लोळत असतोस, अशा वेळी मनरूपी ढेकूण अंगठ्याला चावतो व जिवाला तिळमात्र सुख लागत नाही, म्हणून का त दु:ख करतोस ? ॥ १ ॥

आईवडिलांनी मला संसाराच्या बंधनात टाकले, आता पुढे माझी गती काय ? माझा पुढे सत्यानाश होईल. आईने कोडकौतुकाने स्तनपान करवून शेवटी विषयांच्या पुढे मला वळी म्हणून टाकले, अशा विचारांनी त शोक करतोस का ? ॥ २ ॥

आपण मुलाचे लग्नकार्य करतो म्हणजे तरी काय ? आपण स्वत: खड्ड्यात गाडले गेले आहोत तिथेच मुलालाही ढकलतो. तसे मला ढकलून देतील या शंकेने का त अश्रुपात करतोस ? अरे पण त तर अधूनमधून हसत असतोस; मग त्या वेळी तुला देवाचे पुन: दर्शन होते का ? देवा, कूडल्चरेशा, मला तुझ्यामध्ये सामावून घे, अशी विनवणी करण्यासाठी त रडतोस का ? ॥ ३ ॥

3 How different senses lead to destruction

बेरे बेरे इंद्रियगळु विनाशदेडे सेळेदोय्युव वगे

(वचन)

नयनेंद्रिय विषयदिंद
पतंग केडुवदु दीपद ज्वालेयल्लि.
श्रवणेंद्रिय विषयदिंद
एरळे केडुवदु बेटेगारन सरळिनल्लि.
घ्राणेंद्रिय विषयदिंद
भ्रमरवु केडुवदु संपिगेय पुष्पदल्लि.
रसनेंद्रिय विषयदिंद
मत्स्य केडुवदु जलगारन बलेयल्लि.
त्वगेंद्रिय विषयदिंद
गज केडुवदु राजन कृतकदल्लि.
इंतिष्ट प्राणिगळु
ओंदोंदु विषयक्के बंधनक्कोळगादवु.
इंतप्प पंचेंद्रिय–
विषयव्यापारदल्लि हरिदाडुव
मंदमति एन्नन्नु
सलहिकोळ्ळय्या देवा अखंडेश्वरा.

4 God implored by the aspirant to diagnose his multiple spiritual disease

तन्न अनेकविध पारमार्थिक रोगद निदानवन्नु अरुहलु साधकनु परमात्मनिगे माडिद प्रार्थने

(राग - कांबोदि; ताल–दादरा)

आव रोगवु एनगे देव धन्वंतरि ।
सावधानदि एन्न कै हिडिदु नोडय्य ॥ प. ॥

पद ३

'विषयांचे सुख एथें वाटे गोड।
पुढें अवघड यमदंड'।

डोळ्यांच्या तृष्णेमुळे पतंग दिव्याच्या ज्योतीवर झडप घालून नाश पावतो.

गोड आवाजाच्या लोभाने हरिण पारध्याच्या बाणाला बळी पडते.

मधुर सुवासाची भूल पडल्यामुळे भ्रमर चंपकपुष्पात अडकून प्राणास मुकतो.

जिभेची चटक असल्याने मासा कोळ्याच्या गळाला लागतो.

राजाने हत्ती पकडण्यासाठी खड्डा खणलेला असतो आणि स्पर्शसुखाच्या मोहाने हत्ती त्यात फसतो.

हे सर्व प्राणी फक्त एका एका विषयाच्या पाशात सापडल्याने त्यांच्यावर अनर्थ ओढवतो.

मंदमती असा मी तर या पाचही विषयांच्या खाईत लोळत आहे. हे देवा, अखंडेश्वरा, यांपासून माझे रक्षण कर.

पद ४

'महाराज तूं धन्वंतरी। माझा भवरोग तूं दूर करीं'।

हे धन्वंतरी, मला कोणत्या रोगाने पछाडले आहे? सावधानतेने नाडी पाहून माझ्या रोगाचे निदान कर.

हरिय मूर्तियु एन्न कण्णिगे काणिसदु ।
हरिय कीर्तनेयु केळिसदेन्न किविगे ॥
हरिमंत्र स्तोत्र वारदु एन्न नालिगेगे ।
हरिप्रसादवु जिव्हेगे सवियागदय्य ॥ १ ॥
हरिपाद सेवेगे हस्तगळु चलिसवु ।
गुरुहिरियरंघ्रिगे शिर वागदु ॥
हरिय निर्माल्यवाघ्राणिसदु नासिकवु ।
हरियात्रेगेन्न कालेळवय्य ॥ २ ॥
अनाथबंधु गोपालविठलराय ।
एन्न भागद वैद्य नीनेयादि ॥
अनादि कालद भवरोग कळेयय्य ।
नानेंदिगू मरेये नी माडिदुपकार ॥ ३ ॥

ಜ

5 Why hast Thou forsaken, oh God ! this destitute and desolate wretch ?

ई अनाथ एकाकि हतभागियन्नु याके तोरेदेयय्य प्रभो ?

(राग – कांबोदि; ताल – दादरा)

याकेन्न ई राज्यकेळतंदे हरिये ।
साकलारदे एन्ननेके पुट्टिसिदि ॥ प. ॥
एन्न कुलदवरिल्ल एनगोब्व हितरिल्ल ।
मन्निसुव दोरेयिल्ल मनके जयविल्ल ॥
होन्नु रत्नगळिल्ल करुणे तोरुवरिल्ल ।
इन्निलि तरवल्ल इंदिरेशने बल्ल ॥ १ ॥
देश परिचयविल्ल वेसर कळेवरिल्ल ।
परमात्मनल्लदे परगतियु इल्ल ॥
हरणदलि हुरुडिल्ल करणदलि दृढविल्ल ।
दोरे पुरंदरविठल ताने बल्ल ॥ २ ॥

ಜ

देवाचे रूप माझ्या डोळ्यांना दिसत नाही. देवाचे कीर्तन माझ्या कानांत शिरत नाही. देवाचे स्तोत्र मुखातून येत नाही. देवाचा प्रसाद जिभेला गोड लागत नाही ॥ १ ॥

देवाची चरणसेवा करताना हात अडखळतात. सद्गुरू आणि वडील माणसे यांच्या पायांसमोर माझा माथा झुकत नाही. देवाच्या निर्माल्याचा सुवास नाकाला येत नाही. तीर्थयात्रेला निघण्यासाठी पाय उचलत नाहीत ॥ २ ॥

हे अनाथबंधू गोपालविठ्ठला, माझ्या भाग्याने तुझ्यासारखा वैद्य माझ्या वाड्याला आला आहे. अनादिकालापासून मागे लागलेल्या या भवरोगाचे उच्चाटन कर. या तुझ्या उपकारांचा मला आजन्म विसर पडणार नाही ॥ ३ ॥

पद ५

'मज टाकिलें परदेशीं। नाहीं विठ्ठला तुजपाशीं'।

देवा, या राज्यात मला का बरे आणून टाकलेस? माझा सांभाळ करण्याची जोखीम घ्यायची नव्हती, तर मला जन्माला तरी कशाला घालावेस?

इथे माझे गणगोत नाही व बोटाएवढा कुणी हितचिंतकही नाही. मला राजाश्रय तर नाहीच पण मनालाही काही हुरूप नाही. माझ्याकडे ना सोनेनाणे, ना मायेचे माणूस. आता इथे राहण्यात काही राम नाही. माझी दैन्यावस्था जाणणारा देवच आहे ॥ १ ॥

हा देश मला अनोळखी आहे. मी थकलो भागलो तर त्याची दखल घेणारे इथे कोण आहे? परमात्म्याशिवाय मला दुसरी गतीच नाही. माझ्या जीवनातले तथ्य हरपले आहे आणि इंद्रियातले त्राण आटले आहे. एक देव पुरंदरविठ्ठलच माझी दुःस्थिती जाणेल ॥ २ ॥

6 Kill the tiger, the bear and the lion inside you, by shooting them with the help of devotion, dispassion and illumination

भक्ति, विरति, अरिवु एंब बिल्लु बाणगळिंद अंतरंगदल्लिय हुलि, करडि, सिंहगळन्नु कोल्लिरय्य

(राग – भूप; ताल – दीपचंदि)

काय कांतारव होक्कु बेटेयनाडि ।
माय मोहद मृगगळ कोल्लिरो ॥ प. ॥
कोपवेंबुव हिरिय हुलियुंटु ।
पापवेंब सूकरवुंटु ॥
चापल्यवेंब जिंकेयुंटु ।
कापट्यवेंब नरियुंटु ॥ १ ॥
मेरेवष्टमदगळेंब कोणगळुंटु ।
बरिय दंभवेंब करडियुंटु ॥
उरिव मत्सर केसरियुंटु ।
मखु ऐंदेंब मद्दानेयुंटु ॥ २ ॥
भरति सद्भक्ति ऐंदेंब बिल्लने माडि ।
विरति ऐंदेंब सिंजिनिय हूडि ॥
अरिवेंब बाणवन्नेच्चि केडहुते ।
गुरुसिद्धनंघ्रिपंकजकेरगि ॥ ३ ॥

8

7 Long is the journey to thy desired goal. Wake up and move, oh sleeping and dreaming pilgrim

अय्य ! निद्रेयल्लि, कनसिनल्लि मैमरेत दारिकारने, निन्न गुरियु बळु दूरविरुवुदय्य ! एच्चरागु ! मुंदे सागय्य !

(राग – शंकराभरण; ताल – दीपचंदि)

एलो दारिकारने मलगिकोंबरे हीगे ।
बळु दूर वैकुंठ प्रवासवु ॥ प. ॥

पद ६

भक्ति-ज्ञान-वैराग्याचे धनुष्यबाण करून मनातल्या वाघ-सिंह-अस्वलांना ठार करा

देहरूपी अरण्यात शिरून शिकार खेळा व तिथल्या कांचनमृगांचा नायनाट करा.

या अरण्यात क्रोधरूपी अक्राळविक्राळ वाघाची अन् पापरूपी डुकराची वस्ती आहे. तिथे चांचल्य हे हरिण आहे, तसा कपट हा कोल्हाही आहे ॥ १ ॥

इथे डौलाने मिरवणारे अष्टमदरूपी रेडे आहेत व त्यांच्या जोडीला पोकळ अभिमानाचे अस्वल आणि पेटलेल्या मत्सराचा सिंह आहे. विस्मरण हाच कोणी मदोन्मत्त हत्ती आहे ॥ २ ॥

भरती आलेल्या भक्तीचे धनुष्य करून त्याला विरक्तीची दोरी लावा. त्यातून ज्ञानाचे बाण सोडून या सर्व प्राण्यांना अचूक टिपा व गुरुसिद्धांच्या चरणकमलांवर माथा टेकवा ॥ ३ ॥

❀

पद ७

'तरि झडझडोनि वहिला निघ ।
इये भक्तिचिये वाटे लाग' ।

अरे पांथस्था, असं झोपून कसा निभाव लागेल बाबा ? वैकुंठाचा प्रवास तर फार लांबचा आहे.

तलेयोळु निंतु नगुवळु मृत्युदेवते ।
हलवु हंबलिसलु फलवेनु कनसिनोळु ॥ अ. प. ॥

स्थळवु निन्नदु बिट्टु हळव सेरिदरिन्नु ।
तिळिवळिके बरवारदे मानवा ॥
तोळलु दारियलि खलरु निन्नय बदुक ।
सेळेयदे बिडरय्य उळिसेलो मानवा ॥१॥

बरुव मुंदे तंद सरुकेल्ल तीरितु ।
तिरुगि बरुवदेल्ल बरिगंट्टु ॥
करि, हुलि, तोळ, नायि, नरि, कोण, करडिगळु ।
हरिदु तिंबुवु निन्न तेरळगोडवु मुन्न ॥२॥

हिंदे हलवु कवचंगळ कळकोंडि ।
इंदी कवचवादरु पोगुदु ॥
मुंदिन्नु साधिसि पुरंदरविठलन ।
पोंदि पादके सुखिसेलो मानवा ॥३॥

मृत्यु-देवता तुझ्या मानगुटीवर बसून विकट हास्य करत आहे. नाना मनोरथांची स्वप्ने रंगवणे निष्फळ नाही का ?

आपला ठावठिकाणा सोडून रानावनात येऊन ठेपला आहेस, आता तरी तुझे डोळे उघडू नाहीत का ? मोठ्या कष्टाने रानोमाळ भटकतो आहेस, इथले वाटवधे तुझ्याजवळचा ऐवज लुटल्याशिवाय सोडतील का ? आपल्या संपत्तीचा सांभाळ कर ॥ १ ॥

येताना बरोबर आणलेला माल पुरापुरा संपला. त्याच्या बदल्यात मिळालं काय तर रिकामी झोळी. हत्ती, वाघ, लांडगा, कुत्रा, कोल्हा, रेडा, अस्वल हे सगळे तुला फाडून खातील. तुला पुढे एक पाऊलही टाकू देणार नाहीत ॥ २ ॥

आजपर्यंत देहामागून देह धारण केलेस. आताचा देहही एक दिवस पडणारच आहे. निदान आतातरी पुरंदरविठ्ठलाचे पाय धरून जन्माचे फळ पदरात पाडून घे आणि सुखी हो कसा ॥३॥

3 Further Incentives and their Consummation

३ अधिक प्रेरणेगळु हागु अवुगळ परिणति

1 Momentariness is writ large upon all affairs of human life

मानवन जीवनव्यापारगळेल्ल क्षणभंगुरवादवुगळु

(राग – भूप; ताल – दीपचंदि)

हेगे इरवेकु संसारदल्लि ।
हेगे बरेदिदे प्राचीनदल्लि ॥ प. ॥
पक्षि अंगळदल्लि बंदु कूतंते ।
आ क्षणदल्लि हारि होदंते ॥ १ ॥
नाना परियल्लि संते नेरेदंते ।
नाना पंथव हिडिदु होदंते ॥ २ ॥
मक्कळाडि मने कट्टिदंते ।
साकेंदु आट अळिसि पोदंते ॥ ३ ॥
वसतिकारनु वसति बंदंते ।
तुसु होत्तेरे होरटु होदंते ॥ ४ ॥
संसारपाशव नीने बिडिसय्य ।
कंसारि पुरंदरविठलराय ॥ ५ ॥

❀

2 The universal reign of anxiety

चिंतेय सार्वत्रिक साम्राज्यवु

(राग – पुरिया धनाश्रि; ताल – दीपचंदि)

अनुगालवु चिंतेयु मनुजरिगे ।
मन होगि माधवन ओडगूडुतनक ॥ प. ॥

३ आणखी काही प्रेरणा व त्यांची परिणती

पद १

'क्षणभंगुर जीवनकी कलिका'[५]

जसे प्रारब्धामध्ये लिहिले आहे तसे या संसारात राहावे.

पाखरे अंगणात उतरतात व क्षणभराने उडून जातात ॥ १ ॥

नाना तऱ्हांनी बाजार भरतो आणि नाना तऱ्हांनी उठून जातो ॥ २ ॥

लहान मुले वाळूचे किल्ले बांधतात आणि खेळ संपल्यावर ते पाडून निघून जातात ॥ ३ ॥

वाटसरू वस्ती करायला येतात आणि तांबडे फुटले की आपापल्या वाटेला लागतात ॥ ४ ॥

हे कंसशत्रू पुरंदरविठ्ठला, तूच मला संसारपाशापासून सोडव ॥ ५ ॥

ꕥ

पद २

'चिंतेचा पिकला मळा'

माधवाच्या चरणी मन लीन होईपर्यंत माणसाच्या मागे चिंता सदोदित लागलेलीच आहे.

सतियु इद्दरु चिंते इल्लदिद्दरू चिंते ।
मतिहीन सतियादरु चिंतेयु ॥
पृथिवियोळगे सति अति चल्वेयादरू ।
मिति मीरि नडेदरे अवळोंदु चिंते ॥ १ ॥

मक्कळिद्दरु चिंते इल्लदिद्दरू चिंते ।
अत्तु अन्नके काडुव चिंतेयु ॥
तुत्तिगे सालदेंब बडतनद
कक्कुलते देशदोळिल्लद चिंते ॥ २ ॥

बळगविल्लद चिंते बळगवादरू चिंते ।
मेले संबळ बारद चिंतेयु ॥
साल कोडो चिंते साल तेगेयो चिंते ।
मूलोकदोळगेल्ल चिंते काणण्णा ॥ ३ ॥

मनेयिल्लद चिंते मनेयादरू चिंते ।
मनेय वार्ते नडेयद चिंतेयु ॥
तोंडनागि पोत्तु तिरुगुव चिंते भू–
मंडलदोळगेल्ल चिंते काणण्णा ॥ ४ ॥

बडवनादरु चिंते बल्लिदनादरु चिंते ।
कोड होन्नु मनेयोळिद्दरू चिंतेयु ॥
पोडवियोळगे नम्म पुरंदरविठलन ।
बिडदे चिंतिसिदरे चिंते निश्चिंते ॥ ५ ॥

बायको असलीतरी चिंता असते आणि नसलीतरी चिंता सोडत नाही. ती मंदबुद्धीची असलीतरी चिंता लागते आणि ती फार सुंदर असेलतर चिंतेची पाल चुकचुकते. तिने मर्यादाभंग केलातर चिंता झपाटतेच ॥ १ ॥

मुलेबाळे असलीतरी चिंता, आणि नसलीतरी चिंताच. भूक भूक म्हणून मुले रडायला लागली की मनात चिंता दाटते. त्यांच्या तोंडात घास घालता येऊ नये इतके दारिद्र्य असल्याने जीव व्याकुळ होतो अन् उभ्या जगात सापडणार नाही अशी घोर चिंता पोखरू लागते ॥ २ ॥

कुणी आप्तेष्ट नाहीत म्हणून माणूस चिंता करतो आणि आप्तेष्ट असलेतरीही चिंता त्याला व्यग्र करते. शिवाय आपल्या कामाला साजेसा मोबदला मिळत नाही ही चिंता त्याच्या मनात घर करून बसते. पैसे कर्जाऊ दिलेतर चिंतेचे सावट आहेच. मग स्वत:साठी कर्ज काढण्याची वेळ आलीतर बघायलाच नको एकूण काय, आख्ख्या त्रिभुवनात चिंतेचे साम्राज्य पसरलेले आहे ॥ ३ ॥

आपल्याला घर नाही म्हणून चिंतेचे पिसे लागते आणि घर झाल्यावरही चिंता सावलीसारखी आहेच. घरचा प्रपंच निभत नाही म्हणून चिंता सुटत नाही. भारवाही हमाल होऊन हिंडण्याची वेळ आलीतरी चिंता हजर आहेच. सगळ्या जगभर चिंताच चिंता आहे ॥ ४ ॥

दारिद्र्य असलेतर चिंतेची सोबत सुटत नाही आणि श्रीमंती आलीतरी चिंता घेरतेच. घागरभर सोने घरात असलेतरी चिंता पाठ सोडत नाही. या मर्त्य लोकांत आल्यावर पुरंदरविठ्ठलाचे निरंतर चिंतन केलेतरच निश्चिंतता लाभते ॥ ५ ॥

3 Thy anxiety may be removed by God who will not merely give thee a pedestal in spiritual life but also prosperity in the life of the world

परमात्मनु निनगे पारमार्थिक पदवियन्नु कोडुवुदल्लदे ऐहिक वैभववन्नू सल्लिसि निन्न चिंतेयन्नु कळेयवहुदु

(राग – भैरवि; ताल – जलदेक्का)

चिंतेयातको । बयल भ्रांतियातको ॥
कंतुपितन दिव्यनाम । मंत्रवन्नु जपिसुववगे ॥प.॥

कालकालदल्लि बिडदे । वेळेयरितु कूगुवंथ ॥
कोळि तन्न मरिगे मोलेय । हालु कोडु सलुहिते ॥ १ ॥

सडगरदि नारियरु । हडेयुवाग सूलगित्ति ॥
अडवियोळगे हेरुव मृगव । हिडिदु रक्षिसुवरारो ॥ २ ॥

हेत्त तायि सत्तु होगलु । केट्टेवेंबरु लोक जनरु ॥
मत्ते गुंगुरिगे तायि । हत्तरिदु सलुहिते ॥ ३ ॥

परदल्लि पदवियुंटु । इहदल्लि सौख्यवुंटु ॥
गुरुपुरंदरविठलन । नाम नेनेदवरिगे ॥·४ ॥

4 Why don't you condescend to relieve the anxiety in my heart, oh ! Lord of the universe ?

विश्वदोडेयने ! एन्नंतरंगदल्लिय चिंतेयन्नु कळेयलु एके दय माडलोल्ले ?

(राग – भैरवि (कर्नाटकि); ताल – दीपचंदि)

याके दय माडवल्लि । श्रीहरिये ।
मूकनागुवरे हीगे ॥ प. ॥

लोकवनु रक्षिप लक्ष्मीकांतनु नीने ।
वाक्य मोरेगळ केळि दयमाडो श्रीहरिये ॥ अ. प. ॥

पद ३

देवच चिंता दूर करतो. तो पारमार्थिक कल्याण तर करतोच पण ऐहिक वैभवही देतो

श्रीकृष्णाच्या दिव्य नामाचा जप करणाऱ्याला चिंता कुठली आणि रिकामी भ्रांती तरी कुठली ?

कोंबडी न चुकता वेळोवेळी पिल्लांना इशाऱ्याचा आवाज देऊन त्यांचे रक्षण करत असेल, पण अंगावरचे दूध पाजून त्यांचे पोषण करते का ? ॥ १ ॥

प्रसूतिकाळी बायका कौतुकाने सुइणीला बोलावतात, पण रानावनात पाडसांना जन्म देणाऱ्या हरिणीची सुटका कोण करते ? ॥२॥

जन्मदाती आई मरून गेलीतर आपला सर्वनाश झाला असे समजून माणसं हाय हाय करतात, पण कुंभारीण माशी[६] पिल्लांचे रक्षण करायला जवळ तरी राहते का? ॥ ३॥

पुरंदरविट्ठलाचे नामस्मरण करणाऱ्यांना मात्र परलोकी पदवी व इहलोकी वैभव प्राप्त होते ॥ ४ ॥

•

पद ४

'काय माझा आतां पाहतोसी अंत'।

हे श्रीहरी, तुला माझी दया कशी येत नाही ? असे मौन का बरे धरलेस ?

हे लक्ष्मीकांता, तू त्रैलोक्याचा त्राता आहेस ना रे ? माझी दीनवाणी ऐकून तुझ्या हृदयाला पाझर फुटू दे.

मनसिनोळिद चिंति । श्रीहरिये ।
पेळुवे ना निनगे ॥
अन्य देवतेगळिगे पेळलारेनु देवा ।
दानवांतक रंगा नीने दयमाडो कृष्णा ॥ १ ॥

अर्थविल्लद बाळ्वेयु । श्रीहरिये ।
व्यर्थवादितु जन्मवु ॥
कर्तु निन्नय नानु काडि बेडुवनल्ल ।
तुर्तदलि दयमाडो तुलसीदलप्रिय रंग ॥ २ ॥

मूरु लोकद कर्ता नी । श्रीहरिये ।
सारुवे ना निनगे ॥
कारुण्यनिधि नम्म पुरंदरविठलनु ।
दीन मनोहर पूर्ण सहायकारि ॥ ३ ॥

5 If you want to save me, oh God ! save me at the present moment

अय्य ! नीनेन्न सल्लुहुवदादरे, इदीग सल्लुहय्य

(राग – पिलु; ताल – केरवा)

इदे समय हरिये । दोरेये ॥ प. ॥
इदे समय निन्न । पदाब्ज तोरुते ॥
सदा एन्ननु नोडि । मुददि सल्लुवरे ॥ अ. प. ॥

नाना जन्मदि बंदु । ज्ञानविहीननागि ॥
हीननादवगे सु– । ज्ञान पालिसुवरे ॥ १ ॥

आशापाशदि सिलुकि । श्रीशा मरेते निन्न ॥
लेसु दारिय तोरि । दासन कायुवरे ॥ २ ॥

माझ्या अंत:करणातला सल तुझ्यापुढे उघडा केला आहे. इतर देवतांपुढे मी माझे गाऱ्हाणे गाणार नाही. हे दैत्यसंहारका, माझ्यावर करुणेचा पूर लोट ॥ १ ॥

माझ्या जीवनात काही स्वारस्य उरले नाही. जन्म व्यर्थच गेला. हे सर्वकर्त्या, तुला त्रास देऊन काहीतरी मागण्याचा माझा उद्देश नाही. पण हे तुलसीदलप्रिया, आताच तुला माझी करुणा येऊ दे ॥ २ ॥

त्रिभुवनाचा तू कर्ता आहेस. हे श्रीहरी, मी तुला शरण आलो आहे. कारुण्यनिधी पुरंदरविठ्ठल हा दीनांचा साहाय्यकर्ता आहे ॥ ३ ॥

ꕥ

पद ५

'हेचि वेळा देवा। नका मागे घेऊं'।

आपल्या चरणकमलांचे दर्शन देऊन आणि माझ्यावर कृपा करून माझे रक्षण करण्याची, प्रभू, हीच वेळ आहे.

जन्मजन्मांतरातून गोते खात खात फिरून, ज्ञान हरवून बसलेल्या मज अनाथावर ज्ञानाचा पाऊस पाडण्याची हीच वेळ आहे ॥ १ ॥

आशेच्या चक्रव्यूहात गुंतल्याने, देवा, मी तुला विसरून गेलो. व्यूह फोडण्याचा योग्य मार्ग दाखवून या दासाला राखण्याची हीच वेळ आहे ॥ २ ॥

संतर संगव । संतत पालिसि ॥
अंतरंगद ए– । कांत भजनेगागि ॥ ३ ॥

हिंदिन सुकृतदि । बंदे मानवनागि ॥
मुंदिन पदवनु । होंदिसि पोरेयलु ॥ ४ ॥

श्रीपति विजय वि– । ठल श्रीवेंकट ॥
तापत्रयदिं । कापाडुवदके ॥ ५ ॥

६

6 A sudden succour from God, after a life of vain search and travail

परमात्मनिगागि नडेयिसिद विफल शोध–परिश्रमगळ तरुवाय आतनिंद दोरेंत आकस्मिक नेरवु

(राग – भैरव; ताल – दीपचंदि)

एल्लिद्दो हरि हेळय्य ।
एल्लि तिळियुत्तदे निम्माटद नेलेय ॥ प. ॥

नाल्कारु हदिनेंटु मंदिय केळिदे ।
सिल्लुकनेंदवराडुते ॥
मलकु एंभत्तु नाल्कु लक्षनू सोसिदे ।
सिल्लुकि निन्न निज नेलेयु तोरदे ॥ १ ॥

नाना मत नाना मार्ग शोधिसिदे ।
खून निन्नदु तिळियदे ॥
नानु नानेंब्वरिगनुसरिसिदे ।
नीनिरुव स्थळद गाळियु बीसदे ॥ २ ॥

सदासर्वदा संतसंगतीत ठेवून माझ्या अंतःकरणात एकनिष्ठ भक्ती फुलवण्याची हीच वेळ आहे ॥ ३ ॥

पूर्वजन्मी थोर सुकृते केल्यामुळे हा नरजन्म लाभला खरा. पण आता परम-पदाची मला जोड करून देण्याची, देवा, हीच वेळ आहे ॥ ४ ॥

हे श्रीपती, विजयविठ्ठला, श्रीव्यंकटा, तापत्रयांचे निवारण करण्याची हीच वेळ आहे ॥ ५ ॥

पद ६

'होता दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी । '

देवा, तू कुठे गुंतला होतास? तुझी लीला अतर्क्य आहे.

चार (वेद)[४], सहा (शास्त्रे)[५], व अठरा (पुराणे)[६] अशी शोधयात्रा केली पण प्रत्येक ठिकाणी तू सापडत नाहीस हेच उत्तर मिळाले. चौऱ्याऐंशी लक्ष जन्मांच्या वारीतूनही तुझा थांगपत्ता लागत नाही हेच निष्पन्न झाले ॥ १ ॥

अनेक मतांचा तपास घेतला. नाना मार्गांची छाननी केली, पण तुझी नाव-निशाणीही सापडली नाही. मी मी म्हणणाऱ्यांच्या मागे लागलो, पण तुझा मागमूसही कुठे लागला नाही ॥ २ ॥

बीळदवर कालु विद्दु ना केळिदे ।
सुळुहु निन्नदु तोरदे ॥
तले केळगे माडि तपसव माडिदे ।
ओलवु निम्मदु एंदिगू आगदे ॥ ३ ॥

पडद बवणि बट्टु हुडुकदा हुडुकिदे ।
तोडकु निम्मदु तिळियदे ॥
ओडने एन्नोळु बंदु अडकव हरिसिदि ।
बडवनाधारेंदु कैय विडदे ॥ ४ ॥

मनोन्मनवागि कंगळ तेरिसिदि ।
स्वानुभव सुख नीडिदि ॥
हीन महिपति मनोहरन माडिदि ।
अनुदिन घन सुखदोळु इरिसिदि ॥ ५ ॥

ज्यांचे तोंडही पाहू नये त्यांचे पाय धरले, पण तुझी चाहूलसुद्धा लागली नाही. उलटे टांगून घेऊन तपश्चर्या केली, पण तुझी कृपा कधीच झाली नाही ।। ३ ।।

अपार कष्ट घेऊन तुला शोध शोध शोधले, पण तुझे मर्म कळले नाही. परंतु एकदम माझ्यासमोर येऊन तू आपले गुह्य प्रगट केलेस. हे दीनानाथा, तू हाती धरून चालवितोस ।। ४ ।।

मन उन्मन करून माझे डोळे उघडलेस. स्वानुभवामृत वाटलेस. हीनदीन महिपतीला तू धन्य धन्य केलेस व त्याला शाश्वत आनंदात ठेवलेस ।। ५ ।।

4 Moral Preparation for the Mystical Life

नैतिक सिद्धते

1 Don't throw away the valuable opportunities of human life

मानव जीवनदिंद लभिसिद बेलेयुळळ सुसंधियन्नु दूरीकरिसदिरु

(राग – भैरवि; ताल – दीपचंदि)

मानव जन्म दोड्डदु । हानि माडवेडि हुच्चप्पगळिरा ॥ प. ॥
कण्णु कै कालु किवि नालिगे इरलिक्के ।
मण्णु मुक्कि मरुळागुवरे ॥
होन्नु हेण्णिगे मेच्चि हरिनामामृत ।
उण्णदे उपवास माडुवरे प्राणि ॥ १ ॥
कालन दूतरु कर पिडिदेळेवाग ।
ताळु तालेंदरे ताळुवरे ॥
दाळि बारद मुन्न धर्मव कैकोळ्ळि ।
सुळळल्लो संसार सुळिगाळियंते ॥ २ ॥
एनु कारण नम्म यदुपतिय मरेतिरि ।
धन धान्य पुत्ररु कायुवरे ॥
इन्नू आदरु एको भावदि पूजिसि ।
उन्नत पुरंदरविठलन भजिसिरि ॥ ३ ॥

ಜ

2 Straighten the crookedness of my mind, oh God !

मनसिन मुरगिय तिद्दिसो देवा

(राग – भैरवि; ताल – दीपचंदि)

मनसिन मुरगिय तिद्दिसो देवा ॥ प. ॥
प्रातःकालके एदु परद्रव्य अपहार ।
साधुर निंदेयनाडुवदु ॥
साधिसि यमनवरु एळेदोय्युवाग ।
सत्ते सत्तेनंत मरगुतल्याद ॥ १ ॥

४ नैतिक तयारी

पद १

'व्यर्थ जिणें हें वेंचुं नका'

मानवजन्म हिऱ्यासारखा अमोल आहे. खुळ्यांनो, तो कवडीमोलाने दवडू नका. डोळे, हातपाय, कान, जीभ असताना बकाबका माती खाऊन वेडे व्हावे का? कामिनी व कांचन यांच्या मागे लागून व हरिनामामृत डावलून कुणी उपाशी बसत असतात का? ॥ १ ॥

यमदूत हात धरून ओढायला लागले म्हणजे थांबा थांबा अशी हाकाटी केलीतरी ते थोडेच थांबतात? मृत्यूचा घाला येण्याच्या आतच धर्माची जोड करा. वाऱ्याची झुळूक आल्हाददायक असली तरी क्षणिक आहे. संसार तसाच क्षणिक आहे हे वचन सत्य आहे ॥ २ ॥

बाबांनो, कशाच्या रे फुशारकीवर परमात्म्याला विसरता? धन, धान्य, पुत्र हे काय तुमचे रक्षण करणार आहेत? निदान आतातरी एकनिष्ठ भक्तीने पुरंदरविठ्ठलाच्या भजनी लागा ॥ ३ ॥

❀

पद २

'कुबुद्धि कुडी वासना नीरसावी'

हे देवा, माझ्या मनाचा वाकडेपणा दूर करून ते सरळ कर.

सकाळी उठल्यापासून लोकांना लुबाडण्यात आणि साधुसंतांची निंदा करण्यात ते गुंतून राहते. संधी साधून यमदूत खेचून न्यायला लागल्यावर मात्र मेलो मेलो असे कळवळते ॥ १ ॥

यतिवेषव ताळि देशभ्रष्टनागि ।
काशिय क्षेत्रके होंटितु मनसु ॥
काशिय दारियोळु वेशिगे मेच्चि ।
केशव निम्मनु मरेयितु मनसु ॥ २ ॥

बल्लवगे आर्जव माडुतल्याद ।
बडवरिगे नोयिसि नुडियुतल्याद ॥
गुरुलिंगजंगम चरणव नंबदे ।
अडवियल्लि चरिस्याडुतल्याद ॥ ३ ॥

ಜ

3 A moral and spiritual recipe to the tongue

नालिगेगे विधिसलाद नैतिक हागु पारमार्थिक औषध

(राग–जोनपुरि; ताल–झपताल)

सुम्मनिरु नालिगे सुम्मनिरु नालिगे ।
साक्षात नालिगे सुम्मनिरु ॥ प. ॥

सुम्मनिद्दरे नीनु ब्रह्मनागुवि ।
सुम्मनिद्देनेंब हम्मनळिदु ॥ अ. प. ॥

परर निंदिसबेड परवस्तु मरेयबेड ।
परतरानंदवनु विडले बेड ॥
पररु एन्नवरेंदु भेद माडले बेड ।
परके परतरवाद परवस्तु नीनु ॥ १ ॥

कोप तापवु बेड कोपदवरेनबेड ।
कोपदवर कूड सहवास बेड ॥
कोप तापवु मीरि सोपानवनेरि ।
भूपचिद्रूपनु ताने आगि ॥ २ ॥

संन्यासी बनून, स्वदेश सोडून हे मन मारे काशीयात्रेला निघते, पण वाटेतच वेश्येवर भाळते व हे केशवा, तुला ते विसरून जाते ॥ २ ॥

माझे मन श्रीमंतांचे गोडवे गाते आणि गरिबांना टाकून बोलते. गुरुलिंग-जंगमांच्या चरणांवर श्रद्धा न ठेवता ते रानावनातून भटकते ॥ ३ ॥

ꕥ

पद ३

हे जिव्हे, मौन्यमुद्रा धर

हे जिव्हे, चूप बस ग बाई, चूप बस. खरोखरी निश्चल राहा.

अगदी स्तब्ध राहिलीस तर तू ब्रह्मच होशील; मात्र मी गप्प बसले आहे हा अहंकार सोडला पाहिजे बरं !

परनिंदा करू नको; परवस्तूला विसरू नको. परमानंदाला मुकू नको; आप-परभाव धरू नको. परात्परवस्तू तूच आहेस ॥ १ ॥

क्रोध-संताप करू नको; कुणालाही संतापी म्हणू नको. क्रोधी लोकांच्या सहवासात राहू नको. क्रोध-संताप आवरून परमार्थमार्गाची चढण चढ आणि चैतन्यसाम्राज्य संपादन कर ॥ २ ॥

शांत गुरुविन होंदि शांतगणदोळगाडि ।
शांतनागिद्दरे शांतियहुदु ॥
शांत निरुपाधिय कांतियोळु मन मुळुगि ।
शांत सर्वांतर्यामियागि ॥ ३ ॥

ಜ

4 A great agricultural metaphor

ओंदु हिरिदाद कृषिरूपक

(राग–सुरट; ताल–दादरा)

शरीरवेंबुव होलन हसन माडि ।
परतत्त्व बेळेयनु बेळेदुण्णिरो ॥ प. ॥

शम दम ऐंदेंब एरडेत्तुगळ हूडि ।
विमल मानसव नेगिलने माडि ॥
ममकारवेंदेंब करिकेयनु कळेदु ।
समते ऐंदेंब गोब्बरव चेल्लि ॥ १ ॥

गुरुवरनुपदेशवेंब बीजव वित्ति ।
मेरेव संस्कार वृष्टिय बलदि ॥
अरिवेंब पैरनु बेळेसुते मुसुकिर्द ।
दुरित दुर्गुणवेंब कळेय कित्ति ॥ २ ॥

स्थिरमुक्ति ऐंदेंब धान्यव बेळेदुंडु ।
परमानंददोळु दण्णने दणिदु ॥
गुरुसिद्धनडिगेरगुत्ते भववेंब ।
बरवनु तन्न सीमेगे कळुहिरो ॥ ३ ॥

ಜ

प्रशांतमनस्क सद्गुरूंची प्राप्ती कर व मनःशांती मिळवलेल्या संतांच्या संगतीत रममाण हो. तू शांत राहिलीस तर तुला पराशांती मिळेल. प्रशांत निरुपाधींच्या तेजात मन तल्लीन करून सर्वतोपरी शांत हो ॥ ३ ॥

ꕥ

पद ४

'शेत आलें सुगी। सांभाळावे चारी कोन'।

शरीर हेच कोणी शेत. त्याची मशागत करून त्यात परब्रह्माचे पीक काढा व त्यावर आपले पोषण करा.

शम-दम ही बैलजोडी जुंपा. निर्मळ मनाचा नांगर धरून अहंकाराचे तण काढून टाका. समतारूपी खत पसरा ॥ १ ॥

सद्गुरूंनी दिलेल्या उपदेशाचे बी पेरून त्याला सुसंस्कारांचे पाणी द्या. एकीकडे ज्ञानाच्या पिकाची जोपासना करा व दुसरीकडे झाकून राहिलेली दुर्गुणांची रोपटी उपटून टाका ॥ २ ॥

स्थिरमुक्तीचे धान्य काढा व त्याची मेजवानी करून परमानंदाने तृप्त व्हा. गुरुसिद्धांच्या चरणांना वंदन करून भवरूपी दुष्काळावर मात करा ॥ ३ ॥

ꕥ

5 Falter not in thy initial devotion; but push on steadily until the bliss of self is realised

मोदलिन भक्तियु बदलागदिरलि. आत्मानंदवु लभिसुव वरेगे साधनवु एडे बिडदे नडेयलि

(राग – देस; ताल – दादरा)

तिळियवेकु । निजसुखद निलय सहजानंद ॥ प. ॥

मोदल भक्तिगे । बदलवागदे ॥
मधुर वचनदल्लि मनसु ।
कदलदेकरूपवागि ॥ १ ॥

सुळुवु अरिवुदै । ओळगे मरेवुदै ॥
जळजळाद मनदि ब्रह्म– ।
नाळदोळगे सत्यवन्नु ॥ २ ॥

गुरुबोधदि । अरितु मुददि ॥
परिपरिय विकल्पनळिदु ।
निरुपाधियागुव कील ॥ ३ ॥

8

6 When the divine touch-stone is inside you, why need you spread your garments in a beggarly fashion before others ?

दिव्य परुषवु अंतरंगदल्लि नेलेसिरुवाग बेरेयवरेदुरु सेरगोडुवदेकय्य ?

(राग - देस; ताल – दीपचंदि)

एनु हेळलि एन्न अज्ञानवशदिंद । नानु नन्ननु मरेते ॥ प. ॥

नाना जन्मव तिरुगि तिरुगि । हीन मने संसारकागि ॥
श्वान सूकरनंते मने मने । खूनविल्लदे व्यर्थ तिरुगिदे ॥ अ. प. ॥

पद ५

' यालागिं माझ्या ठायीं । अभ्यासें मिळे ' ।

परमानंदाचे उगमस्थान जाणून घ्या.

भक्तिमार्गावर आरंभशूरता नको. लोकांच्या गोड बोलण्याने मन विचलित होऊ देऊ नका, ते एकाग्र करा ॥ १ ॥

परमेश्वराच्या रूपाची सूक्ष्म हालचाल समजावून घ्या. इतर गोष्टी विसरून जा. निर्मल मनाने सुषुम्ना नाडीतील शक्ती ओळखा ॥ २ ॥

सद्गुरूंचा उपदेश मनावर ठसू द्या. परोपरीच्या विकल्पांना थारा देऊ नका. निरुपाधिसिद्धांसारखे होण्याचे रहस्य जाणा ॥ ३ ॥

ꕥ

पद ६

' घरीं कामधेनू पुढें ताक मागे '

काय सांगावे, अज्ञानामुळे स्वतःचाच मला विसर पडला.

नाना जन्मांचे फेरे केले. घर–दार, संसार अशा फोल गोष्टींसाठी कुत्र्या-मांजरासारखा दारोदार हिंडलो; परमेश्वराला ओळखले नाही.

आत्मन अरियदे यातकु वरदादे । भूत पंचतत्त्व देहवनु मेच्चि ॥
एतरिंदलि बंदितेनगिदु । जीवशिवरेंदेंब भेदवु ।
मातुमातिगे शब्दसूतक । पातकदोळु मुळुगि होदे ॥ १ ॥

भानुकोटिप्रकाश ब्रह्मांड तुंबि । तानागि होळेयुतदे ॥
एनु कारण काळ कत्तले । माय मुसुकु तोरगोडदिदु ।
नानु नीनेंदेंब भेदवु । एनु कारण तिळियगोडदिदु ॥ २ ॥

परुषवु तन्नल्लि परिपूर्णविरलिक्के । सेरगोड्डि वेड्डुवरे वडवरनु ।
हरनु तानोंदाद मेले । नरर बाधेगे सिल्लुकुदेके ।
गुरु कूडल्लूरेशन करुणविल्लदे चरणकाणवु ॥ ३ ॥

परमेश्वराला विसरलो, परोपकाराची आठवण ठेवली नाही. पंचभूतात्मक देहावर आसक्ती ठेवली. जीव– शिवामध्ये भेद करायला मी कुठून बरं शिकलो ? वाचाळ-पणाच्या पापात मी बुडून गेलो ॥ १ ॥

कोटिसूर्यप्रकाश ब्रह्मांडात तुडुंब भरला आहे व स्वत:च झगझगत आहे. पण काळाकुट्ट अंधार आणि मायेचे आच्छादन आड आल्यामुळे मला तो दिसत नाही. मी–तू हा भेद कुठून उपटला ते उलगडत नाही ॥ २ ॥

परीस प्रत्यक्ष हातात असताना दरिद्री लोकांपुढे दीनपणाने कुणी हात पसरतात का ? जीव–शिवाचे ऐक्य झाल्यावर प्रपंचाच्या जंजाळात कशाला पडावे ? गुरू कृडल्टूरेशाचा अनुग्रह झाल्याशिवाय परमेश्वराच्या चरणांचे दर्शन कसे होणार ? ॥३॥

5 The Nature of a Spiritual Teacher

सद्‌गुरुविन लक्षण

1 The identity of God and the spiritual teacher

देवसद्‌गुरुगळ अभेद

(राग–भूप; ताल– दीपचंदि)

देवनल्लवेनो सद्‌गुरु महा– । देवनल्लवेनो ॥ प. ॥
आदियोळु सिद्धरु । होद दारिय तोरि ।
भेदव बिडिसिद । साधु मूरुति गुरु ॥ अ. प. ॥

नरजन्मदोळगे बंदु । प्रपंचद । कडलमध्यदलि निंदु ॥
अरितु मरेतु ओम्मे । गुरुवेंदु नेनेदरे ।
गुरुतिट्टु अवरिगे परतत्त्व तोरिद ॥१॥

आशापाशव बिडिसि । माडिद बहु । दोषकर्मव केडिसि ॥
न्यासध्यासदि जप । माडेंदु बोधिसि प्र– ।
काश तोरिद । ईश महेशनु ॥ २ ॥

भक्तिभाववन नोडदे । नंबिदवरिगे । मुक्तिय पालिसुव ॥
कर्तु सद्‌गुरु भव– । तारक देवनु ।
प्रत्यक्षनादंथ । परब्रह्मरूपनु ॥ ३ ॥

ಜ

2 Process and effects of initiation by the spiritual teacher

सद्‌गुरुविन अनुग्रहद रीति मत्तु परिणामगळु

(राग – काफि; ताल – केरवा)

एंथा गारुडिगा सद्‌गुरु ॥ प. ॥
गुरुविन नंबि ना गुणवेल्ल कळकोंडे ॥ अ. प. ॥

५ सद्‌गुरूंची लक्षणे

पद १

'जैसा देव तैसा गुरु'।

सद्‌गुरू देवच नाहीत का ? ते महादेवच नाहीत का ?
प्राचीन साधुसंत ज्या मार्गाने गेले तो मार्ग दाखवून ज्यांनी भेदबुद्धीचा नायनाट केला ते सद्‌गुरू संतमूर्तीच आहेत.

नरजन्माला येऊन संसारसागरात गटांगळ्या खाताना कळून सवरून म्हणा किंवा नकळत म्हणा, एकदा जरी सद्‌गुरूंचे स्मरण केले, तरी तेवढी जाणीव ठेवून ते डोळ्याला परतत्त्व दाखवतात ॥ १ ॥

सद्‌गुरू शिष्याचे आशापाश तटातट तोडतात. त्याच्या दुष्कर्मांच्या राशी भस्मसात् करतात. शरीराच्या विविध भागांवर विशिष्ट देवतांचे अस्तित्व कल्पून त्यानुसार मंत्राक्षरांचा उच्चार करून (न्यास) व परमेश्वराचा ध्यास घेऊन जप कसा करावा हे शिकवून ते आत्मप्रकाश दाखवितात ॥ २ ॥
वेळप्रसंगी भक्तिभावाची तीव्रता कमी झालीतरी त्याकडे सद्‌गुरू काणाडोळा करतात. भक्ताची श्रद्धा लक्षात घेऊन त्याला मुक्ती देतात.[१०] सर्वकर्ते सद्‌गुरू भवतारक प्रत्यक्ष परब्रह्मच आहेत ॥ ३ ॥

ꕥ

पद २

'श्रवणांत पेरणी केली। ती नयनिं उजेडा आली।'

सद्‌गुरु हे एक महान गारुडी आहेत.
त्यांच्यावर श्रद्धा बसल्यावर माझे दुर्गुण ओसरले.

शरणु मांडेंदरे शरणु माडलु पोदे ।
करदोळु इद्द निजभूति ॥
शिरद मेले एन्न मैमेले एळेयलु ।
शरीरव मरेतु ना साक्षियादेनु ॥ १ ॥

यारू इल्लद नोडि वेरेन्न करेदोय्दु ।
मरकिवियोळिद्दु मंत्रिसिद ॥
नारि बदुकु मने मक्कळनेल्ल ।
सेरि सेरदंते माडिदने गुरु ॥ २ ॥

भवगेडि कुलगेडि संगगेडियादे ।
इवर विश्वासद फलदिंदागले ॥
इवर मेले एन्न व्याकुल हत्तलु ।
व्यवहारवेंबुदु एडवट्टायितु ॥ ३ ॥

मंत्रिसिदागले मरुळु एन्न मन ।
मंत्रतंत्रके बग्गितल्ल ॥
मंत्रद महिमेय महामहिमन कै ।
मांत्रिकरोळु बलु दोड्डवने गुरु ॥ ४ ॥

इवर नंबिद मेले इवरंते आगदे ।
भुवनक्के बंदद्दु फलवेनु ॥
विवरिसि हुरुळिल्ल हेळुकेळुवदेनु ।
भुवनरक्षक चिदानंद तानादनु ॥ ५ ॥

नमस्कार कर म्हटल्याबरोबर मी त्यांना नमस्कार करायला गेलो. हातातली विभूती त्यांनी माझ्या डोक्याला व अंगाला फासली. त्याबरोबर माझे देहभान हरपले व मी सर्वसाक्षी झालो ॥ १ ॥

जिथे चिटपाखरू नाही अशा निवांत स्थळी मला एकट्यालाच बाजूला घेऊन माझ्या टवकारलेल्या कानात त्यांनी बीजमंत्र सांगितला. बायको, मुले, घरदार यांच्या संगतीत मी असूनसुद्धा माझी आसक्ती घालवली ॥ २ ॥

सद्‌गुरूंवर श्रद्धा ठेवल्याचे फळ माझ्या ओटीत पडले. माझे भवबंधन सुटले, कुलाभिमान नष्ट झाला व मी संगरहित झालो. त्यांच्यासाठी[११] मी व्याकुळ झाल्यावर संसार ही एक आडवाट आहे हे ध्यानात आले ॥ ३ ॥

माझे खुळे मन मंत्रतंत्राच्या[१२] मागे लागले होते. बीजमंत्र मिळाल्याबरोबर ते मन खोडकर असूनही श्रेष्ठ सद्‌गुरूंच्या मंत्रसामर्थ्याने जाग्यावर आले. सर्व मांत्रिकांत गुरूच थोर ॥ ४ ॥

सद्‌गुरूंवर निष्ठा ठेवूनही त्यांच्यासारखे होता आले नाहीतर जन्माला येऊन काय मिळवले ? याचे चर्वितचर्वण करण्यात तथ्य नाही. आता पुसणे सांगणे दोन्ही नाही. सद्‌गुरूच जगाचे रक्षण करणारे चिदानंद झाले ॥ ५ ॥

3 The spiritual teacher as de-poisoning the serpent of sense

विषयसर्पद् विषवन्नु कळेव सद्गुरु

(राग–तोडि (कर्नाटकि); ताल–दादरा)

हावु तुळिदेने मानिनि ॥ प. ॥

हावु तुळिदु हारि निंते । जीव कळवळगोंडितु गेळती ॥
भाव स्मृतियु तप्पि मनदि । देव नीने गतियु एंदे ॥ १ ॥

हरिगे हासिगेयाद हावु । हरन कोरळोळिरुव हावु ॥
धरेय होत्तु मेरेव हाविन । शिरव मेट्टिदे शिवन दयदि ॥ २ ॥

बोधानंददिंद बरुव । हादियल्लि मलगि इरुव ॥
नादद्दिंद ध्वनिय कोडुव । मोदरूप क्रोधरूप ॥ ३ ॥

घोरतरद उरगवदर । कोरेहल्लु मुरिदरिंद ॥
सत्य शिशुनाळधीशन सेवकगे । कत्तलेयल्लि कालिगे सुत्तिकोंड ॥४॥

4 The serpent of sense as devoured by a group of spiritons

गोरलिगळ गुंपिनिंद तिन्नलपट्ट विषयसर्प

(राग–देस; ताल–केरवा)

हावु कच्चितम्मा । दारिगे तिळियदिदर महिमा ॥ प. ॥
हाविन विषवु एनगेरितम्मा । देवर करुणेयिंद नानुळिदेनम्मा ॥ अ. प. ॥

मीरिद हावम्मा । मूरु लोक नुंगितम्मा ॥
वेसरिल्लदे माड्यान ब्रह्मा । नेनपादरे मै अंबुदु जुम्मा ॥ १ ॥

पद ३

' विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी ।
ते तुझिया गुरुकृपादृष्टी । निर्वीष होय ' ॥

मी सापाला तुडविले गे माये.[13]

सापाला तुडविल्यावर मी टुणकन् उडी मारली आणि माझा जीव कळवळला ग बाई. क्षणात मी दिग्भ्रांत झालो, स्मृती[14] गेली आणि मनात म्हटलं, देवा, आता माझा त्राता तूच ॥ १ ॥

हा साप विष्णूची शय्या झाला आहे आणि शिवाच्या गळ्यातला हार झाला आहे. आपल्या फण्यावर पृथ्वीला तोलून धरणाऱ्या या डौलदार सापाच्या डोक्यावर, शिवाच्या कृपेने मी पाय दिला ॥ २ ॥

गुरुबोध[15] झाल्यावर त्या आनंदात तो दिसतो. तो वाटेवर झोपलेला असतो. अनाहत नादाचा अनुभव देणाऱ्या ह्या सापाच्या ठिकाणी मोद व क्रोध एकदम दिसतात[16] ॥ ३ ॥

या भयंकर सापाचा विषारी दात उपटल्यामुळे अंधारात शिशुनाळधीशाच्या दासाच्या पायाला त्याने विळखा घातला, तरी मी त्याला तुडविले[17] ॥ ४ ॥

पद ४

तिळाएवढ्या बिंदुल्याने विषयसर्पाला गिळून टाकले

बाई ग, मला साप चावला. याचा महिमा कुणालाही कळला नाही.

सापाचे विष मला चढले पण देवाच्या दयेने मी वाचलो.

हा साप आपल्या शक्तीबाहेरचा आहे. त्याने त्रिभुवनाला गिळून टाकले. अजिबात न कंटाळता, ब्रह्म्याने याला निर्माण केले आहे. सापाची आठवण झाल्याबरोबर अंगावर काटाच येतो ॥ १ ॥

मूरु मोळद हुत्तु । ओंवत्तु रंध्रगळदकित्तु ॥
याव रंध्रदिंद हावु सेरितु । ओळगिन गोरलि एत्त होयितु ॥ २ ॥

बाल मेलकेत्ति । भोरेंब शब्द नुडीतैति ॥
मणिपुर कमलदलि मलगिकोंडैति । वेलेयिल्लद रत्न अदर हेडेयोळगैति ॥३॥

गोल्लन हुडुकिदेम्मा । गोल्लनु मंत्र हेळिद प्रणम ॥
गोल्लन मंत्रके अंजितु हावा । विषद कोळवि तोळेदु होदितो कर्मा ॥४॥

सण्ण गोरलि वंतु । हाविन हुत्तु सहित नुंगितु ॥
याव स्थानदलि आ गोरलि इत्तु । मूल प्रणव बल्लवगे गोत्तु ॥५॥

गोरलि हाविगे नुंगि । धरेयोळु मेरेयुव शिरसंगि ॥
दोरे श्रीगुरु बलभीमयोगि । आतन चरणकेरगिदरे स्वर्गके सागी ॥ ६ ॥

5 A pathetic prayer for the descent of grace from the spiritual teacher

करुणव दयपालिसलु गुरुविगे करुळिन करे

(राग – तिलंग; ताल – त्रिताल)

करुणिसो गुरु एनगे ।
अरगळिगे नी एन्न हृदयदिंदगलद हांगे ॥ प. ॥

कण्णिनोळगे निन्न काणदिद्दरे पूर्ण ।
प्राणनिल्लदो निमिषार्धविल्लि ॥
क्षणक्षणक्कोदगि नी खून तोरदिद्दरे ।
तनु विकळितवागि क्षीण होंदुवदो ॥ १ ॥

साडेतीन हात उंचीचे एक वारुळ आहे (शरीर). त्याला नवद्वारे[१८] आहेत. कोणत्या दारातून साप आत शिरला बरे ? आणि आतले बिंदुले कुठे निघून गेले ? ॥ २ ॥

शेपूट उभारून हा साप जोराने फूत्कार टाकतो. तो मणिपुर चक्रात निद्रिस्त आहे व त्याच्या फण्यावर अमोलिक रत्न आहे ॥ ३ ॥

मी गारुड्याचा शोध केला. त्या गारुड्याने मला प्रणवमंत्र दिला. गारुड्याच्या मंत्राला साप भ्याला, आणि माझ्या कर्माच्या विषाचे रांजण फुटले ॥ ४ ॥

तिळाएवढे एक बिंदुले आले आणि त्याने वारुळासकट सापाला गिळून टाकले. हे बिंदुले कोणत्या स्थानी होते, ते ओंकार–ब्रह्म जाणणाऱ्यालाच माहीत ॥ ५ ॥

बिंदुल्याने सापाला गिळले. पृथ्वीच्या पाठीवर शिरसंगि हे ठुमदार गाव आहे. त्या गावाचा राजा जो बलभीमयोगि त्याचे पाय धरलेस तर तुला स्वर्गप्राप्ती होईल ॥ ६ ॥

ꕥ

पद ५

' कृपाकटाक्षें सांभाळि दीना '

गुरुदेवा, माझ्यावर दया करा आणि पळभरही माझ्यापासून दूर जाऊ नका.

तुम्हाला डोळे भरून पाहता आले नाहीतर एक निमिषार्धही माझे प्राण टिकणार नाहीत. एक क्षण जरी तुम्ही नजरेआड झालात, तरी तुमच्या वियोगाने सर्व काया व्याकुळ होऊन जाते ॥ १ ॥

बेडुवदोंदे ना बिडदे निज रूपव ।
रूढियोळगे दृढ निश्चयदि ॥
एड बल नोडदे कडलु होक्किहेनो ।
कडेगाणिसो एन्नोडेयने पिडिदु कैय ॥ २ ॥

सुत्तु सुळियुतलेन्न चित्तदिंदगलदे ।
नित्यवागिरो हृत्कमलदलि ॥
हेत्त तायियोपादि तुत्तु तुत्तिगे ओम्मे ।
हत्तरिदु संतत सलहो महिपतिगे ॥ ३ ॥

ಜ

6 The grace of the spiritual teacher has no parallel

सद्गुरुविन करुणक्के एणेये इल्ल

(राग – दरबारि; ताल – दीपचंदि)

गुरुरायनंथ करुणाळु । काणे ना ई जगदोळु ॥ प. ॥

एनोंदरियद पामर नानु ।
ज्ञान भक्ति वैराग्य रहितनु ।
तानोलिदीगेन्ननुद्धरिसिदनु ॥ १ ॥

माडुव घन तुसु तप्पनु हिडिय ।
बेडिसिकोळ्ळदे नीडुत पोरेव ।
रूढिगादनो इहपरदोडेय ॥ २ ॥

तन्नवनेनिसिद मातिगे कूडि ।
मन्नणे इत्तनु अभयव नीडि ।
इन्नेनु हेळली सुख नोडि ॥ ३ ॥

जन्माला येऊन तुमचे रूप डोळ्यांनी पाहावे हेच एक आर्त मागणे आहे. मागचा पुढचा विचार मी कधी केला नाही आणि संसारसागरात बुडून गेलो. मला हात द्या आणि बाहेर काढा ॥ २ ॥

माझ्या अवतीभवती राहा. तुमचे रूप सदैव चित्तात राहू द्या व माझ्या हृदयात नित्य वास करा. जन्मदात्या आईप्रमाणे माझ्याजवळ राहा व एकेक घास भरवून, या महिपतीचे निरंतर रक्षण करा ॥ ३ ॥

पद ६

सद्‌गुरुकृपा अनुपम आहे

या जगात सद्‌गुरूंइतके दयावंत कुणीही दिसत नाही.

काही एक न जाणणारा मी एक पामर आहे. ज्ञान, भक्ती, वैराग्य यांचा माझ्या ठिकाणी लेशही नाही. तरीही सद्‌गुरूंनी माझ्यावर कृपा करून माझा उद्धार केला ॥ १ ॥

माझे लहानमोठे अपराध त्यांनी पोटात घातले. मी न मागताच कृपेचा वर्षाव करून ते माझे रक्षण करतात. या जन्मातच माझ्या इह-पर कल्याणाचे ते स्वामी झाले ॥ २ ॥

शिष्याची जबाबदारी सद्‌गुरूंवरच असते या वचनानुसार त्यांनी माझा गौरव केला व मला अभय दिले. ते सुख काय सांगू ? ॥ ३ ॥

तन्ननुभव निज मातिन गुट्टु ।
एन्नोळुसुरि घन तोरिसि कोट्टु ।
धन्यन माडिद सेवेयोळिट्टु ॥ ४ ॥

तंदे तायि बंधुबळगेनगागि ।
इंदु सद्गुरु महिपति महायोगि ।
कंदन सलहो नी लेसागि ॥ ५ ॥

ಜ

7 Yogic effects of the grace of the spiritual teacher

सद्गुरु कृपेयिंदुंटागुव यौगिक परिणामगळु

(राग – खमाज; ताल – केरवा)

मंगलवागिहुदु सद्गुरुविगे ॥ प. ॥
कंगळ कोनेयलि थळथळ होळेयुव ।
तिंगळ बेळकिन तिळिरस उक्कुव ॥ अ. प. ॥
आरु चक्रव मीरि । सूक्ष्म ।
द्वारदोळगे सेरि ॥
एरि सासिर दळ पद्मसिंहासनदि ।
भूरि ब्रह्मानंद पदविय सेरुव ॥ १ ॥
विरति एंबुव बत्ति । भक्ति ।
एरकवागिह सुघृत ॥
एरडु ओंदागलु अरिवेंब ज्योतियु ।
उरियलु तामस कत्तले कळेद ॥ २ ॥
रविशशिगळ तेरदि । बेळगुव ।
प्रविमल चित्कळेय ॥
ओळहोरगेरडेंबुवदने अरियदे ।
अविरल गुरुमहलिंगन तेजद ॥ ३ ॥

स्वतःचा पारमार्थिक अनुभव व स्वतःच्या वचनाचे रहस्य मला सांगून सद्वस्तूचे दर्शन घडवले. आपल्या सेवेची संधी देऊन मला धन्य केले ॥ ४ ॥

माझे मायबाप, बंधु-बांधव तेच झाले. हे योगिराजा, महिपती, या बालकाचे नीट रक्षण करा ॥ ५ ॥

पद ७

सद्गुरुकृपेचे यौगिक परिणाम

गुरू तेथे मांगल्य.

सद्गुरूंच्या डोळ्यांच्या कोपऱ्यात परमेश्वराचे रूप झगमगत असते. लखलखीत चंद्रामृत त्यातून काठोकाठ भरून वाहते (अमृतरसाचा अतींद्रिय अनुभव येतो).

षट्चक्रभेद करून, सूक्ष्म द्वारातून (सुषुम्नेतून) प्रवेश करून, सहस्रदल-कमलापर्यंत चढून, त्या कमलसिंहासनावर विराजमान होऊन, ब्रह्मानंदाची पायरी सद्गुरू गाठतात ॥ १ ॥

विरक्तीची वात भावभक्तीच्या तुपात भिजवून सद्गुरू ज्ञानज्योत पेटवतात व तमोरूपी अंधकार नष्ट करतात ॥ २ ॥

सद्गुरू चंद्रसूर्याच्या तेजाप्रमाणे देदीप्यमान आहेत. ते निर्मळ चित्प्रकाश आहेत. गुरुमहलिंगांच्या सबाह्यअभ्यंतरी अवघी घनदाट दीप्ती आहे ॥ ३ ॥

6 Functions of a Spiritual Teacher

सद्‌गुरुविन कार्य

1 Metaphysical and axiological characteristics of a spiritual teacher

सद्‌गुरुविन सत्ताशास्त्रीय हागु मूल्यशास्त्रीय लक्षणगळु

(राग – काफि; ताल – दादरा)

योगि बंदनो शिवयोगि बंदनो ॥ प. ॥

भोगसुखव त्याग माडि ।
आगमोक्तदिंद नडेव ॥ अ. प. ॥

तत्त्वमसि महावाक्य ।
तत्त्व तिळिसि माय मोह ॥
कत्तलेय कडिदु चित्त ।
नित्यदल्लि निलिसुवंथ ॥ १ ॥

तम्म तावु मरेतु जनरु ।
हम्मिनोळगे विद्दरिवरु ॥
कर्मवन्नु कडिदु पर– ।
ब्रह्मवन्नु तोरिसुवंथ ॥ २ ॥

तंदे भवतारकन पाद ।
हों दिदवरिगेल्ल परमा– ।
नंद पदवि कोट्टु दया– ।
सिंधु मुक्ति पडिसुवंथ ॥ ३ ॥

६ सद्‌गुरूंचे कार्य

पद १

'संतसंगें कळे सर्व शास्त्रभाग । आणि ज्ञानयोग अप्रयासें' ।

योगी आले आहेत. शिवयोगी आले आहेत.

भोगसुखावर त्यांनी पाणी सोडले आहे. यांनी आगमात[१९] सांगितल्याप्रमाणे सदाचरण ठेवले आहे.

तत्त्वमसि या महावाक्याचे रहस्य मनावर ठसवून त्यांनी माझ्या मनातला माया-मोहरूपी अंधकार नष्ट केला. माझे चित्त त्यांनी शाश्वत परब्रह्माच्या ठिकाणी स्थिर केले ॥ १ ॥

आपले खरे स्वरूप विसरून सामान्य लोक मदांध होतात. कर्मनाश करून सद्‌गुरू परब्रह्म प्रकट करतात ॥ २ ॥

दयासागर भवतारकांच्या पायांचा आश्रय घेणाऱ्यांना सद्‌गुरू परमानंद देऊन मुक्ती देतात ॥ ३॥

2 One-pointed devotion to God and teacher will relieve you from thraldom to sense

देव-गुरुगळल्लिय अनन्य भक्तियु निन्नन्नु विषयदास्यदिंद मुक्तगोळिसुवदु

(राग – भूप ; ताल – केरवा)

सैं शवास गवरु दरोडे वरतद ।
अवव नोडिदर अर्भाट ॥ प. ॥
सवद ऐतिदु साधुर पुण्य ।
शुभ नुडीतद शकुनद हक्कि ॥ अ. प. ॥

ऐदु मंदि नेलगळ्ळरु कूडि ।
सारि आत्मदलि सेरुवरु ॥
ऐक्यदिंद श्री गुरुविन नेनेदरे ।
ऐदु मंदि विट्टोडुवरु ॥ १ ॥

एंटु हत्तु मंदि बंटरु कूडि ।
मुत्तिगे हाकि निन्न केडहुवरु ॥
सत्यनाद श्रीगुरुविन नेनेदरे ।
हत्तु मंदि विट्टोडुवरु ॥ २ ॥

नोडि ओगियो काडवु हुलिगळु ।
वेडिद पदार्थ दोरकुवदु ॥
कूडि भजिसो श्रीचिदानंदन ।
मूलमंत्र प्रणव दोरकुवदु ॥ ३ ॥

पद २

' त्रिविध तापांसि हारक हे गुरुपाय '

शाबास रे पठ्ठ्या. दरोडा येत आहे पाहा. अबब ! दरोडेखोरांची गर्जना तर ऐक.

साधुसंतांचे पुण्य फळले आहे म्हणून भारद्वाज पक्षी शुभशकुन सांगतो आहे.

पाच भूमिचोर[२०] (हृदयरूपी भूमी चोरणारे) येऊन आत्म्यावर हल्ला करतात. एकाग्र चित्ताने गुरूंचे स्मरण केलेतर चोर आपल्याला सोडून पळून जातात ॥१॥

आठ[२१] (अष्टमद) व दहा[२२] (दशेंद्रिये) योद्धे तुझ्यावर आक्रमण करून तुझा पाडाव करतील खरे, पण सद्गुरूंचे स्मरण केलेस तर ते सगळे हल्लेखोर मागच्या मागे पळून जातील ॥ २ ॥

लक्षपूर्वक शत्रूचा वेध घे, मग हे वाघ तुला छळणार नाहीत. उलट, हवी ती वस्तू तुला मिळेल. तन्मयतेने श्री चिदानंदांचे ध्यान केलेस तर मूलमंत्र ओंकाराची तुला सहज प्राप्ती होईल ॥ ३ ॥

3 The single, dual and triple thorns of life can be burnt only in the fire of the teacher's grace

सद्गुरुविन करुणाग्निये जीवनदल्लिय ओंटि, जोड्डु हागु मूमुख मुळ्ळुगळन्नु सुडबल्लुदु

(राग–भूप; ताल–केरवा)

एन भरा नट्टीतप्पा एनगे मुळ्ळा ।
ब्यानि ताळि हेळलारेनप्पा इदर घोळा ॥ प. ॥
हड्डि नोडिदर सिगवल्लदंथा मायाद मुळ्ळा ।
इदु बहळ मंदिगे मुरिदु माडेतप्पा मळ्ळा ॥ अ. प. ॥

मानाभिमान एरडु जोड मुळ्ळा ।
एन्न किय्याग बडिदु कंडितप्पा जिव्हाळा ॥
स र् र् रा विषवेरि अंगाला ।
तल्याग जुम्म हिडिदु अळकितप्पा नाभिस्थला ॥ १ ॥

स्वाद रुचियेंबेरडु जोड मुळ्ळा ।
इवु बहाळ मंदिगु मुरिदु माड्यावप्पा घोळा ॥
नालिगियोळग मुरिदीतप्पा ब्यालद मुळ्ळा ।
एन्न होट्टियोळग उरुप विट्टिदे एंथा काळा ॥ २ ॥

हेण्णु होन्तु मण्णु इवु मूरु मुळ्ळा ।
एन्न कण्णोळु चुच्यावप्पा एंथा काळा ।
एल्लाकिंता दोड्डु इवु डोण्णिमुळ्ळा ।
मूरु लोकक्केल्ला मुरिदु माड्यावप्पा खुळ्ळा ॥ ३ ॥

बेकागि मुरसिकोंडीरप्पा नीवु मुळ्ळा ।
निम्म काल तावे बेल्याग होगि हाय्लिल्ला ॥
ता माडि ननग तंदु इट्टु काळा ।
नानु यार मुंदे हेळलेप्पा नन्न घोळा ॥
लैन दारिलि ना इद्दु नंद्याळा ।
गुरु संगतीलि सुट्टीनप्पा इष्टु मुळ्ळा ॥ ४ ॥

पद ३

सद्‌गुरूंच्या कृपाग्नीत आयुष्यातील एक, दोन आणि तीन काटे जळून जातात

किती जोरात काटा रुतला बाबा. त्याच्या किती असह्य वेदना होत आहेत ते सांगता येत नाही.

खोल टोकरून पाहिलेतरी हा मायेचा काटा नजरेस पडत नाही. हा काटा मोडल्यामुळे अनेक लोकांना वेड लागले आहे.

मान–अभिमान ही काट्यांची एक जोडी आहे. ती कानाला बोचून जिव्हारी लागली. त्याचे विष सरसर चढले व तळपायापासून मस्तकापर्यंत मुंग्या आल्या. बेंबीच्या देठापर्यंत शरीर हादरले ॥ १ ॥

वास आणि चव ही काट्यांची दुसरी जोडी आहे. अनेक लोकांना टोचून यांनी गोंधळ घातला आहे. जिभेला एक बेलाचा काटा लागला. त्याने पोटात जीवघेणी आग पडली ॥ २ ॥

द्रव्य-दारा-पदार्थ हे तीन भयंकर काटे डोळ्याला लागले. इतर काट्यांपेक्षा हे फार जाड आहेत. ह्या काट्यांच्या प्रतापाने त्रिभुवन खुळे झाले आहे ॥ ३ ॥

डोळे उघडे ठेवून आपण हे काटे स्वत:ला बोचू देतो. आपले पाय काही ओढून नेऊन आपल्याला काटेरी कुंपणावर ढकलत नाहीत. आपल्या हातांनी आपण जे करतो ते भोगणे आलेच. आता ही कथा सांगायची कुणाला ? मी नंद्याळ स्वत: सरळ मार्गाने जातो. म्हणून गुरुकृपेने हे सगळेच्या सगळे काटे जळून गेले ॥ ४ ॥

4 Spiritual teacher as saviour from calamities

सद्गुरुवु संकटगळल्लि रक्षिसुव

(राग–जंगला; ताल–केरवा)

गुरुवे निम्म स्मरणेय नानु मरेयलारेनु ॥ प. ॥
मरेयलारे मरेयलारे मरेतिरलारेनु ॥ अ. प. ॥

कालहरण नीलकंठ पालिसेन्ननु ।
बालकरिगे अभय कोट्टु सलहु शंकरने ॥१॥

तनुव मनव धनव निमगे ओप्पिसिरुवेनो ।
मनव निम्म पाददल्लि निल्लिसिरुवेनो ॥२॥

बंद दुरित दूर माडो इंदु शंकरा ।
तंदे भजक भक्त हरळ दोष परिहारा ॥३॥

धरेयोळु हिरिय हरिदास पुरंदरदासने ।
मेरेयुव दोड्डपेटि बसव गुरुवर्यने ॥४॥

5 Teacher as saviour from temptations

प्रलोभनगळिंद सद्गुरु परावृत्तगोळिसुव

(राग – भैरव; ताल – दीपचंदि)

एनु अन्याय तिळियदु देवाधिदेवा ।
अन्याय क्षमिसदे एन्न ओप्पिसि कोट्टि देवा ॥ प. ॥

निम्म बोधव केळि सारासार विचारदोळगे आगि ।
निम्म पुण्यदिंद अन्याय ना माडिल्ल ।
न्याय अन्यायवु निमगे ओप्पितु देवा ॥१॥

पद ४

'मला संकटीं सोडवावे समर्था'।

हे सद्‌गुरू, तुम्ही दिलेल्या नामाचे विस्मरण मला होईलच कसे ?

विस्मरण होणार नाही, होणारच नाही. विस्मरण झालेतर मी जिवंततरी कसा राहीन ?

हे मृत्युंजया, नीलकंठा, माझे रक्षण करा. बालकांना अभय देऊन, हे शंकरा, त्यांना सांभाळा ॥१॥

माझे तन-मन-धन मी तुम्हाला अर्पण केले आहे. माझे चित्त तुमच्या चरणांवर स्थिर केले आहे ॥२॥

आज माझ्यावर कोसळलेले संकट दूर करा. तुम्ही भक्तांचे कैवारी आहात; भक्तश्रेष्ठांचे दुरित तुम्ही निवारण करता ॥३॥

हे तेजस्वी सद्‌गुरू, दोड्डपेटि बसवा, तुम्ही पृथ्वीच्या पाठीवरील श्रेष्ठ हरिदास पुरंदरदासच आहात ॥४॥

❀

पद ५

'आतां आड उभा राहे नारायणा'

हे देवाधिदेवा, माझे चुकले तरी कुठे ? मला क्षमा न करता दैवाच्या हवाली का करून टाकलेस ?

तुमच्याकडून मला उपदेश मिळाला; सारासार विचार करण्याची मला शक्ती आहे. तुमचे पुण्यही माझ्या पाठीशी आहे; म्हणूनच माझ्या हातून अपराध घडला नाही. पाप-पुण्य सर्व तुमच्या हाती सोपवले आहे ॥ १ ॥

एन्न माया एनगे शास्त्रवनेत्ति होडेव ।
समयक्के साक्षात्कारदलि स्वामि ताने निंत ।
अवन ध्यान माडेंदु तिळिसि हेळिदि देवा ॥२॥

उमदि प्रभु निम्म सुळुवु सूक्ष्मवनु कूडि ।
निम्म होरतु नानिन्यारिगे उसुरलि देवा ॥३॥

ಜ

6 Spiritual teacher as endowing one with the vision of the full form of the self

सद्गुरु पूर्ण आत्मरूपवन्नु तोरिसुव

(राग - बिलावल; ताल - त्रिताल)

ह्यांगे तीरितु निम्मुपकार । इदु अपरंपार ॥ प. ॥
ह्यांगे हिंगिसलि जन्मद अवतार । गुरुराया गंभीरा ॥ अ. प. ॥

भूतपंचक देहवनु धरिसि । नूतन तनु तोडिसि ।
दात ऐदक्षरवनु कलिसि । चित्तव तानोलिसि ।
इतर भयव परिहरिसि । प्रारब्धवनोरिसि ॥१ ॥

सकल स्वरूप तानागि । नानेंबुद नीगि ।
मुकुरानंद बोधिसलागि । निखिल निःसंगि ।
मुक्तांगिय मदुवेयागि । संतरिगे शिर बागि ॥२॥

धरेयोळु कडकोळ क्षेत्र । उपमेयरियेनु मात्र ।
सुरनरलोक विचित्र । करुणारसनेत्र ।
सुक्षि मीरिद विचित्र । माडिदनु पवित्र ॥३॥

ಜ

मला मोहाचा तडाखा बसणार होता. त्या समयी तुम्ही मला दर्शन दिलेत व माझा पाय घसरू दिला नाहीत. परमेश्वराचे ध्यान कर असे सांगितलेत ॥ २ ॥

हे उमदीशा, परमेश्वराच्या सूक्ष्म हालचालीचा अनुभव मला आला आहे. आता तुमच्याशिवाय मी दुसऱ्या कुणाची करुणा भाकू ? ॥ ३ ॥

ꕥ

पद ६

'सद्‌गुरुकृपा होताचि पूर्ण। स्वरूपीं लागलें अनुसंधान'।

तुमचे उपकार अपरंपार आहेत. ते मी कसे फेडणार ?
हे सद्‌गुरू, जन्ममरणाचा फेरा मी कसा चुकवू ?

मी पंचमहाभूतांचा देह धारण करून आलो. पण पंचाक्षरी मंत्र (नमः शिवाय) देऊन तुम्ही मला नवीन जन्म दिलात. माझे चित्त प्रसन्न करून सर्व प्रकारचे भय नाहीसे केलेत आणि माझ्या प्रारब्धाची रेखा पुसून टाकलीत ॥१॥

माझा सर्वात्मभाव जागा झाला आणि मीपणाची भाषाच गेली. माझे पूर्ण आत्मस्वरूप आरशासारखे तुम्ही माझ्या समोर धरलेत. मी आता पुरा निःसंग झालो, मी मुक्तिनोवरी परिणिली आणि संतांना नमन केले ॥२॥

या पृथ्वीवर असलेल्या कडकोळ या क्षेत्राला उपमाच नाही. भूलोक व देवलोक दोन्हीकडे हे नवलपरीचे आहे. अगाध लीला करणाऱ्या माझ्या कारुण्यमूर्ती सद्‌गुरूंनी मला पवित्र केले ॥ ३ ॥

ꕥ

7 Liberation means the vision of the manifold form of God

परमात्मन बगेबगेय रूपगळ दर्शनवे मुक्ति

(राग-दुर्गा; ताल-त्रिताल)

सारि चेल्लिदे सुकृति । गुरु ।
तोरिसदल्लदे काणिसदण्णा ॥ प. ॥

वेदद मोदलिन मूलविदु ।
मेदिनियोळु ता तुंबिहुदु ॥
हादि हादिगे वित्तिहुदु । इदु ।
साधक जनरिगे काणुवदण्णा ॥१॥

एत्त नोडल्ल परब्रह्मविदु ।
सुत्तुमुत्तल्ल सुळियुवदु ॥
मत्ते मत्तेयागि कांबुवदु । गुरु– ।
पुत्रिगल्लदे काणिसदण्णा ॥२॥

हिंदे नोडल्लु बंदिहुदु ।
मुंदे नोडल्लु निंदिहुदु ॥
संदि संदिगे जडिदिहुदु । अ– ।
नंद गुहेश्वरलिंगविदण्णा ॥३॥

पद ७

अवघे विश्वरूप दृष्टिगोचर होणे हीच मुक्ती

मुक्तीची सर्वत्र पखरण झाली आहे. पण गुरुकृपा झाल्याशिवाय तिची प्राप्ती नाही.

विराटरूप अनादी आहे; वेदांच्याही आधीचे आहे. चराचर विश्वात ते कोंदले आहे. येण्याजाण्याच्या वाटेवर त्याची पेरणी झाली आहे. ते साधकांनाच गवसते ॥१॥

जिकडे पाहावे तिकडे परब्रह्मच आहे. अवतीभोवती त्याची हालचाल चालली आहे. पुन्हा पुन्हा त्याचे दर्शन होते. गुरुपुत्रांशिवाय इतरांना त्याचा थांगपत्ता लागत नाही ॥२॥

मागे पाहिले तर विराटरूप हजर आहे. पुढे पाहिले तर समोर उभेच आहे. सांदी-कोपऱ्यात जडलेले आहे. हे रूप आनंद गुहेश्वरलिंगच आहे, बाबा ॥३॥

7 Relation of the Spiritul Teacher to the Disciple – Part – 1

गुरुशिष्यर संबंध – भाग १

1 It is impossible to forget thy obligation, oh spiritual teacher

अय्य ! गुरुदेव ! निन्न उपकृतियन्नु मरेयलारे

(राग–देस; ताल–दीपचंदि)

गुरुदेव नी माडिदुपकृतियनु नानु
मरेयनेंदिगू इहदोळु ॥ प. ॥

पोडवियोळखिल वेदागमशास्त्रगळ ।
विडदे साधिसिद वादिगळेल्ला ॥
होडेदाडि काणदा परतत्त्ववनु नीनु ।
तंदेन्न करके कोट्टिदरिंदे ॥ १ ॥

कंदमूलगळ सेविसि वायुगळनोत्ति ।
बंधिसि पंचाग्नि मध्यदि ॥
निंदु योगिगळु नोडदा परब्रह्म ।
तंदेन्न कण्णिगे तोरिदरिंदे ॥ २ ॥

तरुळ एन्नय मेले दय हुट्टि शिवने श्री ।
गुरुसिद्धनेंब नामवनांतु ॥
गुरुरूपदिंदेन्न बोधिसि तन्नोळु ।
बेरसुत्ते मोक्षवित्तुदरिंदे ॥ ३ ॥

७ गुरुशिष्यसंबंध – भाग १

पद १

'विसरूं कसा मी गुरुपादुकाला'

हे सद्गुरू, तुमचे उपकार जिवात जीव असेतो मी विसरणार नाही.

अखिल वेद,[२३] आगम[२४] किंवा शास्त्रे[२५] यांना पचवणाऱ्या जगातल्या पंडितांना धडपड करूनसुद्धा ज्याचा थांगपत्ता लागला नाही ते परतत्त्व तुम्ही माझ्या हातावर आणून ठेवलेत ॥ १ ॥

कंदमुळे भक्षण करून मूलबंध साधून (वज्रासनावर बसून) पंचाग्निसाधन[२६] करूनसुद्धा योग्यांना जे परब्रह्म गवसले नाही ते तुम्ही माझ्या डोळ्यांना दाखविलेत ॥ २ ॥

या लहान बालकाची दया येऊन शिवच गुरुसिद्ध हे नाव धारण करून आले आणि गुरुरूपाने त्यांनी मला उपदेश केला. त्यांनी स्वत:मध्ये व माझ्यामध्ये सामरस्य घडवून आणले व मला मोक्ष प्रदान केला ॥ ३ ॥

2 A prayer to the spiritual teacher

सद्‌गुरुविगे प्रार्थने

(राग–केदार; ताल–झपताल)

देव, हिरि गुरुराय, तिळियदे निन माय
सेळेयदिरलेन्न मन जगद् वैभववु ।
भाव बलियलि ध्यानदलि वेरेयलेन्न मन
देव तोरलि तन्न दिव्य वैभवव ॥ १ ॥

दुरुळतेयु अळियलै, सरळतेयु मोळेयलै
मैयु सवेयलि निन्न सेवेयल्लि ।
मतियु होळेयलि नाथ, कुदुरलेन्नय मातु
कृतियु बेळगलि निन्न बेळकिनल्लि ॥ २ ॥

निन्न नामव मनवु नित्य नेनेयुतलिरलि
अन्य विषयंगळनु बयसदिरलि ।
निन्न नामद सुधेय, मनदणिये सवियुतलि
आनन्द-सागरदि मुळुगुतिरलि ॥ ३ ॥

निन्न करुणवे अन्न, निन्न करुणवे नीरु
निन्न करुणवे उसिरु एनगागलि ।
निन्न ओलविन सेलेयु तोरेदु सुधेयनु सुरिदु
संततेन्ननु पोरेदु वेळेसुतिरलि ॥ ४ ॥

निन्न मित मातुगळु मिंचु-मातुगळय्य
संचरिसि वेळकु बल नीडुतिरलि ।
निन्न हिरि नुडिगळवु सिडिलिन कुडियय्य
गुडुगि एदेयिं दैन्य दूडुतिरलि ॥ ५ ॥

पद २

सद्‌गुरूंची प्रार्थना

हे प्रभू, हे श्रेष्ठ सद्‌गुरू, तुमची माया अनाकलनीय आहे. या जगाच्या झगमगाटाची ओढ मला लागू नये. माझा भाव मोहरून येऊ दे. ध्यानात माझी तंद्री लागू दे. देव मला आपले दिव्य वैभव दाखवो ॥ १ ॥

दुष्टपणाचा नाश होवो; सरलतेला अंकुर फुटो. तुमच्या कारणी माझा देह पडावा. देवा, माझी मती प्रकाशाने धवळून जावी. माझ्या वाणीला फुलोरा यावा. माझी कृती तुमच्या प्रभेत न्हाऊन निघावी ॥ २ ॥

माझ्या मनाला सदैव तुमच्या नामाच्या स्मरणाचा छंद लागावा. इतर विषयांत ते गुंत नये. तुमच्या नामामृताचे आकंठ पान करत माझे मन आनंदसागरात डुंबावे ॥ ३ ॥

तुमची कृपाच माझे अन्न आणि तेच माझे पाणी. मला संजीवन देणारा प्राणवायू तोच. तुमच्या करुणेच्या निर्झराला पाझर फुटून त्यातील अमृतस्रावाने सतत माझे पोषण व्हावे ॥ ४ ॥

तुमचे स्मितभाषण विद्युल्लतेप्रमाणे आहे. ते माझ्या अंतःकरणात बिंबून माझ्या मनाला प्रकाशाचे व बलाचे पंख फुटावे. तुमच्या कृपाभरित शब्दांच्या घनगर्ज गडगडाटाने माझ्या हृदयाचे दैन्य फिटो ॥ ५ ॥

3 You have saved me from my mortal disease oh ! my spiritual teacher

अय्य ! गुरुराय ! घोर रोगद्दिंद नीनेन्न काय्दे

(राग – भूप; ताल – दीपचंदि)

गोपालदासराय । निन्नय पाद ।
ना पोंदिदेनो निश्चय ॥ प. ॥
ई पीडिप त्रयतापगळोडिसि ।
कै पिडिदेन्ननु नी पालिसनुदिन ॥ अ. प. ॥

घोर व्याधिगळ नोडि । विजयराय ।
भूरि करुणव माडि ॥
तोरिदरिवरे उद्धारकरेंदंदि– ।
नारभ्य तव पाद सेरिदे सलुहेंदु ॥
सूरिजन संप्रीय सुगुणो– ।
दार एन्नय दोषनिचयव ॥
दूर गैसु दयांबुधिये नि– ।
वारिसदे कर पिडिदु बेगने ॥ १ ॥

अपमृत्युवनु तोडेदे । एन्नोळगिप्प ।
अपराधगळ मरेदे ॥
चपल चित्तनिगोलिदु विपुल मतियनित्तु ।
निपुणनेंदेनिसिदे तपसिगळिंदलि ॥
कृपणवत्सल निन्न करुणके ।
उपमे काणेनो संततवु का– ॥
श्यपियोळगे बुधरिंद जगदा– ।
धिपन किंकरनेनिसि मेरेदे ॥ २ ॥

पद ३

'गुरुकृपेनें जिंकोनि काळा । अमर झाला अनायासें'।

हे गोपालदासराया, मी तुमच्या चरणांचा आश्रय घेतला आहे हे निर्विवाद.

तापत्रयांच्या[६९] नख्या मोडून टाका. मला हाताशी धरून माझ्यावर पाखर घाला.

माझ्या दुर्धर व्याधी पाहून विजयरायांनी माझ्यावर अपार करुणा केली व माझा उद्धार करणारे तुम्हीच आहात असे सांगितले. तेव्हापासून ती आशा बाळगून मी तुमच्या पायाशी आलो आहे. विद्वज्जनांना तुम्ही प्रिय आहात, अति उदार आहात, माझा अव्हेर न करता, माझा हात धरून तुम्ही माझ्या दुर्गुणांचे डोंगर चूर्ण केलेत ॥ १ ॥

माझा अपमृत्यू टाळलात. माझे कोटी अपराध पोटात घातलेत. मी चंचल असलोतरी माझ्यावर कृपा करून मला चांगली बुद्धी दिलीत व तपस्वी लोकांकडून माझी वाहवा केलीत. हे भक्तवत्सला, तुमची कृपा अनुपमेय आहे. पृथ्वीवरील पंडितांनी हाच भगवंताचा भक्त आहे, असा माझा गौरव केला ॥२॥

एन्न पालिसिदंददि । सकल प्र– ।
पन्नर सल्हो मुददि ।।
अन्यरिगीपरि बिन्नपगैये ज– ।
गन्नाथ विठलन्न संस्तुतिसुव धीर ।
निन्न नंबिद जनरिगीपरि ।
बन्नवे, भक्तानुकंपि श– ।।
रण्य बंदोदगी समयदि अ– ।
हर्निसि ध्यानिसुवे निन्न ।। ३ ।।

❀

4 I am the slave of my master

नानु एन्नोडेयन गुलामनु

(राग–मिश्रकाफि; ताल–केरवा)

कडकोळद ना गुलामा । नीवु ।
करेदल्लिगे ना बरांवा ।। प. ।।
हाकिकोट्ट जहागीर इनामा । ना ।
गुरुविगे माडतीनि सलामा ।। अ. प. ।।

जगदोळगे ना इरांवा । जग– ।
क्रीडेयोळगे ना आडांवा ।।
जनरिगे सण्णागि नड्यांवा । ना ।
गुरुविन गूळ्यागि मेऱ्यांवा ।। १ ।।

दशेंद्रिय गुणगळ कळ्यांवा । ना ।
दशरथरायन्हांग होळ्यांवा ।।
कसरत कमायि माडांवा । ना ।
कबीर कमालन्हांग हाडांवा ।। २ ।।

माझे रक्षण केलेत तसेच सर्व शरणागतांचे प्रसन्न होऊन रक्षण करा. इतर कुणाजवळ मी हे मागणे मागू शकत नाही. तुम्ही जगन्नाथविठ्ठलाची स्तुती करता. ज्यांची तुमच्यावर श्रद्धा आहे, त्यांच्यावर अशी आपत्ती का यावी ? शरणागतरक्षका, अगदी याच क्षणी माझ्याकडे धाव घ्या. मी तुमचे अहोरात्र चिंतन करतो ॥ ३ ॥

पद ४

'पायाचा मी दास विठोबा'

मी कडकोळ गावातील गुलाम आहे. तुम्ही जिथे बोलवाल तिथे मी हजर आहे.

सद्‌गुरूंनी मला मोठी जहागीर दिली आहे. मी त्यांना सलाम करतो.

या जगात माझी वस्ती आहे. जगात परमेश्वराची लीला चालू आहे त्यात मी भाग घेतो. मी जगाला धाकुटा होतो. देवाला सोडलेल्या पोळाप्रमाणे मी मिरवतो ॥ १ ॥

दशेंद्रियांना[६८] मी मुठीत ठेवतो. राजा दशरथाप्रमाणे मी नाव गाजवणार. कसरत करून मी कमाई करतो आणि कबीर व कमाल यांजप्रमाणे काव्य गायन करतो ॥ २ ॥

कैलासदोळग ना इरांवा । ना ।
रसराय होळिगि तुप्पा जड्यांवा ।।
गुण विट्ट गुरुविन कूडांवा । गुरु ।
मडिवाळय्यन हाडि हरसांवा ।। ३ ।।

ಜ

5 An ideal disciple is one who is like faith incarnate and who is a flute in the hands of his master

तन्न सद्गुरुविन कैयल्लिय कोळलिनंतिरुव नंविगेय मूरुतिये
आदर्श शिष्यनु
(राग–दुर्गा; ताल–दीपचंदि)

कर्पुरारतियन्नु बेळगुवेनु ।
जिगजिन्नि जीयगे ।। प. ।।
कर्पुरारतियन्नु बेळगुवे ।
निर्मलांत:करण यतिगे ।।
निर्ममत्वद मान्य मूर्तिगे ।
निर्गुणन निर्वयल कीर्तिगे ।। अ.प. ।।
नंविगेयु अंबरदि बंदिह्नुदो । उद्धार कार्यके ।
तपवे तोळगुत जगदोळिळिदिह्नुदो ।।
तन्न हिरितनवन्नु अरियदे ।
धन्य गुरुविन महिमे सारुव ।।
चिन्मयन चिन्नाद वीरुव ।
देवरायन दिव्य कोळलिगे ।। १ ।।
कर्पुरवु तानुरिय सेरुतलि । अदु उरियुतुरियुत ।
उरियोळगे अळिदुळियुबंददलि ।।
गुरुविनल्लिये तानु बेरेयुव ।
अवर हिरितनदल्लि मेरेयुव ।।
हिरिय आनंदवनु करेयुव ।
भावुरायर भव्य बेळकिगे ।। २ ।।

ಜ

कैलासामध्ये मी राहणार आणि साजूक तूप व पुरणपोळी खाणार. त्रिगुणातीत[२९] होऊन मी सद्‌गुरूंशी एकरूप होणार व गुरू मडिवाळय्यांचे गुणगान करणार ॥ ३ ॥

पद ५

आदर्श शिष्य म्हणजे श्रद्धेचा पुतळा. तो आपल्या गुरूंच्या हातातील बासरी होऊन राहतो.

जिगजिन्नोच्या स्वामींना कर्पुरारती ओवाळू.

सद्‌गुरू हे शुद्ध अंत:करण असलेले यती आहेत, निर्मलत्वाची मूर्ती आहेत. ते गुणातीत आहेत व त्यांची कीर्ती असीम आहे. त्यांना कर्पुरारती ओवाळू.

मूर्तिमंत श्रद्धाच त्यांच्या रूपाने आकाशात विराजत आहे. जीवांचा उद्धार करण्यासाठी तपच जणू जगात उतरून तळपत आहे. आपल्या मोठेपणाची जाणीव न ठेवता ते आपल्या सद्‌गुरूंच्या महिम्याचा डांगोरा पिटतात. कर्णमधुर दिव्य नाद काढणाऱ्या देवाच्या मंगल मुरलीला[३०] कर्पुरारती ओवाळू ॥ १ ॥

कापूर ज्योतीत शिरून जळतजळत ज्योतीत विरून जातो. पण शिष्य आपल्या सद्‌गुरूंशी एकरूप होऊन सद्‌गुरूंची कीर्ती गात राहतो. स्वत: त्यांच्या मोठेपणाने तेजाळतो व महानंदाचा पाऊस पाडतो. भाउरायांच्या प्रकाशकिरणाला कर्पुरारती ओवाळू ॥ २ ॥

6 I worshipped the feet of the master and was liberated

सद्गुरुविन पादपूजेय माडि मुक्तनादे

(राग–पुरिया धनाश्रि; ताल–दीपचंदि)

पादपूजिय माडि मुक्तादे । गुरुलिंगजंगम ।
पादपूजिय माडि मुक्तादे ॥ प. ॥
पादपूजिय माडि मुक्त–।
नागि दशविध नादघोषदि ॥
वादभेदवनळिदु चिद्घन– ।
बोधमंटपदल्लि कुळितु ॥ अ. प. ॥
काया वाचा मनसु शुद्धागि । भयविल्लद हागे ।
माया मोहव एरडु ता नीगि ॥
काया काशीक्षेत्रदल्लि ।
राय विश्वनाथ ताने ॥
तोय तोयव बेरसिदंते ।
न्याय माडुव जंगमन ॥ १ ॥
इडा पिंगळा जोडगूडिसि । नडु नाडिगूड ।
एडद हिम्मड दशन ओदगीसि ॥
जडिदु आसन बलिदु कुळितु ।
ओडने प्राणापानवेरडू ॥
हिडिदु एब्बिसि नडेदु त्रिकुटदि ।
मुळुगि आडुव जंगमन ॥ २ ॥
पिंड ब्रह्मांडेरडु शिरदोळुमे । षड् जलजमेगिन ।
पुंडरीकन सहस्रदळदोळुमे ॥
कंडु तत्सुख उंडु सुखदि अ–।
खंड ज्योतिय बेळग मुददोळु ॥
कंडु पश्चिम तुदिय बैलोळु ।
मंडिसिद महालिंगरंगन ॥ ३ ॥

पद ६

' पाया लागलिया पैं पाहे। अंतीं मोक्षा लाहे '

गुरुलिंगजंगमांची पादपूजा करून मी मुक्त झालो.

दशविध[७१] नादघोषामध्ये भेदबुद्धीचा व वितंडवादाचा नाश करून चैतन्याच्या बोधमंडपामध्ये बसलो.

काया–वाचा–मनाने शुद्ध होऊन, निर्भय स्थितीत सद्गुरू माया–मोहाच्या पलीकडे जातात. देहरूपी काशीक्षेत्रात सद्गुरू स्वतःच विश्वनाथ आहेत. पाणी पाण्यात मिसळावे तसे सामरस्य घडवून आणणाऱ्या सद्गुरूंची मी पादपूजा केली ॥ १ ॥

इडा पिंगला नाड्यांना एकवटून मधल्या नाडीच्या (सुषुम्नेच्या) तोंडावर डावी टाच घट्ट बसवावी. आसनबंध दृढ करून, प्राण व अपान स्थिर करून कुंडलिनी जागृत करावी. तिला त्रिकूटात पोचवून तिथे नांदणाऱ्या सद्गुरूंची मी पादपूजा केली ॥ २ ॥

पिंडब्रह्मांडाचे सामरस्य होऊन सद्गुरू षड्चक्रांवरील कमलात म्हणजे सहस्रदल कमलात मिसळतात. ते सुख अनुभवून त्या मिष्टान्नाने तृप्त होतात. अखंड-ज्योती प्रज्वलित झालेली पाहून ते सुखाने पश्चिममार्गाने जातात व अनंतापर्यंत पोचतात. तेथील ऐश्वर्यमंडित महालिंगरंगांची मी पादपूजा केली ॥ ३ ॥

7 The spiritual teacher as higher than the highest Reality

परतरवाद वस्तुविगिंत सद्गुरु हिरियनु

(राग–दरबारि; ताल–केरवा)

गुरुता तोरिद गुरुविन ।
मरेतु नानिरलि ह्यांग ॥
गुरुविनिंदधिक उंटे ?
परके परवाद वस्तु ॥ प. ॥

आधार अग्निय स्थळद ।
भेद अरुहिसि कोट्टा ॥
नाद-बिंदु-कळेय ।
हादि तोरिसि विट्टा ॥
साधिसि मूलमंत्र ।
कर्णदोळु ऊदि विट्टा ॥ १ ॥

नासिक कोनेयोळु ।
सूसुव वायुगळैदु ॥
भास्कर कोटि प्र–।
काशदि मेरेवुदु ॥
सासिर दळदोळु ।
सुळिसुळिदाडुवदु ॥ २ ॥

अंगलिंगद सं– ।
योगव हेळिदनु ॥
हिंगदिरेंदु एच्चर ।
कोट्टु पोदनु ॥
कंगळाग्रदि शिव–।
लिंग तोरिसि कोट्टनु ॥ ३ ॥

पद ७

'गुरु परमात्मा परेशु'

परमेश्वराचे रूप ज्यांनी दाखविले त्या सद्गुरूंचा विसर पडलातर मी कसा बरे जगेन ? गुरूंपेक्षा श्रेष्ठ काय आहे ? ते परात्पर वस्तूच आहेत.

आधारचक्र व अग्निचक्र कसे ओलांडावे हे त्यांनी समजावले. नाद-बिंदू-कला यांचा मार्ग दाखवला. योग्य वेळ साधून कानात मूलमंत्र सांगितला ॥ १ ॥

नासिकाग्रावर पंचप्राण[३२] सतत वाहत असतात. कोटिसूर्यांच्या प्रकाशात वस्तू विराजमान होते. सहस्रदलकमलात ती हालत असते, डोलत असते ॥ २ ॥

जीव-शिवाचे ऐक्य त्यांनी स्पष्ट केले व खिन्न होऊ नको अशी जाग देऊन गेले. आज्ञाचक्राच्या ठिकाणी शिवलिंग दाखवले ॥ ३ ॥

कुंडल मध्यदि ।
ज्योति कुणिदाडुवदु ॥
अणुरेणुतृणकाष्ठदि ।
समनागि निल्लुवदु ॥
प्रणव स्वरूप पर–।
ब्रह्म तानाद मेले ॥ ४ ॥

भव तोलगि होयितु ।
बहु पुण्य दोरकितु ॥
भुवन कंदरवायितु ।
गब्हरवे तोरितु ॥
अविरलात्मक गुरु–।
लिंगजंगमनल्लि ॥ ५ ॥

सहस्रदलकमलात ज्योत नाचत आहे. स्वतःच प्रणवस्वरूप परब्रह्म झाल्यावर अणु-रेणु-तृण-काष्ठ अशा सर्व ठिकाणी वस्तूचे समदर्शन होते ॥ ४ ॥

पापाची खंडना झाली. जन्मयातना चुकली. प्रज्ञानघन गुरुलिंगजंगमांसमोर, एवढे मोठे जग पण ते लहानशा गुहेएवढे भासले ॥ ५ ॥

8 Relation of the Spiritual Teacher to the Disciple–Part 2

गुरुशिष्यर संबंध – भाग २

1 Like a bee hover round the lotus-feet of thy master

गुरुचरणकमलदलि भृंगनागय्य

(राग–जयजयवंति; ताल–त्रिताल)

गुरुचरण-कमलदलि
भृंगनागो नी ॥ प. ॥

स्थिरविल्लु संसार
नरजन्मदोळु बंदु ।
परतत्त्व तिळिदु सा–
धुर संगियागो नी ॥ १ ॥

मौन हिडिदु मुद्रे बलिदु
ज्ञानज्योतियोळगे नलिदु ।
स्वानुभवामृत सविदु
निःसंगनागो नी ॥ २ ॥

मुप्पिन मुनिय पिडिदु वचन
कप्पुगोरळ काडसिद्ध – ।
निद्देडेगे होगि
साष्टांगनागो नी ॥ ३ ॥

८ गुरुशिष्यसंबंध - भाग २

पद १

गुरुचरणकमलाजवळ भृंग होऊन राहा

तू गुरुचरणकमलावरील भृंग हो.

हा संसार नश्वर आहे. सुदैवाने लाभलेल्या ह्या नरजन्मात परतत्त्व जाणून संतसंगतीत राहा ॥ १ ॥

मौन वृत्तीचा अंगीकार कर. मनाची एकाग्रता साध व दृष्टी स्थिर राहू दे. ज्ञानाची ज्योत पाजळली म्हणजे डोलत राहा. स्वानुभवामृत यथेष्ट पिऊन सर्व संगांतून मुक्त हो ॥ २ ॥

मुप्पिनमुनींचा उपदेश दृढ धरून नीलकंठ काडसिद्धांच्या जवळ जाऊन साष्टांग दंडवत घाल ॥ ३ ॥

2 From a life of sin to a life of God-realisation

पापपूर्ण जीवनदिंद भक्ति–जीवनदेडेगे

(राग–पुरिया धनाश्रि ; ताल–दीपचंदि)

कुरुवरो नावु कुरुवरो ॥ प. ॥
हीगे ईसोंदु कुरिमरि ।
काय्दु कोंडिरुवंथ ॥ अ. प. ॥

आरैदु सूरारु हत्तु टगरुगळु ।
मायागि होग्याव ई ऊर ओळगे ॥
ब्यारे इन्नूरदा हदिनारु साविर ।
सूय्यागि होगिरुव कुरिमरि काय्वंथ ॥ १ ॥

ओळगे होरगे ओंदे परियल्लि नारुवदु ।
बलु जिड्डु नारुवदु इन्नु बेरे ॥
कोळे कोळेत मल मूत्र तुंवि सोरुतलिदे ।
हळेय दोषद रगटे एळकोंडु तिरुगुवंथ ॥२॥

एरु हाळागलि नेरेयु बीळागलि ।
तोळ ओय्यलि नम्म कुरिमरिगळनु ॥
भाळाक्षहर नम्म कूडल्टरेशन ।
ओळहोरगे हीगे काय्दुकोंडिरुवंथ ॥ ३ ॥

पद २

असतो मा सद्गमय ।

आम्ही मेंढपाळ आहोत.

इतकी सगळी मेंढरे आम्ही सांभाळतो.

तीन (त्रिगुण)[३३] सहा (षड्विकार)[३४] व दहा (दशेंद्रिये)[३५] असे काही एडके या गावात शिरून दडून बसले आहेत. त्यामुळे बरीचशी म्हणजे एकवीस हजार सहाशे मेंढरे इतस्ततः उधळतात. त्यांना आम्ही वाटेवर आणतो (विकारांमुळे श्वासांचा अपव्यय होतो, त्यांना आम्ही कारणी लावतो) ॥१॥

आत बाहेर एकसारखी दुर्गंधी सुटली आहे. शिवाय फार मोठा चिकटा आला आहे. सडलेले मलमूत्र भरून गळती लागली आहे. जन्मजन्मांतरीच्या पापांची लक्तरे ओढत आम्ही भटकत आहोत ॥ २ ॥

आपल्यापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्यांचा नाश झाला काय, अवतीभोवती आहेत त्यांचे अधःपतन झाले काय, किंवा आमची मेंढरे लांडग्याने नेली काय, आम्हाला सारखेच आहे. कारण भाळाक्षहर कूडळूरेशांचे आम्हाला सबाह्यअभ्यंतरी दर्शन झालेले आहे ॥ ३ ॥

3 The efficacy of the spiritual teacher in imparting super-sensuous experience of light, sound and flavour

ज्योति, नाद, सुधेगळ अतींद्रिय अनुभववन्नु सल्लिसुवल्लि काणुव सद्गुरुविन प्रभाव

(राग–काफि; ताल–केरवा)

गुरुविन ह्यांग मरेयलि ।।
बोध कोट्टु सुखदलिट्टु ।
नीगिसि विट्टवन ।।
पापगळनु सुट्टवन । ज्ञानद ।
मार्ग हेळिदवन ।। प. ।।

मोदल मैलिगि कळसि । ओळ्ळे ।
वस्त्र उडिसिदन ।
अद्दु इद्दु मनसिन कामने । बिडिसि ।
निश्चय माडिदन ।।
सदमल महाज्योतिय । वेळकलि ।
इरंत हेळिदन ।।
सदरिन मेले कुळ्ळिरिसेनगे ।
सुधेय कुडिसिदन ।।१।।

आडबारदंथा आटा ।
आडि तोरिदन ।।
तोरबारदंथा सुखव
तोरिसि कोट्टवन
मीरिद नादब्रह्मदोळगे ।
नलिनलिदाडिसिदन ।।
पूर्णवाद आनंददल्लि ।
सेरिकोळ्ळेंदवन ।।२।।

पद ३

प्रकाश, नाद व अमृतरसाचा अतींद्रिय अनुभव देण्याचा सद्‌गुरूंचा प्रभाव

सद्‌गुरूंना कसे बरे विसरावे ? मला उपदेश करून व सुखात ठेवून त्यांनी मला पूर्णतेला नेले, माझे पाप जाळून टाकून ज्ञानमार्ग दाखविला.

आधीचा मळ धुवून टाकून त्यांनी मला स्वच्छ पेहेराव चढवला. हे पाहिजे, ते पाहिजे अशी माझ्या मनाची धाव थांबवून ते स्थिर केले. निर्मल महाज्योतीच्या कांतीत तू निरंतर राहा असा आशीर्वाद दिला. सदरेवर (शृंगाटकाच्या ठिकाणी) बसवून अमृतपान करवले ॥१॥

एका वेगळ्या प्रकारचा खेळ त्यांनी खेळून दाखवला. कधी लाभणार नाही असे सुख माझ्या पदरात टाकले. अलौकिक नादब्रह्माच्या लयीत मला डोलायला लावले. पूर्णानंदात प्रवेश कर असा आदेश दिला ॥२॥

काणबारदंथा वस्तुव ।
काणिसि कोट्टवन ॥
हीन मनद संशय विडिसि ।
निश्चय माडिदन ॥
कोणनागव्याड अंत ।
विवेक हेळिदन ।
ज्ञानपति प्रिय निरुपाधिसिद्धन ।
काणदे ह्यांगिरलि ॥३॥

❀

4 The spiritual teacher as simultaneously locking the nine doors of sense and as revealing the mystical lightning in the dark chamber of the soul

सद्गुरुवु शरीरदल्लिय नवद्वारगळिगे ओम्मेले कीलि हाकि कत्तलुळळ अंतरंगदल्लि दिव्य मिंचिन बेळकन्नु बीरुव

(राग–काफि; ताल–त्रिताल)

ह्यांग मरेयली । गुरुविन ।
ह्यांग मरेयली ॥ प. ॥
ह्यांग नानु मरेयलवन ।
शरीरदाशेय विडिसिदवन ॥
परिपरियिंद तिळिसि एन्नोळु ।
परब्रह्मन तोरिसिदवन ॥ अ. प. ॥
मूढतनदि हेडि । नानु ।
आदेनो वळु खोडि ॥
मनसिन बेन्हत्ति । केडु ।
माडिकोंडेनो अति ॥
बाडिगेत्तिनंते दृडिदृ दृडिदृ ।
काड जन्म तिरुगि केट्टेनु ॥१॥

चर्मचक्षूला अगोचर असलेली वस्तू पाहण्यास ज्ञानदृष्टी दिली. दुष्ट मनातला संदेह घालवून मन शांत केले. बैलोबा होऊ नकोस असा उपदेश केला. ज्ञानी निरुपाधिसिद्धांच्या दर्शनाशिवाय मी कसा राहू ? ॥३॥

पद ४

' नवद्वारांसि घालुनि कुलुपें दहावा उघडा केला '

सद्गुरूंना मी कसे बरे विसरू ? त्यांनी माझा देहभाव नष्ट केला. तत्प्रेतप्रेमे मला बोध करून परब्रह्माचे दर्शन घडवले.

मूर्खपणा, भित्रेपणा यांनी मी वाया गेलो आणि मन मानेल तसे वागून स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. ओझ्याच्या बैलाप्रमाणे काम ओढत राहिलो आणि नीच योनींतून फिरणे माझ्या कपाळी आले ॥१॥

मूरु मंदि प्रीतिय । गेळेयर ।
मोहव बिडिसिदनु ॥
आरु मंदि वैरि– । गळनु ।
ऊर होरगे हाकिदनु ॥
परमार्थ तत्त्वदोळु मनव ।
स्थिरवागि निल्लिसिविट्टनु ॥२॥

एंटु मंदि बंटर । होडेदु ।
सोंटव मुरिदनु ॥
एळु पाळेगारर । कट्टि ।
गोळ हिडिसिदनु ॥
काळगत्तलेय मनेयोळगे ।
कोटि मिंचिन बेळक तोरिदनु ॥३॥

ओंबत्तु बागिलगळिगेल्ला । ओम्मेले ।
कीली हाकिदनु ॥
मत्ते नानु भवके । मरळि ।
बरदंते माडिदनु ॥
सुत्तु मुत्तु एत्त नोडलु ।
चित्तु चिदानंददि बेरसिदनु ॥४॥

ಜ

5 The extraordinary effects of the grace of the spiritual teacher

सद्गुरुविन करुणद अलौकिक परिणामगळु

(राग–पिलु; ताल–केरवा)

सै सै सद्गुरुविन दयदिं– ।
देल्ल मै मरेतेने ॥ प. ॥

तीन गोष्टींचा (कामिनी, कांचन व शेतीवाडी) मोह मला झाला होता, त्यांतून गुरूंनी मला सावरले. सहा[३६] शत्रूंना हद्दपार करून टाकले व परतत्त्वाच्या ठिकाणी माझे मन स्थिर केले ॥२॥

आठ जणांना[३७] झोडपून काढून त्यांची कंबर मोडली. सातांवर[३८] (सप्त-व्यसनांवर) रडण्याची पाळी आणली. काळोख्या घरात माझ्यासमोर कोटी विजांचा लखलखाट केला ॥३॥

नवद्वारांना[३९] एकदम कुलुपे घालून टाकली, माझा जन्ममरणाचा फेरा चुकवला. अवतीभोवती जिकडे पाहावे तिकडे चिन्मयरूप दाखवले व चिदानंदांशी माझे ऐक्य घडवले ॥४॥

पद ५

‘ धन्य हा सद्गुरुमहिमा हो ’

धन्य धन्य ! सद्गुरूंच्या दयेने देहाचा मला विसर पडला.

ऐ ऐ इदु एनु कारण ।
मै मरेतु मत्तळिदेने ॥
कै कै तले मेले इडलु ।
वैराग्यव पडेदेने ॥
थै थै थै अंते कुणिसि ।
तन्नंते ता माडिदने ॥ अ. प. ॥

नानु नीनेन्नुवदेरडु । ताने तानादने ।
मान अपमान एरडू । पान माडिदने ॥
ज्ञान मार्गव तोरि । ध्यान हेळिदने ।
खून तोरिसि विनोद माडिदने ॥१॥
नाद शब्ददलि मनस लुब्ध माडिदने ।
वादि विवादी कूड । कादे गेलिसिदने ॥
भेदाभेदव अरियदे । हादि तोरिदने ।
ईद हुलियंथ मनस । साद माडिदने ॥२॥
भ्रुकुटि-मध्यदलि वस्तु । प्रकट माडिदने ।
नासिकाग्रद कोनेय मेले । भानुप्रकाश तोरिदने ॥
आसन बलिदु पीठवनिक्कि । सासिर नाम गेलिदने ।
ईशनु दत्त महेश दिगंबर ।
घोषदोळगे मन निलिसिदने ॥३॥

❀

6 The spiritual teacher as leading one to union with the markless Reality

सद्गुरुवु कुरुहळिद सद्वस्तुविनल्लि बेरेयिसुव

(राग–भूप; ताल–दीपचंदि)

बोधिसेन्ननु गुरुवे । निग्मय दिव्य ।
पादव नंबिरुवे ॥ प. ॥

अग, पण देहाचा विसर पडला तरी आत्म्याची जाण मात्र आहे. गुरूनी मस्तकावर हात ठेवल्यावरोबर माझ्या ठिकाणी वैराग्याचा उदय झाला आणि थयथय नाचवून त्यांनी मला तात्काळ आपणासारखे केले.

सद्गुरूच मी-तू अवघे होऊन ठेले. मानापमान त्यांनी गिळून टाकला. ज्ञानमार्ग दाखवला व ध्यान करण्यास शिकविले. परमेश्वराचे रूप दाखवून नवल घडवले ॥१॥

अनाहत नादामध्ये माझे मन लुब्ध केले. वादविवादात मला जय मिळवून दिला. आपपरभाव घालवून मला सन्मार्गाला लावले. माझे मन नुकत्याच व्यालेल्या वाघिणीसारखे जहाल होते ते मवाळ केले ॥२॥

भृकुटिमध्यावर वस्तुदर्शन घडवले. नासिकाग्रावर सूर्यबिंब दाखवले. आसन[४०] स्थिर करून पीठिकेवर बसवून सहस्रनामे ऐकवली. ईश[४१], दत्त, महेश, दिगंबर अशा घोषात मन मग्न केले ॥३॥

ꕥ

पद ६

'नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी। तरी जीवा शिवा गांठी पडूनि जाय'

हे सद्गुरू, तुमच्या दिव्य चरणांच्या आश्रयाला मी आलो आहे. मला उपदेश करा.

वेदान्तदोळु गौप्यवाद तत्त्ववन्नु ।
बोधिसि मन विनोदिसि सुखिसेंदु ॥ अ. प. ॥

आदि अन्त्यव बोधिसि । निर्गुणवाद ।
नादब्रह्मव साधिसि ॥
हादि नाल्कर नडुवे ।
वेदिकेयोळु कुळितु ॥
मोददि दशविध ।
नादव केळेंदु ॥१॥

मूल कुंडलियनेत्ति । अग्नियद ।
मेलण नेलेगे हत्ति ॥
सालिद्दु सुरितिर्प ।
हालनु सविदुंडु ॥
नीलज्योतिय दिव्य ।
ज्वालेयोळु बेळगेंदु ॥२॥

रविशशिगळ तडेदु । सुषुम्निय ।
नवमार्गदोळु नडेदु ॥
जवदि पश्चिमदिक्कि- ।
नवनियोळिरुतिर्प ॥
नवमोक्षसुखदनु- ।
भवदि मै मरेयेंदु ॥३॥

परिपूर्णानंद भावा । तारकरूप ।
गुरुसिद्ध देवदेवा ॥
अरिदेनेंविरवनु ।
मरेदु एन्नोळु नीनु ॥
कुरुहेनु तोरदे ।
वेरदेकवागेंदु ॥४॥

वेदान्तातील गूढ तत्त्वाचे ज्ञान[४२] मला द्या, जेणेकरून माझे मन प्रसन्न होऊन मी सुखी होईन.[४३]

सुरुवात (मूलाधार) व शेवट (सहस्रारकमल) म्हणजे काय याचा उपदेश करून[४४] निर्गुण नादब्रह्माची मला प्राप्ती करून द्या. चौरस्त्याच्या (शृंगाटकाच्या) मध्यभागी, पीठावर बसून आनंदावस्थेत मला दशविध[४५] नाद ऐकू यावेत ॥१॥

कुंडलिनी जागृत करून, अग्निचक्रावरील वेदिकेपर्यंत चढून दुथडी भरून वाहणाऱ्या अमृतरसाचे मी पान करावे. नील ज्योतीच्या दिव्य ज्वालेत मला तेजाळून टाका ॥२॥

रविनाडीतील वायूचे शशीनाडीतील वायूशी होणारे दळणवळण थांबवा. सुषुम्नेच्या नवमार्गाने[४६] कुंडलिनी जाऊ द्या व त्या शक्तीचा पश्चिम दिशेस संचार होऊ द्या. तिथे अवनीवर असलेल्या नवमोक्षसुखाच्या अनुभवात माझे देहावरील ममत्व कमी होऊ द्या ॥३॥

परिपूर्ण अवस्थेत राहणाऱ्या हे तारकरूप गुरुसिद्धदेवा, 'मला ज्ञान झाले' अशा वल्गनेची सावली न पडता माझ्यामध्येच असलेल्या निर्गुण ब्रह्माशी मी एकरूप व्हावे ॥४॥

9 Characteristics of Saints
संतर लक्षणगळु

1 Who is the highest devotee?
भक्तश्रेष्ठनु यारु ?

(राग – कांबोदि, ताल – झपताल)

भक्तनेंदरे भक्त प्रह्लादनु ।
मिक्क भक्तरु एल्ल भक्तवररेनु ? ॥ प. ॥

मलतायि–मोसदिंदलिये अरसोत्तिगेयु ।
बलित कोपदि काननव सेरुत ॥
अळियदिह अरसुतन गळिसे हरियनु नेनेव ।
एळेय ध्रुवनेंतु ता भकुत वरनहनु ? ॥ १ ॥

वीणेयिनिसरदल्लि गानवनु वेरसुतलि ।
हरिय होगळुत अलेव ब्रह्मकुवर ॥
कलहवनु मोळिसि वेळेसुवदरलि नलियुतिह ।
भकुतविरुदनु पडेये अर्हनेनु ? ॥ २ ॥

नूरारु कथेगळिं मूरारु ग्रंथगळ ।
बरेदु पुरुषार्थगळ महिमेयन्नु ॥
सार्व हव्यासदलि तुंब मुळुगिद व्यास ।
भकुतिशान्तियनेंतु होंदुतिहनु ? ॥ ३ ॥

ज्ञानकर्मद वेरके मेलेंदु बगेददर ।
हिरिमेयनु बित्तरिप ग्रंथदल्लि ॥
ज्ञानकर्मदि इंतु शिष्टनाद वशिष्ठ ।
भकुतरलि श्रेष्ठनेंतागुतिहनु ? ॥ ४ ॥

९ संतांची लक्षणे

पद १

भक्तश्रेष्ठ कोण ?

भक्त म्हणजे प्रह्लादच.[४७] बाकी कोणीतरी त्याच्या तोडीचे आहेत का ?

ध्रुववाळाने अरण्यात जाऊन देवाचा जप करून अक्षय राज्य मिळवले खरे पण ते सर्व सावत्र आईच्या छळाने राज्य जाणार म्हणून आलेल्या तीव्र संतापापोटी होते. मग ध्रुववाळ कसा भक्तश्रेष्ठ ठरेल ? ॥ १ ॥

वीणेच्या मधुर झंकारात गानमग्न होऊन श्रीहरीची स्तोत्रे गात नारद भ्रमंती करतात, पण म्हणून काय झालं, जिथे तिथे कळ लावून तंटाबखेडा माजविण्यात जर त्यांना आनंद वाटतो तर ते भक्त कसे ? ॥ २ ॥

शेकडो कथा असलेली अठरा पुराणे लिहून पुरुषार्थाच्या महिम्याचा डांगोरा व्यासांनी पिटला हे मान्य, पण ते त्या हव्यासातच बुडले. मग त्यांना सद्भक्तीची शांती कशी मिळेल ? ॥ ३ ॥

ज्ञानकर्मसमुच्चयच श्रेष्ठ आहे या कल्पनेने त्याचेच माहात्म्य वसिष्ठांनी आपल्या ग्रंथात विशद केले. पण केवळ ज्ञान–कर्माचाच उदोउदो करत राहिले तर त्यांना श्रेष्ठ भक्त कसे म्हणावे ? ॥ ४ ॥

ज्ञानदिंदले भुक्ति ज्ञानदिंदले मुक्ति ।
ज्ञानवे चिरसुखव पडेव युक्ति ।।
ज्ञानशक्तियनिनितु तुंव होगळुव शुकनु !
परमभक्तन पदव पडेयवहुदेनु ? ।। ५ ।।

अरसुतनदैसिरिगे सोतु न्यायव मरेतु ।
दुरुळरूळिगदल्लि वाळुतिरलु ।।
शरशय्येयलि कोनेगे हरिय नेनेदरे भीष्म ।
वरभक्तनेंतवनु एनिसुतिहनु ? ।। ६ ।।

हरिसखनु तानेंदु हिरितनद हेम्मेयलि ।
हरिय हिरिमेय मरेतु दुडिसुतिरुव ।।
हरियेदुरु तन्न मति-महिमेयने मेरेसुतिह ।
नरगे वरभक्ति सुख दोरेयवहुदेनु ? ।। ७ ।।

हिरिय पापवु जरिये वीर रामन नेनेदु ।
हुत्त होत्तरू मुनियु तपसिनिंद ।।
ईरुळिळ वेयिसिद वेळिळ कलशवु कूड ।
वेळळगादरू गंध तळळवहुदेनु ? ।। ८ ।।

रामनिगे सेवकनु कामनिगे पावकनु ।
कामविरहित दास्य कुशलनिहनु ।।
प्रेमयुतनादरू कुलद चापल बिडद ।
भीम भक्ताग्रणियदेंतु तानु ? ।। ९ ।।

हरिय बगेबगेयिंद भजिपरिवरेल्लेमगे ।
भक्ति भावव सलिसि वंद्यरहरु ।।
हरिगागिये हरिय नलिवु नोवुगळल्लि ।
भजिप प्रह्लादने वंद्यतमनु ।। १० ।।

ज्ञानानेच भुक्ती, ज्ञानानेच मुक्ती आणि ज्ञानच चिरसुखाची युक्ती आहे, अशी ज्ञानाची येताजाता तोंड भरून स्तुती करणारे शुक श्रेष्ठ भक्ताची पदवी मिळवू शकतील का ? ॥ ५ ॥

भीष्मांनी राजवैभवाचे दास होऊन, न्याय-अन्याय विसरून, दुष्टांच्या सेवेत आयुष्य कंठले. मग अखेरीस जरी शरशय्येवर निजून हरिस्मरण केले तरी त्यांना श्रेष्ठ भक्त म्हणता येईल का ? ॥ ६ ॥

हरी माझा सखा आहे अशा दुरभिमानाने हरीचे माहात्म्य विसरून, त्याला कामाला जुंपले. वर त्याच्यापुढे आपल्या बुद्धीची प्रौढी मिरविली. अशा अर्जुनाला श्रेष्ठ भक्तिसुखाची प्राप्ती होईल का ? ॥ ७ ॥

अंगावर वारूळ चढेपर्यंत रामनामाचा जप करत, वाल्मीकींनी केलेल्या तपश्चर्येने घोर पापाचा संहार झाला खरा. पण चांदीच्या भांड्यात एकदा कांदा शिजवल्यावर भांडे कितीही धुतले-पुसले तरी त्याचा वास जसा जात नाही तसा अधोमनाला जाऊन चिकटलेला पापकर्माचा डाग निघत नाही. मग वाल्मीकी भक्तश्रेष्ठ कसे ? ॥ ८ ॥

स्वत: रामाचा सेवक असेल, कामदेवाला त्याने भस्मसात केले असेल, निष्काम कर्म करणाऱ्यांत तो कुशल असेल आणि रामाचे त्याच्यावर अत्यंत प्रेमही असेल. तरीही चंचलपणाचा मूळ स्वभाव ज्याला सोडता आला नाही तो हनूमान् भक्ताग्रणी कसा होईल ? ॥ ९ ॥

हरीची परोपरींनी उपासना करणारे हे सर्वजण आमचा भक्तिभाव जागा करतात म्हणून ते आम्हाला वंद्यच आहेत. पण सुखात असो वा दु:खात असो, केवळ परमेश्वराच्या भक्तीसाठी धडपडणारा प्रह्लाद आम्हाला सर्वाधिक वंद्य आहे ॥१०॥

2 The saint beyond the reach of fear

संतनु अंजिकेयन्नु मीरिरुव

(राग – कल्याण; ताल – आदिताल)

अंजीकिन्यातक्य्या सज्जनरिगे ॥ प. ॥
संजीवरायर स्मरणे माडिद मेले ॥ अ. प. ॥
कनसिलि मनसिलि कळवळवादरे ।
हनुमन नेनेदरे हारि होगुदु पाप ॥ १ ॥
रोमरोमके कोटि लिंग उदुरिसिद ।
भीमन नेनेदरे विट्ठु होगुदु ताप ॥ २ ॥
पुरंदरविठलन पादपूजिय माळप ।
गुरुमध्वरायर स्मरणे माडिद मेले ॥ ३ ॥

3 There can be no fear and sorrow for the servants of God

हरिदासरिगे भय शोकगळु सोंकलरियवु

(राग – भीमपलास; ताल - त्रिताल)

दासरिगुंटे भयशोका । हरि–
दासरिगुंटे भयशोका ॥ प. ॥
वासुदेवन सदा स्मरिसुव ॥ अ. प. ॥
कामधेनु वरकल्पवृक्ष चिं–
तामणि कैसेरिदकिंत ॥
नामत्रयदिं वप्पा सुखके सु–
दामने साक्षिदकेंबो हरि ॥ १ ॥
रामचंद्र शबरिय तिंदिंजल
अजमिळ माडिद कुकर्मगळ ॥
धूमकेतु भुंजिसुवंददि
मेध्यामेध्यव कैकोंब हरि ॥ २ ॥

पद २

'भवभय हरिनामें साधकांचें पळालें'।

सज्जनांना भीतीचा स्पर्श तरी कसा होईल ?

संजीवरायांचे (हनुमंतांचे) स्मरण केल्यावर भीती कुठली ?

ध्यानी-मनी-स्वप्नी कुणी काकुळतीला आलेतर त्यांनी मारुतिरायांचे स्मरण करावे म्हणजे पाप धुवून जाते ॥ १ ॥

रोमांरोमांतून कोटी लिंगे उत्पन्न करणाऱ्या भीमाचे स्मरण केलेतर ताप निवतो ॥ २ ॥

पुरंदरविठ्ठलाची पादपूजा करणाऱ्या गुरुमध्वरायांचे (मध्वाचार्यांचे) स्मरण करा, मग भीती कुठली ? ॥ ३ ॥

पद ३

'हरीचिया दासा नाहीं भयचिंता'।

हरिदासाला भय व शोक कुठला ?

सदैव वासुदेवाचे स्मरण करणाऱ्याला भय नाही आणि शोकही नाही.

कामधेनू, कल्पवृक्ष व चिंतामणी प्राप्त झाल्यावर जे सुख मिळेल त्याहीपेक्षा जास्त सुख अच्युत-अनंत-गोविंद या नामत्रयाच्या स्मरणाने मिळते, याला सुदामच साक्ष आहे असे हरिदासांचे म्हणणे आहे ॥ १ ॥

रामाने शबरीची बोरे उष्टी असूनसुद्धा खाल्ली. अग्नी ज्याप्रमाणे पवित्र अपवित्र असा भेद न करता सर्वच भक्षण करतो तशी अजामिळाच्या पापांची परमात्म्याने राख करून टाकली ॥ २ ॥

एनु माडिदपराधव क्षमिसुव
एनु कोट्टदनु कैकोंब ॥
एनु बेडिदिष्टार्थव कोडुव
दयानिधि अनुपमनेंब हरि ॥ ३ ॥

प्रह्लादवरद प्रकटनागदले
एल्लरोळिप्पनु प्रति दिनदि ॥
बल्लिदरिगे बल्लिद जगन्नाथ–
विट्ठल विश्वव्याप्तनेंब हरि ॥ ४ ॥

❀

4 The white ants may sooner eat into cinders than fear enter into the hearts of saints

गोरलियु कॆंडवन्नु कडियबहुदु: आदरे भयवु संतर अंतरंगवन्नु सेरलरियदु

(राग – मांड; ताल – केरवा)

कॆंडक्के गोरलियु हत्तुवदुंटे ।
पांडुरंगन दासरिगे भयवुंटे ॥ प. ॥

आनि सिंहन कूड अणकवाडुवदुंटे ।
श्वान हेब्बुलि कूड सरसवाडुवदुंटे ॥ १ ॥

कत्तलु रविगिन्नु कविदु मुत्तलुंटे ।
हुत्तिनोळु कप्पि होगुवदुंटे ॥ २ ॥

मारुतन गुद्दिदरे अंग नोयुवदुंटे ।
हेमगिरिगे वज्र सीळुवदुंटे ॥ ३ ॥

अत्तित्त अगलदे चित्तजनय्यन ।
चित्तदोळिद्दवगे चिंतेयुंटे ॥ ४ ॥

स्वामि श्री पुरंदरविठलरायन ।
नामधारिगळिगे नरकवुंटे ॥ ५ ॥

❀

कोणताही अपराध केलातरी देव क्षमा करतो. त्याला काहीही अर्पण केलेतरी तो आनंदाने स्वीकारतो. जे मागाल ते देतो. अशा दयानिधी परमात्म्याला उपमाच नाही असे हरिदास सांगतात ॥ ३ ॥

प्रह्लादाला वर देणारा देव प्रकट दिसला नाहीतरी सदैव सर्वांतर्यामी असतो. ज्ञानियांचा ज्ञानी जगन्नाथविठ्ठल हा विश्वव्यापी आहे, असा हरिदास घोष करतात ॥ ४ ॥

❀

पद ४

'भय भक्तांसीं स्वप्नीं नाहीं'.

विस्तवाला वाळवी लागणार नाही तशी पांडुरंगाच्या सेवकाला भयाची बाधा कधीच होणार नाही.

सिंहासमोर हत्तीच्या गमजा चालतील का? कुत्रा भल्या मोठ्या वाघाशी चेष्टा मस्करी करेल का? ॥ १ ॥

अंधार कधी सूर्याला झाकून टाकेल का? वेडूक सापाच्या बिळात कधी शिरेल का? ॥ २ ॥

वाऱ्याला गुद्दे मारले तर वाऱ्याला दुखापत होईल का? उलट आपलेच अंग दुखेल. मेरू पर्वत वज्रावर जाऊन आदळला तरी वज्राला तडा जाईल का? ॥३॥

श्रीकृष्णाच्या ठिकाणी अव्यभिचारी भक्ती असेल तर चिंता कुठली? ॥ ४ ॥

स्वामी श्री पुरंदरविठ्ठलांचे नामधारक कधीतरी नरकात पडतील का? ॥ ५ ॥

❀

5 Don't try the dangerous experiment of molesting a saint

शरणरन्नु काडुव अपायकर साहसवन्नु माडदिरु

(वचन)

हाविन हेडेय कोंडु केन्नेय तुरिसिकोंबंते
उरिय कोळिय कोंडु मंडेय सिक्क विडिसिकोंबंते
हुलिय मीसेय हिडिदु अणकवाडुवंते
मरेतु कूडलसंगमन शरणरोडने सरसवाडिदरे
ओडलल्लि सुण्णद कल्लु कट्टिकोंडु मडुव विद्दंते.

8

6 The physical and mental characteristics of saints

संतर दैहिक हागु मानसिक कुरुहुगळु

(राग–मिश्रकाफि; ताल–दादरा)

हौदप्पा हौदप्पा हौदु देवर ।
निंदु नी तिळिदरे इल्लप्पा दूर ॥ प. ॥

तंबाकिल्लदे बत्ति सेदिरवेकु ।
दारू कुडियदे निशा आगिरवेकु ॥
यब्बड तब्बड इल्लदे नालिगे होगिरवेकु ।
झोलि होगि गुरुपादके होंदिरवेकु ॥ १ ॥

नीरु इल्लदे झळक माडिरवेकु ।
अरिवि इल्लदे मडि उट्टिरवेकु ॥
उण्णदे होट्टि तुंबिरवेकु ।
एच्चरदोळगे निंदि हत्तिरवेकु ॥ २ ॥

चिंत्याग संतोष आगिरवेकु ।
भ्रांति बडिदु ब्रह्म दोरकिरवेकु ॥
ई जनरिगे हुच्चन्हांग काणिसवेकु ।
हिंदु मुंदिन सुद्दि तिळिदिरवेकु ॥ ३ ॥

पद ५

'साधूसी गांजीतां झालें सध्या फळ'।

कूडलसंगमदेवाच्या शरणांची (भक्तांची) चुकून-माकूनसुद्धा टिंगल करणे म्हणजे सापाच्या फण्याने गाल खाजवण्यासारखे आहे, जळत्या-मशालीने केसांच्या जटा सोडविण्यासारखे आहे, वाघाच्या मिशा ओढून त्याची मस्करी करण्यासारखे आहे किंवा पदरात चुना बांधून डोहात उडी घेण्यासारखे आहे.

पद ६

'लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें। ऐसीं हीं लक्षणें सज्जनाचीं'।

आहे वा, देव जवळच आहे. आपण कोण आहोत हे ओळखले तर देव दूर नाही.

तंबाखू नसताना धूम्रपान करावे (दीर्घ श्वास घ्यावा). दारू न पिताच कैफ (ईश्वरोन्माद) चढला पाहिजे. जीभ लुळी पडावी, अच्यावाच्या तोंड पिटू नये. तोल जाऊन[१८] सद्गुरूंच्या पायावरच देह पडावा ॥ १ ॥

पाण्याशिवाय स्नान करावे (रसानुभवाने अवभृत स्नान करावे). कपडा नसताना सोवळे नेसावे (शुचिर्भूत असावे). न जेवता पोट भरले पाहिजे (अमृतरस घ्यावा). जागे असतानाच झोप घ्यावी (समाधी लागली पाहिजे)[१९] ॥ २ ॥

चिंता असूनही समाधान असावे. भ्रम झालातरी ब्रह्मप्राप्ती झाली पाहिजे. जगात पिशाच अंतरी शहाणा अशी अवस्था यावी. भूत-भविष्य ज्ञान व्हायला हवे ॥ ३ ॥

सूर्य-चंद्र कळे बंदिरवेकु ।
सज्जन संगदलि वेरतिरवेकु ॥
कुंद इल्लदे मुक्ति दोरकिरवेकु ।
निरुपाधिगे मगा हुट्टि हींगिरवेकु ॥ ४ ॥

ಕ

7 The greatness of a saint is not affected by circumstances

संतर हिरिमेयु परिस्थितियन्नु अवलंबिसिरुवदिल्ल

(राग–जंगला; ताल–केरवा)

हेगिद्दरू चंद ज्ञानियु ॥ प. ॥
जन्मरोगवनळिदु ब्रह्मानंदनागिरे ॥ अ. प. ॥

योगदोळिरे चंद । भोगदोळिरे चंद ।
योगवनरियदिद्दरू चंद ॥
त्यागियादरू । बहु लुब्धनादरू ।
रागियादरू विरागियादरू ॥ १ ॥

मनेयोळिद्दरू चंद । मठदोळगिद्दरू चंद ।
मनेमठदाशेयनळिदरू चंद ॥
धनवंतनागिरे । धनहीननागिरे ।
जनसंगदोळिद्दरू जनसंगवळिदरू ॥ २ ॥

ओदुतलिरे चंद । वरेयुतलिरे चंद ।
ओददे वरेयदिद्दरू चंद ॥
वादिसुतिद्दरू । वादवनळिदरू ।
वेदान्तियादरू सिद्धांतियादरू ॥ ३ ॥

कुलदोळिद्दरू चंद । कुलव बिट्टरू चंद ।
सले कर्म नडेसलु बिडलु चंद ॥
बलु शूरनादरू । रणहेडियादरू ।
इळेयाण्मनादरू सले भंडनादरू ॥ ४ ॥

तोंडावर सूर्यचंद्रांची कळा फुलावी. ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत रमावे. अक्षय मुक्तीचे वाटेकरी व्हावे. निरुपाधिसिद्धांना[५०] देवाच्या बाळरूपाचे दर्शन होऊन या सगळ्या गोष्टी साधल्या पाहिजेत ॥ ४ ॥

ꕥ

पद ७

संतांच्या मोठेपणाला परिस्थितीचे बंधन नाही

कसाही असला तरी ज्ञानी तो ज्ञानीच.

जन्माचे चक्र तोडून तो ब्रह्मानंदात रममाण असतो.

योगात असलातरी ठीक, भोगात असलातरी ठीक, योग कळत नसलातरी ठीकच. तो त्यागी असो, भोगी असो, संसाराचा लोभ असो, राग असो, तो ज्ञानीच ॥ १ ॥

घरात असो, रानावनात असो किंवा घरादाराची आशा नष्ट होवो, त्याला कशाची पर्वा नाही. श्रीमंत असो, गरीब असो, जनात असो, वनात असो, ज्ञानी तो ज्ञानीच ॥ २ ॥

वाचत असेलतरी उत्तमच, लिहीत असेलतरी उत्तम, लिहिणे वाचणे सोडलेतरी उत्तम. वाद घालत असलातरी उत्तम, वाद सोडला असलातरी उत्तम. वेदान्ती[५१] असलातरी ठीक, सिद्धांती असलातरी ठीक. ज्ञानी तो ज्ञानीच ॥ ३ ॥

कुलवंत असला काय, कुलहीन असला काय; कर्म करीत असला काय किंवा कर्मत्याग केलेला असला काय, त्याला खुषीच आहे. शूर असो, भेकड असो, राजा असो, रंक असो, ज्ञानी तो ज्ञानीच ॥ ४ ॥

ꕥ

तिरिदुण्णुतिरे चंद । करेदिक्कुतिरे चंद ।
गिरिगुहांतरवासियादरू चंद ॥
गुरुभक्तनादरू । गुरुशिष्यनादरू ।
गुरुमहालिंगने ताने आगिद्दरे ॥ ५ ॥

8

8 Divine determinism vs. self-effort

परमात्मन नियति मत्तु स्वप्रयत्न

(भामिनिषट्पदि)

देवगंगेयोळुळ्ळवगे दुरि–
तावळिगळुंटे, विचारिसे
पावुगळ भयवुंटे, विहगाधिपन मंदिरदि ॥
जीवकर्तृत्वव मरेदु प–
रावरेशने कर्तृयेंदरि–
दाव कर्मव माडिदरू लेपिसवु कर्मगळु ॥ १ ॥

एनु माडुव पुण्यपापग–
ळाने माडुवेनेंबुवाधम
हीन कर्मके पात्र ना पुण्यक्के हरियेंब ॥
मानवनु मध्यमनु द्वंद्वके
श्रीनिवासने कर्तृयेंदु स–
दानुरागदि नेनेदु सुखिसुवरे नरोत्तमरु ॥ २ ॥

भिक्षा मागत असेलतरी एकच, भिक्षा वाटत असेलतरी एकच. डोंगरदऱ्यात त्याची वस्ती असेलतरी एकच. तो गुरू असो वा शिष्य असो, तो स्वतःच गुरुमहालिंग झाला म्हणजे पुरे ॥ ५ ॥

ꕥ

पद ८

सकळ करणें जगदीशाचें ।

स्वर्गगेमध्ये डुंबणाऱ्याला दुरितांच्या राशीपासूनही भय नाही. विचार करा वरं, गरुडाच्या मंदिरात सापांचे काय भय ? आपण कर्ता नसून, राम कर्ता आहे असे समजून प्रत्येक काम केल्यास कर्माचा लेप लागत नाही ॥ १ ॥

चांगले कर्म आणि वाईट कर्म दोन्ही मीच करतो असे जो समजतो तो अधम होय. वाईटाचा धनी मी आहे पण चांगल्याचा कर्ता हरी आहे असे मानणारा मध्यम होय. चांगले असो किंवा वाईट असो, दोन्ही कर्मांची मुखत्यारी देवाकडेच आहे अशी जाणीव ठेवून, भक्तीने हरिस्मरण करून आनंदाने काल-क्रमण करणारेच नरोत्तम होत ॥ २ ॥

10 Relation of Saints to God

देव-भक्तर संबंध

1 Thy power has encompassed the world;
my love has encompassed thee

निन्न माये जगत्तन्नु सुत्तिदरे, एन्न प्रेमवु निन्नन्नु सुत्तिरुवदु

(वचन)

जगव सुत्तिप्पुदु निन्न मायेयय्या
निन्न सुत्तिप्पुदु एन्न मन नोडय्या
नीनु जगके बल्लिदनु
नानु निनगे बल्लिदनु कंडय्या
आनु निन्नोळगे नीनु एन्नोळगे
करियु कन्नडियोळडगिदंतय्या
एन्नोळगे नीनडगिदे कूडलसंगमदेवा.

2 Omnipotence of God

परमात्मनु सर्वसमर्थनु

(वचन)

हरनीव कालक्के सिरियु बेन्नलि बक्कु
हरिदु हेद्दोरेयु केरे तुंबिदंतय्या
नेरेयद वस्तु नेरेवुदु नोडय्या
अरसु परिवार कैवार नोडय्या
परम निरंजनने मरेद कालक्के
तुंबिद हरविय कल्लु कोंडंते कूडलसंगमदेवा.

१० देवभक्तांचा संबंध

पद १

'हृदय वंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडिला'।

तू आपल्या मायेने जगाला व्यापले असशील पण मी माझ्या प्रेमाने तुला कवेत घेतले आहे. तू जगाला जाणतोस, पण बघ, मी तुलाही ओळखतो. मी तुझ्यात आहे व तू माझ्यात आहेस. मोठा थोरला हत्ती जसा लहानशा आरशात सापडतो त्याप्रमाणे, हे कूडलसंगमदेवा, तू माझ्यामध्ये अडकला आहेस.

पद २

'अनंतहस्तें कमलावराने'।

पाण्याचा लोंढा घोंघावत आला की तळे हां हां म्हणता भरून जाते. तशी परमेश्वराची कृपा एकदा झाली की लक्ष्मी सावलीसारखी माणसाच्या पाठोपाठ येते. त्यावेळी न मिळती वस्तू सहजासहजी हस्तगत होते. राजवैभव दाराशी येते. पण त्याच परम निरंजनाच्या मनातून आपण उतरलोतर, हे कूडलसंगमदेवा, भरलेला रांजण दगड मारून फोडल्यावर पाणी वाहून जाऊन हातात खापराच्या चार ठिकऱ्या उराव्यात तशी गत होते.

3 Show me Thy lotus-feet oh God, at this critical moment

ई संकट समयदल्लि निन्न पादारविंदव तोरय्य प्रभो !

(राग–भैरवि (कर्नाटकि); ताल–दीपचंदि)

इंदु एनगे गोविंद, निन्न पादार–
विंदव तोरो मुकुंद इंदिरेरमण ॥ प. ॥
सुंदर वदनने नंदगोपन कंद ।
मंदरोद्धर आनंद, इंदिरेरमण ॥ अ. प. ॥

नोंदेनय्य भव बंधनदोळु सिलुकि ।
मुंदे काणदे दारि कुंदिदे जगदोळु ॥
कंदनंतेंदेन्न कुंदुगळेणिसदे ।
तंदे कायो कृष्ण कंदर्पपितने ॥ १ ॥

मूढतनदि बलु हेडि जीवनागि ।
दृढ भक्तियनु माडलिल्लवो हरिये ॥
नोडलिल्लवो निन्न पाडलिल्लवो महिमे ।
गाडिकार कृष्ण बेडिकोंबेनो निन्न ॥ २ ॥

धारुणियोळु भूभार–जीवननागि ।
दारि तप्पि नडेदे सेरिदे कुजनर ॥
आरू कायुवरिल्ल सारिदे निनगय्य ।
धीर वेणुगोपाल पारगाणिसो भव ॥ ३ ॥

4 Why don't you answer my call, oh God ?

एन्न कूगे मारुत्तरवन्नु नीडबारदे ?

(राग–भूप; ताल-दीपचंदि)

ओ एन्नबारदे हरिये ना करेदरे ।
ओ एन्नबारदे हरिये ॥ प. ॥

पद ३

'कृष्णा धांव बा लवकरी । संकट पडलें भारी'।

हे गोविंदा, मुकुंदा, इंदिरारमणा, आता तुझे चरणकमल माझ्या दृष्टीस पडू दे.

हे प्रसन्नवदना, नंदकुमारा, आनंदस्वरूपा, तू मंदराचल उचलून धरलास.

भवबंधनात सापडल्याने मला फार सोसावे लागले. पुढची वाट दिसेना आणि मी हीनदीन झालो. या तान्हुल्याच्या दोषांकडे दुर्लक्ष कर आणि हे मदनपित्या कृष्णा, माझे रक्षण कर ॥ १ ॥

मी अडाणी आहे, फार घाबरट आहे. देवा, मी दृढ भक्ती केलीच नाही, ना तुझे दर्शन घेतले, ना तुझी स्तुती गाइली. हे मायाधिपती कृष्णा, मी तुझ्यापुढे पदर पसरतो ॥ २ ॥

मी धरणीला भार झालो, आडवाटेला लागलो आणि मला दुर्जनांची संगत लागली. आता दुसरा कोणी राखणारा नाही म्हणून तुझ्या दारात आलो आहे. हे वेणुगोपाला, मला भवसागराच्या पार ने ॥ ३ ॥

❀

पद ४

'धांव घालीं विठू आतां चालूं नको मंद'।

देवा, तुझा धावा केलातरी तू ओ का देत नाहीस ?

हालनु वेडुत मोरेयिडलुपमन्यु ।
बालगे ध्वनिदोरिदंते ॥
चालवरिदु सरोवरदलि करेद शु-
डालगे ध्वनिदोरिदंते ॥
व्याळ्यक्के ओदगेंदु रात्रिले करेद पां-
चालिगे ध्वनिदोरिदंते ॥
कालकालके बंदु मोरेयिडे सुरमुनि ।
जनके मैदोरि ध्वनिदोरिदंते ॥ १ ॥

देव नी मरेयागे हुंकरिसोदरलु ।
आविगे ध्वनिदोरिदंते ॥
बंदूळिगके निन्न पांडवनोदरलु ।
नितु नी ध्वनिदोरिदंते ॥
इंदाद कलियुगदासर मातिगे ।
बंदु नी ध्वनिदोरिदंते ॥
तंदे महिपतिनंदन प्रभु गो-
विंद मुकुंदेन्न सलहेंव मूढगे ॥ २ ॥

5 A catalogue of charges against God

परमात्मन विरुद्ध सल्लिसलाद अपराधगळ पट्टि

(राग–कांबोदि; ताल–झपताल)

एनु माडिदि केळेन्न, देवा ! ॥ प. ॥

एनु माडिदि एंतंत हेळलि ।
हितवु एल्ल निन्नल्लिरलु ॥
घन घातकतनदिंदलि एन्न ।
नी केडिसिदि सांबा ॥ १ ॥

दुधासाठी तुला साद घातल्याबरोबर उपमन्यूचा लळा तू पुरवलास. सरोवरातून गजेंद्राने मोठ्या कळवळ्याने तुला हाक मारली तेव्हा त्याच्यासाठी तू धावून आलास. रात्री अपरात्रीसुद्धा द्रौपदीला साहाय्य करण्यासाठी वेळेला तात्काळ उभा राहिलास. ऋषिमुनींनी भक्तिभावाने पाचारल्याबरोबर वेळोवेळी येऊन आपले रूप दाखवलेस ॥ १ ॥

तू बाजूला झाल्यामुळे गाय हंबरली. तत्क्षणी तू तिला पावलास. अर्जुनाने मदत मागितल्यावर तू सारथ्य करून त्याची सेवा केलीस. आज या कलियुगातही भक्तांच्या हाकेला ओ देऊन तू हजर होतोस. हे प्रभू, गोविंदा, मुकुंदा, या अजाण महिपतीनंदनाच्या आर्त हाकेला ओ देऊन त्याचा सांभाळ कर ॥ २ ॥

पद ५

'नका मजपुढें ठकाठकी'।

देवा, तू काय काय केले आहेस ते ऐक.

तू काय केले आहेस हे किती म्हणून सांगू? माझे हित करणे तुझ्या हातात असूनसुद्धा तू माझा अपरिमित घात केलास व माझा सर्वस्वी नाश केलास ॥ १ ॥

एन्नोळु नीनु कूडि आडिदि ।
आडुत बंदु फासि हाकिदि ॥
फासिय जरिदु जारि निंतिदि ।
इदु अल्ल रीति सांबा ॥ २ ॥

खुळ्ळ देहदोळु गूळ्याग़ि मेरेदि ।
दुःखके एन्न गुरि माडिदि ॥
भिन्नविल्लदलि भिन्न माडिदि ।
मुलविगे मरुळादि सांबा ॥ ३ ॥

फासियोळगे एन्न घासि माडुवदे ।
ईसु काल निन्न दयदल्लिदे ॥
हरुषदिंद शिव सद्गुरु एन्नलु ।
भवद फासि नी हरिसिदि सांबा ॥ ४ ॥

जीव शिव एंब भेद निन्नल्ले ।
ई संबंधव नडिदु नोडले ॥
ठकवाठकवी हच्चव्याडले ।
हुच्चा नी केळो सांबा ॥ ५ ॥

जीवद इच्छिले आगुवदिल्ल ।
शिवन इच्छे नडिसुवदेल्ल ॥
गुरुलिंगजंगमन पादक होंदि ।
दोषव कळकोळ्ळो सांबा ॥ ६ ॥

❀

6 God responsible for all the thoughts and deeds of man

मानवन आचार विचारगळिगल्लु परमात्मने होणेगार

(राग–भैरवि [कर्नाटकि]; ताल–दीपचंदि)

नान्निंद नानु जनिसि बंदेने कृष्णा ।
लेशवादरू नन्नाधीनविद्दरे तोरु ॥ प. ॥

हे सांबा, तू व मी खेळगडी होतो. खेळता खेळता तू मला संसाराच्या पाशात अडकवलेस व स्वतः मात्र त्यातून निसटून गेलास, हे योग्य नाही ॥ २ ॥

माझ्या या क्षुद्र देहात राहून तू स्वतः पोळासारखा मिरवतोस आणि मला दुःखात लोटतोस. ज्या ठिकाणी भेद नव्हता तिथे तू भेद निर्माण केलास आणि मायेने भुलून गेलास ॥ ३ ॥

मायापाशात लोटून असा माझा छळ करावास का? आतापर्यंत मी तुझ्या कृपाछत्राखाली होतो. आनंदाने शिवा, सद्गुरू, देवा असे म्हणत होतो. त्यावेळेस संसाराचा पाश तू काढून टाकला होतास ॥ ४ ॥

जीव-शिव भेद तुझ्यामुळेच आहे. याचा परिणाम काय होतो पाहा. हे खुळ्या सांबा, ऐक, ठकवाठकवी करू नको ॥ ५ ॥

माणसाच्या इच्छेने काही घडून येत नसते. भगवंताच्या संकल्पसत्तेनेच विश्व चालते. अरे सांबा, तू गुरुलिंगजंगमांच्या पायांचा आश्रय घेऊन दोषरहित हो ॥ ६ ॥

पद ६

'कर्ता तूंचि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे?'

हे कृष्णा, माझा मीच जन्माला आलो आहे का? कुठलीही गोष्ट लेशभरही माझ्या आधीन असेल तर दाखवून दे.

निन्न प्रेरणेयिंद नडेदु नुडिद मेले ।
निन्नदु तप्पो एन्नदु तप्पो परमात्मा ॥ अ. प. ॥

एलबुगळेल्ल जोते माडि नरगळ ।
होलेचर्मव होदिसि देहदोळु ॥
मलमूत्रगळनु बलिसि हृदयदल्लि ।
नेलसि चेतनवनित्तव नीनल्लवे ॥ १ ॥

जननिय जठरदि नवमासवु ।
घनदि नी पोषिसुतिरे नानु ॥
जनिसलारेनु एने जनिसेंदिक्कळदिंद ।
वनजाक्षा नूकिदवनु नीनल्लवे ॥ २ ॥

जनिसिदारभ्य इंदिन परियंत ।
घनघन पाप सुकर्मगळ ॥
मनके बोधिसि माडिसि मुंदे इदनेल्ल ।
अनुभविसुवदु नानो नीनो देवा ॥ ३ ॥

अंधकन कैलि कोलित्तु करदोय्वन ।
मुंदाडि तप्पि गुंडिगे केडहलु ॥
अंधकन तप्पो मुंदाळिन तप्पो ।
हिंदाडवेड एन्नल्लि तप्पिल्लवो ॥ ४ ॥

क्षीरदोळदु नीरोळगदु गोविंद ।
हेरोप्पिसिद मेले सुंकवे सिरिकृष्णा ॥
मायारहित कागिनेलेयादिकेशव ।
कायय्य तप्पनेणिसदे विठलराय ॥ ५ ॥

माझे बोलणे-चालणे सर्व तुझ्याच प्रेरणेने होते; मग काही बिघडले असेल तर चूक तुझी की माझी ?

हाडांची एक मोळी बांधून, मज्जा व मळके कातडे यात तिला गुंडाळून, देहात मलमूत्राचा भरणा करून व स्वतः हृदयात राहून, या देहाला सजीव करणारा तूच ना ? ॥ १ ॥

आईच्या पोटात मला नऊ महिने पुरेपूर पोसलेस. मला जन्माला यायचे नाही असा मी हट्ट धरला. तरीही जन्माला आलेच पाहिजे, अशा आग्रहाने जणू काही चिमट्याने मला बाहेर ढकललेस. हे कमलाक्षा, हे करणारा तूच ना ? ॥ २ ॥

जन्मल्यापासून आजपर्यंत तूच बरी-वाईट कृत्ये मला शिकवलीस आणि माझ्याकडून करून घेतलीस. मग आता ह्याची फळे कुणी भोगायची, तू की मी ? ॥ ३ ॥

अंधळ्याच्या हातात काठी देऊन, त्याचा हात धरून वाट दाखवणाऱ्याने ते करायचे सोडून जर त्याला खड्ड्यात पाडले तर अंधळ्याची चूक, की वाट दाखवणाऱ्याची चूक ? देवा, मागे सरकू नको, सरळ सांग माझी चूक कुठे आहे ? ॥ ४ ॥

मला तुपाशी खायला घाल किंवा उपाशी ठेव. हे गोविंदा, माझा सगळा माल मी तुझ्या स्वाधीन केला आहे. मग आता मला जकात कशाला बसवतोस ? हे मायारहित अशा कागिनेलेयादिकेशवा, माझी चूकभूल विसरून माझे रक्षण कर ॥ ५ ॥

7 Realisation of parity between saints and God

देवभक्तरल्लिय समानत्वद अनुभव

(राग–भैरवि; ताल–दीपचंदि)

अंदिल्ल स्वामी इंदिल्ल ।। प. ।।
एंदिगादरु निम्मनगलि ना इल्ल ।। अ. प. ।।

निर्बैल नीनु । निर्विकारनु नानु ।।
सगुणरूप नीनु । शरणु माडुवे नानु ।। १ ।।

पंचवदन नीनु । पाद नंबिदे नानु ।।
जगभरित नीनु । जगद ओळगे नानु ।। २ ।।

प्रणवस्वरूप नीनु । पठिसि नोडुवे नानु ।।
गुरुलिंगजंगम नीने । नानू नीने ।। ३ ।।

8 Let my heart be Thy constant abode

सदा एन्न हृदयदल्लि वास माडय्य

(राग–भैरवि; ताल–दादरा)

सदा एन्न हृदयदल्लि वास माडो श्रीहरिये ।
नादमूर्ति निम्म पाद मोददिंद भजिसुवे ।। प. ।।

ज्ञानवेंब नवरत्नद मंटपद मध्यदल्लि ।
गानलोलन कुळ्ळिरिसि ध्यानदिंद भजिसुवे ।। १ ।।

भक्तिरस तुंबि मुत्तु माणिक्यद हरिवाणदि ।
मुक्तनागबेकु एंदु मुत्तिनारति एत्तिवे ।। २ ।।

निन्न नानु बिडुवनल्ल एन्न नीनु बिडलु सल्ल ।
घन्न महिम विजयविठ्ठल निन्न भक्तर केळु सोल्ल ।। ३ ।।

पद ७

'तुका म्हणे येथें नाहीं भिन्न भाव। भक्त तोचि देव, देव भक्त'।

देवा, मी कधीच तुझ्याहून वेगळा नव्हतो.
आताही नाही व केव्हाही वेगळा होणार नाही.

तू निर्गुण आहेस तर मी निर्विकार आहे. तू सगुणरूप आहेस; मी तुला शरण येतो ॥ १ ॥

तू पंचवदन[१२] आहेस; मी तुझे पादसेवन करतो. तू आहेस विश्वंभर आणि मी आहे विश्वाच्या आत ॥ २ ॥

तू प्रणव-स्वरूप आहेस व मी त्याचा जप करतो. तूच गुरुलिंगजंगम आहेस आणि मीही तूच आहे ॥ ३ ॥

पद ८

'विठो माउलिये हाचि वर देईं।
संचरोनि राहीं हृदयामाजीं'।

हे श्रीहरी, सदैव माझ्या हृदयात वास कर. हे नादमूर्ते, तुझ्या चरणकमलाची मी संतोषाने पूजा करतो.

ज्ञानरूपी नवरत्नखचित[१३] मंडपात गानलुब्ध श्रीकृष्णाची प्रतिष्ठापना करून मी एकाग्रतेने त्याची आराधना करतो ॥ १ ॥

माणिकमोत्यांच्या तबकात भक्तिरस भरून, मुक्तीच्या आशेने मी मोत्यांची आरती ओवाळतो ॥ २ ॥

हे महात्म्या, विजयविट्ठला, मी तर तुला सोडणारच नाही. माझा हात सोडणे तुला बरे दिसत नाही, तुझ्या भक्तांचे इथे काय म्हणणे आहे ते तरी ऐक ॥ ३ ॥

11 The Nature of God

परमात्मन स्वरूप

1 An epitome of the whole mystical life

समग्र अध्यात्मजीवनद संक्षिप्त रूप

(राग– कांबोदि; ताल– झपताल)

अंतरंगद कदवु तेरेयिंतिदु ।
इंतु पुण्यद फलद प्राप्तियायितु एनगे ॥ प. ॥

एसु दिनवायितो बीग मुद्रेय माडि ।
वासवागिद्दरै दुरुळरल्लि ॥
मोसवायितु इंतु बारिदे इंदिन तनक ।
सूसिर्द तमसिनिं काणुतिद्दिल्ल ॥ १ ॥

हरिकरुणवेंबुव कीलिकै दोरेयितु ।
गुरुकरुणवेंबंथ शक्तियिंदे ॥
वरभागवतर सहवासवनु ना माडि ।
हरिभजनेयिंदली बीगवनु तेगेदे ॥ २ ॥

सुत्तलिद्दवरेल्ल एत्तलो ओडिदरु ।
तत्त्वचिंतनेयेंब दीपवन्नु ॥
ओत्तागि हिडकोंडु द्वारवनु पोगलु ।
एत्त नोडिदरत्त श्रृंगार सदन ॥ ३ ॥

होरगे द्वारवु नाल्कु ओळगैदु द्वारगळु ।
ओळदारियल्लि प्राणादि प्रियरु ॥
मिरुगुव मध्य मंटपदि कोटि रवियंथ ।
सरसिजासन पितन अरमनेय सोबगु ॥ ४ ॥

११ परमात्म्याचे स्वरूप

पद १

समग्र पारमार्थिक जीवनाचे दिग्दर्शन

अंतरंगावरचे झापड आज उघडले आणि माझे पुण्य फळाला आले.

कित्येक दिवसांपासून त्याला कुलूप लावून ते मोहोरबंद केले होते आणि दुष्टांनी आत घर मांडले होते. आतापर्यंत माझी फसवणूक झाली. मिट्ट काळोखाखेरीज तिथे दुसरे काही दिसतच नव्हते ॥ १ ॥

गुरुकरुणारूपी शक्तीच्या साहाय्याने हरिकरुणारूपी किल्ली माझ्या हातात आली. त्यातच संतांची संगतीही लाभली. मग हरिभजनाने मी ते कुलूप काढले ॥ २ ॥

ज्यांनी मला घेरून टाकले होते, ते जीव घेऊन कुठल्याकुठे पळून गेले. तत्त्वचिंतनाचा दिवा हातात घट्ट धरून, दारातून आत शिरल्यावर एक मंदिर दिसले. जिकडे तिकडे गुढ्या-तोरणांची आरास केलेली होती ॥ ३ ॥

त्याला बाहेर चार दारे [५] व आत पाच दारे होती. आतल्या बाजूला प्राण वगैरे प्रिय मित्र होते. मध्यभागीच्या चमचमणाऱ्या मंडपात श्रीविष्णूचा कोटिसूर्यकांतियुक्त नेत्रदीपक राजवाडा होता ॥ ४ ॥

स्वमूर्तिगणमध्य सच्चिदानंदैक्य ।
रमेयोडेय नगेमोगदि मिनुगुतिरुव ॥
कमलजादिगळिंदे स्तुतिसिकोळुतिह हृदय ।
कमलदोळगिह विजयविठलननु कंडे ॥ ५ ॥

❀

2 A personalistic description of God

परमात्मन सगुण रूपद वर्णने

(राग– देस, ताल– केरवा)

कृष्णमूर्ति कण्णमुंदे निंतिरुत्तदे ॥ प. ॥

मस्तकदलि माणिकद किरीट ।
कस्तुरि तिलकदिंदेसेव ललाट ॥
हस्तदि कोळलनू दुव ओरेनोट ।
कौस्तुभ एड वलदलि ओड्याट ॥ १ ॥

मगमगिसुव सोवगिन सुळिगुरुळु ।
चिगरु तुलसिवनमालेय कोरळु ॥
वगे वगे होन्नुंगुरविट्ट वेरळु ।
सोवगिन नाभिय तावरेयरळु ॥ २ ॥

उडुदार ओड्याण निखिलाभरण ।
वेडगु पीतांबर रविशतकिरण ॥
कडग नूपुरगेज्जेगळनिट्ट चरण ।
ओडेय श्रीपुरंदरविठलन करुण ॥ ३ ॥

❀

सच्चिदानंदस्वरूप रमापती निजरूपात असलेल्या आपल्या परिवाराच्या प्रभावळीत विराजत होता. ओठावर मंदहास्य विलसत होते. आणि ब्रह्मदेवासकट सगळे स्वस्तिवाचन करत होते. अशा विजयविठ्ठलाचे मला हृदयकमलात दर्शन झाले ॥ ५ ॥

पद २

'पुढें गोपाळ उभा आहे'।

कृष्णाची मूर्ती डोळ्यांसमोर उभी आहे.

मस्तकावर माणकांचा किरीट धारण केला आहे. कपाळावर कस्तुरीचा टिळा शोभतो आहे. हातातली बासरी वाजवत डोळ्याच्या कोपऱ्यातून तो पाहात आहे. गळ्यातला कौस्तुभमणी डावीउजवीकडे रुळत आहे ॥ १ ॥

मोहक कुरळ्या केसांचा घमघमाट सुटला आहे. गळ्यात तुळशीमंजिऱ्यांची माळ दरवळत आहे. बोटात नाना प्रकारच्या सोन्याच्या अंगठ्या लकाकत आहेत. नाभिकमल अत्यंत मनोहर आहे ॥ २ ॥

कमरेला करगोटा व रत्नखचित कंबरपट्टा ल्यायला आहे. शेकडो सूर्यांच्या दीप्तीप्रमाणे त्याचा पीतांबर झळकत आहे. पायात पैंजण व घुंगुरवाळे किणकिणत आहेत. हे प्रत्यक्ष दर्शन झाले, ही त्या प्रभू पुरंदरविठ्ठलाची कृपा ॥ ३ ॥

3 A dream-vision

कनसिनल्लि दर्शन

(राग – शंकराभरण; ताल – आटताल)

कंडे ना कनसिनलि गोविंदन ॥ प. ॥
कंडे ना कनसिनलि कनकरत्नद मणिय ।
नंदन कंद मुकुंदन चरणव ॥ अ. प. ॥

अंदुगे किरुगेज्जे घलिरेंब वाद्यदि ।
बंदु काळिंगन हेडेयनेरि ॥
धिं धिमिधिमिकेंदु ताळगतिगळिंदा–
नंददि कुणिव मुकुंदन चरणव ॥ १ ॥

उट्ट पीतांबर उडिय कांचिय दाम ।
तोट्ट मुत्तिन हार कौस्तुभवु ॥
कट्टिद वैजयन्ती तुळसी माले ।
इट्ट द्वादशनाम निगमगोचरन ॥ २ ॥

किरुबेरळिन मुद्रेयुंगुर मुंगैय ।
करदल्लि कंकण नळितोळुगळ ॥
वरचतुर्भुज शंखचक्रदि मेरेवन ।
निरुतदि ओप्पुव करुणामूरुतिय ॥ ३ ॥

बण्णद तुटि भावरचनेय सुलिपल्लु ।
सण्ण नगेय नुडि सवि मातिन ॥
पुण्य चरित्रन पोळेव किरीटन ।
कण्णु मनदणियदु कंसारि कृष्णन ॥ ४ ॥

मंगळ वर तुंगभद्रदि मेरेवन ।
अंगजपित श्री लक्ष्मीपतिय ॥
शृंगार मूरुति पुरंदरविठ्ठलन ।
कंगळिंद कंडे हिंगितु भवभय ॥ ५ ॥

पद ३
स्वप्नात देवाचे दर्शन झाले

स्वप्नात मी गोविंदाला पाहिले.
सोन्याने व रत्नांनी मढवलेले नंदकुमार मुकुंदाचे चरण मी स्वप्नात पाहिले.

पायांतल्या नूपुरांचा खुळखुळ आवाज करत येऊन, कालियाच्या फण्यावर चढून, तालाच्या ठेक्यावर आनंदाने थयथय नाचणाऱ्या मुकुंदाचे चरण मला दिसले ॥१॥

कासे पीतांबर व कटीला मेखला असे त्याचे रूप आहे. गळ्यातील मौक्तिक-मालेत कौस्तुभ विराजत आहे. वैजयंतीमाला, तुळशीमाला गळ्यात रुळत आहेत. द्वादशस्थानांवर गंधलेपन आहे. तो श्रुतिगोचर आहे ॥ २ ॥

करंगळीत अंगठी आहे, हातात कंकण आहे, त्याचे बाहू कोमल आहेत, तो चतुर्भुज असून शंखचक्रगदापद्मांनी नटलेला आहे. हा कारुण्यमूर्ती गोविंद सदैव मनोज्ञ भासतो ॥३॥

लालचुटुक ओठ, कुंदकळ्यांसारखे दात, मंदस्मित, मधुरवचन, पुण्यचरित्र, मस्तकावर झगमगणारा किरीट अशा तऱ्हेचे गोंडस ध्यान असणाऱ्या या कंसारी कृष्णाला कितीही पाहिले तरी डोळ्यांची तहान बुझत नाही ॥४॥

हा कामपिता, लक्ष्मीपती मंगलकारक असून तुंगातीरी वास करतो. या सौंदर्य-मूर्ती-पुरंदरविठ्ठलाला डोळ्यांनी पाहिल्यावर भवभय उडाले ॥५॥

4 Personal-impersonal aspect of God

परमात्मन सगुण– निर्गुण रूप

(राग– काफि; ताल – केरवा)

कूसनु कंडीरा ज्ञानिगळेल्ल ॥ प. ॥
सासिर नामद शतकोटि तेजद ।
सूसुव सुखमय ज्ञानद कूसु ॥ अ. प. ॥

ज्ञानसमुद्रदोळाडुव कूसु ।
ज्ञानिगळ हृदयदि मिनुगुव कूसु ॥
दीनदासरिगे काणुव कूसु ।
ताने बल्लुदु तन्न महिमेय कूसु ॥ १ ॥

लोकत्रयवेल्ल नोडुव कूसु ।
बेकाद भक्तरोळाडुव कूसु ॥
आकारविद्दु निराकार कूसु ।
साकल्य दृष्टिगे सिलुकद कूसु ॥ २ ॥

तनुमनधनदलि कुळितिह कूसु ।
घनवाद महिमेगे कारण कूसु ॥
विनुगु बुद्धिगे एंदू निलुकद कूसु ।
चिनुमय पुरंदरविठल कूसु ॥ ३ ॥

ಜ

5 The wonderful vision of God will satisfy the eyes

परमात्मन दिव्य दर्शनदिंद कंगळ वर हिंगुवदु

(वचन)

होळेव कंजेडेगळ, मणिमुकुट
ओप्पुव सुलियल्ल, नगे-मोगद

पद ४

'सगुण निर्गुण एकु गोविंदु रे'।

हे ज्ञानी लोक हो, तुम्ही बाळ पाहिलेत काय?

या बाळाला सहस्र नावे आहेत. ते अतिशय तेजःपुंज आहे. सुखाने फेसाळलेले असे ते ज्ञानमय बाळ आहे.

हे बाळ ज्ञानसागरात खेळत आहे; ज्ञानी लोकांच्या हृदयात वसत आहे; शरण आलेल्या भक्तांना ते दृग्गोचर आहे. स्वतःचा महिमा ते स्वतःच जाणू शकते ॥ १ ॥

त्रिभुवन याच्या दृष्टिक्षेपात येते. आपल्या आवडत्या भक्तांशी ते खेळते. आकार असूनही ते निराकार आहे आणि लौकिक ज्ञानाच्या कक्षा कितीही व्यापक झाल्यातरी त्यात ते गवसत नाही ॥ २ ॥

तनमनधनात याचा वास आहे. जे जे महान आहे त्या सर्वांचा उगम इथूनच होतो. त्याला जाणण्याच्या कामी बुद्धी निरुपयोगी आंहे. ते बाळ म्हणजे चिन्मय पुरंदरविट्ठलच आहे ॥३॥

❀

पद ५

'आवडें हें रूप गोजिरें सगुण। पाहतां लोचन सुखावले'।

चमकदार कांती असलेल्या लाल जटा धारण करणारे, मणी व मुकुट यांनी

कंगळ कांतियिं ईरेळु भुवनमं बेळगुव
दिव्य स्वरूपन कंडे नानु;
कंडेन्न कंगळ वर हिंगित्तिदु.
जगदादिशक्तियोळु वेरसियोडनाडुव
परमगुरु चेन्नमल्लिकार्जुनन
निलव कंडु बदुकिदेनु

ಜ

6 A theistic description of impersonal Brahman

निर्गुण ब्रह्मन सगुणपर वर्णने

(राग–दरबारि कानडा; ताल–त्रिताल)

ब्रह्मानंदद सभेयोळगल्लि
सुम्मने इरुतिह्दुदेनय्य ॥ प. ॥

मूडदु कूडदु उण्णदु माणदु ।
काडदु बेडदु कंगोडदु ॥
नाड मातुगळ बल्लदु आडदु ।
रूढियोळगिरुतिह्दुदेनय्य ॥१॥

पोडविगधिकरेंबुवरिगे बल्लदु ।
कडे मोदलिल्लद ओडलिह्दु ॥
बेडगनरिदेवेंबवरिगगोचर ।
पोडवियोळगण भक्तर बल्लदु ॥२॥

निल्लदु निलुकदु एल्लिगे पोगदु ।
बल्लेवेंबवरिगे अळवडदु ॥
बल्लिद नम्म पुरंदरविठलगल्लदे ।
तिळियदु मूजगदोळगे ॥३॥

ಜ

शोभणारे, मोत्यांसारखे दात असलेले, हसतमुख, डोळ्यांच्या तेजाने चतुर्दश[५५] भुवनांना उजळून टाकणारे असे दिव्य रूपडे मी लोचनी देखिले गे माये. ते पाहून माझ्या डोळ्यांची भूकच हरपली. आदिशक्तीशी एकरूप होऊन लीला करणाऱ्या परमगुरू चेन्नमल्लिकार्जुनाचा ठाणमाण मी पाहिला. त्यामुळे मला संजीवन मिळाले.

पद ६

'तुज सगुण म्हणूं कीं निर्गुण रे'।

ब्रह्मानंदाच्या साम्राज्यात मौन धरून बसलेले ते काय आहे ?

त्याला उदय नाही, ते बसत नाही, ते जेवत नाही, निघून जात नाही, त्रास देत नाही, काही मागत नाही आणि ते कशाला घाबरतही नाही. देशभरच्या बातम्या त्याला असतात पण ते तोंडातून ब्र काढत नाही. पृथ्वीच्या पाठीवर असलेली अशी वस्तू कोणती ? ।।१।।

जगातल्या मी मी म्हणणाऱ्यांना ते जाणते. त्याला आदीही नाही आणि अंतही नाही. या वस्तूचे ऐश्वर्य आम्हाला कळले अशी शेखी मिरवणाऱ्यांना ते खरोखर अगोचर आहे. समस्त भक्तगणांना ते जाणते ।।२।।

ते एका जागी थांबत नाही, कुणाच्या हातात सापडत नाही आणि कुठे जात नाही. स्वतःला ज्ञानी समजणाऱ्यांना ते असाध्य आहे. आमच्या सर्वज्ञ पुरंदर-विठ्ठलाखेरीज या त्रिभुवनात ते कुणालाही कळत नाही ।।३।।

7 God is microcosm and macrocosm

देवरु अणोरणीयान् महतो महीयान् इरुवनु

(वचन)

अय्या ! पाताळवित्तित्त,
श्रीपादवत्तत्त.
ब्रह्मांडवित्तित्त,
मणिमुकुटवत्तत्त.
अय्या ! दशदिक्कु इत्तित्त,
दशभुजगळत्तत्त.
चेन्नमल्लिकार्जुनय्या !
नीवेन्न करस्थलके बंदु
चुळुकादिरय्या !

ಙ

8 The Ineffability of the joy of the formless experience

निर्गुण साक्षात्कारद अवर्णनीय आनंद

(राग–जंगला; ताल–केरवा)

काणबारदंथा वस्तु कंडेनो गुरुराया ।
कंड सुखव केळिदरे हेळलिक्के बारदय्या ॥ प. ॥

कै इल्ला कालु इल्ला ।
मै इल्ला मारि इल्ला ॥
भवबंधनद दुःखवु ।
नमगिल्लो गुरुराया ॥ १ ॥

हेण्णु अल्ला गंडु अल्ला ।
पेळलिक्के अळवु इल्ला ॥

पद ७

'अणोरणीयान् महतो महीयान्'।

हे देवा, पाताळही उथळ ठरावे इतके तुमचे श्रीचरण खोल खोल गेले आहेत. ब्रह्मांड इथेच राहिले पण तुमचे मणिमुकुट त्यापलीकडे गेले आहेत. दशदिशा ऐलाड, तर तुमच्या दशभुजा पैलाड. देवा चेन्नमल्लिकार्जुना, तुम्ही माझ्या हाताच्या चुळकीत येऊन बसला आहात.

ङ

पद ८

'तें सुख काय सांगूं। वाचें बोलतां न ये'।

जी वस्तू दृष्टीला अगोचर आहे, ती वस्तू, हे गुरुराया, मी पाहिली; आणि जे सुख झाले ते सांगायला शब्द मुके आहेत.

त्या वस्तूला ना हात, ना पाय, तिला ना अंग, ना मुख. तिच्या अनुभवाने आमचे भवबंध खळाखळा तुटले ॥ १ ॥

ती वस्तू स्त्री नाही, पुरुष नाही, तिचे वर्णन करायला कुणाच्या अंगात दम नाही.

कण्णिनिंद कंडद्दन्नु ।
ताने वल्ला गुरुराया ॥ २ ॥

जपविल्ला तपविल्ला ।
नित्यनेमगळु इल्ला ॥
उपवासद तापवु ।
नमगिल्लो गुरुराया ॥ ३ ॥

मुट्टि कोट्ट गुरुराया ।
तन्न कृपादयदिंद ॥
सृष्टियोळु कूडल्लरेशा ।
बट्ट बयल प्रमेयादा ॥ ४ ॥

ಜ

9 A God-realiser can wipe away the sins of the world

आत्मानुभवियु जगत्तिन पातकगळन्नु परिहरिसुवनु

(राग–कांबोदि; ताल–दीपचंदि)

नोडिरि ब्रह्मनाटव । नीवु ।
नोडवेकादरे माडि गुरुविन सेवा ॥ प. ॥

कालिल्लदे नडेवुदु । करविल्लदे हिडिवुदु ।
गुह्यविल्लदे इंद्रिय सुखिसुवदु ॥
मैयेल्ला मुसुकितु । मलमूत्र बिडिसितु ।
हुय्यलाडुत बंदु ताने तानादद्दु ॥ १ ॥

किविगियिल्लदे केळुवदु । बायिल्लदे उंबुवदु ।
नयनविल्लदे नोट नोडुवदु ॥
तैलविल्लद ज्योति । बैलोळु निंतितु ।
बेलिगे बेलु निर्बेलु तानादद्दु ॥ २ ॥

मी ज्ञानाच्या दिठीने जे पाहिले ते फक्त सद्‌गुरू जाणू शकतात ॥ २ ॥

ती वस्तू आत्मसात करायला जप नको, तप नको, नित्यनेमही नको, आणि उपासतापासाचे श्रमही करायला नकोत ॥ ३ ॥

कृपावंत होऊन सद्‌गुरूंनी त्या वस्तूला स्पर्श केला व ती माझ्या स्वाधीन केली. या जगामध्ये कूडलूरेश निराकार तेजस्वरूप झाला ॥ ४ ॥

पद ९

'गुरु हा पापाचें खंडन'।

बघा हो, ब्रह्माची लीला बघा. ती कळायला हवी असलीतर गुरुसेवा करा.

ते निर्गुण तत्त्व पाय नसून चालते आणि हात नसून धरते. इंद्रिये नसताना सर्व सुख भोगते. माझे शरीर त्याने व्यापून टाकले[५६] आणि माझे मलमूत्र आटून गेले. ब्रह्मतत्त्व गर्जना करत आले पण निजरूपात मिळून गेले ॥ १ ॥

त्याला कान नसून ते ऐकते. मुख नसून जेवते, डोळे नसून पाहते. तेलाविना तेवणारी ज्योत शून्यात स्थिर झाली आणि महाशून्याशी त्याचे ऐक्य झाले[५७] ॥ २ ॥

नेलेयिल्लद भूमिय मेले । एलेयिल्लद गिड हुट्टि ।
दोड्डदोंदु अदु हण्णायितु ॥
तलेयिल्लदे पोत्तु । वेलेयु इल्लदे मारि ।
बाधे तक्कोंड नम्म कूडल्लूरेशा ॥ ३ ॥

निरालंब जमिनीवर विनपानाचे एक झाड उगवले. त्याला एक भले मोठे फळ आले. कूडल्वरेशाने नसलेल्या डोक्यावर ते उचलून घेतले व त्या फळाची विनामूल्य विक्री केली. त्याने आमच्या तापत्रयाचे[१८] ओझे आपल्या खांद्यांवर घेतले ॥ ३ ॥

12 The Name of God — Part 1

परमात्मन नाम – भाग १

1 The utterance of the name of God is the knowledge of God

परमात्मन नामस्मरणेये ब्रह्मज्ञान

(राग–दरबारि; ताल–त्रिताल)

इदे ब्रह्मज्ञान नोडिको ।
सदानंद परमात्म बोधमय ॥ प. ॥

निदानदोळु निजहृदयकमलदोळु ।
सुधाकिरण गुरुपादव काणलु ॥ १ ॥

योगियागि संभोगवनळिदु ।
रोगवळिदु निजरागव नुडियलु ॥ २ ॥

वसुधेयोळगे शिशुनाळधीशन ।
हेसर पोगळि ऐदक्षर नुडियलु ॥ ३ ॥

2 Sages of yore have realised God by the help of God's name, without any mortificatory rituals

हिंदिन संतरु तपस्सिनिंद देहवन्नु दंडिसदे केवल नामद नेरविनिंदले परमात्मनन्नु साक्षात्करिसिकोंडरु

(राग–दरबारि; ताल–दीपचंदि)

ॐ नमः शिवा एन्निरो ओय्यारदि ॥ प. ॥

ॐ नमः शिवा एंदु अजहरिसुररेल्ल ।
मुन्न कैवल्यव पडेदरेंबुद केळि ॥ अ. प. ॥

१२ नाममाहात्म्य - भाग १

पद १

नामस्मरण हेच ब्रह्मज्ञान

हेच ब्रह्मज्ञान आहे.

नाम हेच आनंदमय व ज्ञानमय परब्रह्म आहे.

अमृतवर्षाव करणाऱ्या गुरुचरणांचे हळुवारपणाने आपल्या हृदयकमलात दर्शन घडणे हेच ब्रह्मज्ञान ॥ १ ॥

योगी होऊन भोगरहित व रोगरहित होऊन अलौकिक संगीत ऐकणे हेच ब्रह्मज्ञान ॥२॥

इहलोकी शिशुनाळधीशाचा जयजयकार करून पंचाक्षरी मंत्राचा जप करणे हेच ब्रह्मज्ञान ॥ ३ ॥

पद २

'नका कष्टवूं पर्वताग्रीं तनुला । मुखीं रामचंद्र स्मरा वेळोवेळां'।

प्रसन्न चित्ताने ॐ नमः शिवा या मंत्राचा जप करा.

ॐ नमः शिवा या मंत्राने ब्रह्मदेव, विष्णू व सर्व सुरगणांना पूर्वीच कैवल्य-प्राप्ती झाली आहे हे ध्यानात ठेवून नामस्मरण करा.

जप तप व्रतव्यातके तामसवेंब ।
कपट भ्रान्तिगळ्यातके ॥
गुप्तदि गुरुविन चरणगळ स्मरिसि ।
मतिहीनरागदे हगलिरुळेन्नदे ॥ १ ॥

मास पक्षगळ्यातके उपवासदिं ।
देहदंडनव्यातके ॥
नाशवागुव देहद ध्यासव विडु तम्मा ।
ईशन नेनेयो नी मोसव होंददे ॥ २ ॥

विडदे इन्नडिगडिगे नीरल्केरि ।
मृडपंचाक्षरि नुडिय ॥
हिडिदेळु कोटिमंत्रके तायि ओडलिदु ।
वेडगिन शिवनाम दृढदिंद भजिसिरो ॥ ३ ॥

3 The meanings of all the letters of the six-lettered Mantra

षडक्षरी मंत्रद एल्ल अक्षरगळ अर्थ

(राग – बिलावल; ताल – दीपचंदि)

आरु अक्षर भेद हरि केळ्लु बंद ।
सुरमुनिगळे केळिरण्णा ॥ प. ॥
मूरु लोकद वरमंत्र तंदनु ।
सिद्धरामेशनु तिळियिरण्णा ॥ अ. प. ॥

ॐ एंबुव अक्षर वह्नवनादरे ।
ॐकार बीज नोडुविरण्णा ॥
न एंबुव अक्षर नीवरितिरेंदरे ।
निरहंकार बीज काणुविरण्णा ॥ १ ॥

जप नको, तप नको, व्रतवैकल्ये नकोत. तमोगुणाने लिप्त असलेले कपट व उन्मत्तता तर नकोच नको. चुपचाप सद्गुरुचरणांचे ध्यान करा. बुद्धी चळू देऊ नका, दिवस म्हणू नका, रात्र म्हणू नका, सतत नाम जिभेवर ठेवा ॥ १ ॥

संकष्टी किंवा एकादशी कशाला करावी ? उपासतापासाने देह झिजवणे तरी कशासाठी ? बाबारे, या नाशवंत देहाचा ध्यास सोडून दे. ईश्वराचे स्मरण कर, कुणाच्या फशी पडू नको ॥ २ ॥

आता तरी क्षणही व्यर्थ न दवडता पावलोपावली नीरलकेरि पंचाक्षरीने सांगितल्याप्रमाणे निष्ठेने जप कर. सात कोटी मंत्राचे हे मायपोट आहे. प्रसन्न अशा शिवनामाचे दृढभक्तीने भजन कर ॥ ३ ॥

पद ३

षडक्षरी मंत्राच्या अक्षरसंज्ञा

हे सुरमुनीहो, ऐका. हरी षडक्षरी मंत्राचे रहस्य ऐकण्यास आला.

ऐका हो ऐका, सिद्धरामाने त्रैलोक्यातला श्रेष्ठ मंत्र आणला.

'ॐ' या अक्षराचा अर्थ तुम्हाला कळलातर त्याचे मूळ जे ॐकारबीज ते तुम्ही पाहिल्यासारखेच आहे. 'न' हे अक्षर काय आहे ते समजले की निरहंकाराचे बीज गवसल्यासारखे आहे ॥ १ ॥

म एंबुव अक्षर बीजव तिळिदरे ।
ईरेळु लोकद मर्म नोडीरण्णा ॥
शि एंबुव अक्षर आकाश ।
आ कारणबीजव काणण्णा ॥ २ ॥

वा एंबुव अक्षर वाय्वादिगळ ।
गुरुत हेळुवदण्णा ॥
य एंबुव अक्षर यारिगे निलुकिल्ल ।
तानु तन्ननु वल्लनण्णा ॥ ३ ॥

षडक्षर मुनिगळु होस मंत्र हेळिदरु ।
मरुळ, काडसिद्ध, षण्मुख, सिद्धराम ।
बबलादियल्लि इरुतारण्णा ॥ ४ ॥

ಜ

4 Significance of the name of Allamaprabhu

अल्लमप्रभुविन नामद महिमे

(वचन)

अ एंब वर्ण ऐश्वर्य वर्धिपुदु.
ल एंब वर्ण लकुलीश घनपदमक्कु.
म एंब वर्ण मायाब्धियनु दाटिपुदु.
प्र एंब वर्ण सतत कायद हीन गुणंगळ
कत्तरिसि विसुटिपुदु प्रमेयनु काणिपुदु.
भु एंब वर्ण भूतेश्वरन काणिपुदु.
ओय्यारदिं नंबि अल्लमप्रभु एंब
मंत्रवनु जपिसुवदु.

ಜ

'म' या अक्षराचे मूळ सापडले की चतुर्दश[५९] भुवनांच्या रहस्यांचे आकलन झाले. 'शि' या अक्षराच्या ज्ञानावरोबर आकाशाचे जे कारण आहे (कारणब्रह्म) ते स्पष्ट होईल ॥ २ ॥

'वा' या अक्षराने वायू वगैरेंचे मर्म जाणले जाते. 'य' या अक्षरापर्यंत कुणाचेही हात पोचले नाहीत. त्याचे ज्ञान त्याला स्वतःलाच होते ॥ ३ ॥

षडक्षरमुनींनी नवीन मंत्र सांगितला. मरुळसिद्ध, काडसिद्ध, षण्मुख, सिद्धराम हे संत बबलादि येथे राहतात ॥ ४ ॥

❀

पद ४

अल्लमप्रभूंच्या नावाचा महिमा

'अ' हा वर्ण ऐश्वर्य वाढवणारा आहे.
'ल' या वर्णाच्या साहाय्याने लकुलीश[६०] शिवाच्या श्रेष्ठ पदाची प्राप्ती होते.

'म' हा वर्ण मायासागराच्या पार नेतो.

'प्र' हा वर्ण कायिक मळ धुवून टाकून परमेश्वराची प्रभा दाखवतो.
'भु' हा वर्ण भूतेश्वराचे दर्शन घडवतो. नितांत विश्वासाने व आनंदाने अल्लमप्रभु या मंत्राचा जप करा.[६१]

❀

5 Meditate upon the Mantra given to you by your spiritual teacher, in full devotion

श्रीगुरुमंत्रवन्नु तुंब प्रीतियिंद नेनेयुत्तिरु

श्रीगुरुमंत्रव रागदि जपिसलु ।
भोगसंपत्तु सुखवागुवदु ॥ १ ॥

माजद मंत्रद मोदलिनक्षरवनु ।
तेजसिनलि नित्य नडिसुवदु ॥ २ ॥

विडदेरडक्षर नडुविन शून्यदि ।
दृढविडिदात्मदि निलिसुवदु ॥ ३ ॥

वरिदे मूरक्षर निरुत सेविसलु ।
दुरित कोटिगळेल्ल नीगुववु ॥ ४ ॥

नी कलि सुम्मने नाल्कु अक्षरगळ ।
बेकेनिसुव वस्तु सिगुतिहुदु ॥ ५ ॥

शिशुनाळधीशन हेसरिनैदक्षर ।
विडदे जपिसलहुदेनिसुवदु ॥ ६ ॥

8

6 Why don't you utter the name of God, under all physical, mental and accidental conditions ?

एल्ल शारीरिक, मानसिक, आकस्मिक स्थितिगळल्लि परमात्मन नामवन्नु नेनेयबारदे ?

(राग–भूप; ताल– दीपचंदि)

मातु मातिगे शंकरा । श्रीगुरुवे ।
सर्वोत्तमेनबारदे ॥ प. ॥
ज्योतिसंगदि उरिदु होगुव कर्पुरदंते ।
पातक राशियु उरिदु होगुवदागि ॥ अ. प. ॥

पद ५

'आवडीं करितां हरिकीर्तन । हृदयीं प्रगटे श्रीजनार्दन'।

सद्‌गुरूंनी दिलेल्या नामाचा प्रेमाने जप केलातर विजय–वैभव–प्राप्ती होते ॥ १ ॥

शाश्वत अशा एकाक्षरी मंत्राचे (ॐ) ध्यान केले म्हणजे तेज:पुंज ॐ चे नित्य दर्शन होते ॥ २ ॥

मध्ये शून्य येणाऱ्या सांब किंवा शंभू अशा दोन अक्षरी मंत्राचा जप अखंड चालू दे, यामुळे स्वरूपी स्थिरता मिळेल ॥ ३ ॥

तीन अक्षरी मंत्राचे (शंकर) सतत स्मरण केलेतर पापाचे कोट्यवधी रांजण रिकामे होतील ॥ ४ ॥

चुपचाप चार अक्षरी मंत्राचा (सदाशिव) जप करीत राहा म्हणजे हवी असलेली सद्‌वस्तू तुला प्राप्त होईल ॥ ५ ॥

शिशुनाळधीशाच्या पंचाक्षरी नामाचे (नमः शिवाय किंवा ॐ नमः शिवा) निरंतर स्मरण केल्यास खात्रीने प्राप्तीचे पैलतीर गाठता येईल[६२] ॥ ६ ॥

ꕥ

पद ६

'प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये'।

शंकरा, श्रीगुरू अशी त्या सर्वोत्तमाची शब्दागणिक आठवण का बरे करू नये ?

ज्योतीबरोबर कापूर जळून जावा त्याप्रमाणे नामस्मरणाने पापांच्या राशी भस्मसात होतील.

स्नानमाडुवाग । नेमदि आत्मन ।
ध्यान माडुवाग ।।
जाणतनदि अन्न उंडु । अमृतवन्नु ।
पानव माडुव कालक्के मनवे ।। १ ।।

वेड्डवनेरुवाग । कालूरिदल्लि ।
थट्टने बीळुवाग ।।
चळिज्वर केम्मु उब्बस रोग बंदाग ।
मळे गाळि सिडिलिनार्भटदल्लि मनवे ।। २ ।।

विसजाक्षि नोडुवाग । कुळितु नित्य ।
ओसेदु माताडुवाग ।।
अष्टभोगदलि नित्य लोलुप्ति पडेयुवाग ।
नष्ट दारिद्र्यवु बंदागलु मनवे ।। ३ ।।

सुलियुव कळ्ळनु बंदाग । घोरारण्यदोळु ।
व्याघ्रवु हरियुवाग ।।
गुरुवे, गुरुवे, कल्पतरुवे पालिसु ! एंदु ।
गुरुमहालिंगन नेनेयल्लो मनवे ।।४।।

7 One must feel elation in the company of saints and reach union with the God-head

संतर संगदल्लि उत्साहितरागि परमात्मनल्लि बेरेयबेकु

(राग – शंकराभरण; ताल – दीपचंदि)

निन्न निजव नी नोडो ।
अनुमानिसव्याडो ।। प. ।।

हे मना, स्नान करत असशील किंवा नित्याप्रमाणे ध्यानाला बसला असशील, खात-पीत असशील, तरीसुद्धा नाम विसरू नको ॥ १ ॥

डोंगर चढशील किंवा पाऊल चुकून घसरून पडशील. थंडी-ताप, खोकला येईल किंवा श्वास लागेल, वारा-पाऊस येईल किंवा विजेचा कडकडाट होईल. तरीही मना, तू नामाला चिकटून राहा ॥ २ ॥

प्रिय पत्नीबरोबर सुखाने बोलत बसले असताना किंवा सर्व सुखोपभोग घेत असताना अथवा दारिद्र्याने गांजले असतानाही, रे मना, नामाची कास धर ॥ ३ ॥

लूट करणारा चोर येवो किंवा घोर अरण्यात वाघ फाडून खावो, कशाही अवस्थेत, हे गुरू, कल्पतरू, माझे रक्षण कर अशी, हे मना, तू गुरुमहालिंगाची प्रार्थना करीत राहा बरं[३] ॥ ४ ॥

पद ७

'संतसंगें अंतररंगें देवासन्निध सुखें डोलावें'।

बाबा रे, स्वस्वरूप पाहा आणि वावगा संशय सोडून दे.

तनु नेनप पोगि ।
घन सुखवागि ।।
जनन मरण भय नीगि ।
परब्रह्म तानागि ।। १ ।।

मरळि मरळि हुट्टि ।
मरविगे मै कोट्टि ।।
गरिगट्टि शरणरोळाडो ।
अनुभवके कूडो ।। २ ।।

ओडेय नीरलकेरि ।
नुडि पंचाक्षरि ।।
ओडेयन ओलिसि ओडगूडो ।
संसारक केडो ।। ३ ।।

देहभान विसरून आत्मानंद मिळव व जन्ममृत्यूचे भय सोडून परब्रह्म हो ॥ १ ॥

वरचेवर जन्ममृत्यूचे गोते खात आल्याने तुला तुझ्या मूळ स्वरूपाचा विसर पडला. आता तरी द्विगुणित उत्साहाने संतसंगात तुझे चित्त रमू दे. आत्मानुभवाची जोड करून घे ॥ २ ॥

नीरलकेरीच्या स्वामींचा पंचाक्षरी मंत्र जपत राहा, स्वामींचे प्रेम संपादन करून त्यांच्यात मिसळून जा. मग संसार राहील कोठे ? ॥ ३ ॥

13 The Name of God — Part 2

परमात्मन नाम — भाग २

1 A great horticultural metaphor on the name of God

देवर नामवन्नु कुरितु तोटगारिकेय महारूपक

(राग–विहाग; ताल–केरवा)

हरि नारायण । गुरु नारायण ।
हरि नारायण एनु मनवे ॥ प. ॥
नारायणनेंबो नामद बीजव ।
नारद वित्तिद धरेयोळगे ॥ अ. प. ॥

तरळ ध्रुवनिंदंकुरिसितु अदु ।
वर प्रह्लादनिं मोळक्यायितु ॥
धरुणिप रुक्मांगदनिंदे चिगुरितु ।
कुरुपितामहनिंद हूवायितु ॥ १ ॥

विजयन सतियिंद कायायितु अदु ।
गजराजनिंदे दोरे हण्णायितु ॥
श्रीशुकमुनियिंदे फलपक्ववायितु ।
अजामिळ तानुंडु रस सविदा ॥ २ ॥

कामित फलवीव नामवोंदिरलिक्के ।
होम नेम जप तपव्याके ॥
स्वामि श्रीपुरंदरविठलन पादव ।
एकोभावदि नेने मनवे ॥ ३ ॥

१३ नाममाहात्म्य – भाग २

पद १

'हरिनामवेली पावली विस्तार।
फळीं पुष्पीं भार वोल्हावली'।

रे मना, हरिनारायण, गुरुनारायण हा मंत्र तुइया जिभेवर नाचू दे.

नारायण या नामाचे बीज नारदाने जमिनीत पेरले.

ध्रुवबाळाच्या तपश्चर्येने त्याला अंकुर आला. भक्तश्रेष्ठ प्रह्लादाने त्याला मोड आणला. रुक्मांगद राजाच्या पुण्याईने त्याला कळ्या आल्या आणि भीष्मपितामहांच्या भक्तीने फुले फुलली ॥ १ ॥

सती द्रौपदीच्या निष्ठेने झाडाला फळे आली आणि गजेंद्राच्या आर्त भक्तीने फळांना पाड लागला. शुकमुनींच्या तपोबलाने फळे पिकून तयार झाली आणि अजामिळाने त्यांच्या रसाचे भोजन केले ॥ २ ॥

हवे ते फल देणारे नाम हातात असल्यावर होम-हवन, नेम-धर्म, जप-तप हवेत कशाला ? रे मना, स्वामी पुरंदरविठ्ठलाच्या चरणांचे अव्यभिचारी भक्तीने स्मरण कर ॥ ३ ॥

2 Divine name can not be had for nothing

परमात्मन दिव्य नामवु सुम्मने दोरेयलरियदु

(राग–आनंदभैरवि; ताल–त्रिपुट)

सुम्मने दोरकुवदेनो श्रीरामन दिव्यनामवु ।
जन्म जन्मांतरद दुष्कर्म होदवगल्लदे ॥ प. ॥

कंतुपितन दिव्य नाम अंतरंगदोळगिट्टु ।
चिंतेयेल्लु विट्टु निश्चिंतनादवगल्लदे ॥ १ ॥

भक्तिरसदल्लि तन्न चित्त परवशवागि ।
अच्युतन्न नामव बच्चिट्टुकोंडवगल्लदे ॥ २ ॥

कण्णिनोळगे इद्द मूरुति तन्नोळगे ता कंडु ।
धन्नपूर्ण पुरंदरविठलन कोंडाडदे ॥ ३ ॥

ಜ

3 Why should I care for you, oh God ? Thy name is powerful enough

अय्य ! निन्न नामवे तुंब प्रबलविरलु, एनगे निन्न परिवेयनु ?

(राग–काफि; ताल–त्रिताल)

नी याको निन्न हंग्याको । रंगा ।
निन्न नामद बलवोंदिद्दरे साको ॥ प. ॥

करि मकरिगे सिलुकि मोरेयिडुतिरुवाग ।
आदिमूलनेंब नामवे काय्तो ॥ १ ॥

प्रह्लादन पित बाधिसुतिरुवाग ।
नरहरियेंबो नामवे काय्तो ॥ २ ॥

बालेय सभेयल्लि सीरेय सेळेवाग ।
कृष्ण कृष्ण एंब नामवे काय्तो ॥ ३ ॥

पद २

' जन्मजन्मांतरीं असेल सामुग्री ।
तरिच नाम जिव्हाग्रीं येईल वाचे ' ।

श्रीरामाचे दिव्य नाम फुकट मिळते का ? अनंत जन्मांच्या पापांचे क्षालन झाले-तरच ते मिळणार.

मदनपित्या कृष्णाचे जे पवित्र नाम त्याची अंतरंगात प्राणप्रतिष्ठा करून व संसारचिंता धुळीला मिळवून जो निश्चिंत झाला आहे त्याच्याशिवाय कुणाला ते प्राप्त होईल ? ॥ १ ॥

भक्तिरसात पूर्ण बुडी देऊन अच्युताच्या नावाचे गुज हृदयात साठवून ठेवणाऱ्यालाच दिव्य नाम मिळते ॥ २ ॥

डोळ्यातल्या मूर्तीचे स्वतःच दर्शन घेऊन पुरंदर-विठ्ठलाचे गुणगान केल्या-शिवाय दिव्य नामाची प्रचिती कशी येईल ? ॥ ३ ॥

ꕥ

पद ३

' आम्हासी तों तुझें नामचि पाहिजे ।
मग भेटी सहजें देणें लागें ' ।

हे श्रीरंगा, तू हवा आहेस कुणाला, आणि तुझे उपकार तरी कशाला पाहिजेत ? तुझ्या नामाचे बळ असले म्हणजे बस्स झाले.

गजेंद्र मगराच्या तोंडात सापडल्यावर काकुळतीला येऊन ओरडू लागला तेव्हा तुझ्या आदिमूल या नामाने त्याला तारले ॥ १ ॥

प्रह्लादाच्या पित्याने त्याचा छळ मांडला तेव्हा नरहरी या नामाने त्याला अभय दिले ॥ २ ॥

राजसभेत द्रौपदीचा अपमान झाला तेव्हा कृष्ण कृष्ण या नामाने तिचे रक्षण केले ॥ ३ ॥

यमन दूतरु बंदु अजमिळनेळेवाग ।
नारायणनेंब नामवे काय्तो ॥ ४ ॥

आ मरा ई मरा ध्यानिसुतिरुवाग ।
राम राम एंब नामवे काय्तो ॥ ५ ॥

हसुळे आ ध्रुवराय अडविगे पोपाग ।
वासुदेवनेंब नामवे काय्तो ॥ ६ ॥

निन्न नामके सरि काणेनु जगदोळु ।
घन्न महिम सिरि पुरंदरविठल ॥ ७ ॥

ಜ

4 The storage of the ambrosia of God's name by the saints of yore

हिंदिन संतरिंद देवर नामसुधेय संग्रह

(राग–जंगला; ताल–केरवा)

एन सवि एन सवि हरिनाम ।
मनसु तृप्ति आगुदु प्रेम ई ॥
जनरिगे तिळियलिल्ल इदर वर्म ।
घन महिम सासिर विष्णुनाम ॥ प. ॥

नामद सवियुंड वाल्मीक ।
नामव स्मरिसिद नरहरि कनक ॥
प्रेमद हरिभक्त पुंडलीक ।
राम राम राम सार्व जनक ॥ १ ॥

आत्मन सवियनु नोडिदवरु ।
तुंबर नारद पुरंदरदासरु ॥
अंबरीष ऋषिगळु दुर्वासरु ।
तुंबिकोंडरु तावु व्यासरायरु ॥ २ ॥

यमदूत येऊन अजामिळाला खेचून नेऊ लागले तेव्हा नारायण हे नाम त्याच्या साहाय्याला आले ॥ ४ ॥

मरा मरा असा वाल्मीकीने जप चालवला असताना राम राम या नामानेच त्याचा उद्धार केला ॥ ५ ॥

ध्रुववाळ अरण्यात गेला असताना वासुदेव या नामानेच त्याला पार नेले ॥ ६ ॥

हे महामहिम अशा पुरंदरविठ्ठला, तुझ्या नामाची बरोबरी करेल असे या जगात काहीच दिसत नाही[६४] ॥ ७ ॥

❀

पद ४

'आगमीं नाम निगमीं नाम ।
पुराणीं नाम केशवाचें' ।

देवा, तुझे नाम अमृताहूनही गोड आहे. प्रेमाने त्याचा जप करीत राहिले म्हणजे मन तृप्त होते. विष्णूच्या सहस्र नामांत किती असामान्य सामर्थ्य आहे याचे वर्म मनुष्याला सापडलेच नाही.

नामसुधेचे वाल्मीकीने पान केले आणि नरहरी व कनकदास यांनी नामाचा ध्यास घेतला. प्रेमळ हरिभक्त पुंडलिक राम राम राम हा जप करा असा साऱ्या जगापुढे घोष करतो ॥ १ ॥

तुंबर, नारद, पुरंदरदास तसेच अंबरीष व दुर्वास हे ऋषी, या सर्वांनी आत्म्याची गोडी चाखली. व्यासरायांनी आपल्या मनात नामामृत साठवले ॥ २॥

हरि हरि हरिय स्मरणि माडवेकु ।
मूरु गुणगळळिदिरबेकु ॥
बिरुद सारुतिवे वेद नाल्कु ।
परम भक्त भीमदास सार्व जनके ॥ ३ ॥

ಜ

5 The name of God as a wish-fulfilling cow

देवर नामवु कामधेनु

करेयदले बंदिहुदु –
करेदुण्णल्लि – हरिनाम कामधेनुवनु ॥ प. ॥

नेनेवर होरेयलु अनुवागि बंदिरलु
मनुज मै मरेवरे नीनु ॥ १ ॥

मनवेंव करु विट्ठु घन भक्ति मुरुविट्ठु ।
तनुविन पात्रिलि नीनु ॥ २ ॥

करुण केच्चल तोरेदु भोर्गरेयलु ।
अरुव्हेंव कैंयिंद नीनु ॥ ३ ॥

गुरु महिपतिकंदगरुहिद निजानंद ।
सिरिसुख पडियलो नीनु ॥ ४ ॥

ಜ

6 The pseudo - saint and the real saint

डांभिक संतरू निजवाद संतरू

(राग–पुरिया धनाश्रि; ताल–दीपचंदि)

दासनेंदरे पुरंदरदासनय्य ॥ प. ॥
वासुदेव कृष्णन्न सूसि पूजिसुव ॥ अ. प. ॥

हरी हरी हरी असा जप करून त्रिगुणांची [६५] त्रेधातिरपिट उडवा. परमभक्त भीमदास जगापुढे डांगोरा पिटतो की चारी वेद नामावर स्तुतिसुमने उधळत असतात ॥ ३ ॥

पद ५

'अमृताची खाणी नाम तुझें'।

तुझ्या दाराशी हरिनामरूपी कामधेनू अनाहूतपणे येऊन उभी राहिली आहे. तू तिला ना आमंत्रण दिलेस, ना ती आल्यावर तिच्या दुधाने भूक शमवलीस.

तिची आठवण करणाऱ्यांचे रक्षण करण्यासाठी ती सिद्ध होऊन आली असतानासुद्धा, हे मनुजा, तू तिची दखल घेतली नाहीस ॥ १ ॥

तुझ्या देहरूपी घमेल्यात आर्तभक्तिरूप आंबोण घाल आणि मनाचे वासरू तिच्याकडे सोड ॥ २ ॥

कामधेनूला करुणारूपी पान्हा फुटला आणि ती झुरूमुरू झुरूमुरू दूध देऊ लागली की प्रज्ञेच्या हातांनी धार काढ ॥ ३ ॥

गुरू महिपतींनी आपल्या शिष्याला निजानंदाचे रहस्य सांगितले त्या परमानंदाचा वाटा मिळव ॥ ४ ॥

पद ६

'मानीं तो हरिदास। ज्या नामीं विश्वास'।

खरोखरचा देवभक्त कुणी असेल तर तो म्हणजे पुरंदरदासच.
भक्तिभरल्या अंतःकरणाने वासुदेव-कृष्णाची पूजा करणारा पुरंदरदासच खरा दास.

ग्रासकिल्लदे पोगि परर मनेगळ पोक्कु ।
दासनेंदु तुलसिमाले धरिसि ॥
व्यासरिल्लदे अवर काडि बेडि बळलिसुत ।
कासु गळिसुव पुरुष हरिदासने ॥ १ ॥

डंभिकदि हरिस्मरणेय माडि जनर मुंदे ।
संभ्रमदि तानुंव ऊट बयसि ॥
अंबुजोद्भव पितन आगमगळरियदे ।
तंबूरि मीटुवव हरिदासने ॥ २ ॥

यायवारव माडि विप्ररिगे मृष्टान्न ।
प्रीयदले तानोंदु कोडद लोभि ॥
माय संसारदलि ममते हेच्चागिट्टु ।
गायनव माडुवव हरिदासने ॥ ३ ॥

पाठकन तेरनंते पदगळनु ता बोगळि ।
कूट जनर मनव संतोषपडिसि ॥
गूटनामवनिट्टु कोट्टरिये तानेनुत ।
तोटकव माडिदव हरिदासने ॥ ४ ॥

नीतियेल्लवनरितु निगमवेद्यन नित्य ।
वातसुतनल्लिहन वर्णिसुतलि ॥
गीतनर्तनदिंद कृष्णन्न पूजिसुव ।
पूतात्म पुरंदरदासनिवनय्य ॥ ५ ॥

अन्नाच्या एका घासासाठी लोकांच्या दाराशी गेले, गळ्यात तुळशीमाळा मिरवून मी भक्त आहे असे लोकांना भासवले, त्यांच्यापुढे हात पसरला, त्यांना छळले आणि एकसारखी कटकट करून पैसे उकळले तर अशा माणसाला हरिदास म्हणावे का ? ॥१॥

नामस्मरण करतो आहोत असे जगाला भासवून दांभिकपणाने आत मात्र हव्या त्या पदार्थासाठी मिटक्या मारत बसणारा, कमलसंभव ब्रह्म्याच्या पित्याचे (विष्णूचे) भक्तिशास्त्र जाणून न घेता तंबोऱ्यावर नुसती बोटे घासणारा मनुष्य का कुठे हरिदास होतो ? ॥२॥

घरोघरी हिंडून जो शिधा जमा करतो परंतु त्यातला एक दाणाही कुणाच्या हातावर ठेवत नाही, या नश्वर संसारात बुडलेला असतो आणि कोरड्या ताना मात्र मारतो, तो मनुष्य काय हरिदास या पदवीला पोचेल ? ॥३॥

भाटाप्रमाणे गाणी घोकून जो जमलेल्या लोकांची मने रिझवतो आणि खुंटी-एवढा उभा टिळा लावून, लोकांनी दिलेल्याचे स्मरण न ठेवता नुसता तंटाबखेडा माजवतो तो कसचा हरिदास ? ॥४॥

उलट जो नीतीचे मर्म जाणतो आणि मारुतीच्या हृदयात वास करणाऱ्या वेदवेद्य कृष्णाची गीतनर्तनाने उपासना करतो तो पूतात्मा पुरंदरदासच खराखुरा हरिदास आहे ॥५॥

7 God has no relish for songs, not inspired by devotional love

भक्ति भावविल्लद गानवु परमात्मनिगे रुचिसदु

(राग–भैरवि; ताल–दीपचंदि)

केळनो हरि ताळनो ॥ प. ॥
ताळमेळगळिद्दु प्रेमविल्लद गान ॥ अ. प. ॥

तंबूरि मोदलाद अखिल वाद्यगळिद्दु ।
कोंबु कोळलु ध्वनि स्वरगळिद्दु ॥
तुंबर नारदर गान केळुव हरि ।
नंबलार ई डंभिकर कूगाट ॥१॥

नाना वर्गेय राग भाव तिळिद्दु स्वर ।
ज्ञान मनोधर्म जातिविद्दु ॥
दानवारिय दिव्य नामरहितवाद ।
हीन संगीत साहित्यक्के मनवित्तु ॥२॥

अडिगडिगानंदबाष्प पुळकदिंद ।
नुडि नुडिगे श्रीहरि एन्नुत ॥
दृढ भक्तरनु कूडि हरिकीर्तने माडि ।
कडेगे पुरंदरविठलनंदरे केळुव ॥३॥

पद ७

'प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं।
तंव कैसा श्रीहरि करील कृपा'।

भले लयताल असतील, गायकांचा मेळा जमलेला असेल, पण प्रेमरस नाही असे गाणे परमात्म्याच्या कानावर जात नाही व ते त्याला सहन होत नाही.

तंबोरे आदिकरून अखिल वाद्यवृंद[६६] जमवून व बासरी, शिंग यांचा ध्वनी काढून दांभिक लोक जो कलकलाट करतात त्याला हरी कसा विचारेल ? त्याच्या कानात नारद-तुंबरांचे स्वर्गीय स्वर घोळत असतात ।।१।।

ढीगभर रागांचे ज्ञान आहे, भावांचे (मनातील भावनांच्या चढउताराचे) ज्ञान आहे, स्वरांचेही ज्ञान आहे एवढेच नव्हे तर राग आळवण्याची रीत माहीत आहे आणि तालाचे सर्व प्रकार माहीत आहेत, पण परमात्म्याचे दिव्य नाम ज्यात नाही अशा काव्याचे गायन केलेतर त्या निकृष्ट साहित्यात देवाचे मन लागत नाही ।।२।।

पावलोपावली आनंद, अश्रू, रोमांच असे सात्त्विक भाव जागे होत आहेत, शब्दाशब्दाला हरी हरी अशा नामाच्या ऊर्मी उसळत आहेत, संतसंगतीत हरि-कीर्तनाचा थाट चालू आहे अशा वेळी अखेरीस जो पुरंदरविठ्ठलाचा नामघोष होतो तोच हरी ऐकतो ।।३।।

14 The Methodology of Meditation

ध्यानपद्धति

1 Place the three-petalled Bilva-patra upon the feet of the lord

मूरु दळद बिल्वपत्रियन्नु परमात्मनिगे एरिसिरि

(राग – पुरिया धनाश्रि; ताल – दीपचंदि)

बिल्वपत्रिय धरिसवेकण्णा । अण्णय्य केळो ।।प.।।
बिल्वपत्रिय धरिसवेको । मल्लिकार्जुन पूजेगिन्नु ।
सोल्लिनल्लि इरुव शिवन । मेल्लनागि नोडवेकु ।। अ. प. ।।

मूरु दळद बिल्वपत्रियु । अदनेरि नोडलु ।
सारि शिवन वेळकु तोरुवदु ।।
वारिजोद्भव तानु आगि । घोर पातक दूर माडि ।
भोरनेंबुव नाददल्लि । धीरनागि निल्लुबेकु ।।१।।

मत्ते सासिर दळद कमलवनु अदन्हत्ति नोडलु ।
सुत्तु मुत्तले वेळकु तोरुवदु ।।
सत्चित्तानंदनागि । कर्तुवन्नु नेनिसिकोंडु ।
मर्त्यदोळु चलिसुवंथा । नित्य निर्मलनागवेकु ।।२।।

धरेय भोगव बयसवेडण्णा । नी मरेयदन्ते ।
गुरुविनंद्रिय भजिसवेकण्णा ।।
उरगगिरिय निलयनाद । हरन पार्वतिरमणनिंदु ।
चरणसेवेयन्नु माडि । करुणवन्नु पडेयबेकु ।।३।।

१४ ध्यानपद्धती

पद १

त्रिदल बिल्वपत्र परमात्म्याला वाहा

ऐक बाबा, बिल्वपत्र केव्हाही तयार असू दे.

मल्लिकार्जुनाच्या पूजेसाठी ते सिद्ध ठेव, नामामध्ये ओतप्रोत भरलेल्या शिवाकडे सावधानतेने सतत लक्ष ठेव.

बिल्वपत्राला तीन दळे आहेत. नासाग्रावर दृष्टी स्थिर केलीतर सर्वत्र पसरलेल्या परमेश्वराच्या प्रकाशाचा अनुभव येईल. स्वत:च ब्रह्म होऊन, घोर पापाचे क्षालन करून, घनघोर नादात तल्लीन होऊन राहा ॥१॥

तदनंतर सहस्रदल कमलापर्यंत पोचल्यावर अवतीभोवती तेजच तेज दिसेल. सच्चिदानंदस्वरूप होऊन कर्त्या परमेश्वराची जाण ठेव. जगातले व्यवहार चालू असताना चित्त सदोदित निर्मळ ठेव ॥२॥

इहलोकातील भोगांची लालसा धरू नको. न चुकता गुरुचरणांचे ध्यान कर. उरगगिरिवासी पार्वतीरमण शिवाची पादसेवन भक्ती करून त्याचा अनुग्रह मिळव ॥३॥

2 A fine continued allegory on the practice of shooting at the target of Brahman

ब्रह्मन गुरियन्नु होडेयुव अभ्यासवन्नु कुरितु अंदवाद सांग रूपक

(राग–सारंग; ताल–केरवा)

गुरिया ओगेदेनो ब्रह्मके ।
गुरिया ओगेदेनो ॥ प. ॥
सर्व कालदलि शरीरव मरेतु ।
स्मरणि गुरु नरसिंहन आगि ॥ अ. प. ॥

माताडु मुच्चळव विगिदु ।
भूतपंचक तुवाकिलि ॥
ख्यातिय भक्ति ज्ञान वैराग्य ।
जाति मद्दु मूरु बेरळले होय्दु ॥१॥

इडा पिंगळ गुंडिलि हाकि ।
रूढिगे एनिसुव गजवनु जडिदु ॥
गाढानुग्रह रंजक सुरिदु ।
हूडि वीरासन ओळितागि कुळितु ॥२॥

गुरुकरुणेंबुव जावगि ओत्ति ।
एरडू दृष्टि ओंदे माडि ॥
ऊर्ध्व मुजरियनु नेट्टगे निलिसि ।
इरुव नासिकद कोनेयलि मुळुगि ॥३॥

घन रंजक ई तनुव मुच्चदलि ।
तनु तुवाकिय तुगाडगोडदे ॥
मन मिसुकदे मत्तोंदु नेनेयदे ।
विनयदि नित्य एच्चरदिंद ॥४॥

पद २

'ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते'।

ब्रह्माला लक्ष्य करून त्याचा वेध घेतला. मी ब्रह्माचा वेध घेतला.

देहभान हरवून निरंतर गुरुनरसिंहाचे स्मरण केले.

ओठ घट्ट मिटून पंचमहाभूतात्मक शरीराच्या बंदुकीत भक्ति-ज्ञान-वैराग्य या तीन बोटांनी अस्सल दारू ठासली ॥१॥

इडा पिंगळा या नळ्यात ही दारू घालून, चाप ओढून त्यावर जोराचा प्रहार करून सुषुम्नेतून प्राण वर ढकलला. वीरासन सिद्ध करून सद्गुरुकृपारूपी दारू (नाममंत्र) शरीररूपी बंदुकीत भरली ॥२॥

दृष्टी एकवटली व ती नासाग्री स्थिर केली (शरीर-मन-दृष्टी बंदूक उडवण्यात एकाग्र केली) व गुरुकृपारूपी चाप ओढला ॥३॥

दारू शरीररूपी बंदुकीत भरल्यावर (नाममंत्र हृदयात जपल्यावर) शरीर यत्किंचितही न हलवता, मन चंचल होऊ न देता, इतर कसलीही आठवण न ठेवता, विनयाने, अत्यंत सावधगिरीने ब्रह्मावर नेम धरला ॥४॥

वेदरि ओडलु अष्ट मदगजगळु तावु ।
उदुरि बीळलु अरिषड्वर्गद तलि ॥
साधु ज्ञानिगळु हौदु हौदु एन्नलु '
सच्चिदानंद नरसिंहनु आगि ॥५॥

ಜ

3 The saint is a fearless snake-charmer who charms the inverted serpent of sense into the basket of devotion

संतनु हेडेयन्नु मेलक्कैत्तिद विषयसर्पवन्नु मंत्रिसि
भक्तिय बुट्टियल्लिरिसुव धीर गोल्लनु

(राग – पुरिया धनाश्रि; ताल – दीपचंदि)

गोल्लरो नावु गोल्लरो ॥ प. ॥
ई घटवेंब हुत्तिनोळु । दिटवागि हाव हिडिदु ।
कटवायियोळगिन कडिहल्लु मुरिवंथ ॥ अ. प. ॥

नडु नाडिगे हेडे इट्टिहुदु ।
सर्पद बाला कडिचक्र मुट्टिहुदु ॥
ओडेय श्री गुरुमंत्र । अडिगडिगे जपिसुत्त ।
कडिदीतेंबुव अंजिके इल्लदे हिडियुवंथ ॥ १ ॥

हेडेय मेलक्कैगिसि ।
म्यागिन बाला केळभागक्किळिसि ॥
ओळगिरुव त्रिकोण गळिगियोळगे पोक्कु ।
कळेनाद सर्पद फणिरत्न पडेदंथ ॥ २ ॥

सद्भावबेंबो बुट्टियलि ।
ई हाव हिडिदु ओळगे हाकिदेबिल्लि ॥
देवदेवरिगेल्ल देवशिखामणि ।
देव बलभीमन मूलव तिळिदंथ ॥ ३ ॥

ಜ

अष्टमदरूपी[६५] हत्तींनी पळ काढला. षड्रिपूंची[६६] डोकी छिन्नभिन्न होऊन खाली पडली, साधुसंत शाबास शाबास म्हणाले. नरसिंह प्रत्यक्ष सच्चिदानंदच झाले[६७] ॥५॥

पद ३

'गारुडी गुरु हा समजा अंतःकरणीं'।

आम्ही गारुडी आहोत हो गारुडी.

धारिष्ट करून शरीररूपी वारुळामधला साप आम्ही खचितच धरतो व त्याचा विषारी दात उपटतो.

त्याचा फणा सुषुम्नेत शिरला असून शेपटी शेवटच्या चक्रापर्यंत पोचली आहे. पावलापावलाला सद्गुरूंनी दिलेले नाम आम्ही जपतो आणि साप चावेल याची तमा न बाळगता त्याला पकडतो ॥ १ ॥

आम्ही त्याच्या फण्याची दिशा बदलून फणा वर वळवतो व वर असलेली शेपटी खाली आणतो. त्रिकोणी मणक्यातील पदरापदरांत शिरून, सापाच्या फण्यावरील तेज-नादरूपी मणी मिळवतो (कुंडलिनी वर जाऊ लागली की तेज-नादाचे अनुभव येतात) ॥ २ ॥

सापाला पकडून त्याला सद्भावरूपी टोपलीत घालतो आणि देवदेवाधिपती बलभीमाचे अधिष्ठान समजून घेतो ॥ ३ ॥

4 An epitome of mystical experience

पारमार्थिक अनुभवद संक्षिप्त रूप

(राग – अलैया बलावलि; ताल – दीपचंदि)

कण्णिनोळगे नोडो हरिय ॥ प. ॥
ओळगण्णिनोळगे नोडो मूजगदोडेयन ॥ अ. प. ॥

आधार मोदलाद आरु । चक्र ।
शोधिसि, विडवेकु ईषण मूरु ॥
साधिसि सुषुम्ना एरु । अल्लि ।
भेदिसि नी परब्रह्मन सेरु ॥ १ ॥

एवे हाकदे मेले नोडि । बेग ।
पवनदिंदलि वायु बंधनव माडि ॥
सविदु नादव पान माडि । अल्लि ।
नवविध भक्तिलि नलिनलिदाडि ॥ २ ॥

अंडजदोळाडुताने । भानु– ।
मंडलदोळु नारायणनेंबवने ॥
कुंडलि तुदियोळिद्दाने । श्री पु– ।
रंदरविठल पालिसुताने ॥ ३ ॥

5 Visualise Shrigiri inside yourself

श्रीगिरियन्नु अंतरंगदल्लि काणवेकु

(राग – आनंदभैरवि; ताल – दीपचंदि)

श्रीगिरिय सुक्षेत्रकिंदु ।
होगि यात्रेय माडि बंदे ॥ प. ॥
श्रीगिरियु शरीरदोळगुंदु । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
योगिजनर मर्म बेरुंदु ॥ अ. प. ॥

पद ४

'नवद्वारांतें भेदुनी । दशमद्वारीं गेली जनी'।

आपल्या डोळ्यांमध्येच परमात्म्याचे दर्शन घे.

त्रिभुवनाच्या सम्राटाला ज्ञानदृष्टीने पाहा.

मूलाधारादी सहा चक्रांचा भेद कर. तिन्ही इच्छांचा[२२] त्याग कर. सुषुम्नेतून वर चढून परब्रह्मात प्रवेश कर ॥ १ ॥

डोळ्याचे पातेसुद्धा लवू देऊ नये. ऊर्ध्वदृष्टी करावी आणि श्वास, उच्छ्वास थांबवून त्वरित कुंभक साधावा. अनाहत नाद ऐकावा. नवविधा भक्तीत नाचत-डोलत राहावे ॥ २॥

नारायण सूर्यमंडलामध्ये आणि ब्रह्मांडात लीला करत असतो. सहस्रदल कमलात स्थिर असणारा पुरंदरविठ्ठलच आपला रक्षणकर्ता आहे ॥ ३ ॥

ଌ

पद ५

'माझ्या शरीरीं ज्योतिर्लिंग उगवलें ।
अगाध कवळिलें हस्तेंवीण'॥

आजच मी श्रीगिरिक्षेत्राला जाऊन तीर्थयात्रा करून आलो.

ॐ श्री गुरुसिद्धा, श्रीगिरी वास्तविक आपल्या देहातच आहे. योगिजनांचे मर्म काही औरच आहे (म्हणून या यात्रेला वेळ आणि श्रम लागत नाहीत).

आरु वेट्टव दाटि नडेदु ।
मूरु कोळ्ळद मूलक्किळिदु ॥
एरिदेनो कैलास द्वारव । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
सारि बडगल गुडिय कंडेनु ॥ १ ॥

एळु सुत्तिन कोटेयोळगे ।
नीळदुप्परिगेगळ नडुवे ॥
ताळ मद्दले गंटे भेरिगळु । ॐ श्री गुरुसिद्धा ।
वेळे वेळेगे तावे नुडियुवबो ॥ २ ॥

ओंबत्तु बागिलगळदरो– ।
ळिंबाद बीदिगळु नाल्कु ॥
तुंवि सूसुव कोळगळेळुंटु । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
स्तंभवेरडु शिखरबोंदुंटु ॥ ३ ॥

पाताळगंगेयोळु मिंदु ।
ओतु शिखरेश्वरनिगेरि ॥
ज्योतिर्लिंगके दृष्टियनिट्टिहेनो । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
ज्योतिर्लिंगवु करदि काणिसितो ॥ ४ ॥

वरुव कोणगळेंट बडिदे ।
हिरिय हुलिगळनार तडेदे ॥
मेरेव सर्पद हेडेय मेट्टिदेनो । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
चरिप कपियनु हिडिदु कट्टिदेनो ॥ ५ ॥

सप्तनदिय संगम दाटि ।
गुप्त कदळिय वनदोळु सुळिद– ॥
लिप्त गुहेयोळगोब्बने पोक्किदेनो । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
सप्त वर्णद लिंगव कंडिहेनो ॥ ६ ॥

सहा डोंगर (षड्विकार)[७१] ओलांडून, तीन दऱ्या (त्रिगुण)[७२] उतरून, ॐ गुरुसिद्धा, मी कैलासद्वारापर्यंत चढून गेलो; व पुढे जाऊन उत्तर दिशेला एक मंदिर पाहिले ॥ १ ॥

सात बुरुज (मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा, द्विदल ही कमले) असलेल्या किल्ल्यात उंच वालेकिल्ला (सहस्रार कमल) असून त्यात वेळोवेळी टाळ, मृदंग, घंटा, भेरी यांचे आपोआप आवाज होत आहेत ॥२॥

किल्ल्याला नवद्वारे[७३] आहेत. त्यांच्या आत चार विस्तृत रस्ते आहेत (राजयोग, भक्तियोग, कर्मयोग आणि ज्ञानयोग. ह्या कडव्यात शरीराचे वर्णन आहे म्हणून चार रस्ते म्हणजे शृंगाटक म्हणता येईल). उसळून वाहणारी सात सरोवरे आहेत. दोन स्तंभ (इडा, पिंगला) व एक शिखर (सहस्रार कमल) आहे ॥३॥

पाताळगंगेत स्नान करून (कुंडलिनी नाभिकमलापर्यंत पोचल्यावर) मोठ्या भक्तीने मी शिखरेश्वरापर्यंत (सहस्रार कमलापर्यंत) चढलो व ज्योतिर्लिंगावर दृष्टी टाकली, तर ज्योतिर्लिंग तळहातावर दिसले ॥ ४ ॥

आड येणाऱ्या आठ रेड्यांना (अष्टमदांना) मारले. सहा भल्या मोठ्या वाघांना (पाच बाह्य इंद्रियांना व अंतःकरणाला) रोखले. शोभिवंत[७४] अशा सापाच्या फण्यावर (वासनेवर) मी पाया दिला. चंचल माकडाला (मनाला) बांधून टाकले ॥ ५ ॥

सात नद्यांचा संगम (सप्तव्यसने) ओलांडून गुप्त कदलीवनात हिंडून, तिथे असलेल्या गुहेत मी एकट्याने प्रवेश केला. सात वर्णांचे लिंग मी पाहिले ॥ ६॥

इंद्रदिक्किनोळेद्द सूर्य– ।
चंद्र गुप्तद पुरदोळु मुळुगि ॥
चंद चंदद बेळकु तोरुवदु । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
निंदु नोडलु बयलिगे बयलायितो ॥ ७ ॥

गिरिशिखरकग्नि मुखदो– ।
ळिरुव अर्केश्वरन हिंदे ॥
सुरियुवमृत पंचधारेयु । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
अरितु सेविसे मरणविल्लवो ॥ ८ ॥

इंतु श्रीशैलद घनव ।
भ्रान्तियळिदु तिरुगि नोडि ॥
अंतरंगद गुडिय होक्कैनो । ॐ श्रीगुरुसिद्धा ।
शान्तमल्ल ताने तानादनो ॥ ९ ॥

ಜ

6 The phenomenal, the mystical and the philosophic Lingas

प्राकृतिक, पारमार्थिक हागु तात्त्विक लिंगगळु

अ. इष्टलिंग

(राग – कांबोदि; ताल – दीपचंदि)

परतर शिवलिंगवेळसि निनगागि ।
करकंजदोळु काणिसितु योगि यजिसु ॥प.॥

मोदल पीठवे बिंदुवागि मेले निंदे – ।
सेद पीठवदु नादवागि गोमुखवे ॥
सदमल कळेयागि सकलातीतवे लिं – ।
गद निजवागिरलदरोळुज्वलिप ॥ १ ॥

पूर्वमार्गाने कुंडलिनीचे उत्थापन होऊन सूर्य चंद्र (पिंगळा इडा) नाड्या एकवटल्यावर नयनमनोहर प्रकाश दिसला. तिथे उभे राहून पाहिल्यावर निर्गुण-निराकार ब्रह्माचा अनुभव आला ॥ ७ ॥

गिरिशिखरावर अग्निचक्राच्या ठिकाणी (भृकुटिमध्यावर) अर्केश्वराच्या मागे पाच अमृतधारा स्रवत असतात (पाच तऱ्हेचे अतींद्रिय अनुभव येतात). ज्ञानावस्थेत या अमृताचे सेवन करणाऱ्याला मरणच नाही ॥ ८ ॥

असे श्रीगिरीचे माहात्म्य समजून, मायारहित झालो व पाठमोरे वळून (अंतर्मुख होऊन) अंतरंगाच्या मंदिरात शिरलो. हे गुरुसिद्धा, शांतमल्ल स्वस्वरूपात लीन झाले ॥ ९ ॥

ꕥ

पद ६

इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग

अ. इष्टलिंग[७६] (स्थूललिंग)

परात्पर शिवालिंग आपणहून तुझ्या करस्थलावर दिसले. त्याची, हे योगिराजा, तू पूजा कर.

मूळपीठ (शाळुंखा) हाच बिंदू; त्यावरील सुंदर पीठ (पिंडी) हाच नाद; गोमुख म्हणजेच सतत निर्मल राहणारी कला (तेज), हेच सकलातीत लिंगाचे निजस्वरूप आहे. त्यात इष्टलिंग प्रज्वलित होत आहे ॥ १ ॥

तरु विस्तारवनोळकोंडिर्द वीजद ।
परियंतरारय्वगळिगिंबुवडेद ॥
परवोम्मदाश्रयवागिह निजशक्ति – ।
वेरसि तनगे तानाधारवागिर्प ॥ २ ॥

मूरु मंडलवनुच्चळिसि गुणवर्ण ।
मूरनु मीरि बोधमात्रवागि ॥
तोरुव गुरु शंभुलिंगवदु ताने ।
वेरेनिसदे निन्न कण्ण मुंदिद्दुदु ॥ ३ ॥

आ. प्राणलिंग

(राग – सोहनि; ताल – दीपचंदि)

प्राणलिंगविदनु गुरुवि– । नाणतियोळु केळि नोडि ।
माणदेकचित्तदिंदे जानिपने कृतार्थनु ॥ प. ॥

असुवे रवियपानमिंदु– । वेनिपुदवरोळगलदोंदि ।
मिसुप श्रांत सांतमाद शैवशक्तिबीजद ॥
बेसुगेयाद ताणदेकवर्णदखिळवृत्तिमयद ।
पेसरु तळेदु श्रवणविषयमाद परमनादवे ॥ १ ॥

मूल लिंग नाभि हृदय कंठ कूर्च गोत्र मोत्त ।
जालदंबुजाक्षरादि दैव मंत्र शक्तिय ॥
मेळदोडने कंपु मिंचु रन्न चिन्न सोडरु चंच– ।
लालताग्नि दीप्ति रूपदोर्प दिव्य बिंदुवे ॥ २ ॥

पलवु विवरवान्त कुंभदोळगणचल दीपदोंदु ।
वेळगु मसगुवंते देहकरण निकर मुखदोळु ॥
पोळेदु विश्वदृश्य वीथिगळनु वेरे वेरे तोर्के – ।
गोळिप चारु चित्कल प्रपूर्ण शंभुलिंगवे ॥ ३ ॥

संपूर्ण वृक्षाचा प्रपंच (मूळ, खोड, फांद्या, पाने, फुले व फळे असे सहा भाग) आपल्यामध्ये साठवणाऱ्या बीजाप्रमाणे हे इष्टलिंग षट्स्थलांचे (भक्त, महेश्वर, प्रसादी, प्राणलिंगी, शरण व ऐक्य) आश्रयस्थान आहे. हे लिंग परब्रह्माच्या अभिव्यक्तीचा आधार किंवा साधन असलेल्या शक्तीने युक्त असून ते स्वतःच स्वतःचा आधार आहे ॥ २ ॥

सद्गुरू शंभुलिंगापासून जे भिन्न नाही, जे तीन मंडलांना (सूर्य, चंद्र, अग्नी यांना) ओलांडून जाते, जे त्रिगुणातीत[७७] आहे, जे बोधमात्र (अ, उ, म या मात्रांच्या पलीकडील) आहे, ते इष्टलिंग तुझ्या डोळ्यांसमोर आहे ॥ ३ ॥

आ. प्राणलिंग (सूक्ष्मलिंग)[७८]

सद्गुरूंच्या उपदेशाने प्राणलिंग जाणून व त्याचे दर्शन घेऊन, एकाग्र चित्ताने जो अखंड ध्यान करतो तोच कृतार्थ आहे.

प्राण हीच रविनाडी व अपान हीच शशीनाडी; या दोन्ही एकवटल्यावर नाद झळकू लागतो. निष्पंदभाव अवतरतो. हे सर्वांचे अखेरचे स्थान किंवा नादब्रह्म आहे. शिवाशी ऐक्य (परमात्मा – कुंडलिनी, शिव–शक्ती किंवा पुरुष– प्रकृतीचे ऐक्य) पावणारा, एकवर्णाचा, प्रणवाकार झालेला, श्रवणाचा विषय असणारा अनाहतनाद हेच प्राणलिंग ॥ १ ॥

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपुर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा ह्या सहा चक्रांच्या मार्गाने कुंडलिनी सहस्रदल कमलापर्यंत जाऊन, पन्नास अक्षरे, ब्रह्मादिदेवता, मंत्र व शक्ती यांच्याशी एकरूप झाल्यावर दिव्यबिंदू प्रकट होतो. रक्तवर्ण, लखलखणारी वीज, रत्नकलिका, सोने, दीपज्योती, प्रकाशाची थरथरणारी ज्वाला अशा विविध तऱ्हांनी प्रकट होणारा दिव्यबिंदूच प्राणलिंग आहे ॥ २ ॥

नाना छिद्रे असलेल्या कुंभात एकच दीप ठेवला असलातरी छिद्रातून बाहेर आलेले प्रकाशाचे किरण ज्याप्रमाणे अनेकविध दिसतात त्याप्रमाणे देहेंद्रियांच्या द्वारे प्रकट होणारी आत्मज्योती नानाविध प्रपंचाचे रूप घेते. ती सौंदर्यशाली चित्कलापूर्ण ज्योत शंभुलिंगच आहे ॥ ३ ॥

इ. भावलिंग

(राग – मालकंस; ताल – दीपचंदि)

भावलिंगवनु विडदे नीनु । परि – ।
भाविसु भेदविल्लदे योगि ॥ प. ॥

गुरुमंत्र शक्तियिंदुदिसदे । योग ।
करण मथनदोळुज्वलिसदे ॥
कर हृदयद हवणेनिसदे । नित्य ।
परिपूर्णानंदवच्चळियदे ॥ १ ॥

दीपवु दीपद किरणव । ताने ।
व्यापिसि तोरुव प्रभेयन्ते ॥
रूपिसि वेळगुविष्ट प्राण– । लिंगा – ।
रोपविल्लद निरुपाधिय ॥ २ ॥

सुकरदर्चने ध्यानवेसगलु । तोर्प ।
सकलासकल निष्कळंगळ ॥
निकर विषय विकल्पने गूड – । दोप्पु – ।
वकलंक नित्य निर्मलवाद ॥ ३ ॥

पोरगोळगण नेत्रमानस– । दिंदे ।
कुरुहु ओडेदु वर्ण वगेयागि ॥
बरि बळिकेयोळोंददविरळ । दीप्ति ।
करिगोंडु विकृतियोंदिल्लद ॥ ४ ॥

स्थूल तत्त्वात्मक जीवन । वृत्ति ।
जालवंटद सूक्ष्मांतरदोळु ॥
मेळविसद सदमळपर– । मानु– ।
कूलदिंदखिळ साक्षिकमाद ॥ ५ ॥

इ. भावलिंग

हे योगिराजा, भावलिंगाचे अनुसंधान ठेवून, भेदभाव विसरून, तू त्याचे पूर्ण ज्ञान प्राप्त कर.

भावलिंग उत्पन्न होण्यास गुरुमंत्राची आवश्यकता नाही किंवा ते प्रज्वलित होण्यास योग-प्रक्रियांच्या मागे लागण्याचे कारण नाही. नित्य व अविनाशी आनंदाचे रूप घेतलेले भावलिंग हाताच्या (इष्टलिंगाच्या) व हृदयाच्या (प्राणलिंगाच्या) आवाक्याबाहेरचे आहे ॥ १ ॥

ज्योतीने तेजाला स्वत:च व्यापून आपली दीप्ती प्रकट करावी, त्याप्रमाणे अरूप असे भावलिंग रूप घेऊन झगमगते. त्याच्यावर इष्टलिंग किंवा प्राणलिंग यांचा आरोप करता येत नाही (ते वर्णन लागू पडत नाही) कारण ते उपाधि-रहित आहे ॥ २ ॥

सद्भावाने व आनंदाने ध्यान केले तर त्याचे दर्शन होते. हे भावलिंग सगुणही नाही, निर्गुणही नाही. ते निष्कल (भागरहित) आहे. कोणत्याही वैषयिक कल्पनेचा त्याला स्पर्श होत नाही. अकलंक व नित्यनिर्मल असे भावलिंग कांतिमय आहे ॥ ३ ॥

बाह्यचक्षूंपुढे व अंतश्चक्षूंपुढे वस्तूचा स्फोट झाला (वस्तू अवतरली). रंगी-बेरंगी तेज फाकले. व्यवहाराच्या चौकटीत न बसणाऱ्या अविकारी भावलिंगाची प्रभा दाटली. तिला काजळीचा स्पर्श नव्हता ॥ ४ ॥

पाच महाभूतांच्या मायाजाळात अडकलेल्या जीवात्म्याच्या व्यापारांशी भाव-लिंगाचा संबंध नाही. आंतरिक सूक्ष्म वासना-विकारांशी ते हातमिळवणी करत नाही. ते सदोदित निर्मल राहते. परतत्त्वाशी एकरूप असल्याने ते सर्वसाक्षी आहे ॥ ५ ॥

नोटद समरति कूटद । मेले ।
मीटेनिसुव परवशनंते ॥
नाटिसुतिह रूप रुचिगळ । मीरि ।
साटिदोरद तृप्तिमयवाद ॥ ६ ॥

तरुमूल शाखेयनोळकोंड । वीज– ।
दिरविनंददोळु पडच्वद ॥
नेरविगे परम कारणवागि । कार्य– ।
कारण कर्मद तोर्के ओडेयद ॥ ७ ॥

मंदराचलद चलने निंद । सदा ।
सिंधुविनंते बुद्धिवृत्ति– ।
योंदिल्लदिह कालदोळु नित्य । बोधा– ।
नंदमुद्रेयोडेयदिर्प ॥ ८ ॥

तनुकर्मवनु वायुजयवनु । हार– ।
दनुभव मात्रदोळपरोक्ष– ।
वेनिसुव गुरु शंभुलिंगद । निज– ।
दनुविन चिन्मात्रवेनिसुव ॥ ९ ॥

परतत्त्वाच्या दर्शनाचा आनंद रतिसुखाच्या पैलपार जातो. या आनंदाने देह-भावाच्या जागी शिवभाव येतो. मनाला खिळवून ठेवणाऱ्या रूप-रुचीच्या पलीकडे जाणारी, अतुलनीय अशी तृप्ती म्हणजे भावलिंग ॥ ६ ॥

बीज जसे वृक्ष, मुळे, फांद्या या सर्वांना पोटात सामावून घेते त्याप्रमाणे भाव-लिंग हे षट्स्थलांचे अधिष्ठान (आदिकारण किंवा परमकारण) आहे. तिथे कार्य, कारण, कर्म अशा दृश्य व्यवहाराला थारा नाही ॥ ७ ॥

मंदराचलाने होणारे समुद्राचे मंथन थांबल्यावर समुद्राची खळबळ थांबते, त्याप्रमाणे चित्तवृत्तींचा प्रक्षोभ पूर्ण थांबून या जन्मातच लाभलेला नित्य अखंड, स्थिरभाव म्हणजे भावलिंग ॥ ८ ॥

देहाच्या नादाने होणारी यज्ञकर्मे सोडून, प्राणजयादी हठयोगाला दूर सारून, फक्त ज्ञानाने स्वतःला ओळखणे हीच अपरोक्षानुभूती. हेच गुरुशंभुलिंगांचे चिन्मय निजस्वरूप ॥ ९ ॥

15 Criteria and Genesis of Mystical Experiences

अनुभावद उगमवू प्रमाणगळु

1 The philosophic criterion

अनुभावद तात्त्विक प्रमाण

निज ऊहिसबारदु संपन्ना ॥ प. ॥

अदु वचनके गोचरमल्लेंदु ।
अदु मनसिगे विषयमल्लेंदु ॥

केळु मत्तोंदु अनुविंद ।
पेळु उपदेशिसबेकदरिंद ॥

सत्यज्ञानसुखात्मकवेंदु ।
नित्य परिपूर्णतेयेंदु ॥

दृश्यविलक्षण वीक्षिसुदेंदु ।
जानिसि पेळितु श्रुतिगळ मोत्त ॥

❀

2 The moral criterion

अनुभावद नैतिक प्रमाण

(राग–सारंग; ताल–केरवा)

निज गुह्यद मातु ।
साधुरिगल्लदे तिळियदु गोत्तु ॥ प. ॥

१५ पारमार्थिक अनुभवाचा उगम व त्याची प्रमाणे

पद १

साक्षात्काराची तात्त्विक कसोटी

अरे साधनचतुष्टयसंपन्ना, परतत्त्वाबद्दल उगीच पोकळ कल्पना करीत बसू नये.

परतत्त्व शब्दात सापडत नाही. मनाला ते अगोचर आहे.

ऐक रे बाबा, आणखी एका निराळ्याच पद्धतीने ते जाणावे लागते (ज्ञानदृष्टीने जाणावे लागते). ते गुरूपदेशाशिवाय समजत नसते.

परतत्त्व सच्चिदानंदस्वरूप आहे आणि सदैव परिपूर्णच आहे.

परात्परवस्तूचे स्वरूप अद्‌भुत आहे. ते ध्यानानेच आकळावे असा श्रुतींचा सांगावा आहे.[७९]

❀

पद २

साक्षात्काराची नैतिक कसोटी

परम गुह्य तत्त्वाचा थांगपत्तासुद्धा साधुजनांखेरीज इतरांना लागणार नाही.

कण्णिले कंडु हेळद मातु
पुण्यवंतरिगिदे होळेदीतु ॥
इन्नोब्बरिगेन तिळिदीतु ।
चिन्मयद वस्तु ॥ १ ॥

नीतिगे निजवागिह मुकुट ।
मातिगे मुट्टदवने बलु निगट ॥
मतिहीनरिगे ओगट ।
यतिजनरिगे प्रगट ॥ २ ॥

सोऽहं सोन्नेय मातने केळिको ।
गुह्य गुरुतु हेळुव गुरु बळिको ॥
महिपति निन्नोळु नी तिळको ।
सिद्धद बलु वेळको ॥ ३ ॥

ಜ

3 Supersensuousness – mystical criterion

अनुभावद अतींद्रिय प्रमाण

(राग–आनंदभैरवि; ताल–दीपचंदि)

अंदवाद श्रीगंधद गिडदोळु ।
निंद हण्णुगळनु काणदे इवन्नु ।
सवियदे होगदिरेंदादरू ॥
ॐ सुज्ञानिगळिरा । अंदवरिगे अमृतसारवु ॥ १ ॥

कण्णु इल्लदवने नोडि ।
कालु इल्लदवने एरि ।
कैयिल्लदवने हरिय बंदनु ॥
ॐ सुज्ञानिगळिरा बायि इल्लदवने तिंदनो ॥ २ ॥

ते ज्ञानदृष्टीला दिसते. त्याच्या वर्णनाला शब्द लंगडे पडतात. पुण्यवंतांसमोर त्याचा प्रकाश उजळतो. ती चिन्मय वस्तू येरा गबाळ्यांना कशी दिसणार ? ॥ १ ॥

ती वस्तू नीतीचा कळस आहे. जो शब्दज्ञानाने बुडाला नाही तोच तिच्या निकटवर्ती असतो. जे बुद्धिहीन आहेत त्यांच्यापुढे ती एक समस्या आहे. यतिजनांच्यापुढे ती वस्तू प्रकट असते ॥ २ ॥

सोऽहं मंत्राची गोष्ट ऐक. नंतर गुरूच तुला त्यातील रहस्य सांगतील. पाहावे आपणासी आपण असे महिपती सांगतात. आत्म्याचे तेज स्वयंसिद्ध आहे ॥ ३ ॥

ꕥ

पद ३

साक्षात्काराची अतींद्रिय कसोटी

हे सुज्ञानी लोकहो, अमृताची गोडी कुणाला कळली सांगू ? अलौकिक श्रीगंधवृक्षाच्या फळांकडे दृष्टिक्षेप न टाकता अन् त्यांची गोडी न चाखता पाऊल कधीच पुढे टाकू नका (या जन्मातच परमेश्वराचा आस्वाद घ्या) असे जे सांगतात ना, त्यांनाच ती गोडी कळली ॥ १ ॥

अंधळ्याने ती फळे पाहिली, पांगळा झाडावर चढला, थोटा फळे तोडायला आला व ज्याला तोंड नाही त्याने ती खाल्ली ॥ २ ॥

एलेंदु आरु हत्तु मंदि ।
कळ्ळरु वेळे इदे एंदु नोडि ।
कळ्ळ मतियल्लि कायि हरिय बंदरु ॥
ॐ सुज्ञानिगळिरा । कोळि कूगितष्टरोळगे ॥ ३ ॥

गिडव कायुव कावलुगार ।
नोडलु बंदु तड माडदले ।
उडिगे उट्टिदु सिडिलिनंते होडेदनो ॥
ॐ सुज्ञानिगळिरा । हिडिदु पाल्मोर जिल्हेगे कळुहिदनो ॥४॥

जिल्हा दोरेयु अल्लम साहेव ।
कळ्ळरनेल्ल विचार माडि ।
कळळतनक्के सल्लुवष्टु जुर्मानव ॥
ॐ सुज्ञानिगळिरा । आळिगरवत्तु दंडव माडिदनु ॥ ५ ॥

दंडद रूपायि कोडुवदक्के ।
बंदे गुरुविन अडिगळ पिडिदु ।
दंड कोट्टु धन्यरादरु ॥
ॐ सुज्ञानिगळिरा । कंडेनय्या श्रीगुरुकरुणदि ॥ ६ ॥

ಜ

4 Inter-change and apperception in spiritual experiences

पारमार्थिक अनुभवगळल्लिय अदलु बदलु हागु अनुबोधे

(अ)

(राग–भूप; ताल–दीपचंदि)

इदरोळारय्य नीनु । आत्मा ।
ओरगि नानेंदहंकरिसि ओ ऐंदेवे ॥ प. ॥

सात (सप्तव्यसने),[८०] आठ (अष्टमद),[८१] सहा (षड्विकार),[८२] दहा (दशेंद्रिये)[८३] चोर संधी साधून फळे चोरायला आले पण तेवढ्यातच कोंबडा आरवला (सदसद्विवेक जागा झाला) ॥ ३ ॥

झाडाच्या राखणदाराने चोरांना हेरले व तो तत्क्षणी तिथे हजर झाला. त्याने विद्युत्–गतीने त्या चोरांना कपड्यांनी झोडपले व पालमोर जिल्ह्यात पाठवले ॥४॥

जिल्हाधिकारी अलुमप्रभु यांनी त्यांची चौकशी केली. त्यांच्या चोरीला साजेशी शिक्षा म्हणून साठ रुपये दंड फर्मावला (मिनिटाची ६० सेकंदे किंवा तासाची ६० मिनिटे नामस्मरण करण्यास सांगितले) ॥ ५ ॥

सद्गुरूंचे पाय धरून दंड भरण्यास मी आलो. दंड भरून चोर धन्य झाले. सद्गुरूंच्या कृपेने हे सर्व मला पाहायला मिळाले ॥ ६ ॥

❀

पद ४

'अंधळ्यानें देखिलें बहिऱ्यानें ऐकिलें'।

(अ)

हे आत्म्या, या देहात तू कोण आहेस? इथे तू निद्रिस्त आहेस (अज्ञानात गुरफटला आहेस) आणि 'तू कोण' असे विचारल्याबरोबर अहंकाराने 'मी' असे उत्तर देतोस (मीपण किंवा अहंकार म्हणजेच अज्ञान).

नोडुवनोब्ब ता केळलरियनु नुडिय ।
नोडलरियनु केळुवव रूपा ॥
आडुवव नुडियोब्ब परिमळंगळ तिळिया ।
आडलरुविल्ल घ्राणेंद्रियवगे ॥ १ ॥

कुडुवव्वग नडेयिल्ल नडेवव्वग करविल्ल ।
विडदे चेष्टिसुवव्वगे रूपविल्ल ॥
विडनारु मूरु इप्पत्तैदु कूटदल्लि ।
गडणदिंदिह मनिगे क्षेत्रज्ञनोब्बनिह ॥ २ ॥

तन्न निज तानरिये धन्य तानेंदेंवे ।
निन्न बल्लरिकिदु नोडुचितवे ॥
इन्नारे तंदे महिपति बोधवनु सविदु ।
कण्देरेदच्युतन नेनेदु तिळियो ॥ ३ ॥

(आ)

(उगाभोग)

कण्णिलि केळुव कांबुवनरिव
आघ्राणिसुव आस्वादिसुव
श्रवणदि केळुव कांबुवनरिव
आघ्राणिसुव आस्वादिसुव
रसनदि केळुव कांबुवनरिव
आघ्राणिसुव आस्वादिसुव
स्परुशदि केळुव कांबुवनरिव
आघ्राणिसुव आस्वादिसुव
घ्राणदि केळुव कांबुवनरिव
आघ्राणिसुव आस्वादिसुव
लोकविलक्षण दिव्य करण
लोगरिगाश्चर्य पुरंदरविठल ॥

जो पाहणारा आहे (डोळा), त्याला शब्द ऐकू येत नाही. ऐकणाऱ्याला (कानाला) रूप दिसत नाही. जी बोलते (जीभ) तिला सुगंध कळत नाही. ज्याला वास येतो (नाक) त्याला बोलण्याची शक्ती नाही ॥ १ ॥

जो देतो (हात) त्याला चालणे शक्य नाही. जो चालतो (पाय) त्याला हात नाही. ज्याची एकसारखी वळवळ चालू आहे (मन) त्याला रूप नाही. सहा[८४] (षड्विकार), तीन[८५] (त्रिगुण), पंचवीस[८६] (तत्त्वे) यांनी बांधलेल्या घरामध्ये (क्षेत्र किंवा शरीर) एक क्षेत्रज्ञ (जीव) आहे ॥ २ ॥

ब्रह्मज्ञान झाल्यावर मनुष्य धन्य झाला असे मानतो. उलट, तुझ्या लौकिक पांडित्याला ज्ञान समजणे उचित आहे काय याचा विचार कर. आता तरी पित्या महिपतीच्या उपदेशाचा आस्वाद घेऊन डोळे उघडून (अज्ञानातून जागे होऊन) अच्युताचे स्मरण करून ज्ञान मिळव ॥ ३॥

(आ)

तो (परमात्मा) डोळ्यांनी ऐकतो, पाहतो व जाणतोही, वासही घेतो आणि रुचीही घेतो.

कानांनी ऐकतो, पाहतो व जाणतो, वास घेतो व रुचीही घेतो.

जिभेने ऐकतो, पाहतो, जाणतो, वास घेतो व रुचीही घेतो.

स्पर्शेंद्रियाने ऐकतो, पाहतो, जाणतो, वास घेतो व रुचीही घेतो.

नाकाने ऐकतो, पाहतो, जाणतो, वास घेतो व रुचीही घेतो.

दिव्य इंद्रिये असणारा व परमाश्चर्यमय असणारा पुरंदरविठ्ठल लोकविलक्षण आहे.

5 This price-less divine pearl can be purchased only by poverty of spirit

ई बेलेयुळळ दिव्य मुत्तन्नु दीनभावदिंदले कोळळबहुदु

(राग – मिश्रकाफि; ताल – केरवा)

मुत्तु कोळ्ळिरो जनरु मुत्तु कोळिळरो ॥ प. ॥
मुत्तु बंदिदे कोळिळ सच्चिदानंद दिव्य ॥ अ. प. ॥

ज्ञानवेंबो दारदल्लि पोणिसिद दिव्य मुत्तु ।
ध्यानदिंद कोंबुदिदनु दीनराद बल्ल जनरु ॥ १ ॥

कट्टलागदु मूगिनल्लि इट्टु मेरेयलागदिदु ।
भ्रष्ट जनके काणिसदंथ कृष्णनेंबो आणि मुत्तु ॥ २ ॥

हिडियलिक्के सिलुकदिदु कंडे काणदेंदू बेलेयु ।
पोडविगेल्ल पुरंदरविठल ओडेयनेंबो दिव्य मुत्तु ॥३॥

8

6 Very few can see this spiritual pearl

ई दिव्य मुत्तन्नु काणुववरु बहळे विरळरु

(राग–बिलावल; ताल–दीपचंदि)

आरिगे काणदी मुत्तु । गुरुविन करुणागदे ।
तिळियदु गोत्तु ॥ प. ॥

काष्ठदोळग्नियंतिहुदु । अदु ।
कोटि सूर्यर प्रभे मंटागिहुदु ॥

नोटक्के अदु कांबुवदु । निज ।
निष्ठेयुळळवरिगे घट्टिगोंडिहुदु ॥ १ ॥

कत्तलेयोळु कांबुवदु । इदु ।
एत्त नोडलु प्रभेयेत्ति तोरुवुदु ॥

नेत्तियोळु गोत्तु माडिहुदु । अदु ।
उत्तर उन्मनि सेरिकोंडिहुदु ॥ २ ॥

पद ५

'जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी'।

मोती घ्या हो मोती.

सच्चिदानंदरूपी दिव्यमोती आला आहे, तो विकत घ्या.

हा दिव्य मोती ज्ञानाच्या धाग्यात गुंफला आहे. निरहंकारी महात्मे ध्यानाचे मोल देऊन हा मोती खरेदी करू शकतात ॥ १ ॥

त्याला कोंदणात जडवता येत नाही की तो नाकात घालून मिरवता येत नाही. भ्रष्ट लोकांना न दिसणारा हा कृष्णरूपी दिव्य मोती आहे ॥ २ ॥

धरायला गेले तर हातात येत नाही. त्याची किंमत करायला आकाश ठेंगणे आहे. भूमंडलाचा प्रभू पुरंदरविठ्ठल हाच दिव्य मोती आहे ॥ ३ ॥

पद ६

'परि प्राप्तिचां पैलां तीरीं । विरुला निगे'।

गुरुकृपेशिवाय हा मोती कुणालाच दिसत नाही व त्याचा तपास लागत नाही.

काष्ठात जसा अग्नी गुप्त असतो तसा हा आहे. कोटी सूर्यांच्या तेजाला तो मागे टाकतो. तो ज्ञानदृष्टीला दिसतो. दृढ श्रद्धा असणाऱ्यांच्या पकडीत सापडतो ॥ १ ॥

तो अंधारातही दिसतो आणि जिथे पाहावे तिथे त्याचा प्रकाश उजळलेला असतो. मस्तकात शिंशुमारचक्रात तो ठाण मांडून बसला आहे. उन्मनी अवस्थेत त्याची प्राप्ती होते ॥ २ ॥

सूत्रद बलविरवेकु । आ ।
सूत्रव हिडिदु ता बंदिरवेकु ॥
ताप त्रिगुण अळियबेकु । सु– ।
पात्र सुज्ञानद नेले तिळियबेकु ॥ ३ ॥

उदयास्तवेरडदकिल्ला । वेद– ।
श्रुति शास्त्र आगमकदु निलकिल्ला ॥
तन्नोळु ता तिळियलिल्ला । इदु ।
कल्लु मेत्तगे माडुवबने बल्ला ॥ ४ ॥

रेवगिपुरके होगबेकु । दोड्ड ।
महामेरु पर्वतवनु हत्तबेकु ॥
अभिमानदि गवि होगबेकु । दोड्ड ।
रेवणसिद्धलिंगन नोडबेकु ॥ ५ ॥

ಜ

7 Greatness of this pearl will reveal itself in course of time

ई मुत्तिन महिमेयु मुंदे तिळियबहुदु

(राग–बिलावल; ताल–दीपचंदि)

मुत्तु बंदिदे कोळ्ळिरण्णा । अदके ।
एज्जिल्ला एनिल्ला बेलेयागदण्णा ॥ प. ॥

थळ थळ होळेयुतदण्णा । अदु ।
बल्ल जाणरिगे बयलोळगण्णा ॥
कूदल एळेकिंत सण्णा । अदु ।
बण्ण बण्णद ब्रह्मलोकण्णा ॥ १ ॥

तनुवेंब तराजु पिडिदु । आदि ।
शरणरु तूग्यारु बेसर कळेदु ॥
मनवेंब मणिदार पिडिदु । झोक ।
होगदे तूग्यारु योग माडिदवरु ॥ २ ॥

साधकाला गुरुसंप्रदायाचे पाठबळ लागते. त्याच्या जोरावर त्याने पुढे पुढे जावे. त्रिविध ताप[८७] व त्रिगुण[८८] यांचा नाश करावा. आपला अधिकार व ज्ञान यांचा अंदाज घ्यावा ॥ ३ ॥

या मोत्याला ना उदय, ना अस्त. श्रुती, शास्त्रे किंवा आगम[८९] त्याच्यापर्यंत पोचले नाहीत. केवळ स्वप्रयत्नाने तो गवसत नाही, त्याच्यासाठी अंतःकरण मृदू करावे लागते ॥ ४ ॥

रेवगिपुराला जावे, महामेरू पर्वतावर आरोहण करावे, आत्मविश्वासाने भक्तिपंथाला लागावे, मग रेवणसिद्धाच्या लिंगाचे दर्शन घ्यावे ॥ ५ ॥

पद ७

'तरी आलोट फळ भेटे । परि वेळें कीं गा'।

मोती आला आहे, घ्या हो. या मोत्याला वेजबिज काहीच नाही. त्याचे मोल करता येत नाही.

त्याचे तेज झगझगीत आहे. तो मोती जाणत्यांनाच दिसतो. केसापेक्षा तो बारीक आहे. रंगीबेरंगी असा हा ब्रह्मलोकच आहे ॥ १ ॥

प्राचीन ऋषिमुनींनी कंटाळ्याला रामराम ठोकला व देहरूपी तराजू घेऊन या मोत्याचे वजन केले. योगी लोकांनी मनाचा काटा इकडेतिकडे झुकू न देता त्याला तोलले ॥ २ ॥

मुत्तिन महिमे मुंदद । इदर ।
गोत्तु तिळियद मंदि सत्तु होगेद ।।
सुत्तु मुत्तलु सुळियुतलद । गुरु ।
चिदानंदन चित्तदोळगद ।। ३ ।।

८

8 The vision of the spiritual jewel which is seen when sin is destroyed and which destroys sin when seen

पापवळिदाग काणुव हागु काणिसिदाग
पापवन्नळिसुव दिव्य रत्नद दर्शन

(राग – भूप; ताल – दीपचंदि)

रत्न बंदिदे नोडिरो । उन्नत जीव ।
रत्न बंदिदे नोडिरो ।। प. ।।
पृथ्विगधिक ब्रह्मपुरदिंद बंदिदे ।
रत्न परीक्षेय वल्ल सत्पुरुषरे ।। अ. प. ।।
शिरदोळु अडगि अदे । यावागल्ल ।
करदल्लि काणुतिदे ।।
पर चंद्र सूर्य वीदिगळोळगिट्टिदे ।
दुरित कर्मगळळिदवगे काणुतिदे ।। १ ।।
अष्टदळगळिंदे । आ रत्नवु ।
दिटवागिहुदरिंदे ।।
दृष्टियनगलदे नोडिद पुरुषनु ।
नष्टपातकनागि श्रेष्ठनागुवनंते ।। २ ।।
कळ्ळर भयविल्लवो । आ रत्नक्के ।
सुळ्ळर सुळविल्लवो ।।
एल्लेल्लि नोडलु अल्ले कांबुदु तानु ।
ओल्लेनेंदरे विडदेदुरिगे निल्लुवदु ।। ३ ।।

या मोत्याचा महिमा अजून पुढेच आहे. ज्यांना त्याचे ज्ञान नाही ते मेल्यातच मोजावे. गुरू चिदानंदांच्या चित्तात हा मोती आहे आणि त्याच्या अवतीभोवती घिरट्या घालत आहे ॥ ३ ॥

पद ८

'अमोलिक रत्न जोडिलें रे तुज'

रत्न आले आहे, आत्मरूपी रत्न आले आहे, पाहायला या हो, या.

पृथ्वीपेक्षा अधिक मोलाच्या ब्रह्मलोकातून हे आले आहे, हे साधू हो, आपण रत्नपारखी आहात.

ते रत्न मस्तकस्थानी गुप्त असते आणि सदैव करस्थलावर दिसते. चंद्रसूर्यापासून येणाऱ्या प्रकाशकिरणांवर ते शोभते. ज्यांचे पाप नष्ट झाले आहे त्यांनाच त्याचे दर्शन होते ॥ १ ॥

अष्टदलयुक्त रत्न साक्षात डोळ्यांसमोर येते. स्थिरदृष्टीने त्या रत्नाकडे पाहणाऱ्या साधकाचे पाप नाहीसे होते व तो उच्च स्थान मिळवतो ॥ २ ॥

त्या रत्नाला चोरांचे भय नाही. लांडीलबाडी करणारे लोक त्याच्याजवळ फिरकू शकत नाहीत. जिथे दृष्टी टाकावी तिथे ते हजर आहेच. आपण विन्मुख झालोतरी ते सन्मुख होते ॥ ३ ॥

शिरदोळु रत्नवन्नु । धरिसिदंथा ।
उरगन हृदयवन्नु ॥
उरग भूषण पक्षि हंस वाहन मुख्य ।
सुर मुनि हृदयदि नित्य वेळगुवंथा ॥ ४ ॥

दोरे देसायिगळल्लियू । नवकोटि ।
नर नारायणरल्लियू ॥
नेरे चक्रवर्ति बोक्कसदोळगिल्ल श्री ।
गुरुमहलिंगरंगन भांडारदोळिह ॥ ५ ॥

मस्तकावर मणी धारण करणाऱ्या शेषाच्या हृदयात किंवा सर्पभूषण शिव, गरुडवाहन विष्णू व हंसवाहन ब्रह्मदेव यांच्या हृदयात, तसेच सर्वच सुरमुनींच्या हृदयात हे नित्य विलसत असते ॥ ४ ॥

सरदार–दरकदार, नवकोटिनारायण किंवा राजेरजवाडे यांच्या तिजोरीत चुकूनही हे रत्न गवसणार नाही पण महालिंगरंगांच्या भांडारात ते जरूर सापडते[१०] ॥५॥

16 Morphic, Photic, Phonic and other Experiences

रूप, तेज, नादादिगळ अनुभाव

1 Vision of the spiriton, the lightning, the moon, the sun and the Self

परविंदु, मिंचु, चंद्र, सूर्य, प्राणलिंग दर्शन

(राग-दुर्गा; ताल–दीपचंदि)

काणुतिदे परविंदु शांभविय
कोनेयल्लि लक्षविडलाक्षणदि ॥ प. ॥

स्थिरकायनागि कुळितु व्यवहरिप
करणेंद्रियगळनु तडेदु बाह्य–
परिकरवनळिदु दृष्टि मन पवन–
बेरसि नासाग्रदलि नोडे ॥ १ ॥

एळेयाद मुत्तिनंते दीपदुरियंते
सेळे मिंचिनंते रत्नदंते
तोळिप विद्रुम बळ्ळियंते थळ–
थळिप शशिसूर्य कोटि प्रभेयन्ते ॥ २ ॥

ओळगिर्प प्राणलिंग अदु ताने
पळक कोडदोळु दीप तेरदि
होळेव नेत्र द्वारदि होर होम्मि
बेळगि गुरुसिद्ध ताने आगि ॥ ३ ॥

१६ रूपतेजनादादी पारमार्थिक अनुभव

पद १

'सहस्रदळ बिंदु त्यांत तेज दिसे'।

शांभवी मुद्रा[१] (भ्रूमध्यावर दृष्टी स्थिर होण्याची क्रिया) साधली रे साधली की बिंदुले डोळ्यांपुढे ठाकते.

स्थिर आसनावर बसावे. इतस्ततः धावणाऱ्या इंद्रियांचा व्यापार थांबवावा. बाह्य जगातून मन काढावे. मग दृष्टी नासाग्रावर एकवटून, मनोजय व प्राणजय केल्याक्षणीच बिंदुले पुढे उभे राहते ॥ १ ॥

हा बिंदू मौक्तिकमालेप्रमाणे आहे. दीपशिखेसारखा आहे. विजेची शलाका चमकून जावी किंवा रत्न पाजळावे तसा तो आहे. जणू प्रवाळाच्या वेलीच, असा तो कांतिमान आहे. कोटी सूर्यचंद्रांच्या उजळलेल्या तेजोराशीप्रमाणे आहे[२] ॥ २ ॥

अंतस्थ प्राणलिंग स्फटिकाच्या हंडीत ठेवलेल्या दिव्याच्या ज्वालेसारखे आहे. नेत्रद्वारा ते तेज धो धो वाहू लागते. तेच गुरुसिद्ध होऊन परबिंदुरूपाने दिसते ॥ ३ ॥

2 By the grace of the all-powerful master, I have seen the fathomless all-pervading form of God

श्रीसमर्थ सद्‌गुरुविन करुणदिंद नेलेयिल्लद सर्वव्यापियाद परमात्मन रूपव कंडे

(राग – दुर्गा; ताल – दीपचंदि)

वस्तु कंडेनो ओंदु
कर्तु सद्‌गुरुविन कृपेयिंद ॥ प. ॥

तेजःपुंजद रूप ।
मूर्जगदोळगिदु अपरूप ॥
निज निर्विकल्प ।
सज्जन हृदयदि चिद्‌घन दीप ॥ १ ॥

रूपके नेलेयिल्ल ।
व्यापकवायितु मूजगवेल्ल ॥
गुप्तज्ञानिये बल्ल ।
जप तपगळिगिदु सिल्लुकुवदल्ल ॥ २ ॥

वैलिगे निर्वैल ।
भाविक बल्ल इदर होयिल ॥
महिपतिगनुकूल ।
जीवन्मुक्तिगिदे मूल ॥ ३ ॥

ಜ

3 The worship of Linga is going on continuously within my heart

एन्नंतरंगदल्लि लिंगपूजेयु संततवागि नडेदिरुवदु

(राग– पुरिया धनाश्रि; ताल– दीपचंदि)

लिंगपूजि आगतदण्ण । यावाग नोडल्लु ।
लिंगपूजि आगतदण्णा ॥ प. ॥

पद २

'गुरुकृपेचें हें वर्म । जग देखे परब्रह्म '।

सर्वकर्त्या सद्गुरूंच्या कृपेने सद्वस्तू माझ्या दृष्टीस पडली.

तिचे रूप तेजःपुंज आहे; त्रिभुवन धुंडाळले तरी ती दुर्लभच राहते. स्वभावतः निर्विकार असून सज्जनांच्या हृदयात तळपणारा तो चैतन्यदीपच आहे ॥ १ ॥

तिच्या रूपाला मोजमाप नाही. या अगाध वस्तूने त्रैलोक्य व्यापले आहे. तिचे गुह्य ज्ञानी जनांनाच उकलते. जपतपाने ती साध्य होत नाही ॥ २ ॥

या निर्विकार महाशून्याच्या अंतरंगात शिरण्यासाठी कशाची जरुरी असेल तर ती खऱ्या भावाची. जीवन्मुक्ती प्राप्त करून देणारी ही वस्तू महिपतीला सुलभ आहे ॥ ३ ॥

पद ३

'ज्योतिर्लिंग मग ध्याइलें । ज्ञानदेवीं हृदयीं '।

लिंगपूजा चालू आहे. केव्हाही पाहा, लिंगपूजा चालूच आहे.

लिंगपूजि आगतद । अंग एंबो गुडिय ओळगे ।
लिंगदंथा मनसु तन्न । कंगळिगे काणतद ॥ अ. प. ॥
आरु मूरु कट्टवेकण्णा । आ लिंगपूजेगे ।
आरु मूरु केडिसवेकण्णा ॥
आरु मनिया दाटवेकु । मूरु नदिया नट्टनडुवे ।
एरि शिखरदल्लि नोडलु । भेरिगुट्टि कूगुतद ॥ १ ॥
नाल्कु दारि उंटु नोडण्णा । आ लिंगपूजेगे ।
मेल्क एरि निल्लुवेकण्णा ॥
काकबुद्धि कळेयवेकु । नूकवेको मदगळेल्लु । वि– ।
वेकनागि नोडलु अ– । नेक वेळक काणतद ॥ २ ॥
योगि उन्मनि वास नोडण्णा । आ नंविदवरिगे ।
चिन्मयरूपा होळेयुतदण्णा ॥
आग ईग एन्नदे देह । सागि निन्न होगतद ।
होगुवाग गंगाधरन । वेग नीवु बल्लिरण्णा ॥ ३ ॥

ಆ

4 The eight-fold woiship of Pranalinga

अष्टविध प्राणलिंगपूजेयु

(राग–भूप; ताल– दीपचंदि)

लिंगपूजेय माडिरो । निम्मोळु प्राण– ।
लिंगपूजेय माडिरो ॥ प. ॥
गंगे यमुनेगळ संगमदोळु मिंदु ।
शृंगाटकदुपरि रंगमंटपदोळु ॥ अ. प. ॥
वर भक्ति जलव नीडि । मज्जनगैदु ।
विरति गंधवने तीडि ॥
करण इंद्रिय एंब । मिरुगुवक्षतेयिट्टु ।
अरिवेंब निर्मल सरस पुष्पव सूडि ॥ १ ॥

देहरूपी (अंगरूपी) राउळात आत्म्याची (लिंगाची) पूजा होत आहे आणि आत्मलिंग डोळ्यांसमोर उभे आहे.

या पूजेसाठी सहा (षड्विकार)[३३] व तीन (त्रिगुण)[३४] यांच्या मुसक्या आवळून त्यांना बळी द्यावे लागते. तीन नद्यांमधील (इडा, पिंगला, सुषुम्ना यांतील) सहा घरे ओलांडून (षट्चक्रभेद करून) उत्तुंग शिखरावर (सहस्रार कमलावर) आरोहण केल्यावर ढोल बडवल्याचा आवाज सुरू होतो ॥ १ ॥

तिथे पोचण्यास चार वाटा (शृंगाटक) आहेत. लिंगपूजेसाठी उंच जागी उभे राहावे लागते. छिद्रान्वेषी वृत्ती सोडून अष्टमदांना[३५] अर्धचंद्र द्यावा लागतो. विवेक जागा ठेवावा लागतो. मग अनेक प्रकारची दीप्ती उजळते ॥ २ ॥

योगी हा उन्मनी अवस्थेत राहतो. अन्तःकरणात श्रद्धा असेलतर डोळ्यांसमोर चिन्मय रूप झळकत राहते. आजचा उद्याचा विचार न करता प्राण कुडीतून निघून जाईल; क्षणही न दवडता त्या कठीण समयी गंगाधराचे स्मरण करा ॥ ३ ॥

पद ४

प्राणलिंगाची अष्टविध पूजा

लिंगपूजा करा. आपल्या हृदयातच प्राणलिंगाची पूजा करा.

गंगा-यमुनांच्या (इडा-पिंगला यांच्या) संगमात स्नान करून शृंगाटकाच्या वरच्या रंगमंडपात (सहस्रार कमलात) लिंगपूजा करा.

अनन्यभक्तीच्या जलाचे अर्घ्य देऊन अभिषेक करा. विरक्तिरूपी गंधाचे बोट लावा. ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये ह्या शोभिवंत अक्षता वाहून बोधावस्थेची प्रफुल्लित व निर्मळ फुले उधळा ॥ १ ॥

हरुपवेंवुव धूपव । समर्पिसि ।
परविंदु रुचिदीपव– ॥
निरदेत्ति परिपूर्ण नैवेद्यवने माडि ।
मेरेव त्रिगुणवेंव वर तांबूलव कोट्टु ॥ २ ॥

करदिष्टलिंगविदे । शरीरदल्लि ।
परवस्तु तानागिदे ॥
होर ओळगेरडेन्नदरिदरिवने मीरि ।
गुरुसिद्धनंघ्रियोळ् बेरदेक्कमयवागि ॥ ३ ॥

ಜ

5 See the wish-fulfilling tree inside the heart

अंतरंगदल्लिय कल्पवृक्षवन्नु काणिरय्य

(राग–पुरिया धनाश्रि; ताल–दीपचंदि)

कल्लु मेत्तगे माडिकोळ्ळण्णा । बल्लवन केळि ॥ प. ॥
कल्लु मेत्तगे माडिकोळ्ळो । कल्लुसक्करेगिंत सवियो ।
सार अमृत सुरिदु नीनु । ज्ञानज्योति तुंबिकोळ्ळो ॥अ. प ॥

कल्लिनोळगे परुप काणण्णा । परब्रह्मनरियदे ।
कैय ओळगे बंदीतु ह्यांगण्णा ॥
कल्लु कुट्टिग अल्लमप्रभु । शिलेय ओडेदु सेलेय तेगेद ।
नीरु नीरु कूडिद बळिक । भेदभावगळ्याक बेको ॥ १ ॥

कल्लु कल्पवृक्ष काणण्णा । बेडिद फलगळ ।
कोडुव ब्रीद उंटु नोडण्णा ॥
गुरुलिंगजंगम चरण । होंदिगूडो एंदिगगलदे ।
बेल्ल सवियु कूडिदंते । कूडिकोळ्ळो नीनु इल्ले ॥ २ ॥

ಜ

हर्षाचा धूप पाजळा व परब्रिंदुरूपी तेजाने औक्षण करा. सर्वार्पणभावाच्या मिष्टान्नाचा नैवेद्य दाखवा व त्रिगुणांचा[१६] टपोरा तांबूल अर्पण करा ॥ २ ॥

करस्थलावर इष्टलिंग आहे. तेच आपल्या अंतर्यामी परवस्तुरूपाने राहते. हे आतले, ते बाहेरचे, असले द्वैत तर गळलेच पाहिजे, शिवाय द्वैतातीत झाल्याची जाणीवही मावळली पाहिजे. गुरुसिद्धांच्या चरणांशी एकरूप होऊन लिंगपूजा करा ॥ ३ ॥

पद ५

अंतरंगातील कल्पवृक्ष पाहा

फत्तरासारखे अंतःकरण मेणाहून मऊ कसे करतात हे ज्ञानी लोकांकडून शिकावे. हे वज्रासारखे कठीण अंतःकरण मऊ केलेस तर ते खडीसाखरेपेक्षा गोड होईल. त्यातील अमृत पोटभर पिऊन ज्ञानाच्या प्रकाशाने मन उजळ.

तुझ्या कठोर हृदयात वास्तविक परीस आहे. परब्रह्माच्या अनुभवाशिवाय तो तुझ्या हातात कसा येईल? अल्लमप्रभु पाथरवटाने खडक फोडून झरा काढला. पाणी पाण्यात मिसळल्यावर जीव–शिवात भेद कुठला? ॥ १ ॥

तुझे निष्ठुर मन खरोखर कल्पवृक्ष आहे. इच्छित वस्तू देण्याचे त्याचे ब्रीद आहे. गूळ व त्याची गोडी जशी एकजीव, तसा तू गुरुलिंगजंगमचरणी समरस हो. तिथून कधी वेगळा होऊ नको. तिथे अढळपणे राहा ॥ २ ॥

6 The spiritual sound as the death-knell to all passions and desires

अनाहत नादवु एल्ल विकार कामनेगळन्नु नाशगोळिसुवदु

(राग–मांड; ताल–केरवा)

नादव केळुत निद्रेय माडुत ।
ब्रह्मवु तानागि ।।
नादव केळलु नाना गुणगळु ।
होदवु तावागि ।। प. ।।

कूडितु दृष्टि परब्रह्मदोळु ता ।
अनुदिनदलि वेगी ।।
मन इंद्रियगळु हुडुकिदरिल्ला ।
होदवु तावागि ।। १ ।।

नाना वर्णद छायव नोडुत ।
निद्रेय माडिदेनो ।।
भानुकोटि प्रकाशद बेळकलि ।
नादव केळिदेनो ।। २ ।।

काणद रूपव काणुतले ना ।
कामिसि मलगिदेनो ।।
बोधचिदानंद सद्गुरुनाथन ।
ध्यानव माडिदेनो ।। ३ ।।

पद ६

' सहस्रदळांमधून अनुहात ध्वनि उठीं ।
नामाचेनि गजरें पातकें रिगालीं कपाटीं '।

अनाहत नादाच्या एकतानतेत योगनिद्रा लागल्यावर साधक स्वत:च ब्रह्म झाला. त्या दिव्य सुराच्या प्रभावाने अनेक दुर्गुणांनी मागच्या मागे पळ काढला.

दिवसानुदिवस दृष्टी परब्रह्मावर खिळून राहिली; मन व इंद्रिये आपल्याआपण कुठे अदृश्य झाली ती शोधूनही सापडेनात ॥ १ ॥

विविध रंगछटांनी नटलेला प्रकाश पाहतापाहताच मला योगनिद्रा लागली. कोटिसूर्यांच्या झळाळीत नादही घणघणत होता ॥ २ ॥

अरूपाचे रूप कितीही पाहत राहिले तरी तृप्ती कशी ती होईना आणि मी ब्रह्मनिद्रेच्या आधीन झालो. ज्ञानघन सद्गुरू चिदानंदांचे मला ध्यान लागले ॥ ३ ॥

7 A great culinary metaphor to describe the preparation of spiritual ambrosia

पारमार्थिक परमामृतद सिद्धतेयन्नु बण्णिसुव हिरिद्दाद पाकशास्त्रीय रूपक

(राग - भूप; ताल–दीपचंदि)

नेल्लु कुट्टुणु बारम्मा । इब्बरु कूडि ॥ प. ॥
नेल्लु कुट्टुणु बारे । निल्लदे बेन्नु हत्ति ।
हन्नेरडु हदिनारु नल्लेयरु कूडिकोंडु ॥ अ. प. ॥

तनुवेंब ओळळ माडि । प्राणवेंब ।
ओनकिले हेरि हाकि ॥
विवेकदिंद अक्कि हसन माडि ।
हळळ तगियम्मा ज्ञानदृष्टिले नोडि ॥ १ ॥

वासनत्रयगळेंब । ओलेगुंडु माडि ।
प्रारब्ध गडिगे हेरि ॥
कामक्रोधवेंब कट्टिगे उरि माडि ।
प्रपंच परमार्थ ओळ होरगे नोडि ॥ २ ॥

कुदियुव समयदल्लि । मदद उक्कु ।
मीरि बरुतलदम्मा ॥
सत्त्वधीर एंब हुट्टिले होडेदु ।
नेट्टगे अडिगेय धिट्टागि माडम्मा ॥ ३ ॥

परमान्न पायसवु । प्रारब्धदि ।
प्राप्तवादीतु एळम्मा ॥
गुरुलिंगजंगम बीगर कूडिकोंडु ।
स्वानंद एडि माडि सविय नोडम्मा ॥ ४ ॥

पद ७

सहजें ब्रह्मरसाचें पारणें केलें

भात कांडू या गे बाईयानो, आपण दोघी मिळून भात कांडू या.

बारा सोळा जणी क्षणभरही न विसावता कामाचा ध्यास घेऊन भात कांडू या.

देहाचे उखळ करून प्राणांच्या मुसळाने घाव घाल. विवेकदृष्टीने तांदूळ निवडून ज्ञानदृष्टीने त्यातले खडे वेच ॥ १॥

तीन वासनांचे दगड मांडून चूल कर व वर प्रारब्धाचे गाडगे ठेव. कामक्रोध-रूपी लाकडांचा विस्तव पेटवून आत-बाहेर म्हणजे परमार्थ व प्रपंच दोन्हीकडे लक्ष ठेव ॥ २ ॥

खीर शिजू लागल्यावर अहंकाराचा कढ उतू जायला लागतो. सत्त्वरूपी पळी घेऊन तो धैर्याने आत जिरव व काळजीपूर्वक पक्वान्न कर ॥ ३ ॥

ईश्वरकृपेने सुग्रास खीर तयार झाली म्हणजे त्या स्वानंदरूपी खिरीचा नैवेद्य दाखवून गुरुलिंगजंगमांच्या समवेत तिचा आस्वाद घे ॥ ४ ॥

17 Cumulative Mystical Experience

सम्मिलित अनुभाव

1 Blissful Reality, sunlight without the sun, an overflowing pitcher of nectar

आनंदमय चिद्घन, भानुविल्लद बिसिलु, उक्कुव अमृतकुंभ

(राग – भूप; ताल – दीपचंदि)

आनंदवाद चिद्घन वस्तु ना कंडे ।
भानुविल्लद बिसलेनम्मा ॥ प. ॥
तानु अल्लद तन्न तद्रूप मनेयोळु ।
तानु माडिद पुण्य तनगम्मा ॥ अ. प. ॥

कुंडलदोळगोंदु नीलगन्नडि इद्दु ।
मंडलदोळगाडुवदेनम्मा ॥
सेरि उन्मनियोळु गुरुविन पुण्यदि ।
घन वस्तु दोरकितु एनगम्मा ॥ १ ॥

नडुनीर मध्यदि वटवृक्ष ना कंडे ।
हूविल्ल मिडिगायि हण्णम्मा ॥
अखंड वनदोळु अमृत कोड उक्कि ।
उंडुंडु सुखिसि बाळुवेनम्मा ॥ २ ॥

कैलास भूमि अल्ला कनक भूषणवल्ला ।
बैलोळगाडुवदेनम्मा ॥
वर कवि नागलिंग गुरुविन पुण्यदि ।
स्थिरमुक्ति दोरकितु एनगम्मा ॥ ३ ॥

१७ संमिश्र पारमार्थिक अनुभव

पद १

'आनंदस्वरूप प्रसिद्ध देखिलें ।
निजरूप संचलें सर्वांठायीं ' ।

आनंदमय चिद्वस्तूचे मला दर्शन झाले. सूर्य नव्हता पण उन्हाच्या कवडशांची आरास दिसली.

देहाची ओढ सुटल्यावरच आत्मदर्शन होते. आपल्या पूर्वसुकृताने हे फळ मिळते.

हृदयमंडलात एक निळा आरसा आहे. त्यात एक वर्तुळ आहे. त्यात कोण बरे खेळते ? उन्मनी अवस्था मला प्राप्त झाली आणि गुरुकृपेने सद्वस्तूची भेट झाली ॥ १ ॥

पाण्यात उभा ठाकलेला वटवृक्ष मला दिसला. फुलांचा पत्ता नव्हता पण लुसलुशीत पिकलेली फळे मात्र लटकत होती. अमृताच्या घागरीतून अमृताचे कारंजे उसळत होते व त्याने उभे रान चिंब झाले होते. त्या अमृताचे यथेष्ट सेवन करून माझे जीवन धन्य धन्य झाले ॥ २ ॥

मी जे पाहिले तो कैलास नव्हता किंवा ते जडजवाहिराची लयलूट असणारे वैकुंठ नव्हते. मग अनंत आकाशात कोण बरे खेळते ? सद्गुरू नागलिंगांच्या कृपेने मला शाश्वत मुक्ती मिळाली ॥ ३ ॥

2 The company of the saints as granting the enjoyment of the highest type of experience of light, sound and ambrosia

सत्संगवु मेल्तरगतिय, तेज-नाद-सुधेगळ
अनुभाव सुखवन्नु नीडुवदु

(राग – सारंग; ताल – केरवा)

इंथादेल्लिदे ता नोडि । सत्संगद सुखा ॥ प. ॥

ओंदोंदु परि केळिसुव । ह – ।
न्नोंदर मेलिन्नोंदर घोषा ॥
धिमि धिमि धिमि धिमि ।
धिमिगुडुतिदे आनंदद घोषा ॥ १ ॥

उदयास्तिल्लद वेळगिन प्रभेयु ।
तुदि मोदलिल्लदे तुंबिनु पूर्णा ॥
बुधजनरनुदिन सेविसुतिरुव ।
सदमलवाद सदा सविसुख ॥ २ ॥

विहित विवेकद अनुभवगूडि ।
बाह्यांतरदलि घन तोरुतलिह ॥
स्वहित सुखद सुधारसगरेव ।
महिपति गुरुकरुणद कौतुक ॥ ३ ॥

❀

3 Various spiritual experiences of a real Brahmin

निजवाद ब्राह्मणनु पडेयुव वगे वगेय अनुभावगळु

(राग–मांड; ताल–केरवा)

ब्राह्मणनेंदरे ब्रह्मन तिळिदव ।
अवनीग ब्राह्मणनु ॥ प. ॥
ब्रह्मभेदवेंदु जगवनु कंडव ।
अवनीग ब्राह्मणनु ॥ अ. प. ॥

पद २

सत्संगाने उच्च अनुभवांची प्राप्ती

संतसंगतीचे अतुलनीय सुख कुठे मिळेल बरे ?

आपापल्या परीने होणाऱ्या अकरा नादांच्यावर आणखी एका नादाचा[१७] घोष होतो. घिम् घिम् आवाजाने भक्ताच्या हृदयात आनंदकल्लोळ उचंबळतात ॥ १ ॥

उदय नाही, अस्त नाही, आदी नाही, अंत नाही, अशा तेजाच्या पताका ठायी ठायी लागल्या आहेत. ज्ञानी जन निखळ अमृताची गोडी नित्य चाखत असतात ॥ २ ॥

विवेकाने मिळणारा हा अनुभव साधकाचे गात्र न् गात्र अंतर्बाह्य फुलवतो. महिपति म्हणतात की गुरूंच्या अगाध कृपेने आत्मानंदाचा पाऊस पडतो ॥ ३ ॥

पद ३

'बहेणि म्हणे ब्रह्म नांदे तो ब्राह्मण'।

ज्याच्या देही सदासर्वकाळ ब्रह्मभाव आहे त्यालाच ब्राह्मण म्हणावे.

ब्रह्म ते ब्रह्म आणि जग ते जग; असा जो जाणता आहे, तो ब्राह्मण अशी खूणगाठ बांध.

मूगलि वायुव तुंबि तुंबि एळेयुव ।
अवनीग ब्राह्मणनु ॥
नागस्वरद ध्वनि किवियलि केळुव ।
अवनीग ब्राह्मणनु ॥
वेगने नेले नेले आरनु अडरुव ।
अवनीग ब्राह्मणनु ॥
वेगदि चंद्रन मंडलदमृतवनु ।
उंडव ब्राह्मणनु ॥ १ ॥

मुत्तिन मळे हनि उदुरुवाग ।
तोय्यदव ब्राह्मणनु ॥
एत्तेत्त नोडलु सूसु वेळदिंगळ ।
काणुव ब्राह्मणनु ॥
मत्ते द्विदळद सिंहासनदलि ।
कुळितव ब्राह्मणनु ॥
उत्तम सहस्रकमलदेरिकेयलि ।
सेरुव ब्राह्मणनु ॥ २ ॥

थळथळिसुव ब्रह्मरंध्रदि सुखदिंद ।
मलगुव ब्राह्मणनु ॥
बलु रविशतकोटि शिशुमारदलि ।
सेरुव ब्राह्मणनु ॥
कलियुगदलि हरि नामामृतवनु ।
उंडव ब्राह्मणनु ॥
सुलभदि पुरंदरविठलरायन ।
सेरुव ब्राह्मणनु ॥ ३ ॥

येत्याजात्या श्वासाबरोबर देवाला आठवणे हे ब्राह्मणाचे चिह्न. गारुड्याच्या पुंगीचा आवाज (अनाहत नाद) ज्याला ऐकू येतो त्यालाच ब्राह्मण असे जाणावे. पाठोपाठ सहा मजले चढतो (षट्चक्रभेद करतो) व लागलीच चंद्रामृताचे भोजन करतो (रसानुभव घेतो) तो ब्राह्मण असे निश्चित समजावे ॥ १ ॥

मोत्यांच्या पावसात अवभृत स्नान करूनही जो भिजत नाही तोच खरा ब्राह्मण. जिकडे तिकडे ज्याला चांदण्याची शिंपण झालेली दिसते त्यालाच या जगी ब्राह्मण मानावे. द्विदलाच्या सिंहासनावर (भ्रकुटिमध्यावर किंवा आज्ञाचक्राच्या ठिकाणी) स्थानापन्न होतो तोच केवळ ब्राह्मण. सहस्रदल कमलामध्ये पाऊल टाकतो तो ब्राह्मण म्हणून ओळखावा ॥ २ ॥

झळकणाऱ्या ब्रह्मरंध्रात संतोषाने योगनिद्रेचे सुख जोडणे हेच ब्राह्मणाचे लक्षण. शतकोटी सूर्यांना फिके पाडणाऱ्या शिंशुमारचक्रात[१८] जो प्रवेश करतो तो ब्राह्मण हे सत्य होय. कलियुगात हरिनामाच्या अमृताची गोडी ज्याने चाखली तो ब्राह्मण. परमात्मा पुरंदरविठ्ठल ज्याला सुलभ आहे तोच तत्त्वतः ब्राह्मण समजावा ॥ ३ ॥

4 We became spiritual mendicants, saw the light round about and partook of the sweet offerings to God

फकीररागि सुत्तेल्ल ज्योतिय कंडेवु,
सवि सवि प्रसाद उंडेवु

(राग–भूप; ताल–केरवा)

हुसेनि साहेबर बदियलि होगि ।
हसनागि नावु बंदेवु ॥ प. ॥
मसूतियोळगिन मूलव तिळिदु ।
दीन दयाळन नेनेदेवु ॥ अ. प. ॥

लाड बंधनद लाडिय कट्टि ।
ओड्याडु पंजेय हिडिदेवो ॥
सूर्य चंद्ररु एंदिगे इल्ला ।
अंदोब्ब पीरन कंडेवो ॥ १ ॥

हसरु हळदि बिळिदु केंपु ।
कुशलद चौकिय कंडेवो ॥
मुसल्मर गूड फकीर रागि ।
सवि सवि प्रसाद उंडेवो ॥ २ ॥

खतालबेंबो कत्तलेयोळगे ।
सुत्तेल्ल ज्योतिय कंडेवो ॥
उत्तर पश्चिम नवबाज वाद्यव ।
अदर भ्रमि नावु गोंडेवो ॥ ३ ॥

खालियेंबुव डोलिय मुरिदु ।
ओळगिन मूलव तिळिदेवो ॥
कलबुरगिय सिद्धेश्वरन ।
बालरागि पडकोंडेवो ॥ ४ ॥

पद ४

'माझे नेत्रीं देख शुद्ध ज्योती'।

हुसेनसाहेबांच्या जवळ जाऊन आम्ही निर्मल होऊन आलो.

मशिदीचे रहस्य कळल्यावर दीनदयाळ देवाचे स्मरण केले.

वस्त्र परिधान करून कमरेला नाडी बांधली. पंजा हातात धरला. ज्या काळी चंद्रसूर्यही नव्हते त्या काळी अस्तित्वात असलेला पीर आम्ही पाहिला ॥ १ ॥

हिरवा, पिवळा, पांढरा व लाल रंगांचा कलाकुसरीचा चौक पाहिला. मुसलमान मित्रांबरोबर फकीर होऊन गोड प्रसाद ग्रहण केला ॥ २ ॥

कत्तलरात्रीच्या अंधारात चहू बाजूंना सर्वत्र ज्योत चमकत होती. उत्तरेला व पश्चिमेला नवविध[१९] नाद झंकारले आणि आमचा देहाभिमान गळाला ॥ ३ ॥

रिकामा ताबूत मोडून त्यामागचे रहस्य ओळखले. कलबुरगीच्या सिद्धेश्वराचे शिष्य होऊन त्यांचा आशीर्वाद मिळवला ॥ ४ ॥

5 Every hair of he body has become an eye to enjoy the vision of God

शरीरदलिल रोमंगळेल्ल कंगळागि परमात्मन
दर्शनानंदवन्नु पडेयुवंतु

(वचन)

निम्म नोट अनंत सुख
कूट परम सुखवय्या
अष्ट कोटि रोमंगळू
कंगळागि नोडुत्तिद्देनु
कूडलसंगमदेवय्या ! निम्म नोडि नोडि
मनदलि रति हुट्टि निमिर्दुवेन्न कंगळु

8

6 A vision of the assembly of saints

साधुसंतर सभेय दर्शन

(राग – मिश्रकाफि; ताल – केरवा)

सै सै सै कुंतिदेने । कुंत जागदागेल्लरने ॥ प. ॥
एल्लर मुखव कंडेने । अल्लि ।
सभेयोळगे शिवन नोडिदेने ॥ अ. प. ॥

साधुसंतर सभा कंडेने ।
योगि जोगियिरुवदु नोडिदेने ॥
साग्रदलि सांबन कंडेने । ई ।
योग माडिकोंडव धन्यने ॥१॥

सभादोळगिन अर्थेन हेळलि ।
गुलाल झुम्मर हारितरी ॥
सुत्तेल्ल तारक वर्णदरी । इदु ।
तिळिदवरिगे वैकुंठदरी ॥२॥

पद ५

देवाच्या दर्शनासाठी रोमारोमाला डोळे फुटले

तुमच्या दर्शनाने डोळ्यांचे पारणे फिटले.

लिंगांगसामरस्यात परम सुख आहे. आठ कोटी रोमांचांचे डोळे तुमच्यावर खिळले होते. कूडलसंगमदेवा, तुम्हाला पुन्हा पुन्हा पाहून मनात भक्ती अंकुरली आणि माझे डोळे विस्फारले.

ಜ

पद ६

संतसभावर्णन

मी एक आसन मांडलं आणि तिथं बसल्या बसल्या मला सर्वांचं दर्शन झालं. त्या संतसभेत मी शिवाला पाहिलं.

साधुसंतांची सभा मला दिसली. तिथं योगी-जोगी होते. सदाशिवाने अग्रस्थान मंडित केलं होतं. असा योग ज्यांना साधतो ते धन्य होत ॥१॥

या सभेची थोरवी किती सांगू? तिथे गुलाल उधळतो, झुंबराचे प्रकाशकिरण फेर धरतात. अवतीभोवती नक्षत्रपुंज चमकतो. ज्यांना हा अनुभव आला, त्यांना भूवरीच हे वैकुंठ भासते ॥२॥

हसरु हळदि कुशलदोंदु ।
शेषन वर्णा तोरुवदु ॥
ईशान रूपवु ओंदोदु । एनु ।
हेळलि नानु आ छंदु ॥३॥

एंथ सुलभ इद्दानो देव ।
अल्लि एरि माडि आतन धावा ॥
द्वार तेरेदु नोडुवे अवन । पर ।
नाद दिम्मदोळु मुळुगुवे ना ॥४॥

इष्टु अर्थवु एल्लि अद ।
फणि नेत्र मध्यद नडुवद ॥
मूरु मीरिदवग तोरेद । गुरु ।
सारि हेळिदर तिळिदद ॥५॥

आत्मन अनुभव बल्लवरु ।
गुरु निंवरगि महाराज साधुरु ॥
योगद मार्ग तिळिदवरु । गुरु– ।
लिंगजंगम कूडिदवरु ॥६॥

7 Oh ! mind shine like camphor lit up with flame, drink the nectar, play in the blue palace and sleep in the cradle of the space-less void

अय्य मनवे ! उरियुव कर्पुरदंते बेळगु, अमृतव कुडि, नील मंटपदल्लि आडु, बयल तोट्टिलल्लि मलगय्य

(राग– मिश्रकाफि; ताल– केरवा)

बा बा बा एन्न मोहद मनस ॥ प. ॥
यति मुनीश्वररिगे गतिगे हच्चुव कूस ॥ अ. प. ॥

हिरव्या, पिवळ्या अशा शेषाच्या मनोहर रंगांचा पट दिसला. परमेश्वराचं एकेक रूप किती चित्ताकर्षक होतं ते शब्दांत कसं सांगू ? ॥३॥

परमेश्वर साधकांना किती सुलभ आहे ! त्याच्या जवळ जाऊन मी त्याचा धावा केला. दार उघडून मी त्याला पाहते आणि घिम् घिम् अशा दिव्य नादात बुडून जाते ॥४॥

अशी दिव्य संतसभा कुठे दिसते ? आपल्या भ्रूमध्यावरच. जो त्रिगुणातीत[१०] झाला आहे त्यालाच ते उलगडते, ज्याला गुरूपदेश मिळाला आहे, तोच हे जाणतो ॥५॥

श्री निंबरगी महाराज हे आत्मानुभवी संत आहेत. योगमार्ग जाणून ते गुरु-लिंगजंगमांशी एकरूप झाले आहेत ॥६॥

पद ७

'गुणातीत डाहाळीं पाळणा लावला ।
तेथें सुत पहुडला मुक्ताईचा' ॥

मना, हे प्रिय मना, ये रे, ये.
यतिमुनींना सद्गतीला लावणारे तू बाळ आहेस.

निंदु नी तिळियलो हटमारि कूस ।
निंदु नी तिळिदरे नीने राजहंस ॥ १ ॥

चौऱ्यांशि जन्म तिरुगि दणिदेल्लो मनस ।
भोग माडि त्यागियागि नीगि निंत कूस ॥ २ ॥

हर गुरुविन ओलिसुवदु बिरियल्लो मनस ।
नीनोलिदरे मूरु लोक ओलियुववु कूस ॥ ३ ॥

करुण गुरुविन शरण होगि मरण नीगु मनस ।
मूल गुरुविन मेले नोडि कील तिळि कूस ॥ ४ ॥

मूल सालि बीजमंत्र ओदु कलि मनस ।
आदि अनादि आचिकिन सुद्दि कद्दु हेळु कूस ॥ ५॥

साधन माडि नाद बिंदु कळे तिळियुव मनस !
नील मनेयोळु मेलु मंटपदि लोल्याडु कूस ॥ ६ ॥

अरितु अमृत गटगट कुडियुव मनस ।
वज्र बयल तोट्टिलोळु मलगुव कूस ॥ ७ ॥

उरि उंड कर्पुरदंते बेळगुव मनस ।
संग लिंग अंग सहित नुंगुव कूस ॥ ८ ॥

अरे हट्टी बाळा, तू आपले स्वरूप ओळख. ते ओळखलेस तर तू राजहंसच आहेस ॥ १ ॥

चौऱ्याऐंशीचा फेरा करून दमलास. सगळे भोग भोगून झाले, ते सोडूनही दिलेस आणि सर्व संपवून आता स्तब्ध झाला आहेस ॥ २ ॥

देवाला काय किंवा गुरूंना काय, प्रसन्न करणे काही कठीण नाही. एकदा तू प्रसन्न झालास की सारे त्रिभुवन प्रसन्न होते ॥ ३ ॥

करुणामय सद्गुरूंना शरण जाऊन मृत्यूला जिंक. त्यांच्या कृपेने विश्वाचे रहस्य लक्षात घे ॥ ४ ॥

समोर दिसणारा मूलमंत्र वाच व समजून घे.[१०१] दिक्कालातीत अशा वस्तूची वार्ता मला गुपचूप सांग ॥ ५ ॥

साधन केल्यावर तुला नाद–बिंदू–कला यांचे रहस्य कळेल आणि निळ्या महालातील सर्वांत वरच्या मंडपात (सहस्रार कमलांत) तू सुखाने लोळशील ॥६॥

ज्ञानप्राप्ती झाल्यावर तू गटागटा अमृत प्राशन करशील आणि अनंत अवकाशाच्या पाळण्यात पहुडशील (योगनिद्रा लागेल) ॥ ७ ॥

प्रज्वलित कर्पूरज्योतीप्रमाणे झगमगणाऱ्या मना, तू इतका विशाल होत जाशील की संग, लिंग व अंग यांना गिळून टाकशील (पूजा करणारा, पुजली जाणारी वस्तू व पूजासाहित्य या त्रिपुटीचा लय होईल) ॥ ८ ॥

18 Supernal Experience

परतर अनुभाव

1 Here before me shines the lustrous form of God in His indescribable glory

परमात्मन ज्योतिरूपवु वर्णिसबारद वैभवदिंद नन्नेदुरु बेळगुतिदे

(राग–पिलु; ताल–केरवा)

सदा बेळगुतदे । ज्योति ।
सदा बेळगुतदे ॥ प. ॥
सदा बेळगुतदे हृदय कमलदोळु ।
अक्को इदे इल्याद नोडु सखि ॥ अ. प. ॥

ताने तानु कुळितु । तन्नोळु ।
एनु कळेय तुंबि ॥
एनु हेळलि स्वानुभवद ।
खून तोरिसिद ज्ञान मूरुति ॥ १ ॥

तन्न ताने बेरेदु । निज सुख– ।
दल्ले मै मरेदु ॥
अल्ल हौदु इल्ले उंटु ।
बल्ल जाणरिगे सोल्ल सूक्ष्मविदु ॥ २ ॥

नित्य निरुपाधिगे । हत्तदे ।
मेरेवुदु बयलोळगे ॥
सत्तु चित्तु आनंदवागि ।
एत्त नोडलदु कर्तुमूरुति ॥ ३ ॥

१८ उच्चतर पारमार्थिक अनुभव

पद १

'देहींच पाहावी आत्मज्योती'।

ज्योत झगमगत आहे, सदैव ती झगमगतच आहे.

हृदयकमलामध्ये ही सदासर्वदा झगमग करीतच असते. सखे, पाहा, ह्या इथंच तर ती आहे.

निवांत बसल्यावर एक अवर्णनीय आभा रंध्रारंध्रात तुडुंब भरते. काय सांगावे, हा अनुभव देणाऱ्या ज्ञानमूर्ती सद्‌गुरूंची लीला कुठवर वर्णावी ? ॥ १ ॥

आत्म्याशी एकरूप होऊन ब्रह्मानंदाने विदेहावस्था आल्यावर सद्‌वस्तू अवतीभोवती सर्वत्र अनुभवाला येते. ज्ञानी लोकांनाच हे रहस्य उलगडते ॥ २ ॥

निराकार अवकाशात आत्मा विलसतो. निरुपाधींना दिसणाऱ्या ज्योतीला संसाराचा लेप लागत नाही. हा सच्चिदानंद व सर्वकर्ता आत्मा जिथे दृष्टी टाकावी तिथे असतुचि आहे ॥ ३ ॥

2 Let us learn from our master the art of reaching our Self through a number of ecstatic experiences

वगेवगेय आनंदमय अनुभवगळ मुखांतर आत्मनन्नु सेरुव कलेयन्नु सद्गुरुगळिंद कलियोण

(राग–आनंदभैरवि; ताल–दीपचंदि)

अर्तियागि बन्नि अरितु नोडुव गुरुमूर्तियिंद ।
निर्तवागि पूर्ण बेरेतु कूडुव बन्नि गुर्तादिंद ॥ प. ॥

सूर्यनिल्लदे सुप्रकाश तुंबिदे हेळलेना ।
तुरियावस्थेयल्लि बेरितु कूडुव ज्ञानि बल्ल खून ॥
बरिय मातनाडि होरेय हेळुवदल्ल अरिवु स्थान ।
परियायदिंदलि परिणमिसि नोडो परम प्राण ॥ १ ॥

चंद्रनिल्लदे बेळदिंगळ बिद्दे बहु भाळा ।
इंद्रियादिगळेल्ल हरुषागि नोडुववु सर्व काला ॥
सुंदरवाद सुवस्तुवोंदोळगद बलु मेला ।
सांद्रवाद सुख तुंबि तुळुकुतदे थळथळा ॥ २ ॥

मनद कोनेयल्लिद्द घन सुख नोडिरि नेनेदु वेगा ।
अनुभविगळिगिदु अनुकूलवागिदे ब्रह्मभोगा ॥
ना नीनेंबुव मातु एनु तालुवदल्ल राजयोग ।
अनुदिन महिपति ताने तानादनु सद्गुरुवीग ॥ ३ ॥

पद २

'ही खूण त्वां ओळखुनी घ्यावी ।
गुरुपुत्राला जाउनी पुसावी '।

आर्त भक्तीने या सद्‌गुरूंकडून परमार्थाचे रहस्य जाणून घेऊ या. परमेश्वराची खूण जाणून सदैव त्यांच्याशी एकरूप होऊन राहू या.

काय सांगू ? सूर्य नाही पण सगळीकडे प्रकाशाचा शिडकावा झाला आहे. तुर्यावस्थेत ब्रह्माला मिळून गेलेला ज्ञानीच याचे खरे रहस्य जाणतो. भाराभर भाकडकथा सांगून परमात्म्याचे निजस्वरूप कळत नाही. देव म्हणजे आपला प्राण. परोपरीचे प्रयत्न करून त्याचे दर्शन घे ॥ १ ॥

चंद्र नसूनही चंदेरी रसाचा सडा पडला आहे. आनंदित झालेल्या सगळ्या इंद्रियांचे लक्ष सतत तिकडेच आहे. एक अमोलिक मनोज्ञ वस्तू अंतर्यामी आहे. घनदाट सुखाचा प्रकाशझरा फेसाळून वाहतो आहे ॥ २ ॥

त्वरा करा आणि नामस्मरण करून उन्मनी अवस्थेतील सुखाचा सोहळा अनुभवा. हा भोगमोक्ष अनुभवी जनांना सहजसाध्य आहे. हा राजयोग आहे मी-तू-पणाची इथे बोळवण करायला हवी. महिपतींचे आपल्या सद्‌गुरुंशी अखंड ऐक्य झाले ॥ ३ ॥

3 It is impossible to find adequate words for the description of the invaluable bliss of self-realisation

आत्मानुभवद अमूल्य आनंदवन्नु वर्णिसलु सरियाद शब्दगळे दोरेयलरियवु

(राग–काफि; ताल–दादरा)

पेळलळवे स्वानुभवद सुखव मानिनी ।
भानुकोटि प्रभेगे मिगिलु कंडे कामिनी ॥ प. ॥

मूलद्वार मेट्टि मूल कोनेगेरिदे ।
मेलु मंटप आदि मूल मूर्ति होळेदिते ।
लीलेयिंद भ्रमर स्वनद नाद नुडिदिते ।
मोलविल्लदंथ स्वानंदवायिते ॥ १ ॥

नाददोळु सूसुनाद एद्दु दिम्मिते ।
बोधवडगि ब्रह्मदोळगे ऐक्यवादिते ॥
सौख्यवुंडु सुखके मेच्चि मैय मरेतिते ।
आदि अनादियागि ताने निंतिते ॥ २ ॥

उणदे उडदे उदर तुंबि उक्कलेरिते ।
उक्कलेरि इंद्रियगळ उलवु अडगिते ॥
उलवु अडगि सूसुगाळि सुम्म निंतिते ।
ओळगे होरगे ओंदे सवने कल्म बेळगिते ॥ ३ ॥

ಜ

4 Supernal experiences of vision, audition and self-identity

दिव्य दर्शन, श्रवण, आत्मैक्यगळ अपूर्व अनुभवगळु:

(राग–आनंदभैरवि; ताल–दीपचंदि)

कण्णिनोळगे नोडि कैवल्यव नीवु कण्णु तुंबि ।
वर्णिसलळवल्लु सद्गुरु चरणव निज नंबि ॥ प. ॥

पद ३

'ठावो न पवता जयाचा। मनेंसी मुरडली वाचा'।

स्वानुभवाच्या सुखाचे वर्णन शब्दांनी करणे शक्य आहे का? कोटी सूर्यांना मागे टाकणारे तेज मला दिसले गे माये.

मूलाधार चक्रावर टाच रोवून मी सहस्रार कमलापर्यंत पोचलो. त्या मंडपात एक सनातन लखलखणारी मूर्ती दिसली. सहजासहजी भ्रमरांचा गुंजारव कानी आला आणि अवर्णनीय अशा सुखाची दिवाळी झाली ॥ १ ॥

भ्रमरांच्या रुंजीतच धिम् धिम् अशी एक नादाची लाट एकदम उठली. माझे मीपण विरून गेले आणि ब्रह्माशी एकरूपता लाभली. ते महासुख भोगले आणि त्या सुखाच्या तंद्रीत देहाची क्षिती राहिली नाही. जिला स्वतःला कोणतेही कारण नाही पण जी सर्वांचे मूलकारण आहे ती वस्तू सन्मुख झाली ॥ २ ॥

न खातापिताच मी तृप्त झालो. आनंद पोटात मावेना. त्यामुळे इंद्रियांची कसमस मोडली. अशी त्यांची शक्ती खचल्यामुळे श्वासोच्छ्वास मंदावला आणि जवळजवळ थांबला (केवल कुंभक साधला). एकाएकी आत बाहेर कणाकणांतून तेज ठिबकू लागले ॥ ३ ॥

❀

पद ४

'नाद आणि ज्योति परिपूर्ण आत्मा'।

डोळ्यांची धणी पुरेपर्यंत डोळ्यांतच कैवल्य पाहा. ह्या अनुभवाचे वर्णन करायचे म्हटले तर वाचा जिथल्या तिथे पांगुळते. त्यासाठी सद्गुरूंवर श्रद्धाच ठेवली पाहिजे.

कत्तले मनेयलि रत्नद मणियिंदे नोडिकोळ्लि ।
चित्तद कोनेयलि श्रीहरि कुंताने नोडिकोळ्लि ॥१॥
ओळ होरगोंदागि होळेयुतलिरुवदु नमन माडि ।
थळथळिसुव सुवर्णद ज्योतिय तारक नोडि ॥ २ ॥
उन्मनियोळगिद ॐकार नादव केळिरय्या ।
सन्मानदिंदलि साधुसंतर बळगोंबिरय्या ॥ ३ ॥
कायवु स्थिरवल्ल मायद संसार अळियबेकु ।
कायवु इरलिक्के कमलनाभनल्लि बेरेयबेकु ॥ ४ ॥
ज्ञानियाद मेले ताने तानादहु तिळियबेकु सु– ।
ज्ञानि पुरंदरविठलरायन कूड बेरेयबेकु ॥ ५ ॥

ಜ

5 God as He appears in manifold manner to the meditating devotee

ध्यानदल्लि निरतनाद साधकनिगे परमात्मनु कांणिसिकोळ्लुव विविध वेगळु

(अ) उगाभोग

मलगि पाडिदरे कुळितु केळुव ।
कुळितु पाडिदरे निंतु केळुव ।
निंतु पाडिदरे नलिदु केळुव ।
नलिदु पाडिदरे स्वर्ग सूरेबिट्टनेंब पुरंदरविठला ॥

(आ) षट्पदि

मलगि परमादरदि पाडलु
कुळितु केळुव, कुळितु पाडलु
निलुव, निंतरे नलिव, नलिदरे ओलिव निमगेंब
सुलभनो हरि तन्नवरनर–
गळिगे बिट्टगलनु रमाधव–
नोलिसलरियदे पामररु बळलुवरु भवदोळगे ॥

ಜ

अंधाऱ्या कोठडीत एक रत्न आहे (हृदयात परमेश्वराचा वास आहे) ते पाहा. चित्तातल्या त्या हरीचा वेध लागू द्या व त्याचे दर्शन घ्या ॥ १ ॥

आत बाहेर हा भेद नाहीसा होऊन आत्मा सर्वत्र झळकू लागतो, त्याला नमन करा. चमचमणाऱ्या सुवर्णज्योतीची चांदणी पाहा ॥ २ ॥

उन्मनी स्थितीत लाभणारा ॐकार नाद श्रवण करा. साधुसंतांचा सन्मान करा आणि त्यांच्या कृपाछत्राखाली राहा ॥ ३ ॥

देह नश्वर आहे, संसार मायिक आहे, त्याचा काटा काढा. देह असतानाच कमलनाभ परमात्म्याशी ऐक्य साधा ॥ ४ ॥

ज्ञानाचा उदय झाल्यावर आत्मस्वरूपाची ओळख पटेल. ज्ञानियांचा राजा जो पुरंदरविठ्ठल त्याच्याशी एकरूप व्हावे ॥ ५ ॥

❀

पद ५

'निजल्यानें गातां उभा नारायण'।

(अ) भक्त निजून गात असेलतर परमात्मा बसून ऐकतो, बसून गायले तर तो उभा राहून ऐकतो. उभे राहून गायन केलेतर तो नाचतो. भक्ताने कीर्तनाचा नटनाच केलातर पुरंदरविठ्ठल त्याच्याकडून स्वर्गसुखाची लूट करवतो.

(आ) भक्ताने निजून अत्यंत प्रेमाने गायन केलेतर परमात्मा ते बसून श्रवण करतो, भक्त बसला असेलतर देव उभा राहतो. भक्त उभा राहून गात असेलतर तो नाचतो आणि भक्त नाचायला लागलातर देव भक्ताच्या आधीन होतो. हरी सुलभ आहे. तो आपल्या भक्तांना क्षणार्धही विसंबत नाही. मात्र त्याचे प्रेम ज्यांनी मिळवले नाही ते अभागी करंटे वाया जातात. [१०२]

❀

6 The way in which various forms of super sensuous experiences play before an aspiring mystic

बगेबगेय अतींद्रिय अनुभवगळु साधकनेदुरु सुळिदाडुव रीति

(राग–भैरवि; ताल–दीपचंदि)

कण्णारे कंडेवु चिन्मयद रूप ।
कण्णारे कंडेवु मा ॥ प. ॥

कण्णोळगिहुदु काणिसिकोळ्ळदु ।
कण्णिगे कण्णागि दोरुदु मा ॥
कण्णिनोळगिन्नु कण्णारे काणुव ।
जाणरिगे पुण्य गैसुवदु मा ॥ १ ॥

केळिकिलिहुदु केळिसगोडदु ।
केळिकेये तानागिहुदु मा ॥
केळिकेयोळिन्नु केळलु किविगोट्टु ।
घेळेनिसुत घोष गैवुदु मा ॥ २ ॥

मूडुत आडुत अडगुतलिहुदु ।
गूढ गुह्यवागि दोरुदु मा ॥
नोडेनेंदरे तन्न गूडिनोळगदे ।
हिडिदेनेंदरे कैगूडदु मा ॥ ३ ॥

थळथळगुडुत होळेवुतलिहुदु ।
सुळवु तन्न तिळियगोडदु मा ॥
ओळेनेंदरे तन्न नेले निभ दोरुत ।
ओळ होरगे तानु भासुदु मा ॥ ४ ॥

उत्तमरोळगे अत्यंतवागिन्नु ।
अत्तित्तलागदे इहुदु मा ॥
नित्य निजवाद वस्तु महिपति ।
हृत्कमलदोळु कंडनु मा ॥ ५ ॥

पद ६

'घोषाच्या कुंडीं। नादचित्रांचीं रूपडीं'।

चिन्मय ब्रह्माचे रूप मी डोळे निवेपर्यंत पाहिले हो.

डोळ्यांत आहे पण डोळ्यांना दिसत नाही. ते चिन्मय ब्रह्म डोळा होऊन डोळ्यांसमोर येते. ज्यांना ते डोळ्यांत प्रत्यक्ष दिसते ते धन्य होत रे होत ॥ १॥

ऐकण्याच्या टप्प्यात आहे पण ऐकू येत नाही. ते नादब्रह्मच आहे . कानात प्राण आणून ऐकलेतर घळ् घळ् असा विविध वाद्यांचा घोष ऐकू येणारच ॥ २ ॥

दिसते तेव्हा लपते आणि लपते तेव्हा पुन्हा दिसते. असा लपंडाव खेळते. हे गुह्यातले गुह्य आहे. पाहावे म्हटलेतर आपल्या घरट्यात दडून बसते. धरू जाता धरता येत नाही मा ॥ ३ ॥

ते झगमग झगमग करते. आपली सूक्ष्म हालचाल कुणाला कळू देत नाही. ते रूप पाहू नये म्हणून उगे राहिलेतर ते स्वयंप्रकाशात प्रकट होते. बाहेर सर्वत्र त्याची अंगप्रभा विखुरते आणि आतही प्रकाशकिरण फेर धरतात ॥ ४ ॥

संतसंगतीत ध्यान केल्यास ह्या चिन्मय रूपात अणुमात्र चलनवलन होत नाही. हे शाश्वत तत्त्व महिपतीने आपल्या हृदयकमलात पाहिले मा ॥ ५ ॥

7 Cradle-song on the birth of the spiritual son

पारमार्थिक मगन जननवन्नु कुरितु जोगुळ पद

(राग–पिलु; ताल–केरवा)

मगा हुट्टिदव्वा । एनगोव्व ।
मगा हुट्टिदव्वा ॥ प. ॥
मगा हुट्टि एन्न मायवनळिसि ।
जगा विडिसि एन्न जन्मव कडिसिदा ॥ अ. प. ॥

नव्व तिंगळव्वा । मैयेल्ल ।
नोव तिंदेनव्वा ॥
देहके हत्तद मायके निलुकद ।
मोसगारनव्वा ॥ १ ॥

मगा हुट्टिदाग । मनेयेल्ल ।
बेळक कंडेनव्वा ॥
राळ ज्योतिगळ हूव बाणगळु ।
बहळ कंडेनव्वा ॥ २ ॥

आसे अळिसिदव्वा । आरु ।
मूरु सुडिसिदव्वा ॥
घोर बट्टु एन्न पूरद ओळगे ।
सूर्य हुट्टिदव्वा ॥ ३ ॥

घट्टि तोट्टिलव्वा । आत– ।
गागि कट्टीनव्वा ॥
पंचवर्णदव्वा । प्रभुविन ।
तगु तोट्टिलव्वा ॥
तोट्टिलदोळगे विट्टन मलगिसि ।
मुट्टि तगीनव्वा ॥ ४ ॥

पद ७

'निजसुख पाळणा'।

पुत्रजन्म झाला. ऐके गे बाइये, मला पुत्रलाभ झाला.

जन्माला येऊन या पुत्राने माझा माया-मोह उद्ध्वस्त केला, संसाराची बेडी तोडली आणि जन्ममृत्यूचे रहाटगाडगे मोडले.

नऊ महिने मी पोटात त्याचे ओझे वाहिले. देहाला स्पर्श न करता जन्माला येणारा व मायेला लज्जायमान करणारा हा एक अजब जादूगार आहे ॥ १ ॥

बाळ जन्माला आलं तेव्हा सगळं घर लख्ख उजेडाने भरून गेलं. राळेच्या ज्योतीतून निघालेले असंख्य बाण व फुलबाज्या मी पाहिल्या ॥ २ ॥

आशा-शृंखलांतून मला त्याने मुक्त केले. सहा (षड्विकार)[१०३] व तीन (त्रिगुण)[१०४] जाळून टाकले. वेदना सोसून अशा तापहीन मार्तंडाला मी जन्म दिला ॥ ३ ॥

बाळासाठी मी एक वळकट पाळणा बांधला. देवाचा हा पंचरंगी पाळणा हलत-डोलत असतो. त्या धिटुकल्याला पाळण्यात निजवून मी त्याला जोजवले ॥ ४ ॥

हेसर इट्टेनव्वा । कुशलद ।
वस्तु रंगनव्वा ।।
अगाध गुरुविन तगुत नानु ।
जोगुळं हाडिदेनव्वा ।। ५ ।।

यार पुण्यनव्वा । निंवरगि ।
गुरुव तंदीदव्वा ।।
चंदागि आतन पादक होंदि ।
कंदन हडेदेनव्वा ।। ६ ।।

मी या सद्वस्तुरूप गोजिरवाण्या सानुल्याचं नाव ठेवलं. या अगाध गुरूला आंदोळत मी पाळणा म्हटला ॥ ५ ॥

हे सर्व कुणाच्या कृपेने झाले ? श्री निंबरगि महाराजांच्या कृपेने. भक्तीने त्यांचे पाय धरून मी मुलाला जन्म दिला ॥ ६ ॥

19 Effects of God-realisation—Part 1

१९ साक्षात्कारद परिणामगळु - भाग १

1 A realised soul is free from re-birth

आत्मानुभावियु पुनर्जन्मरहितनु

(राग–देस; ताल–दीपचंदि)

गुरुवे निम्माज्ञेयनु मीरदे नडेदवनु ।
नरनल्लनु वेडा परमात्मनु ॥ प. ॥
अरियद प्राणिगळु अवरेनु बल्लरु ।
परके परतरवाद परवस्तु अवनु ॥ अ. प. ॥

हेप्पु हालिगे कोडलु तुप्प अदरोळगागि ।
तुप्प कूडुवदे मरळि हालिनोळु ॥
निष्पत्ति निजरूपनादंथ पुरुषनु ।
अप्पि संसारक्के ओळगागनवनु ॥ १ ॥

नदियु ता पुट्टि अदु समुद्रव कूडलु ।
नदियु ता पोगुवदे पुट्टिदेडेगे ॥
सदमल सुज्ञानि प्रपंच माडलु ।
अदरोळु कूडिदरू बेरेयनु अवनु ॥ २ ॥

मुत्तु नीरोळु पुट्टि मत्ते नीरागुवदे ।
मुत्तु लक्षांतरके बेलेयादीतु ॥
तत्त्वद ज्ञानियवनु हुट्टव नरनल्ल ।
अत्यंत आनंद परिपूर्णनवनु ॥ २ ॥

१९ साक्षात्काराचे परिणाम – भाग १

पद १

' जन्ममृत्यापासुनि सुटला । या नांव जाणिजे मोक्ष जाला '।

हे सद्‌गुरू, तुमची आज्ञा जो कधीच उल्लंघत नाही, तो मनुष्य नाही, तर प्रत्यक्ष परमात्माच आहे.

तो खरोखर परात्पर परवस्तूच आहे, हे या अडाणी लोकांना काय समजतं ?

दुधाला विरजण लावले की तूप तयार होते. पण तूप पुन्हा दुधात मिसळून जाईल का ? तसेच जो पूर्णतया परमात्मरूपच झाला आहे तो पुन्हा संसारात अडकत नाही ॥ १ ॥

गंगा एकदा सागराला मिळाली की माघारी गंगोत्रीला जात नाही. शुचिर्भूत असा सुज्ञानी प्रपंच करत असलातरी तो प्रपंचात बुडत नाही ॥ २ ॥

पाण्यातून मोती जन्माला येतो पण त्याचे पुन्हा पाणी होईल का ? तो अनमोल मोतीच राहतो. त्याचप्रमाणे ज्ञानी पुन्हा जन्माला येणाऱ्यांपैकी नाही, तो आनंद-साम्राज्याचा चक्रवर्ती असतो ॥ ३ ॥

गरुडन मंत्रवनु कलितिरुवातगे ।
उरग कच्चिदरे विषवेरुवदे ॥
परिपरि विषयदोळु मुळुगाडिदरातगे ।
धर्म कर्मगळिंद आतगेनु ॥ ४ ॥

जातियोळु पुट्टि अजातनादवगे ।
जातिधर्मगळु आतगेनु ॥
ज्योतिप्रकाश नम्म कूडल्लरेशनु ।
दात प्रख्यात अवधूतनवनु ॥ ५ ॥

2 Who cares whether the body lives or dies when one realises oneself

तन्न ता कंड बळिक देह इद्दरू सरि, विद्दरू सरि

(राग दरबारि; ताल–केरवा)

इद्दरिरली देहा होदरे होगलि ॥ प. ॥

पंचतत्त्व भावनळिदु परम आसन मुद्रे बलिदु ।
संचितार्थ कर्म हरिदु सर्व साक्षियाद मेले ॥ अ. प. ॥

हेण्णु होन्नु मण्णु विट्टु कण्णिनोळगे कण्णु कंडु ।
कन्नडि हिडिदु नोडिदंते तन्न निजव तिळिद बळिक ॥१॥

सुत्तु सुळिव मनव निलिसि चित्तकळे पूर्ण तुंबि ।
मत्ते गंगा यमुने स्नान नित्य नेमदि माडिद मेले ॥२॥

मूल मंत्र जपवु बलिदु स्थूल सूक्ष्म कारण तिळिदु ।
कालत्रयद समयनळिदु मूलब्रह्मनाद मेले ॥३॥

गुरुविन ज्ञान कण्णिले कंडु परके परन नेनिसिकोंडु ।श्री–।
गिरिमल्लेशन कंडु परम पावननाद मेले ॥४॥

ज्याला गरुडमंत्र येतो त्याला साप चावलातरी विष चढत नाही. म्हणून ज्ञानी। जरी प्रापंचिक व्यापारात गुंतत असलातरी त्याला धर्मकर्मांचे बंधन नाही ॥४।

तो जन्माला आला असलातरी आता पुन्हा त्याला जन्म नाही. कुळजातिवर्ण हे त्याच्या बाबतीत अप्रमाण आहेत. ज्योतिस्वरूप झालेला कूडलूरेश सर्वसंग-परित्यागी असून पारमार्थिक संपत्ती सर्वांना वाटतो ॥ ५ ॥

ಜ

पद २

' देह जावो अथवा राहो '।

देह राहू दे किंवा पडू दे.

पांचभौतिक देहाची स्मृती हरपली. आसन घालून मनाची एकाग्रता व दृष्टीची स्थिरता साधली. संचित कर्माचा क्षय झाला आणि सर्वसाक्षी अवस्था आली. आता देहाची पर्वा कुणाला ?

कामिनी, कांचन व शेतभात यांचा मोह नष्ट झाला. डोळ्यांत डोळ्याचे दर्शन झाले. दर्पणात मुख दिसावे तसे स्वस्वरूप स्पष्टपणे डोळ्यांसमोर आले. मग आता देह जाईना का ॥ १ ॥

इतस्ततः हुंदडणारे मन एका जागी थबकले. चित्तात तेज तुडुंब भरले आणि गंगा-यमुनांचे नित्य स्नान होऊ लागले (इडा, पिंगला व सुषुम्नेच्या संगमापर्यंत कुंडलिनी शक्ती पोचली). यावर देहाला कोण विचारतो ? ॥ २ ॥

नाममंत्राचा वारेमाप जप झाला. स्थूल कारण व सूक्ष्म कारण समजले. भूत-वर्तमान-भविष्य अशा त्रिकालाच्या पलीकडे जाऊन ब्रह्मरूप झाल्यावर हा देह असला काय आणि नसला काय ॥ ३ ॥

सद्गुरूंचे रूप नेत्रांत साठवून परमात्म्याचे ध्यान लावून गिरिमल्लेशांच्या दर्शनाने परमपवित्र झाल्यावर देहाची क्षिती कुठली ? ॥ ४ ॥

ಜ

3 Having realised God in every nook and cranny of the universe, a saint plunges into a wonderful rapture

विश्वद मूलेमूलेगळल्लि परमात्मनन्नु कंडु संतनु
अत्यानंददल्लि मै मरेयुवनु
(राग– काफि; ताल– केरवा)

तन्न ता तिळिद मेले इन्नेनिन्नेनु ।
तन्नंते परर जीवर मन्निसि मूकाद मेले ॥ प. ॥

ताने पृथ्वि आप तेजा । ताने वायु आकाशात्मा ।
ताने सूर्य चंद्र तारा । ताने ब्रह्मांडाद मेले ॥ १ ॥

ताने जिव्हा घ्राण नेत्रा । ताने श्रोतृ त्वक्कु हृदया ।
ताने काया करणा हरणा । ताने पिंडांडाद मेले ॥ २ ॥

ताने लक्ष सावि़र नूरु । ताने हत्तोंबत्तु ऐंटेळु ।
ताने आरैदु नाल्कु मूरु । ताने एरडोंदाद मेले ॥ ३ ॥

ताने सत्ता अत्ता होत्ता । ताने नित्या सत्या अनृता ।
ताने अरिता बेरिता मरेता । ताने सर्वोंदाद मेले ॥ ४ ॥

ताने नीनु नीने तानु । तानु इल्ला नीनु इल्ला ।
ताने महंता ताने नानु । एनो एनोंदाद मेले ॥ ५ ॥

ಜ

4 When the eye has stood before the eye, the visible world will disappear and a new world of surpassing bliss will open before thy vision

कण्णिनोळगे कण्णु नेट्टु निंतागा, ईग काणुव सृष्टियु अळिदु
अनुपम आनंददिंद तुंबिद नवसृष्टियें
कंगळेदुरु निल्लुवदु

(राग – आनंदभैरवि; ताल – दीपचंदि)

दृष्टियोळगे दृष्टि नितिरु । नी नोडु सखिये ।
दृष्टवेल्ल नष्टवायितु ॥ प. ॥

पद ३

'तैसें नारायणें विश्व कोंदलें'।

स्वस्वरूपाचा अनुभव आल्यावर आता काय मिळवायचे राहिले? मी तसा दुसरा अशी जाण आल्यावर शब्दाला निःशब्दता आली.

साधक स्वतः पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश झाला. सूर्य, चंद्र, तारेच काय, तो संपूर्ण ब्रह्मांडही झाला ॥ १ ॥

जीभ, नाक, डोळे, कान, त्वचा व हृदय आपणच, शरीर आपण, इंद्रिये आपण, प्राण आपण व पिंडाडही आपणच झाला ॥ २ ॥

लक्ष, सहस्र, शंभर, दहा, नऊ, आठ, सात, सहा, पाच, चार, तीन, दोन, एक[१०१] या सर्व संख्या परमेश्वराकडेच बोट दाखवतात हे त्याच्या लक्षात आले ॥३॥

तो स्वतःच मेला, स्वतःच रडला, स्वतःला त्याने खांदा दिला. आपणच नित्य, सत्य व असत्यही आहोत अशी त्याला ओळख पटली[१०२]. जाणणारा तोच, एकरूप होणारा तोच व विसरणाराही तोच असा सर्व काही तोच झाला ॥ ४ ॥

आपणच दुसरा, दुसराही आपणच. आपणही नाही व दुसराही नाही. तोच महंत[१०३] व तोच मीही झालो. सर्वच ब्रह्ममय झाले, मग आता मिळवायचे काय? ॥ ५ ॥

पद ४

'डोळियाचा डोळा उघडिला जेणें। लेववियें लेणें आनंदाचें'।

सखे, माझी दृष्टी दृष्टीतच खिळली आणि विश्वाभास मावळला.

काष्ठवेल्ल कडेगे ओत्ति । दृष्टवन्तु मीरि निंतु ।
सृष्टियोळगे तुष्टि गैंदेने ॥ अ. प. ॥

कर्मवेल्ल काणदे होयितु । ई सर्व काल ।
धर्मवेल्ल तृगि निंतितु ॥
सर्ववेल्ल इन्तु मत्ते । उर्वियोळगे जनिसलागि ।
पर्वताग्र भूमियिन्तु निर्विकार तोरितल्ला ॥ १ ॥

ऐदु मंदि कूडि बंदरु । कूडि बंदु ।
ऐदकैदु अगलदादरु ॥
ऐदरोळगे नोडलिन्तु । ऐदकैदु ताने एल्ला ।
ऐदरोळगे बंदु निंतेने ॥ २ ॥

हिंदु एंदु कंडिदिल्लवे । इंथा सुखव ।
मुंदु नानु यारिगुसुरले ॥
तंदे गुरु भवतारकन पाद । होंदिदवरिगे केळिदेनो ।
एंदिगिंदिगे हींगे अंबुवरे ॥ ३ ॥

5 Various activities of the saint maddened by love of God

परमात्मन प्रीतियिंद मत्तनाद संतन विविध चटुवटिकेगळु

(राग– मिश्रकाफि; ताल– केरवा)

एंथा हुच्चु हिडिदीतिवग ।
यारु कलिसिबिट्टरव्वा ॥
अंतु अवनु एनेनाद ।
संतानळिदु निःसंतानाद ॥ प. ॥
कट्टिद गोडे केडवुतलान ।
उट्ट अरिवि हरिवुतलान ॥
अट्ट गडिगि एल्लने ओडेदु ।
हुट्टा मुरिदुबिट्टानव्वा ॥ १ ॥

माझे कष्ट पुरते पुरते संपले. या दृश्य सृष्टीचे नश्वरत्व पटले आणि या जगात असतानाच तुष्टी मिळाली.

सर्व कर्मे (संचित व क्रियमाण) दिसेनाशी झाली. धर्माची हालचाल काही काळ झाली व थांबली (प्रारब्धाची दोरी हलत राहिली आणि प्रारब्ध भोगून संपले). एक नवी सृष्टी माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. जमिनीपासून अस्मानापर्यंत सर्व काही निर्विकार ब्रह्मतत्त्वाने व्यापले होते ॥ १ ॥

पाचजण मिळून आले. मिळून येऊन पंचवीस तत्त्वे झाली. ती वेगवेगळी राहिली नाहीत. पाचांची परीक्षा केलीतर हे कळते की पंचवीस[१०८] तत्त्वे मीच आहे. मी पाचात येऊन राहिलो ॥ २ ॥

पूर्वी असे सुख कधीही अनुभवले नव्हते. आता ह्या सुखाचे वर्णन मी कुणापुढे करू ? सद्गुरू भवतारकांना शरण गेल्यावर कळले की अनादिकालापासून हीच भाषा चालत आली आहे ॥ ३ ॥

पद ५

'जगात पिशाच्च अंतरीं शहाणा'।

याला किती जबरदस्त वेड लागले आहे हो ! कुणी याला हे वेड लावले ? याची स्थिती काहीच्याबाहीच झाली आहे. जन्ममरण थोपवून त्याने पुनर्जन्माच्या येरझारा चुकविल्या.

बांधलेली भिंत त्याने कोलमडून टाकली, नेसलेली वस्त्रे फाडून टाकली. स्वयंपाकाची गाडगी-मडकी फोडली आणि पळीची मोडतोड केली ॥ १ ॥

तन्न देहद सुखवनरिया ।
परर सुखवनेनु बल्ला ॥
तन्न माता ताने हेळि ।
इन्नु एष्टु नगुतिहनव्वा ॥ २ ॥

हम्मु दम्मनेल्लानळिदा ।
ब्रह्मनेंबुद ताने तिळिदा ॥
सृष्टियोळु कूडलूरेशन ।
बट्ट बयल प्रभेयादा ॥ ३ ॥

6 Description of the state of divine lunacy

दैवी उन्मादावस्थेय बण्णने

(राग–मिश्रकाफि; ताल–केरवा)

हुच्चु हिडियितु एनगे हुच्चु हिडियितु ।
अच्युतन नामवेंब मेच्चु मद्दु तलेगे एरि ॥ प. ॥

वासुदेव हरिये एंदु वदनदिंद ओदरुवे । माय– ।
पाशवेंब अंगियन्नु हरिदु हरिदु हाकुवे ॥ १ ॥

केशवगेरिसिद हूव मुडिदु कुणिदु आडुवे । केट्ट ।
दोषवेंब गोडेयन्नु केदरि केदरि हाकुवे ॥ २ ॥

कृष्णनंघ्रि कमलदल्लि सोरगि कोरगि बीळुवे । भव– ।
कष्टवेंब कुंभवन्नु ओडेदु ओडेदु हाकुवे ॥ ३ ॥

निष्ठरन्नु कंडु अवर हिंदे हिंदे तिरुगुवे । कडु ।
दुष्टरन्नु कंडु कल्लुकल्लिनिंद बीसुवे ॥ ४ ॥

बंधु बळगदवरोळुदासीननागि बाळुवे । एन्न ।
तंदे पुरंदरविठलन्न नेनेदु कुणिदु हाडुवे ॥ ५ ॥

स्वतःच्या देहाचे सुखच जर त्याला समजत नाही, तर इतरांच्या सुखाची काय कथा ? आपल्याच गोष्टी सांगून तो खुळा अजून कितीतरी हसतो आहे ॥ २ ॥

दंभदर्पांना त्याने तिलांजली दिली. आपण ब्रह्मच आहोत, याची त्याला प्रचिती आली. या जन्मातच कूडल्गरेशाच्या अनंत दीक्षीशी तो एकरूप झाला ॥३॥

पद ६

' या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेपरें ' ।

अच्युताच्या नावाचे आवडते मादक द्रव्य मला चढले आणि मला वेड लागले.

हे वासुदेवा, हे हरी, अशी मी मुखाने गर्जना करतो. मायापाशरूपी सदऱ्याच्या चिंध्या चिंध्या करतो ॥ १ ॥

केशवाला वाहिलेले फूल मी आपल्या केसात माळतो, नाचतो आणि खेळतो. दुर्गुणांची भिंत पोखरून टाकतो ॥ २ ॥

क्षीण होऊन काष्ठवत् झालेला माझा देह कृष्णाच्या पादकमलावर मी झोकून देतो. संसारदुःखरूपी कुंभाची तोडफोड करतो ॥ ३ ॥

निष्ठावान भक्त दिसले की मी त्यांची पाठ सोडत नाही पण दुष्टांवर सरळ दगडफेक करतो ॥ ४ ॥

बंधुबांधव, सगेसोयरे यांच्याबद्दल मी उदासीन असतो. मात्र बाप पुरंदर-विठ्ठलाचे स्मरण करून नाचतो आणि गातो ॥ ५ ॥

7 Intoxication through God-realisation

परमात्मन साक्षात्कारदिंदुंटाद आनंद-परवशते

(राग मांड; ताल केरवा)

सद्गुरु साकिद मद्दानि वरुतिदे ।
एद्दु होगिरि इद्द निंदकरु ॥ प. ॥
विद्दु भवदोळु होरळ्याडु जनरन्नु ।
उद्धार माडुत वरुतलिदे ॥ अ. प. ।

आकाश नोडुत वायुव नुंगुत ।
झेंकरिसुतलद्दु वरुतलिदे ॥
ॐकील हिडिदु चौंक पीठदि बंदु ।
आनंद भरितागि वरुतलिदे ॥ १ ॥

अष्ट मदगळेंबो दुष्ट नीचर नीगि ।
शिष्टिले सीळ्याडि वरुतलिदे ॥
हुट्टु सावुगळेंबो हादि बट्टेय कट्टि ।
सुट्ट काम क्रोध वरुतलिदे ॥ २ ॥

प्रणम स्वरूपव अनुदिन नोडुत ।
घन सुखदल्लिद्दु वरुतलिदे ॥
प्रणयि कल्मेशनोळ् मन मग्नवं माडि ।
चिन्मयात्मनागि वरुतलिदे ॥ ३ ॥

पद ७

' आला हो आला आला ।
गणराज माझा आला ' ।

निंदकहो, सद्‌गुरूंनी पाळलेला मदोन्मत्त हत्ती येतो आहे, इथून उठून जा.

संसाराच्या खाईत लोळणाऱ्या लोकांचा उद्धार करत करत तो येत आहे.

आकाशाकडे पाहात (ऊर्ध्वदृष्टी करून), वायूला गिळत (प्राण–अपान थांबवून, कुंभक करून), चीत्कार करत (आनंदोद्‌गार काढत) हा हत्ती झुलत आहे. चार गंडस्थळे असलेल्या आपल्या मस्तकासमोर आपल्या सोंडेने तो ॐकार रेखतो (शृंगाटकाजवळ ॐकार नादाचा[१०९] अनुभव घेतो) व आनंदभरित अशा अवस्थेत येतो ॥ १ ॥

अष्टमदरूपी[११०] दुष्टांना तो रागारागाने भिरकावून देतो. जन्ममृत्यूच्या वाटा रोधून टाकतो व कामक्रोधांची दाणादाण उडवतो ॥ २ ॥

रोजच्यारोज प्रणवस्वरूपाचे दर्शन घेत, तो महदानंदात येत आहे. प्रेमस्वरूप कल्मेशामध्ये[१११] मनोलय करून, चिन्मय आत्म्याशी एकरूप होऊन हा हत्ती येत आहे ॥ ३ ॥

20 Effects of God-realisation – Part 2

२० साक्षात्कारद परिणामगळु – भाग २

1 Spiritual life as a life of the highest type of activity

पारमार्थिक जीवनवु उन्नततम चटुवटिकेय जीवन

(राग– दरबारि; ताल–दीपचंदि)

ब्रह्मानंदद सुखवेनु निनगे ।
सुम्मनिद्दरे ह्यांगागुवदरुवे ॥ प. ॥

द्वारगळोंबत्तु बागिल मुच्चुव तनक ।
परम प्रकाशद कद तेरेयुव तनक ॥
हरिव त्रिनदि संगम दाटुव तनक ॥
एरडु दारिय बिट्टु नडु होगुव तनक ॥ १ ॥

रंग मंटप पोक्कु स्थिरवागुव तनक ।
हिंगद रविकोटि प्रभे काणुव तनक ॥
कंगोळिसुवनार्भट केळुव तनक ।
कंगळल्लि कण्णु कंडु बेरगागुव तनक ॥ २ ॥

घन महालिंगन पूजि आगुव तनक ।
अनुहतदिंद मै मरेदिरुव तनक ॥
मनसिन मैलिगि तोळेदु होगुव तनक ।
दिनकर वसवन दयवागुव तनक ॥ ३ ॥

२० साक्षात्काराचे परिणाम – भाग २

पद १

'तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं । चूडारत्न' ।

ब्रह्मानंदाच्या सुखाशी तुझी ओळख आहे का ? हातपाय जोडून स्वस्थ बसलास तर ब्रह्मानंद कुठे दृष्टीस पडेल बरं ?

आधी नऊ द्वारांना[११२] कुलुपे घालून परम प्रकाशाचे दहावे द्वार खुले कर. धो धो वाहणाऱ्या तीन नद्यांच्या संगमाच्या पार जा (सत्त्व, रज, तम यांच्या पलीकडे जा). दोन रस्ते सोडून मधल्या रस्त्यात प्रवेश कर (एक अर्थ :– अति सर्वत्र वर्जयेत् या वचनानुसार केव्हाही सुवर्णमध्य गाठ. दुसरा अर्थ :– इडा-पिंगला यांचा मार्ग सोडून सुषुम्नेच्या मार्गाने जा) ॥ १ ॥

प्रथम रंगमंडपात (सहस्रार कमलात) शिरून स्थिर होणे जरूर आहे. नित्य उजळलेल्या कोटी सूर्यांचा प्रकाश नजरेत साठवावा. अनाहत नाद ऐकून व डोळ्यांत डोळा पाहून आश्चर्यात बुडून जावे ॥ २ ॥

पहिल्याप्रथम परमपवित्र महालिंगाची पूजा कर. अनाहत नाद ऐकून तुझा जीवभाव गळून पडू दे. मनातील वासनारूपी मळाचे क्षालन कर. असे केल्यावर दिनकरसवाची कृपा प्राप्त होईल. त्याशिवाय ब्रह्मानंदाचे सुख कसे हाती येईल ? ॥ ३ ॥

2 Vision of the Atman everywhere confers on the aspirant perfect equality

एल्लेल्लियू आत्मदर्शनवाद साधकनिगे पूर्ण समदृष्टि उंटागुवदु

(राग – भूप; ताल – केरवा)

एंदु मैया मरेसि इदरंते ।
ई जगवेल्ल शिवमयवागुवंते ॥ प. ॥
हुलि करडि नोडिदरे आकळंते ।
विषद हावु चेळु कंडरे कूसिनंते ॥ अ. प. ॥

सूळि गेळेयरु कूडि बंदरे हिग्गुवंते ।
नम्म तायितंदेयेंदु पादक्केरगुवन्ते ॥
रात्रि तुडुगरु बंदरे सद्गुरुविनंते ।
इद्देल्ला कोट्टु काल हिडियुवंते ॥१॥

वैरि होडेयलिक्के बंदरे नगुवंते ।
ना बडिसिकोंडु काल हिडिदुकोळ्ळुवंते ॥
तन्न कै मुट्टि देह कडिदुकोडुवंते ।
गुरु आशीर्वाद पूर्ण आयितंते ॥२॥

वादवेल्ल वेदार्थ आगुवंते ।
ना अर्थ माडि हाड्याडि नगुवंते ॥
पडुचिगळु वेविन कायि तिंदंते ।
निम्म नामद रसवु जेनुतुप्प सुरिदंते ॥३॥

ई दृश्यवेल्ल शिवमयवागुवंते ।
ई दृश्यविल्लदागि अडगि होगुवंते ॥
शब्ददोळु शब्द होगि कूडुवंते ।
निःशब्ददोळु ॐकार पाडुवंते ॥४॥

पद २

'मग जयातयाकडे। ब्रह्मेचि दिठी उघडे'।

देहावरील ममत्व ओसरून, केव्हा बरे मला जग शिवमय दिसेल ?

वाघ व अस्वल मला गाईप्रमाणे सोज्वळ दिसावेत, विषारी साप-विंचू निष्पाप बालकाप्रमाणे भासावेत.

पाऊल वाकडे पडलेली माणसे माझ्यासमोर आलीतरी मायबापांप्रमाणे मी त्यांना नमस्कार करण्याइतकी समदृष्टी मला केव्हा लाभेल ? रात्री अपरात्री आलेल्या चोरांपुढे आपले द्रव्य ठेवून ते सद्गुरूंचीच रूपे आहेत असे मानून त्यांना नमस्कार करण्यास मी केव्हा शिकेन ? ॥१॥

शत्रू चालून आल्यावर, मी हसावे आणि त्यांचा मार खाऊन त्यांचे पाय धरावे. माझ्या देहाचे मी आपल्या हाताने तुकडे तुकडे करून त्यांना अर्पण करावे व ही संधी सद्गुरूंच्या आशीर्वादानेच आली आहे असे मानावे ॥२॥

वितंडवाद सुद्धा वेदमंत्रच आहेत असे मला वाटले पाहिजे. त्या दिव्य मंत्रांचा अर्थ लावून, त्यांचे सामगायन करून मी मनाशी हसावे. षड्रसपक्वान्ने[१७] निंबोळ्यांप्रमाणे कडू लागावीत आणि देवाचे नाम मात्र मधाप्रमाणे गोड लागावे ॥३॥

दृश्य विश्व शिवमय होवो. शिव प्रकट झाल्यावर दृश्य जग दिसेनासे होईल. शब्द नादब्रह्मात विरून जावा (जीव शिवात मिसळून जावा). निःशब्द अवस्थेत ॐकाराचा गंभीर ध्वनी घुमावा ॥४॥

कत्तलि गित्तलि गोत्तु इल्लदंते ।
ना अल्लि इल्लि एल्लि एनु एंबुवंते ॥
तारे कडिदु सूर्य केळगे बंदंते ।
गुरु नंद्याळ संगन दय पूर्णत्रागुवंते ॥५॥

8

3 Ecstasy through moral warfare

नैतिक काळगदिंद लभिसिद आनंदपरवशते

(राग - मिश्रकाफि; ताल-केरवा)

दणियदे मलगिदेनो । नानु ।
दणियदे मलगिदेनो ॥ प. ॥

मणिदु गुरुविगे । हणिदु शत्रुव ।
हरिसि रक्तव कुणिसि तलेगळ ।
धणि धणि धणि धणि नादव केळुत ।
मणिमंटपदुन्मनि बैललि ना ॥ १ ॥

हरिसि तापवनु । कालिले । वरिसि ममतेयनु ।
तरिसि संशय हरिसि दुर्गुण ।
कोरिसि व्यसनव जारिसि मदगळ ।
सुरिसुरि सुरिदु सुधारस रंजक ।
मेरेव सहस्रदळ मंचद मेले ॥ २ ॥

तडेयो वायुगळनु । तुंडागि । कडियो क्लेशगळनु ।
मडियो संशय बडियो शत्रुव ।
किडिकिडि उदुरिसि मोहाज्ञानगळ ।
बिडि मुत्तुदुरुव हंसतल्पद मेले ॥ ३ ॥

काळोखाबिळोखात तोंड लपवावे, मी इथे आहे की तिथे आहे, की आणखी कुठे आहे ह्याची शुद्ध हरपावी. नक्षत्रमंडल छेदून सूर्य खाली येतो त्याप्रमाणे गुरू नंद्याळसंगांची कृपा माझ्यासमोर अवतरावी ॥५॥

पद ३

'जैत रे जैत'।

मी यत्किंचितही दमलो नव्हतो पण मला झोप (योगनिद्रा) लागली.

मी सद्गुरूंना नमन केले. शत्रूला इतके झोडपले की त्याच्या रक्ताची नदी वाहिली. त्याचे शिर सैन्यात मिरवले. उन्मनी अवस्थारूपी रत्नखचित मंडपात घणघण घंटानाद ऐकत मी झोपलो ॥ १ ॥

तापाचे मूळ खणून काढिले, ममतेला नामशेष केले, संशयाला नेस्तनाबूद केले, दुर्गुणांना देशोधडीला लावले, संकटांना भीक घातली नाही, अष्टमदांची गठडी वळली आणि सहस्रदल कमलाच्या मंचकावर स्वादिष्ट अमृताचे भुरके मारत पहुडलो ॥ २ ॥

श्वासोच्छ्वास संथ केले, क्लेश छिन्नभिन्न केले, संशयाचा उच्छेद केला, शत्रूला नामोहरम केले. मोह व अज्ञान यांचा कणा मोडला आणि मोत्यांचा वर्षाव होत असलेल्या हंसमंचकावर झोपलो ॥ ३ ॥

अळिदे ममतेगळनु । कालिले । तुळिदे व्रतगळनु ।
कळिदे व्यसनव अळिदे सोक्कव ।
एळदे न्यायव बळिदे मोहव ।
थळ थळ थळ वेळदिंगळिनोळु ।
बल्ल चिदानंदन वेळकिनोळु ॥ ४ ॥

ಜ

4 Will he who has plunged in the bliss of the Eternal have his mind ever conjured up by the ephemeral ?

नित्यानंदद्दलि नेलेसिरुववनु अनित्यव वयसुवने ?

(**राग–पिलु; ताल–केरवा**)

काल कर्मव कालिले ओदिदव ।
कत्तलिगंजुवने ॥
आलिय मेलात्मन निलिसिद पुरुष ।
बालेर वयसुवने ॥ १ ॥

अमृतद तृप्ति आद महिमनु ।
अंबलि वयसुवने ॥
कुंभक वायु निलिसिद मनुजनु ।
कुंदि कुदियुवने ॥ २ ॥

वेद आगमव साधिसिदव भव– ।
बाधेगे अंजुवने ॥
नित्यानंद आनंददोळिदव ।
अनित्य वयसुवने ॥ ३ ॥

तत्त्वमसि महावाक्य केळिदव ।
मृत्युविगंजुवने ॥
आदि मूरुति गुरु भवतारकनु ।
भेदव माडुवने ॥ ४ ॥

ಜ

ममतेचा पाश तोडला, व्रतवैकल्ये पायांनी तुडवली, व्यसनातून मुक्त झालो, गर्वाची नावनिशाणी पुसली, न्यायनीतीची सोबत घेतली, मोहाची खोड जिरवली आणि पिठासारख्या शुभ्र चांदण्यात, ज्ञानी चिदानंदांच्या प्रकाशात झोपलो ॥४॥

पद ४

'जो अमृतासी ठी ठेवी । तो जैसा कांजी न सेवी' ।

काल आणि कर्म यांना जो पायाने लाथाडून देतो त्याला काय अंधाराची भीती वाटेल ? ज्याच्या डोळ्यात परमेश्वराचे रूप भरलेले आहे तो विकारवश होईल का ? ॥ १ ॥

जो भरभरून अमृत पिऊन तृप्त झाला, तो कधी कांजी उष्टावेल का ? केवल कुंभक[११४] करण्याची ज्याच्या अंगात धमक आहे तो हातपाय गाळून नुसता झुरत बसेल का ? ॥ २ ॥

निगम आगमांना[११५] कंठी धरणाऱ्यावर भवरोगाची छाया कुठली ? नित्यानंदाच्या सागरात ज्याने बुडी दिली आहे, त्याला अनित्याची भूल कशी पडेल ? ॥३॥

तत्त्वमसि[११६] हे महावाक्य ज्याच्या पचनी पडले त्याला मृत्यू विचलित करील का ? ज्याला अद्वैतबोध झाला त्याची भेदबुद्धी मावळून जाते ॥ ४ ॥

5 Post-ecstatic monologue

आत्मानंदपरवशतेयल्लिय स्वगत भाषण

(राग--भैरवि; ताल- दीपचंदि)

इन्नेनिन्नेनु एनगिन्नु ।
इन्नेनिन्नेनु ॥ प. ॥
एन्नोळु तन्न मर्मव तोरिद ।
इन्नेनिन्नेनु ॥
सुन्निन कर्मवु निर्मूलवायितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
एन्नोळात्मन कुरुहवु तिळियितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
कनसु मनसु एल्ल निन्न सेवेयायितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
भावद वयलाट निजवागि तोरितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
जीव शिवद गति सोह्यवु तिळियितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
जन्म मरणद जंत्रवु सुरियितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
संदेह संकल्प सूत्रवु हरियितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
इम्मनविद्दु ओम्मनवायितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
महिपति जीवन पावनवायितु ।
इन्नेनिन्नेनु ॥
तन्नोळु भास्कर गुरु ताने आदनु ।
इन्नेनिन्नेनु ॥

पद ५
'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां'।

मला आता मिळवायचे असे राहिले तरी काय ?

परमार्थाचे रहस्य सद्‌गुरूंनी मला माझ्या ठिकाणीच दाखवले, आता काय मिळवायचे ?

संचिताचा नायनाट झाला, आता काय मिळवायचे ?

अंतरात्म्यातच परमार्थाची ओळख पटली. आता काय मिळवायचे ?

जागेपणी काय किंवा स्वप्नात काय मी सदा तुझ्या सेवेतच रंगतो, आता काय मिळवायचे ?

भावनांचा खेळ खरा खरा कळल्यावर आणि सर्व संकल्प सत्य झाल्यावर आता काय मिळवायचे ?

जीव-शिव यांच्या सामरस्याची प्रचिती येऊन सोहंचा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर मिळवायचे ते काय ?

जन्ममरणाचे रहाटगाडगे मोडून पडले, आता काय मिळवायचे ?

संशयाचा धागा तुटला, आता काय मिळवायचे ?

मन द्विधा होते ते एकाग्र झाले. आता काय मिळवायचे ?

महिपतीचे जीवन पावन झाले, आता काय मिळवायचे ?

आपले सद्‌गुरू भास्करयती व आपण एकच झाल्यावर आता काय मिळवायचे ?[११७]

6 Beatificatory ejaculation consequent upon the company of saints and the attainment of grace and vision of God

हरिदासर संगवू नंदकंदन ओलुमे-दर्शनगळू
लभिसिदुदरिंद होरहोम्मिद धन्योद्गार

(राग – भैरवि; ताल – दीपचंदि)

हरिदासर संग दोरकितु एनगीग इन्नेनिन्नेनु ।
वर गुरु उपदेश सफलवाय्तु एनगीग इन्नेनिन्नेनु ॥ प. ॥

हलवु देवगळेंब हंबल बिडिसितु इन्नेनिन्नेनु ।
जलजनाभन नाम जिव्हेयोळु नेलेयितु इन्नेनिन्नेनु ॥ १ ॥

मायद संसार ममकार तग्गितु इन्नेनिन्नेनु ।
तोयजाक्षन ध्यान हृदयदोळु नेलेसितु इन्नेनिन्नेनु ॥ २ ॥

तंदे तायि मुचकुंद वरदनाद इन्नेनिन्नेनु ।
संदेहविल्ल मुकुंद दय माडिद इन्नेनिन्नेनु ॥ ३ ॥

एनेंदु हेळलि आनंद संभ्रम इन्नेनिन्नेनु ।
आ नंदकंदन ओलुमेय गळिसिदे इन्नेनिन्नेनु ॥ ४ ॥

एन्न वंशगळेल्ल पावनवादवु इन्नेनिन्नेनु ।
चिन्मय पुरंदरविठलय्य दोरकिद इन्नेनिन्नेनु ॥ ५ ॥

ಜ

7 The assembly of saints as a kingdom of God on earth

भूकैलासदंतिरुव संतर सभेयाद अनुभव मंटप

(राग– भूप; ताल– दीपचंदि)

इदे अनुभव मंटपवु ॥ प. ॥
इदु घनतर मोक्षदुन्मनिय साधनवु ॥ अ. प. ॥

पद ६

'धन्य आजि दिन संतदरुशनाचा'।

मला संतसंगती लाभली, आता काय राहिले ? सद्‌गुरूंचा उपदेश फळाला आला, आता काय राहिले ?

नाना देवतांचे उंबरे पुजणे आज सुटले; आता काय राहिले ? नारायणाचे नाम जिभेत रुजले, आता काय राहिले ? ॥ १ ॥

संसाराची ओढ सुटली, अहंकार ओसरला, आता काय राहिले ? हृदयात कमलाक्षाचे ध्यान लागले, आता काय राहिले ? ॥ २ ॥

श्रीकृष्णच माझे आई-बाप झाले, आता काय राहिले ? देवाची कृपा झाली आणि यावद्‌बलचा माझा संदेह फिटला, आता काय राहिले ? ॥ ३ ॥

काय सांगावे ? आनंदाला उधाण आले, आता काय राहिले ? श्रीकृष्णाची प्रीती मला मिळाली, आता काय राहिले ? ॥ ४ ॥

माझ्या बेचाळीस कुळांचा उद्धार झाला, आता काय राहिले ? चिन्मय पुरंदर-विठ्ठलाची प्राप्ती झाली, आता काय राहिले ? ॥ ५ ॥

ꕥ

पद ७

'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी'।

हाच तो अनुभवमंटप.
हेच उन्मनी अवस्थेतून मिळणाऱ्या श्रेष्ठ मोक्षाचे साधन.

इदे गुरु चर लिंग स्तोत्र ।
इदे करस्थल-इष्ट–प्रणम ॥
इदे षट्स्थल– ब्रह्मघोष ।
इदे प्रांजळ ब्रह्मज्ञान ॥ १ ॥

गुरुतर शरणरने करेसि ।
परमात्मननुभव मंटपव विस्तरिसि ॥
उरद कन्नडिय शृंगरिसि ।
गुरुमूर्ति जंगमरंघ्रि पूजि विस्तरिसि ॥
करडि कंसाळ रुद्रवीणेयु ।
मेरेव झांगटि ताल मद्दलि ॥
सुररु घनरु आडु पाडुत ।
नेरेव धुमु धुमु घडने आगुत ॥ २ ॥

वडवाग्नि मंटपदोळगे आ ।
मृडनु ओलिदु अनुभावदुज्वलिगे ॥
पोडवियोळु शरण संततिगे ॥
कडलु उक्कितु गिरियु करगितु ।
षट्स्थलदोळु तुंबि तुळुकितु ॥
गुडुगु होडेदितु सिडिलु मिंचितु ॥
विडदे जलदोळु ज्योति उरियितु ॥ ३ ॥

शशि भानु वक्रदोळिरलु नाल्कु ।
देशद भक्तरु लयदोळिरलु ॥
भसित रुद्राक्षि मालेयोळु ॥
एसेव जंगम बंद मार्गदि ।
हृषितदाडुव शिशुविनंददि ॥
बसवसंततियाद प्रमथरु ।
पडेदरागतिहर्ष मनदोळु ॥ ४ ॥

इथेच गुरुलिंगजंगमांची स्तुतिस्तोत्रे गायिली जातात. इथेच करस्थलावरील इष्ट-लिंगाची ॐकार नादाने आळवणी केली जाते. हा नाद षट्स्थलांतून घुमतो. हीच ब्रह्मज्ञानप्राप्तीची जागा ॥ १ ॥

या ठिकाणी मोठमोठ्या साधुसंतांना पाचारण केले जाते व त्यांच्यात परमार्थाची चर्चा होते. त्यांच्या हृदयाच्या आरशात त्यांचे पारमार्थिक वैभव उमटते. जंगमांच्या पाद्यपूजेचा सोहळा इथेच साजरा केला जातो. इथे ढोल, घंटा, रुद्रवीणा, झांजा, टाळ, मृदंग यांसारख्या वाद्यांचा घोष होत असतो. प्रत्यक्ष देवच मोठ्या आनंदाने सामगान करतात आणि त्या गजराने अवघे विश्व दुमदुमते ॥ २ ॥

वडवाग्नीच्या या मांडवातच साधुसंतांच्या व शिष्यगणांच्या भक्तिभावावर शिव प्रसन्न झाला. या इथेच सागराला भरती आली, पर्वत वितळला, षट्स्थले उज्ज्वल अनुभूतीने ओतप्रोत ओथंबली, घनगर्जना झाली, विजेचा लोळ उठला आणि वह्निज्वालांची परंज्योत निरंतर पाजळायला लागली ॥ ३ ॥

एका शुभ दिवशी चारी दिशांनी आलेले भक्त आपली दृष्टी भ्रूमध्यावर खिळवून ध्यानमग्न झाले होते. त्या वेळी महाज्ञानप्रभेने तळपणाऱ्या एका जंगम-मूर्तीने (अल्लमप्रभूंनी) मंडपात प्रवेश केला. तपःपूत देह भस्मविभूषित होता, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा रुळत होत्या. निष्पाप बालकांनी खेळताना खुषीत येऊन जयजयकार करावा तसा प्रभुदेव आल्यासरसा बसवेश्वरांच्या श्रेष्ठ शिवशरणांनी अत्यानंदाने शिवघोष केला ॥ ४ ॥

मुन्न कल्याण पट्टणदि ।
चेन्नवसवदेशिकननुभव मंटपदि ॥
रत्न केच्चिद सिंहासनदि ॥
वण्ण हरियितु चिन्नवायितु ।
होन्न कळसव शून्य नुंगितु ॥
तानु तन्नोळु आद मेले ।
चेन्नवसवन ज्योति नुंगितु ॥ ५ ॥

बयलु आदवरेल्ल बयलु ।
निर्बयल मट्टिय कट्टि हिडिदरेंबुवरु ॥
सहाय संपत्तुळळवरु हीगे ।
न्याय माडुतलवरु सत्तिल्लिद्दवरु ॥
कायरहित जीवरहित । मायरहित वेरट्टुरेश ।
छाय रूप षडक्षरि मन– । वायितिंदनुभाव मंटपवु ॥६॥

कल्याण नगरातील अल्लमप्रभूंच्या त्या मंडपात एक रत्नखचित सिंहासन होते. त्या ठिकाणी एकाएकी रंगांचा झिम्मा सुरू झाला व सोनेरी छटा सर्वत्र कोंदली. अनुभवमंडपाचा कळस शून्यात विराला. चेन्नबसवांना स्वरूपसाक्षात्कार झाला आणि ते ज्योतीमध्ये लीन झाले ॥ ५ ॥

ज्यांना निराकाराचा साक्षात्कार झाला होता ते स्वतःच शिवरूप झाले व परमपदाचे मानकरी झाले. न्यायमार्गाचा अवलंब करीत आलेल्या त्या भक्तांना ऐश्वर्यप्राप्ती झाली. ते जीवन्मुक्तच होते. कायारहित, जीवरहित, मायारहित[११८] अशा सद्गुरू वेरट्टुरेशांची जणू छायाच असलेल्या षडक्षरींचे मनच आता अनुभवमंटपात पूर्ण विलीन होऊन गेले ॥ ६ ॥

परिशिष्ट १

मूल इंग्लिश ग्रंथदल्लि उल्लेखितवाद केलवु हेचिन पदगळु

ई पदद उल्लेखवु एरडनेय प्रकरणद ऐदनेय पद्यवन्नु चर्चिसुवाग बंदिदे

(राग – पूर्वि; ताल - आटताल)

१ मुय्यक्के मुय्यि तीरितु ॥प.॥ जग– ।
दय्य विजय्य साहय्य पंढरिराय ॥ अ. प. ॥

सण्णवनेंदु ना नीरु तारेंदरे ।
वेण्णे कळळ कृष्ण मरवे माडि ॥
चिन्नद गिंडिलि नीरु तंदित्तरे ।
कण्णु काणदे ना ठोगेदे पंढरिराय ॥१॥

एन्न पेसरु माडि सूळेगे कंकण– ।
वन्नु नीनित्ते निजरूपदि ॥
एन्न पीडिसि परम भंडन माडि ।
निन्न मुय्यक्के मुय्यि तीरिसिकोंडेय्य ॥२॥

भक्तवत्सलनेंबो बिरुदु वेकादरे ।
भक्ताधीननागिरवेडवे ॥
युक्तियलि निन्नंथ देवर ना काणे ।
मुक्तीश पुरंदरविठल पंढरिराय ॥३॥

परिशिष्ट १

मूळ इंग्रजी ग्रंथात उल्लेखिलेली काही जास्तीची पदे

या पदाचा उल्लेख प्रकरण २, पद ५ या पदाची चर्चा करताना केला आहे

१

हे जगन्नायका, अर्जुनाच्या सख्या, पंढरीनाथा, मला चांगला ठोशास ठोसा मिळाला.

लहान पोर समजून मी तुला पाणी मागितले आणि, लोणी चोरून खाणाऱ्या कृष्णा, मला भ्रमात पाडून तू सोन्याच्या भांड्यात पाणी आणून दिलेस. अजाणपणे मी तुला चोप दिला ॥१॥

माझा वेष घेऊन स्वत:चे कंकण एका वेश्येला नेऊन दिलेस. बडव्यांनी माझा छळ केला आणि माझी छी थू केली. जशास तसा भेटून चांगली मजालस थाटली ॥ २ ॥

तुला भक्तवत्सल हे आपले ब्रीद टिकवायचे असेलतर तू भक्तांचा अंकित होऊ नयेस का ? हे मुक्तिदायका पंढरीनाथा, पुरंदरविट्ठला, युक्त्याप्रयुक्त्या लढविण्यात तुझा हात धरणारा दुसरा देव मला दिसत नाही[११९] ॥३॥

एरडनेय प्रकरणद ऐदनेय पदवन्नु चर्चिसुवाग केळगिन पद बंदिदे

(राग – नादनामक्रिये, ताल – आदिताल)

२ यारु विट्टरु कैय नी विडे नंविदे । नारायण ।। प. ।।
स्वामि नी विट्टरे मुंदिन्नारु काय्वर काणे । नारायण ।। अ. प. ।।

मुंदे नोडिदरे हेब्बुलि बाय्विडुतिदे । नारायण ।।
हिंदे नोडिदरे हेब्बावु नुंगुतलिदे । नारायण ।। स्वामि ।
अद कंडु मडुव वीळलु अल्लि नेगळिगे । नारायण ।। बहु ।
बंधनदोळु सिक्कि बळलि नोंदेनय्या । नारायण ।। १ ।।

नंबि ना पिडिदरे कोंवेल्ल मुरिदावु नारायण ।। स्वामि ।
हंबलिसिदरंजवेडवेंबुवरिल्ल । नारायण ।।
तुंबिद होळेयल्लि हरिगोलनेरिदे नारायण ।
अंबिगनंतेन्न दडव सेरिसो मुन्न । नारायण ।।२।।

शिशु अवतारदि पशुगळ नी काय्दे । नारायण ।। स्वामि ।
दश अवतारदि चक्रव ताळिदे नारायण ।।
विपद काळिंगन मडुव कलकि बंदे । नारायण ।। स्वामि ।
वसुधेयोळधिक पुरंदरविठलने नारायण ।।३।।

❀

प्रकरण २, पद ५ इदन्नु चर्चिसुवाग कळगिन पदविदे

(राग–पंतुवराळि; ताल–आटताल)

३ हिंदिल्ला स्वामि मुंदिल्ला । गो– ।
विंद नीनल्लदे इहपरविल्ल ।। प. ।।

परर बेडिप्पंते गतियायितल्ल ।
नरर तुतिसि नालिगे बरडायितल्ल ।।
परविल्ल इहविल्ल नरजन्म स्थिरविल्ल ।
नरगे पामरगे पापद पंजरगे ।।१।।

प्रकरण २, पद ५ या पदाच्या चर्चेत खालील पद येते

२

भले सगळ्या जगाने मला टाकले तरी तू टाकणार नाहीस असा मला दृढ विश्वास आहे.

हे स्वामी, तू जर मला सोडलेस तर माझे रक्षण करील असे कुणीही दिसत नाही.

समोर पाहिलेतर अक्राळविक्राळ वाघोबा आ वासून उभा आहे. मागे पाहिलेतर भलामोठा अजगर गिळायला टपला आहे. हे पाहून डोहात उडी घ्यावी तर तिथे मगर गट्ट करणार. घोर संकटात सापडून मी घायाळ झालो आहे ॥१॥

मोठ्या आशेने झाडाच्या डहाळीचा आश्रय घेतला, तेव्हा ती तुटून गेली. आर्ततेने धावा केलातरी 'भिऊ नको, भिऊ नको' असे आश्वासन देणारे कुणी नाही. महापूर आलेली नदी मी तराफ्यावर बसून पार करायला गेलो. नावाडी होऊन आधी मला पैलतीराला ने ॥२॥

बाळपणी तू गोधनाचे रक्षण केलेस. दहांपैकी एका अवतारात तू चक्र धारण केलेस. विषयरूपी कालियाच्या डोहात उडी घालून त्याला मी डिवचून आलो आहे. भूमंडळात पुरंदरविठ्ठलच श्रेष्ठ आहे ॥३॥

प्रकरण २, पद ५ या पदाच्या चर्चेत खालील पद आहे

३

हे गोविंदा, मला मागेपुढे कोणीही नाही. तुझ्याशिवाय इहलोकी सुख नाही व परलोकी गती नाही.

माझ्या हातात भिक्षापात्र आले. मनुष्याची स्तुती करकरून जीभ कोरडी पडली. पापाची खाणच असलेल्या म्या पामराचे ऐहिकच धड नाही, तर परत्राचे काय पुसावे? हे जीवन क्षणभंगुर आहे ॥१॥

तनुवु तन्नदल्ल तन्नवरु तनगिल्ल ।
अनुकूलविरुवाग सति सुतरेल्ल ॥
अनुवु तप्पि मन तल्लणिसुवाग ।
वनजनाभ नीनल्लदे यारिल्ल ॥२॥

मातापितृबंधुगळु सुंतागि सं– ।
प्रीतियोळिरलु मन्निपरे एल्ल ॥
कातरनाग्यम कोंडोय्युवाग सं– ।
गात इन्यारय्य पुरंदरविठल ॥३॥

❀

प्रकरण २, पद ५ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग – भीमपलास; ताल – त्रिताल)

४ जय पांडुरंग । एनु माडिद्यो मानभंग ॥ प. ॥

सूसुव नदियंतीसलु होदरे । ईसु काळु नीरु तोरलिल्ल ।
तासु बडिदु किवि केळिसलिल्ल । कैयान गंट कसगोंडेल्ल ॥ १ ॥

कव्वु सवियु आदरेनु । कब्बिन रुचियु तोरलिल्ल ।
अद्दरसि गद्दरसि मळेयागलिल्ल । मोडागि ओंद्हनि उदरलिल्ल ॥ २ ॥

नगेगेडायितु नाल्वरोळगे । नुग्गी गिड बुड तग्गिसिदंते ।
तग्गिसिदात बग्गलिल्ल । सुग्गि विद्देनो मुकुंद कृष्ण ॥ ३ ॥

मंगनंते आयितु जन्म । लिंग कळकोंड जंगमनंते ।
अंग हरिदु भृंग आदितंते । भृंगदोळगे रंग सिलुकितंते ॥ ४ ॥

कंड कंड भूमंडल तिरुगि । कंड कल्लिगिन्नु हाय्दरेनु ।
पुंडलीकवरदनंते । पुरंदरविठल ताने बल्ल ॥ ५ ॥

❀

देह आपला नाही, ज्यांना आपले म्हणून कवटाळतो ते भरवशाचे नाहीत. बायकामुले सगळी सुखाची सांगाती आहेत. निराधार स्थिती होऊन मन कळवळते तेव्हा हे कमलनाभा, तुझ्याखेरीज दुसरे कुणीच साहाय्य करत नाही ॥२॥

सुखसंपत्ती असेलतर माता-पिता, बंधु-बांधव गोळा होतात. यमराजाचे बोलावणे आल्यावर जेव्हा कापरे भरते तेव्हा, हे पुरंदरविठ्ठला, तुझ्याखेरीज कोण माझ्या पाठीशी राहील ? ॥३॥

प्रकरण २, पद ५ या पदाच्या चर्चेत खालील पद आहे

४

हे पांडुरंगा, माझा किती घोर अपमान केलास.

खळाळून वाहणाऱ्या नदीत पोहावे म्हणून मी गेलो, तर तिथे पाण्याचा टिपूस नव्हता. घंटा वाजली ती मला ऐकू आली नाही आणि हातातल्या गाठोड्यातील चिंधीसुद्धा माझ्या हाती राहू दिली नाहीस ॥ १ ॥

भले ऊस गोड आहे पण त्याची चवच मला कळली नाही. थरकाप करणारा ढगांचा गडगडाट झाला पण पावसाचा एक थेंबही आला नाही. आभाळ आले पण जमीनसुद्धा ओली झाली नाही ॥ २ ॥

चार लोकांत माझी फटफजिती झाली. शेवग्याचे झाड[१२०] वाकवण्याचा कितीही प्रयत्न केलातरी ते वाकत नाही तसा मी ताठलो होतो. माझा प्रयत्न विफल होऊन मी तोंडघशी पडलो ॥ ३ ॥

जन्माची माकडासारखी दशा झाली. जंगमाने आपल्या गळ्यातले शिवलिंग हरवून बसावे तसे झाले. आधीच भुंग्याची जात चंचल, त्यातून त्याने रंगीबेरंगी फुलांना भुलून जावे तद्वत संसारात अडकल्याने माझा नाश झाला (अपमान झाला) ॥४॥

वाट फुटेल तिकडे भ्रमंती करून शेंदूर फासलेल्या दगडापुढे डोके आपटले-तर उपयोग काय? पुंडलिकाला वर देणारा पुरंदरविठ्ठलच हे जाणू शकेल[१२१] ॥५॥

मूरनेय प्रकरणद प्रारंभदल्लि केळगिन पदद उल्लेखविदे

(राग–भूप; ताल–दीपचंदि)

५ कंडिरेनो महाकारण ब्रह्मन ।
कंडु उंडंथ महाज्ञानिगळिरा ॥ प. ॥

मोळकेयिल्लद बीजव वित्ति । अळतेयिल्लदे राशियने माडि ।
ओळतंदु मने तुंवि हेच्चुळिद धान्यव ।
अळतिले मारिरो महाज्ञानिगळिरा ॥ १ ॥

कावु इल्लद कोडलिय पिडिदु । मूडल दिक्किनोळु महा वेर कडिदु ।
ओंदे होडेतक्के मूरु तुणुक ।
माडि चल्लिरो महाज्ञानिगळिरा ॥ २ ॥

मूरु बट्टिन अळतिय मेले । आरु बेट्टगळु अडगिदवल्ले ।
मीरिद उन्मनि कोनेय बागिलव ।
तेरेदु नोडिरो महाज्ञानगळिरा ॥ ३ ॥

नालिगेयिल्लद घंटिय नुडिसि । नाद शब्दव हिडिदु निल्लिसि ।
ओडेय श्रीकाडसिद्धन कृडि ।
काणवारदनेल्ल कंडे ॥ ४ ॥

ಜ

प्रकरण ५, पद १ इदर विवरणेयल्लि ई वचनविदे

(वचन)

६ नंबरु नच्चरु बरिदे करेवरु
नंबलरियरी लोकद जनरु !
नंबि करेदडे, ओ एन्नने शिवनु ?
नंबदे नच्चदे बरिदे करेवर
कोंब मेट्टि कूगेंद कूडलसंगमदेव !

ಜ

तिसऱ्या प्रकरणाच्या सुरुवातीस या पदाचा उल्लेख आला आहे

५

हे महाज्ञानी लोकहो, तुम्ही महाकारण ब्रह्म पाहिले आहे का? पाहून त्याचा आनंद लुटला आहे का?

मोड न येणारे बी पेरून, अमाप पीक घेऊन, ते घरात आणून आपली कोठारे भरा. उरलेले धान्य मोजून–मापून (ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे) विका ॥१॥

दांडा नसलेली कुऱ्हाड घेऊन पूर्वेकडील आदिमूलावर (मूल प्रकृतीवर) घाव घाला. एका घावासरसे तीन तुकडे (सत्त्व, रज, तम) करून टाका ॥ २ ॥

तीन वोटांच्या अंतरात (भ्रूमध्यापासून नाकाच्या शेंड्यापर्यंत) सहा डोंगर (षड्रिपू)[१२२] लपले आहेत. ते ओलांडून वर जा व उन्मनीच्या टोकाचे दार उघडून पाहा[१२३] ॥ ३ ॥

लोळी नसलेली घंटा वाजवून होणारा नाद (अनाहत नाद) घट्ट धरून, प्रभू श्रीकाडसिद्धांच्या समवेत, सहसा न दिसणाऱ्या गोष्टी मी पाहिल्या ॥ ४ ॥

ಜ

प्रकरण ५, पद १ याच्या चर्चेत खालील वचनाचा उल्लेख आहे

६

विश्वास नाही, श्रद्धा नाही, लोक कोरडी वटवट मात्र करतात; दृढ श्रद्धेशी प्रापंचिक लोकांची ओळखच नाही. अंतःकरणपूर्वक निष्ठेने हाक घातलीतर तो शिव ओ देणार नाही का? हे कूडलसंगमदेवा, ना श्रद्धा, ना भक्ती असले ओरडणे म्हणजे व्यर्थ शिंग फुंकणे आहे.

ಜ

प्रकरण ६, पद ४ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग – मुखारि; ताल – एकताळ)

७ तोरेदु जीविसवहुदे हरि निन्न चरणव ।
बरिदे मातेकिन्नु अरिदु पेळुवेनय्य ॥ प. ॥
कर पिडिदेन्ननु कायो करुणानिधे ॥ अ. प. ॥

तायि तंदेय विट्टु तपव माडलु बहुदु ।
दायादि बंधुगळ विडलु बहुदु ॥
राय मुनिदरे राज्यव विडबहुदु ।
कायजपित निन्नडिय विडलागदु ॥ १ ॥

ओडलु हसिदरे अन्नव विडबहुदु ।
पडेद क्षेत्रव विट्टु होरडलु बहुदु ॥
मडदि मक्कळ कडेगे तोलगिसि विडलु बहुदु ।
कडलोडेय निम्मडिय गळिगे विडलागदु ॥ २ ॥

प्राणव परिरिगे बेडिदरे कोडबहुदु ।
मानाभिमानव तग्गिसबहुदु ॥
प्राणदायकनाद आदिकेशवराय ।
जाण श्रीकृष्ण निन्नडिय विडलागदु ॥ ३ ॥

❀

प्रकरण ६, पद ४ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–नादनामक्रिये; ताल–एकताळ)

८ जंगमरु नावु जगदोळु ॥ प. ॥

जंगमरु नावु लिंगांगिगळु । मंगळवंतरु भविगळेंतेंविरि ॥ अ. प. ॥

प्रकरण ६, पद ४ च्या चर्चेमध्ये खालील पदाचा उल्लेख आहे

७

हे हरी तुझे पाय सोडून एक क्षणभर तरी जिवंत राहता येईल का ?
आता याबद्दल माझी खात्रीच झाली आहे. पोकळ बडबड करण्याचा काय फायदा ? हे करुणासागरा, माझा हात धरून मला चालव.

मातापित्यांना सोडून देऊन एक वेळ तप करता येईल. बंधुबांधवांचा त्यागही शक्य होईल. राजाचा कोप झालातर देशांतर करणे अशक्य नाही. पण हे कृष्णा, तुझे पाय सोडावे का ? ॥ १ ॥

पोटात कावळे ओरडायला लागलेतरी अन्न वर्ज्य करता येईल. जन्मभूमीचा त्याग वेळप्रसंगी करणे अशक्य नाही. अखेरीस कुटुंबकविला सोडायचा म्हटलेतर तेही करता येईल. पण सागराधिपती, कृष्णा, तुझे पाय क्षणभरही दृष्टीआड कसे बरे करू ?॥ २ ॥

कुणी प्राण द्या म्हटलेतर प्राणावर उदार होता येईल. मानाभिमानाच्या कल्पना गुंडाळून ठेवता येतील. हे प्राणदायक आदिकेशवा, सर्वज्ञा, श्रीकृष्णा, तुझ्या पायांचा आधार सोडून कसे चालेल ? ॥ ३ ॥

८

प्रकरण ६, पद ४ या पदाच्या चर्चेमध्ये खालील पदाचा संदर्भ दिला आहे

८

या जगात आम्हीही जंगम (शैव स्वामी) आहोत.
आम्हीही लिंगधारी आहोत, लोकांचे कल्याण करणारे आहोत. उगीचच तुम्ही आम्हाला ' भवि ' (लिंग धारण न करणारा) असे संबोधता.

हरगुरुदैव केशव नम्म मने दैव ।
वरद मोहन गुरुशांतेश ।
हरगुरुद्रोह माडिद परवादियु ।
रौरव नरकदि मुळुगुवदे सिद्ध ॥ १ ॥

विभूति नमगुंटु विश्वेश नमगुंटु ।
शोभन नाम मुद्रेगळुंटु ।
श्रीभार्गारथियगणित मज्जनवुंटु ।
सौभाग्य महन्तन मठदवरु ॥ २ ॥

विरक्तरु नावु शीलवंतरु नावु ।
वीरभद्रप्रियभक्तरु नावु ।
कारणकर्त श्रीपुरंदरविठलन ।
कारुण्यके मुख्य पात्ररु नावु ॥ ३ ॥

❀

प्रकरण ६, पद ४ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–मध्यमावति; ताल – आदिताळ)

९ शिवदरुशन नमगायितु केळे ।
शिवरात्रिय जागरणे ॥ प. ॥

पाताळगंगेय स्नानव माडलु । पातकवेल्ल परिहारवु ।
ज्योतिर्लिंगन ध्यानव माडलु । द्यूतगळिल्ल अनुदिनवु ॥ १ ॥

बेडिद वरगळ कोडुवनु तायि ।
ब्रह्मन राणिय नोडुवनु ॥
आडुत पाडुत एरुत बसवन ।
आनंददलि नलिदाडुवनु ॥ २ ॥

शिखरव कंडेनु पुरंदरविठलन
हरि नारायण ध्यानदलि ॥ ३ ॥

❀

तुमचे कुलदैवत शिवगुरू असेलतर आमचे दैवत केशव आहे. तुम्ही त्याला गुरू शांतेश म्हणता, तर आम्ही त्याला वर देणारा मोहन असे म्हणतो. शिवगुरूचा द्रोह करणारा पाखंडी रौरव नरकात पडतो हे ठरलेलेच आहे ॥ १ ॥

आम्हीही विभूती (भस्म) लावतो, अर्थात शोभिवंत नाममुद्रा धारण करतो. विश्वेशही आमचा आहे. भागीरथीमध्ये आम्ही वारंवार स्नान करतो. सौभाग्याचा वर्षाव करणाऱ्या महंताच्या मठातले आम्ही आहोत ॥ २ ॥

आम्ही पण विरक्त व शीलवंत आहोत आणि आम्ही वीरभद्राचे प्रियभक्त आहोत. सर्वकर्त्या पुरंदरविठ्ठलाच्या कृपेचे प्रधान वाटेकरी आम्हीच आहोत ॥३॥

प्रकरण ६, पद ४ या पदाच्या चर्चेत हे पद आले आहे

९

ऐक बाई, शिवरात्रीचे जागरण करत असताना आम्हाला शिवाचे दर्शन झाले.

पाताळगंगेचे स्नान केले म्हणजे सर्व पापांचा परिहार होतो. ज्योतिर्लिंगाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर सोंगट्यांचा पट मांडण्यास रस वाटेल का ? ॥१॥

शिव मागावा तो वर देतो आणि कृपा प्राप्त व्हावी म्हणून आपली आई सरस्वती (भारती) हिची प्रार्थना करतो. तो हसत, खेळत, गात, नंदीवर चढतो आणि आनंदात डोलतो ॥ २ ॥

हरिनारायणाचे ध्यान धरल्यावर पुरंदरविठ्ठलाने शिरी वाहिलेल्या देवराण्याचे दर्शन झाले ॥३॥

प्रकरण ७, पद २ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–कल्याणि; ताल – झंपेताळ)

१० एन्न विन्नप केळु धन्वंत्रि दय माडो
सण्णवनु इव केवल ॥ प. ॥
वन्न बडिसुव रोगवन्नु मोचन माडि
चन्नागि पालिसुवदो करुणि ॥ अ. प. ॥

आरोग्य आयुस्सु ऐश्वर्यवेंब ई
मूरु विध वस्तुंगळु
नारायणन भजकरादवर साधनके
पूरणवागिप्पवो
घोर व्यभिचार परनिंदे परवित्ताप-
हार माडिद दोषदि
दरिद्रागुवरु मूरु विधदिंदले
कारणनु नीने दुष्कर्म परिहरिसो ॥ १ ॥

वसुमतिय मेलिन्नु असुर जनरे बहळ
वशवल्ल कलिय बाधे
बिसिलिंद पीडितवाद सासिगळंते
शिशुगळु नाविप्पेवो
असुरारि निन्न करुणामृतद मळेगरेदु
कुशलदलि पालिसुवदु
केसरिंद केसरु तोळेदंते कर्मद पथवु
असुनाथ हरिये सलहो स्वामी ॥ २ ॥

प्रकरण ७, पद ३ या पदाची चर्चा करताना खालील पदाचा संदर्भ येतो

१०

हे धन्वन्तरी, माझी प्रार्थना ऐक. हा अजून अजाण बालक आहे.

हे करुणाघना, या छळणाऱ्या रोगातून याला मुक्त करून त्याचे उत्तम रक्षण कर.

नारायणाची भक्ती करायची असेलतर आयुष्य, आरोग्य, धनसंपदा ही तीन्ही आवश्यक आहेत, पण घोर व्यभिचार, परनिंदा आणि परधनाचा अपहार या तीन पापांमुळे हे तीन्ही प्रकारचे वैभव नाहीसे होऊन दारिद्र्य येते. सर्वकर्ता तूच आहेस म्हणून दुष्कर्मांचा परिहार कर ।। १ ।।

या जगात दुष्ट लोकच फार. कलीच्या लीलांवर आमचा ताबा नाही. उन्हाने करपून गेलेल्या रोपट्यांप्रमाणे आम्ही दीन लेकरे आहोत. हे दैत्यसंहारका, तुझ्या करुणामृताचा वर्षाव करून हळुवारपणे आमचे लालनपालन कर. कर्माची गती अशी आहे की जसा चिखलाने चिखल धुतला जात नाही तसे कर्मानि कर्म नाहीसे होत नाही. हे प्राणनाथा, हरी, आम्हाला वाचव ।। २ ।।

अन्यरनु भजिसदले निन्नने स्मरिसुत्त
निन्न चिह्नगळन्नु धरिसि
निन्न नामोच्चरिसि निन्नवरवनेनिसि
निर्विंद उपजीविसि
अन्न आरोग्य अल्पवु आगे अन्यरिगे
इन्नु आल्परिय वेके
निन्न संकल्प भक्तरनु पोषिपेनेंदु
घन्न विरुदन्नु उळुहो स्वामी ॥ ३ ॥

आधि व्याधिगळु उन्माद विभ्रम नाना
बाधेगौषधवु नीने
ई दाव निन्न करकमलदिं सुधेगरेदु
साधुगळ पालिसुवे नी
मोद बडिसुवे निन्न साधिसुववरिगे सु–
बोधयंगळे नीडि
आदरिसि अवगे तव पाद ध्यानवनित्तु
साधुगळोळगिरिसि मोद कोडु सर्वदा ॥ ४ ॥

निन्नवरलि इवगे इन्नु रतियने कोडो
निन्नवनेंदु अरिदु
निन्न प्रार्थिसदे नानन्यरिगे आल्परिये
एन्न पालिसुव धोरेये
एन्न मातल्ल इदु एन्न हिरियर मातु
मन्निसवेकु करुणि
अनंत गुणपरिपूर्ण गोपालविट्ठल
इन्निदने पालिसुवुदो (करुणि) प्रभुवे ॥ ५ ॥

अन्य देवता सोडून तुझीच कास धरली. तुझ्या नावाचा टिळा लावून तुझेच नाम जपत राहिलो. स्वतःची तुझ्या भक्तात गणना केली. तुझ्या कृपेवर जगलो. पण आता अन्न आणि आरोग्य यांना ओहोटी लागल्यावर मी काय लोकांपुढे हात पसरावे ? भक्तरक्षक असा तुझा लौकिक आहे. हे आपले बिरुद सांभाळ ॥ ३ ॥

आधी-व्याधी, वेड, भ्रम अशा अनेक बाधांना तूच एक औषध आहेस. तू आपल्या करकमलातून स्रवणाऱ्या अमृताने साधुसंतांचा सांभाळ करतोस. आपल्या भक्तजनांना योग्य बोध करून त्यांना आनंद देतोस. तसेच या बालकाची स्थिती जाणून, आपल्या भक्तीचा लाभ त्याला देऊन, सत्संगतीत ठेवून, त्यालाही सदैव आनंद दे ॥ ४ ॥

हे तुझेच लेकरू आहे हे लक्षात घेऊन याच्या मनात तुझ्या भक्तगणांबद्दल प्रेम उपजू दे. मी तुझीच प्रार्थना करतो, इतर देवतांकडे जात नाही. हे रक्षणकर्त्या देवा, मी हे सर्व बोलत आहे, पण बोलविते धनी माझे सद्गुरू आहेत. म्हणून हे मागणे तू मान्य करायलाच हवेस. हे गोपालविठ्ठला, अनंतगुणपूर्णा, हे तुझे लेकरू तूच सांभाळ ॥ ५ ॥

प्रकरण ९, पद २ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–शंकराभरण; ताल–एकताल)

११ मध्वराया गुरु मध्वराया । मध्वराया
गुरु मध्वराया ॥ प. ॥
रामावतारदोळोम्मे मध्वराया ।
आ महा हनुमनादे मध्वराया ।
वाम मुष्टिलि रावणन गेलिदे मध्वराया ।
कामितार्थ सुररिगित्ते मध्वराया ॥ १ ॥

कृष्णावतारदोळोम्मे मध्वराया ।
दुष्ट कुलके भीमनादे मध्वराया ।
कुट्टिदे कौरवरनेल्ल मध्वराया । श्री– ।
कृष्णन प्रीतिय पडेदेयो मध्वराया ॥ २ ॥

धरेयोळु यतियागि जनिसिदे मध्वराया ।
गुरु व्यासर हितव पडेदे मध्वराया ।
दुरुळ मायि मतव मुरिदे मध्वराया ।
पुरंदरविठलन दासनाद्यो मध्वराया ॥ ३ ॥

ಽ

प्रकरण १२, पद १ इदर विवरणेयल्लि केळगिन वचनद संदर्भ विदे

(वचन)

१२ ताळ मान सरिसवनरिये,
ओजे बजावणिय लेक्कवनरिये,
अमृतगण देवगणवनरिये,
कूडलसंगमदेवा, निनगे केडिल्लवागि
आनु ओलिदंते हाडुवे ॥

ಽ

प्रकरण ९, पद २ या पदाची चर्चा करताना खालील पद घेतले आहे

११

हे गुरू मध्वराया,

एके वेळी रामावतारामध्ये तुम्ही महापराक्रमी हनूमान होऊन आलात. आपल्या डाव्या मुठीच्या प्रहाराने तुम्ही रावणाला नामोहरम केलेत. देवजनांना जे काही हवे होते ते दिलेत ॥१॥

कृष्णावतारामध्ये तुम्ही भीमाच्या रूपाने येऊन दुष्ट कौरवांचे निर्दालिन केलेत आणि श्रीकृष्णाची प्रीती संपादन केलीत ॥ २ ॥

कलियुगात या पृथ्वीच्या पाठीवर तुम्ही यती म्हणून जन्म घेतलात व वेद-व्यासांचा अनुग्रह मिळवलात. मायावादाचे खंडन केलेत व पुरंदरविठ्ठलाचे दास झालात ॥ ३ ॥

प्रकरण १२, पद १ या पदाच्या चर्चेत खालील वचन येते

१२

मला ताल समजत नाही. लय कळत नाही. सम म्हणजे काय याचा पत्ताच नाही. वाद्य वाजवण्याच्या मात्रा मला माहीत नाहीत. देव कोण, गंधर्व कोण हे मी ऐकलेलेच नाही. कूडलसंगमदेवा, मी स्वान्तः सुखाय गातो. मात्र माझ्या गाण्याने तुझ्या वैभवाला उणेपणा येऊ देत नाही बरं.

प्रकरण १२, पद ४ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन श्लोकविदे

१३ बल्लडी शिशुवेतरोळगिह–
नल्ल होरगिहनल्ल भाविस–
लिल्लदिरुतिहनल्लवेनुता तंदे तायिगळु ।
एल्ल जाडयद जंजडंगळ–
नल्लवेनिसुव बालकरो बळि–
कल्लमग्रभुवेंदु हेसरनु कोट्टरितियलि ।।

ಜ

प्रकरण १३, पद २ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पद्यविदे

(राग – कल्याणि; ताल–आटताळ)

१४ कल्लुसक्करे कोळ्लिरो नीवेल्लरु ।
कल्लुसक्करे कोळ्लिरो ।। प. ।।
कल्लुसक्करे सवि बल्लवरे बल्लरु ।
फुल्ललोचन श्रीकृष्णनामवेंब ।। अ. प. ।।

एत्त हेरुगळिंद होत्तु मारुवदल्ल ।
ओत्योत्ति गोणियोळ् तुंबुवदल्ल ।।
एत्त होदरु बाडिगे सुकविदकिल्ल ।
उत्तम सरकिदु अति लाभ बरुवंथ ।। १ ।।

नष्ट बीळुवदल्ल नात हुट्टुवदल्ल ।
एष्टु ओय्दरू बेले रोक्कविदकिल्ल ।।
कट्टिरुवेयु तिंदु कडिमेयागुवदल्ल ।
पट्टणदोळगे प्रसिद्धवागिरुवंथ ।। २ ।।

संतेसंतेगे होगि श्रम पडिसुवदल्ल ।
संतेयोळगे इट्टु मारुवदल्ल ।।
संतत भक्तर नालिगे सविगोंब ।
कान्त पुरंदरविठलन नामवेंब ।। ३ ।।

ಜ

प्रकरण १२, पद ४ याच्या चर्चेत खालील श्लोक आला आहे.

१३

खरं पाहिलेतर हे बालक कशाच्या आतही नाही, कशाच्या बाहेरही नाही (स्थलाच्या पलीकडे आहे). ते पूर्वी नव्हते व आता आले असेही नाही (अनादी आहे). एकूण प्रपंचाच्या जंजाळात कुठेही सापडत नाही म्हणून त्या बाळाचे आईवडिलांनी अत्यंत प्रेमाने अल्लमप्रभु (अल्ल अल्ल किंवा नेति नेति) असे नाव ठेवले.

प्रकरण १३, पद २ या पदाच्या चर्चेत खालील पद येते.

१४

खडीसाखर घ्या हो, सारेजण खडीसाखर घ्या. जे ज्ञानी आहेत तेच फक्त कृष्णनामरूपी खडीसाखरेची गोडी जाणतात.

बैलाच्या पाठीवर ओझे लादून ही खडीसाखर बाजारात विकायची नाही. खडीसाखर गोणीत ठासून ठासून भरायची नाही. ही साखर कुठेही पाठवलीतरी तिला भाडे द्यावयाचे नाही की कर भरायचा नाही. पण माल दर्जेदार आहे व त्यातून चांगला नफा होणार आहे ॥ १ ॥

हा माल कुजणार नाही; त्याची दुर्गंधी सुटणार नाही. कितीही माल खरेदी केलातरी पैसा मोजावा लागणार नाही. मुंगळ्यांनी खाल्लातरी माल कमी होणार नाही. गाभात ही खडीसाखर नाणावलेली आहे ॥ २ ॥

या साखरेसाठी बाजारोबाजारी पायपीट करावी लागत नाही, कारण बाजारात ती येतच नाही. साधुसंतांच्या जिभेला त्याची निरंतर चटक लागली आहे, असे हे प्रभू पुरंदरविठ्ठलाचे नाव आहे ॥ ३ ॥

प्रकरण १३, पद २ इदर विवरणेय संदर्भदल्लि केलगिन पदविदे

(राग – कांभोजि; ताल – झंपेताळ)

१५ इदु कोळ्ळि भवरोगकौषधवु ॥ प. ॥
इंद्रियव जयिसुवुदे इदके इच्छापथ्य ॥ अ. प. ॥

वासुदेवन नाम वातविध्वंसिनी ।
जनार्दनन नाम ज्वरांकुश ॥
माधवन नामवे मनगंड मंडूर ।
मंगळात्मकन नाम माल्यवसंत ॥ १ ॥

चिंतायतन नाम त्रैलोक्य चिंतामणि ।
भुजगशयनन नाम भूपतिमात्रे ॥
राजीवलोचनन नाम रसकर्पूर ।
सीतापतिय नाम दिव्य सिंदूर ॥ २ ॥

नारायणन नाम दिव्य ताम्रभस्म ।
लोकदोडेयन नाम लोहभस्म ॥
वैकुंठपतियेंब वंगभस्मव कोळ्ळि ।
श्रीनिवासन नाम स्वर्णभस्म ॥ ३ ॥

रामचंद्रनेंब पूर्णचंद्रोदयवु ।
कृष्ण कृष्णनेंब श्लेष्मकुठार ॥
वारिजांबकनेंब वसंतकुसुमाकर ।
कमलनाभनेंब कर्णचूर्णविदको ॥ ४ ॥

इदनु कोंडवर पेसरनु पेळुवेनु केळि ।
मुददि प्रह्लाद मुचकुंद ध्रुवनु ॥
सदमले द्रौपदियु अजमिळनु बदुकिदरु ।
पदुमाक्ष पुरंदरविठलनेंबौषधवु ॥ ५ ॥

प्रकरण १३, पद २, याच्या चर्चेत खालील पद येते

१५

भवरोगावर औषध आले आहे, घ्या.
इंद्रियांना जिंकणे हे पथ्य पाळावे लागते.

वासुदेव हे नाव जणू वातविध्वंसिनी या औषधाचे काम करते. जनार्दन नाम ज्वरांकुश घेतल्यासारखा परिणाम करते. माधव हे नाम मंडूराचे व मंगळात्मक हे नाम माल्यवसंताचे काम निश्चित करते ॥ १ ॥

चिंतायत[१२४] नाव त्रैलोक्यचिंतामणी असून भुजगशयनाचे नाव ही भूपतिमात्रा आहे. राजीवलोचन हे नाम रसकर्पूर असून सीतापती म्हणजे दिव्य सिंदूर ॥ २ ॥

नारायणाचे नाव दिव्य ताम्रभस्माची जागा घेते, तर लोकपालक हे नाव लोहभस्माची घेते. वैकुंठपती या नामाचे वंगभस्म व श्रीनिवास या नावाचे सुवर्णभस्म अवश्य घ्या ॥ ३ ॥

रामचंद्र हे नाम म्हणजे पूर्णचंद्रोदय हे औषध आणि कृष्ण हे नाम श्लेष्मकुठार हे औषध समजा. वारिजांवक (कमलाक्ष) हे नाव वसंतकुसुमाकर आहे तर कमलनाभ हे नाव कर्णचूर्ण आहे ॥ ४ ॥

भवरोगावरचे नामरूपी औषध ज्यांनी ज्यांनी सेवन केले त्यांची नावे ऐका प्रह्लाद, मुचकुंद, ध्रुव, सती द्रौपदी, अजामिळ यांना पद्माक्ष पुरंदरविठ्ठल या नामौषधाने संजीवन मिळाले[१२५] ॥५॥

८

प्रकरण १३, पद २ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग – आनंदभैरवि; ताल – छापुताळ)

१६ इन्नेके यमन बाधेगळु । एन्न ।
जिव्हेलि हरिनामस्मरणे ओंदिरलु ॥ प. ॥

पतितपावननेंब नाम । अति–।
हितदिंद मुनिगळु स्तुतिसुव नाम ॥
क्रतुकोटि फलवीव नाम । स–।
द्रतिगे साधनवागुव हरिनाम ॥ १ ॥

मुन्नोव्व प्रह्लाद साक्षि । आ ।
कन्याशिरोमणि द्रौपदि साक्षि ॥
चिण्णनेंदजमिळ साक्षि । निज ।
पुण्यलोकवनाळ्व ध्रुवराय साक्षि ॥ २ ॥

हदिनाल्कु लोकवनाळ्व । दिव्य ।
मदन जनकनागि मुददिंद बाळ्व ॥
पद्मनाभनागि इरुव गुरु ।
मध्वेश पुरंदरविट्ठल काय्व ॥ ३ ॥

प्रकरण १३, पद २ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–मलयमारुत; ताल–रूपक ताल)

१७ स्मरणे ओंदे सालदे । गोविंदन ।
नाम ओंदे सालदे ॥ प. ॥
परम पुरुषनन्तु नेरे नंबिदवरिगे ।
दुरित बाधेगळ गुरुतु तोरुवुदे ॥ अ. प. ॥

प्रकरण १३, पद २ या पदाच्या चर्चेत खालील पद आहे

१६

एक श्रीहरीचे नाव माझ्या जिभेवर नाचायला लागल्यावर आता मृत्यूची भीती कशाला ?

परमात्म्याचे नाम पतितपावन आहे अशी ऋषिमुनी भक्तिभावाने त्याची स्तुती गातात. कोटी यज्ञांचे फळ या नामाने पदरात पडते. नामच सद्गतीचे मुख्य साधन आहे ॥ १ ॥

या कथनाला प्राचीन काळातील प्रह्लाद, कन्याशिरोमणी द्रौपदी, दीनदुबळा अजामिळ व अढळपदाचा सम्राट ध्रुव हे सगळे साक्षी आहेत ॥ २ ॥

चतुर्दश भुवनांचा[१२६] अधिपती मदनपिता कृष्ण होऊन राहिला आहे. गुरू मध्वाचार्यांचे आराध्य दैवत पुरंदरविठ्ठलच असून तो आमचे रक्षण करतो ॥ ३ ॥

प्रकरण १३, पद २ या पदाच्या चर्चेत हे पद आहे

१७

गोविंदाच्या नामाचे स्मरण करणे एवढे पुरेसे नाही का ?

परमपुरुषावर ज्यांची पूर्ण श्रद्धा आहे त्यांना दुरितांची काडीइतकी तरी भीती आहे का ?

कड्डु मूर्खनादरेनु । दुष्कर्मदिं ।
तोडेदातनादरेनु ॥
जडनादरेनल्प जातियादरेनु ।
विडदे प्रह्लादन्न सलहिंद हरिय ॥ १ ॥

पातकियादरेनु । सर्वप्राणि– ।
घातकियादरेनु ॥
नीतिय बिट्ट दुष्कर्मियादरेनु ।
प्रीतियिंदजामिळन सलहिद हरिय ॥ २ ॥

सकल तीर्थयात्रेय । माडिदंथ ।
निखिळ पुण्यद फलवु ॥
भक्ति पूर्वकवागि विडदनुदिनदल्लि ।
प्रकट पुरंदरविठलन नामद ॥ ३ ॥

❀

प्रकरण १३, पद ३ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग – दरबारि; ताळ – दीपचंदि)

१८ ॐ नाम कायुवदु नामद बलवु ॥ प. ॥

प्रह्लादन काय्दंथा पावन नाम ।
अजामिळगे बल अच्युत नाम ॥
सुरर्न्नु संतोषबडिसिद नाम ।
द्रौपदियभिमान काय्दंथा नाम ॥ १ ॥

पक्षिय पुत्रन रक्षिसिद नाम ।
पार्थन पंथव गेलिसिद नाम ॥
पाराशरादिगळिगे ओदगिद नाम ।
पन्नगशयनन परिपूर्ण नाम ॥ २ ॥

ते मूर्ख असतील. दुष्कर्मात बुडलेले असतील, मंदबुद्धी असतील, हीन जातीचे असतील, पण तसे असेनात का बापडे, प्रह्लादाच्या साहाय्याला धावून आलेल्या हरीचे स्मरण जरी त्यांनी केलेतरी ते पुरेसे आहे ॥ १ ॥

ते पापी असोत, सर्व प्राण्यांचा घात करणारे असोत, नीती सांडून अनीतीच्या खाईत लोळणारे असोत, अजामिळाचे रक्षण केलेल्या हरीच्या नामाचे स्मरण त्यांनी केलेतर ते पुरे आहे ॥ २ ॥

अखिल तीर्थयात्रांचे पुण्य केवळ स्मरणाने पदरात पडते. भक्तिपूर्वक व अखंड स्मरण केलेतर पुरंदरविठ्ठल प्रकटच असतो. त्याचे एक नाम पुरेसे नाही का ? ॥ ३ ॥

❀

प्रकरण १३, पद ३ याच्या चर्चेत खालील पद आहे

१८

ॐ हे नामच तारेल. कारण त्यात सामर्थ्य आहे.

या पावन नामाने प्रह्लादाला तारले. अजामिळाला नामाचे बळ लाभले. सुरगणांना या आनंददायक नामानेच मुक्त केले. नामानेच द्रौपदीचे लज्जारक्षण केले ॥ १ ॥

पक्षिपुत्राचे[१२७] रक्षण नामानेच केले. अर्जुनाच्या प्रतिज्ञेची पूर्ती नामानेच केली. व्यासादिकांना ते साहाय्यकारी झाले. शेषशायी भगवंताचे नाम परिपूर्ण आहे ॥ २ ॥

करिराजन काय्दंथा करुणद नाम।
कंदन ककुलाति केळिद नाम ॥
भवद बंधन बिडिसिद नाम।
गुरुलिंगजंगम घन पुण्य नाम ॥ ३ ॥

ಆ

प्रकरण १३, पद ५ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन श्लोकपंक्तिगळिवे

१९ नानु ओलिदु फलवदेनु
नीनु ओलियदनक शिवने
एनु माडि फलवदेनु बयल भ्रमेयहुदु ॥ प. ॥

जपव माडि फलवदेनु
तपव माडि फलवदेनु
अपरिमितद शास्त्र पठिसि फलवदेनलै
त्रिपुरवैरि तन्न ताने
सुपथदोरि ओलियदनक
उपमेयिंद माडे तुदिगे केट्टु पोपुदु ॥ १ ॥

हेण्ण बिट्टु फलवदेनु
होन्न बिट्टु फलवदेनु
मण्णनुळिदु बडवनागि फलवदेनलै
पन्नगेंद्रभरणनोलिदु
तन्न सुपथ तोरदनक
अन्यरुगळ नोडि माडे केट्टु पोपुदु ॥ २ ॥

कृपापूर्ण नामानेच गजेंद्राचे रक्षण केले आणि त्यानेच ध्रुवबाळाच्या शोकाचे निवारण केले. नामच भवबंधन तोडते. गुरुलिंगजंगमांचे नाम अति पुण्यकारक आहे ॥ ३ ॥

प्रकरण १३, पद ५ या पदाच्या चर्चेमध्ये खालील श्लोकपंक्तींचा उल्लेख आहे

१९

हे शिवा, तू जोवर प्रसन्न होत नाहीस तोवर मी प्रसन्न होऊन काय उपयोग? मी काहीही करणे म्हणजे भ्रमाचा भोपळा आहे. तो केव्हातरी फुटणारच.

जपाचा काय उपयोग आहे आणि तपाचा तरी काय आहे? भाराभर शास्त्रे घोकलीतरी कोणते फळ पदरात पडणार? महादेव आपणहून आम्हाला मार्गदर्शन करून आमच्यावर प्रसन्न होत नाही तोपर्यंत लोकांचे पोकळ अनुकरण करीत राहण्याने नाशच होणार ॥ १ ॥

कामिनीला सोडलेतर त्याचा फायदा काय? सोन्यानाण्याचा त्याग केलातरी काय फायदा आणि शेतभात सोडून दारिद्र्याला कवटाळलेतरी काय फायदा होणार? श्री शंकर प्रसन्न होऊन रस्ता दाखवत नाही तोवर लोक करतात म्हणून आपण काही केलेतर नाश ठरलेलाच आहे ॥ २ ॥

गिरिगळल्लि गविगळल्लि
तरुगळल्लि सेरि तनुव
मरेदु अस्थिमात्रविरलु फलवदेनलै
हरनु तन्न ताने ओलिदु
परम सुखव तोरदनक
परर नोडि माडे कडेगे केडु पोपुदु ॥ ३ ॥

कोडुगलु तुदिय मेले
नीडि काल गगनकागि
कूडे उग्र तपव माडि फलवदेनलै
रूढिगीश करुण हुट्टि
नोडि ओलियदनक परर
नोडि माडलेलु कडेगे केडु पोपुदु ॥ ४ ॥

मुन्न माडिदवर कंडु
इन्नु नोडि माडि बहळ
बन्न बडुत इरलु कडेगे केडु पोपुदै
तन्न ताने पक्कवागि
तन्न ताने पथके बरलु
चन्न षडक्षरिय लिंग ताने ओलिवनु ॥ ५ ॥

ಜ

प्रकरण १४ पद ४ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–नादनामक्रिये; ताल–आटताळ)

२० नळिननाभन नी पाडो वेग
ओळकर्णिंद अवन कंडु नलिदाडो ॥ प. ॥

हृदय आकाशदल्लिरुव । अल्लि ।
पदुमाक्ष पुरुषोत्तमनेंबात ।
आतनु बहुरूपदिंद । काव ।
आधारवागिप्प सूक्ष्मप्रदेश ॥ १ ॥

डोंगरदऱ्यात किंवा रानावनात जाऊन शरीराचे भान विसरून केवळ अस्थि-पंजर झालेतर काय फल आहे? स्वतः होऊन शिव प्रसन्न होऊन परमसुख दाखवत नाही तोवर दुसऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकलेतर नाशच नशिबी येणार ॥ ३ ॥

पर्वतशिखराच्या उत्तुंग बिंदूवर खाली डोके वर पाय करून उग्र तप आरंभिलेतर काय निष्पन्न होणार? परमेश्वराच्या पोटात कळवळा येऊन तो प्रसन्न झाला नाहीतर अंती नाशच आहे ॥ ४ ॥

पुढच्यांनी काय केले ते पाहून आपण तिळभर त्यांच्या पुढेच गेलोतर फार संकटे भोगावी लागून अखेर नाशच होणार. आपण स्वतःच परिपूर्ण झालो व आपला आपणच सन्मार्ग शोधलातर षडक्षरिलिंग (परमेश्वर) आपणहूनच प्रसन्न होतो ॥ ५ ॥

प्रकरण १४, पद ४ या पदाच्या चर्चेत खालील पदाचा संदर्भ आहे

२०

कमलनाभ श्रीकृष्णाची त्वरित स्तुती गा, आणि ज्ञानदृष्टीने त्याचे दर्शन घेऊन डोलत राहा.

पद्माक्ष पुरुषोत्तम हृदयाकाशात वस्ती करतो. तो तऱ्हातऱ्हांनी तुझे रक्षण करीत असतो. आधारचक्राच्या प्रदेशात त्याचेच वास्तव्य असते ॥ १ ॥

एंटोंदु कदव मुच्चो । मेले ।
तंटेयिल्लद मनव अवनलि इरिसो ।
कुंडलि मध्यदि नोडो । दिव्य ।
मंटपदलि ज्योति थळथळिसुवदो ॥ २ ॥

थळथळिसुव बालकृष्ण । अल्लि ।
बलु क्रीडेगळन्नेल्ल माडिसुवनय्य ।
ओळगे होरगे परिपूर्ण । नम्म ।
फुल्ल लोचन तंदे पुरंदरविठल ॥ ३ ॥

ಜ

प्रकरण हदिनेळर प्रारंभदल्लि केळगिन पदविदे

(राग–आनंदभैरवि; ताल-दीपचंदि)

२१ इष्टु दिन ई वैकुंठ । एष्टु दूरदे एन्नुतिद्दे ।
दृष्टियिंद नोडिकोंडे । सृष्टिगीश श्रीरंगशायी ॥ प. ॥

वन उपवनगळिंदे । घन सरोवरगळिंदे ।
कनकगोपुरगळिंदे । घनशोभित श्रीरंगशायी ॥ १ ॥

वज्र वैडूर्य तोलेगळ कंडे । प्रज्वलिप महाद्वार कंडे ।
निर्जरोत्तमर मनेगळ कंडे । दुर्जनांतक श्रीरंगशायी ॥ २ ॥

रंभे ऊर्वसि मेळव कंडे । तुंबर नारदर कंडे ।
अंबुजोद्भवप्रमुखर कंडे । शंबरांतकपित श्रीरंगशायी ॥ ३ ॥

नागशयनन मूर्तिय कंडे । भोगिभूषण शिवन कंडे ।
भागवतर संमेळव कंडे । कागिनेलेयादिकेशव श्रीरंगशायी ॥ ४ ॥

ಜ

नवद्वारांना[१९८] कुलुपे घाल आणि मन संकल्पविकल्परहित करून त्याला परमात्म्याच्या दिशेने वर चढव. कुंडलिनी शक्तीवर लक्ष ठेव. दिव्य मंडपात (सहस्रार चक्राच्या ठिकाणी) तेजोमय ज्योती झळकताना दिसेल ॥२॥

अनेकविध व्यवहार करवून घेणारा बालकृष्ण तिथे झगमगत आहे. आमचा प्रफुल्लनेत्र पुरंदरविठ्ठल अंतर्बाह्य परिपूर्ण आहे ॥ ३ ॥

प्रकरण १७ च्या सुरुवातीला हे पद येते

२१

हे श्रीरंगशायी. सृष्टिकर्त्या भगवंता, वैकुंठ फार फार दूर आहे असे मी इतके दिवस घोकत होतो. पण ज्ञानदृष्टीने ते माझ्या हृदयातच दिसल्यावर माझ भ्रमनिरास झाला.

वने, उद्याने, सुंदर सरोवरे, सोनेरी शिखरे यांनी ते वैकुंठ सुशोभित आहे ॥ १ ॥

त्याला वज्रवैडूर्याच्या तुळया आहेत आणि झगमगणारे महाद्वार आहे. तिथे सदैव तरुण राहणाऱ्या देवांची निवासस्थाने मी पाहिली ॥ २ ॥

त्या जागी रंभा ऊर्वशीसारख्या अप्सरांचे संमेलन पाहिले. तुंबर, नारद तिथे होतेच. ब्रह्मदेवादी देवतांचे मी दर्शन घेतले ॥ ३ ॥

हे कागिनेलेयादिकेशवा, श्रीकृष्णा, त्या वैकुंठात शेषशायी भगवंताची मूर्ती माझ्या डोळयांसमोर आली. सर्पमाला घातलेल्या शिवाचे दर्शन झाले. संतसभा दृष्टीस पडली ॥ ४ ॥

प्रकरण १७, पद ५ इदर विवरणेय संदर्भदल्लि केळगिन श्लोकविदे

२२ सुमति घंटाकर्णनोर्व
प्रमथवरनेंदवनितर श–
ब्दमनितुमं केळदिप्पुदे नेमवन्तागि
अमितकर्णगळोळनेकं
निमिर्दु घणघण एन्दु मोरेवा
क्रमिप घंटेगळिंद घंटाकर्णनेनलेसेद ॥

ಜ

प्रकरण १७, पद ६ इदर नंतर केळगिन पदविदे

(राग– जंगला; ताल– केरवा)

२३ कण्णिनोळु कण्णु कंडे । काणवारदनु कंडे ॥
पन्नंगधरन कंडे । नोडि कण्णिनोळु ॥ प. ॥

झगझगिसुवदनु कंडे । ज्योतिप्रकाशव कंडे ॥
निगिनिगि किच्च सुरिवुदु कंडे । नोडि कण्णिनोळु ॥ १ ॥

मुत्तु सुरिवुदु कंडे । मल्लिगि मळेगरेवुदु कंडे ॥
रत्नद कांति कंडे । नोडि कण्णिनोळु ॥ २ ॥

साधु सत्पुरुषर कंडे । साक्षान्निरुपाधिय कंडे ॥
गुरु चिदानंदन कंडे । नोडि कण्णिनोळु ॥ ३ ॥

ಜ

प्रकरण १७, पद ५ याच्या चर्चेत खालील श्लोकाचा उल्लेख आहे

२२

घंटाकर्ण नावाचा एक प्रज्ञावंत, श्रेष्ठ व नेमनिष्ठेने राहणारा ऋषी होता. त्याला इतर शब्द ऐकू येत नसत. शरीराला जणू अगणित कान फुटून त्या आतुर कानांनी घणघण असा नाद व क्रमाक्रमाने घंटेचा नाद ऐकू येई. त्यामुळे त्याचे घंटाकर्ण हे नाव सार्थ ठरले.

ꕥ

प्रकरण १७, पद ६ नंतर हे पद येते

२३

डोळ्यामध्ये मला डोळ्याचे दर्शन झाले. जी वस्तू दिसायला मोठे भाग्य लागते ती मी पाहिली. सर्पांनी नटलेल्या महादेवाला बघितले. म्हणून डोळ्यांतच त्याला पाहा.

लखलखणारी वस्तू दृष्टीस पडली. ज्योतीचा प्रकाश दिगंतरात दाटला होता. जळत्या निखाऱ्यांचा वर्षाव होत होता. म्हणून डोळ्यांतच हे पाहावे ॥ १ ॥

मोत्यांचा पाऊस पडत होता. मोगऱ्याचा सुगंध दरवळला होता. रत्नाची कांती सर्वत्र फाकली होती. हे सर्व डोळ्यांत पाहा ॥ २ ॥

साधुसंतांचे दर्शन झाले. उपाधिरहित साक्षात परमेश्वरच दिसला. सद्गुरू चिदानंदांनाही मी पाहिले. म्हणून डोळ्यातच शोध घ्या ॥ ३ ॥

ꕥ

प्रकरण १७, पद ७ इदर चर्चेय संदर्भदल्लि केळगिन पदविदे

(राग–सौराष्ट्र)

२४ कोगिले चेल्व कोगिले मुद्दु ।
कोगिले जाण कोगिले ॥ प. ॥

हिंदे तपदोळीशनोंदिरुतिरलेच्चु ।
बेंद कामन विद्दु कोगिले ॥
बंदु वेगदि बालेंदुधरन कूडि ।
कुंददे नी बाळु कोगिले ॥ १ ॥

मनु मुनिगळ नीतियनु केडिसुव दुष्ट ।
मनसिजननु मीरि कोगिले ॥
घन पदवनु तन्न नेनेवरिगोलिदीव ।
धनद मित्रन सारु कोगिले ॥ २ ॥

नल्लरनगलिद मेल्लेदेयर कोल्व ।
पुल्लशरन पिंगि कोगिले ॥
एल्ल जीवरिगेरविल्लदोलवनीव ।
बल्ल भवनोळिरु कोगिले ॥ ३ ॥

मंगळवदोळनंगन बण्णिसे ।
भंगबल्लवे नोडु कोगिले ॥
कंगोळिसुव सर्वमंगळेयरसन ।
पिंगदे नी पाडु कोगिले ॥ ४ ॥

दुरुळ कंतुविनोडनिरे लोकदोळु निन्न ।
परपुट्टनेंबरु कोगिले ॥
धरेगे जनकनाद गुरु शंमुलिंगद ।
चरणपल्लव पिडि कोगिले ॥ ५ ॥

प्रकरण १७, पद ७ या पदाच्या चर्चेत खालील पदाचा समावेश आहे

२४

अग मनरूपी कोकिळे, तू साजरी-गोजरी, लाडकी व समजदार आहेस.

पूर्वी ध्यानावस्थेत मग्न असणाऱ्या शिवावर बाण सोडून कामदेवाने त्याचा तपोभंग केला व स्वत:ची राखरांगोळी करून घेतली. त्या कामदेवाचा त्याग कर. खचून न जाता चंद्रकोर मस्तकी धारण करणाऱ्या शिवाशी त्वरित एकरूप होऊन राहा ॥ १ ॥

मनुष्य काय किंवा ऋषिमुनी काय, त्यांच्या आचारविचारांचा व तपाचा कामदेव नाश करतो. त्याचा वारा अंगाला लागू देऊ नको. शिवाचे केवळ स्मरण केलेतरी तो शाश्वत पदाचे घबाड आपल्या पदरात टाकतो. कुबेराचा मित्र असणाऱ्या शिवाकडे तू जा ॥ २ ॥

पतिविरहामुळे सुकुमार हृदयाची स्त्री दु:खी असते. तिला पोळणाऱ्या मदनाला तू सोड व अवघ्या जनांचे सदैव कल्याण करणाऱ्या सर्वज्ञ परमेश्वरामध्ये तुझा वास असू दे ॥ ३ ॥

गोड सुस्वर गायनाने मदनाचे वर्णन करणे हा अध:पातच नाही का ? सर्व मंगल अशा पार्वतीचा प्रभू जो कांतिमान शिव, त्याचे स्तुतिसूक्त उल्हासाने गात राहा ॥ ४ ॥

दुष्ट कामाची संगत धरलीसतर तुझा परभृत असण्याचा कलंक कायमच राहील, म्हणून सृष्टिकर्त्या गुरू शंभुलिंगांचे चरणकमल घट्ट धर ॥ ५ ॥

परिशिष्ट २

टिपणे

१ (पृ. ११) जंबुद्वीप हे सप्तमहाद्वीपांपैकी एक आहे अशी परंपरा आहे. ही बेटे म्हणजे जंबू, प्लक्ष, शाल्मली, कुश, क्रौंच, शाक व पुष्कर. सप्तद्वीपांत जंबुद्वीप केंद्रस्थानी असून भरतखंड त्यातच मोडते. जंबुद्वीप म्हणजे पांचभौतिक देह असाही अर्थ करतात.

२ (पृ. ११) पाच पाच म्हणजे पाच तन्मात्रे व पाच महाभूते. शब्दतन्मात्र, स्पर्शतन्मात्र, रूपतन्मात्र, रसतन्मात्र व गंधतन्मात्र ही पाच तन्मात्रे व आकाश, वायू, तेज, आप व पृथ्वी ही पाच महाभूते आहेत. पाचात पाच म्हणजे तन्मात्रांत पंचमहाभूते अंतर्भूत आहेत. कारण तन्मात्रे म्हणजे स्थूल पंचमहाभूतांच्या गुणांची अतिसूक्ष्म मूळ स्वरूपे आहेत. पाचांत पाच मिसळणे म्हणजे महाभूतांचा तन्मात्रांत (स्थूलाचा सूक्ष्मात) लय करणे किंवा इंद्रिये बहिर्मुख आहेत ती अन्तर्मुख करणे. सर्गाच्या किंवा उत्पत्तीच्या वेळेला तन्मात्रांतून महाभूते निर्माण होतात व प्रलयकाळी ती त्यांतच लय पावतात असे सांख्य दर्शनाचे मत आहे. इथे स्थूलाकडून सूक्ष्म कडे जाण्यास सांगितले आहे. टिपण क्रमांक ८६ व १०८ पाहा.

३ (पृ. १३) कन्नड पदाच्या पाचव्या ओळीत ' जीव मनसु एंब तगणि उंगुटके हत्ति ', याऐवजी ' जीव मनसु एंब तगणि गुंगडु कच्चि ' असा शांतरस यांनी संपादित केलेल्या कूडळूरु बसवलिंग शरणर स्वर वचनगळु या पुस्तकात पृ. ४६ वर पाठ आहे. गुंगडु म्हणजे डास. याच ओळीत ढेकणाचा उल्लेख असल्याने डांस-ढेकूण चावतात असा अर्थ होतो. हाही पाठ ठीक आहे.

४ (पृ. १९) अष्टमद = द्रव्यमद, यौवनमद, स्त्रीमद, विद्यामद, कुलमद, रूपमद, उद्योगमद व अन्नमद. कित्येक वेळेला विद्यामद, धनमद व सामर्थ्यमद असा मदत्रयांचाच उल्लेख असतो.

५ (पृ. २३) पुरंदरदासांच्या या पदात व एकनाथांच्या एका अभंगात विलक्षण साम्य आहे. इतके की एक दुसऱ्याचे भाषांतर वाटावे. एकनाथांचा अभंग खाली दिला आहे :–

तैसें असावें संसारीं । जोंवरीं प्राचीनाची दोरी ॥
पक्षी अंगणीं उतरतीं । ते कां गुंतोनी राहतीं ॥ १ ॥
बाळीं घराचार मांडिला । तो सवेचि मोडोनि गेला ॥ २ ॥
वस्तीकर वसती आला । प्रातःकाळीं उठोनि गेला ॥ ३ ॥
शरण एका जनार्दन । ऐसें असतां भय कवण ॥ ४ ॥

(पाहा, सकलसंतगाथा, पुणें, १९२४, एकनाथगाथा क्र. ३२२०, पृ. २३४).

६ (पृ. २७) पुरंदरदासांनी गुंगुरि या किड्याचे उदाहरण दिले आहे. गुंगुरि म्हणजे कुंभारीण माशी. कुंभारीण माशी hymenoptera या प्रकारात मोडते, (class – insecta, order-hymenoptera). यातील मादी मातीची छोटी छोटी घरे बांधते. शक्तिहीन केलेले सुरवंट आणून ठेवते व तिथे अंडी घालून घरे बंद करून टाकते. मग उडून जाते. इथे आई पिलांच्या जवळ राहत नाही. अंड्यांतून बाहेर आल्याबरोबर अळ्यांसाठी खाद्य ठेवलेले असलेतरी त्या अळ्यांचे कोश होऊन त्यांतून पूर्ण वाढलेल्या माशा बाहेर येण्याच्या वेळी रक्षण करण्यास आई हजर नसते. त्या वेळी परमेश्वरच त्यांचे रक्षण करतो असे पुरंदरदास सांगतात.

७ (पृ. ३१) चार = चार वेद. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद.

८ (पृ. ३१) सहा = सहा शास्त्रे (दर्शने). न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा (वेदान्त).

९ (पृ. ३१) अठरा = अठरा पुराणे. मत्स्य, मार्कंडेय, भविष्य, भागवत, ब्रह्मांड, गरुड, लिंग, पद्म, वामन, अग्नि, कूर्म, स्कंद, नारद, वराह, ब्रह्मवैवर्तक, वायु, ब्रह्म, वाल्मीक. अठरा पुराणांची हीच एक यादी आहे असे सांगता येत नाही. विष्णु, शिव ही नावे असलेला व वायु आणि वाल्मीक ही नावे गाळलेला एक श्लोकही उपलब्ध आहे. लोकमान्यांनी गीतारहस्यात दिलेली यादीही बरीच वेगळी आहे. पुराणात ५ विषयांची चर्चा असते म्हणून त्यांना पंचलक्षण म्हणतात.

" सर्गश्च, प्रतिसर्गश्च, वंशो मन्वंतराणिच ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् " ॥

(पाच विषय म्हणजे उत्पत्ती, प्रलय, वंशांची माहिती, मन्वंतरांची माहिती (कालमापन), व वंशांचा इतिहास).

१० (पृ. ४५) भवतारक गीतगळु या पुस्तकात कन्नड पदाच्या १० व्या ओळीचा पाठ भक्तिज्ञानव हिडिदु नंबिदगे । मुक्तिय निश्चयदि पालिसुव । (भक्तिज्ञानयुक्त ज्याची श्रद्धा आहे त्याला देव निश्चितपणे मुक्ती देतो) असा आहे. हाही पाठ चांगला आहे.

११ (पृ. ४७) डॉ. सी. व्ही. रंगस्वामि यांच्या 'सिद्धपर्वतवासिनि देवि बगळा-मुखि ' या पुस्तकात पृ. ५२ वर कन्नड पदाचे तिसरे कडवे मुळातल्या

इवर मेले एन्न व्याकुळ हत्तलु
व्यवहारवेंबुदु एडवट्टायितु । याऐवजी
तवर मेले एन्न व्याकुळ हत्तलु
व्यवहारवेंबुदु एडवट्टायितु । असे आहे. तवर म्हणजे

माहेर किंवा मूळ घर किंवा परमेश्वर. परमेश्वरासाठी व्याकुळ झाल्यास संसाराचा फोलपणा लक्षात येतो. दोन्हींचा मथितार्थ एकच आहे. पण दुसऱ्या पाठात तवर शब्द आहे तो व्यवहाराच्या विरोधी आहे. मूळ घराबद्दल (तवर मेले) आसक्ती म्हणजे संसाराबद्दल अनासक्ती असा अर्थ होतो. शिवाय याच कडव्यात इवर शब्द एकदा आलेला आहे, म्हणून तोच शब्द पुन्हा येण्यापेक्षा तवर शब्द येणे ठीक. म्हणून हाही पाठ चांगला आहे.

१२ (पृ. ४७) कन्नड पदातील चवथ्या कडव्याचा पाठ डॉ. सी. व्ही. रंगस्वामींच्या पुस्तकात पुढीलप्रमाणे आहे :–

मंत्रिसिद क्रिये मरुळेन्नुतलि ।
मंत्रतंत्रके बग्गलिल्ल ।
मंत्रद महिमेयु महा मायि मनक्के
मांत्रिकरोळु बलु दोड्डवनु । गुरु ।

याचा अर्थ असा की गुरूंनी 'वेड्या' असे म्हटल्याबरोबर स्वतःला शहाणा समजणारा मी जागा झालो. चैतन्यरूप असून स्वतःला देह समजणे हा वेडेपणा, हे पूर्ण कळल्यावर मी जागा झालो. मंत्रिसिद क्रिये म्हणजे माझा मांसमय पिंड मंत्रमय केला म्हणून ते गारुडी आहेत. सामान्य जादूगार जादू दाखवून पैसे मागतात. पण तीन्ही काळात अयाचित वृत्तीने राहणारे व शिष्यकोटींचा उद्धार करणारे सद्गुरू सर्व मांत्रिकांत मोठे. 'मंत्रतंत्रके बग्गलिल्ल' हा प्रश्न समजलातर त्याचा अर्थ, 'नाम मिळण्याच्या आधी एका तरी मंत्रातंत्राच्या मागे लागणे मी सोडले का?' असा घेता येतो. पण गारुड्याच्या हस्तस्पर्शानंतर (अनुग्रह मिळाल्यानंतर) मात्र मी मंत्रातंत्राच्या मागे गेलो नाही. फक्त तत्त्वमसि या महामंत्राचा लक्ष्यार्थ ध्यानी घेतला. तू 'तो' आहेस असा द्वैतमूलक अर्थ हा वरवरचा अर्थ किंवा वाच्यार्थ. यालाच तंत्र म्हणता येईल. याच्या मागे मी लागलो नाही. पण तू व तो यात भेदच नाही, ते एकरूप आहेत हा खरा अर्थ–लक्ष्यार्थ– मी ध्यानात घेऊन त्याला शरण गेलो. महामायि मनक्के म्हणजे शुद्ध सत्त्वयुक्त चिन्मय मनाला, मंत्राचा महिमा (मंत्रद महिमेयु) कळतो म्हणजे नाममाहात्म्याचा अनुभव येतो. ऐक्य पावलेल्या आरूढाच्या दृष्टीने मंत्रतंत्र फोलकटाप्रमाणे आहेत.

१३ (पृ. ४९) शरीफसाहेब हे कारडगि येथे शिक्षक होते. एक दिवस काम संपवून रोजच्याप्रमाणे गावी परतताना गावाबाहेर अंधारात निर्जन स्थळी त्यांच्या माहितीतील त्यांच्यावर मोहित झालेल्या एका सुंदर स्त्रीने त्यांना गाठले. ते एकदम दिङ्मूढ झाले. पण क्षणात त्यांनी स्वतःला

सावरले व तिला न दुखवता तिचे सांत्वन करून घातक अशा मोहपाशातून स्वतःची सुटका केली. प्रस्तुत पदाच्या मागे ही घटना आहे. इथे सर्प म्हणजे कामसर्प.

१४ (पृ. ४९) शरीफसाहेबांवरील शरीफसाहेबर चरित्रे हागु तत्त्वपदगळु, या पुस्तकात पृ. ९१ वर हे पद आहे. तिथे काही पाठभेद आहेत. भावस्मृतियु तप्पि मनदि या कन्नड परमार्थसोपानातील पदाच्या तिसऱ्या ओळीऐवजी देहत्रयद स्मृतियु तप्पि (स्थूल, सूक्ष्म व कारण देहांची स्मृती गेली) असा पाठ आहे.

१५ (पृ. ४९) याच पदातील तिसऱ्या कडव्याचा पाठ मागच्या टिपणात उल्लेखिलेल्या पुस्तकात पुढीलप्रमाणे आहे :–

बोधे होलदि बरुतिरलु । दारियोळगे मलगि इरलु ।
पाददिंद पोडविगोत्ति । नादगोळिसितु निजदि नोडि ॥

(बोधरूपी शेतातून येत असताना वाटेत झोपलेल्या सापाला पायाने जोरात जमिनीत दाबले. त्यावेळी त्याने फूत्कार टाकला). संदर्भाला हा पाठ कन्नड परमार्थसोपानातील पाठाहून जास्त बरोबर वाटतो.

१६ (पृ. ४९) उपरिनिर्दिष्ट पुस्तकाच्या पाठात कन्नड परमार्थसोपानातील तिसऱ्या कडव्यानंतर खालील एक ओळ जास्त आहे :–

कारडगि ऊर होरगे दारिकट्टि तरुविदंथ !

(कारडगि गावाच्या बाहेर सापाने वाट अडवली होती). ही जास्तीची ओळ कवितेतली कथा आणखी स्पष्ट करते.

१७ (पृ. ४९) या पदाबद्दल आणखी एक गोष्ट नमूद करायला हवी. सारनाथ येथील बुद्धाच्या पायाखाली दाखवलेल्या चक्राबद्दल गुरुदेव रानडे म्हणतात की, प्रथम त्याचा अर्थ कळला नाही पण नंतर एकदम सुचले की बुद्ध भवचक्राच्या पार गेला असल्याने भवचक्र पायाखाली दाखवणे अनुचित नाही (See, The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints, p. 23). याची तुलना गुरु-

देवांनी हावु तुळिदेने मानिनि यातील सापाला तुडवण्याच्या क्रियेशी केली आहे. जो खरोखर विषयांच्या पूर्णपणे पार गेला आहे तोच म्हणू शकतो की मी सापाला तुडविले.

१८ (पृ. ५१) शरीराच्या बाहेर उघडणारी नऊ द्वारे म्हणजे :–
मुख, २ नाकपुड्या, २ डोळे, २ कान, पायू व उपस्थ.

१९ (पृ. ५७) ढोबळपणे आगम व निगम दोन्ही शब्द वेदांसाठी वापरतात. परंतु मुळात हे भिन्न आहेत. निगम म्हणजे वैदिकमत आणि आगम म्हणजे पुराणे व तंत्रशास्त्रातील मत. वेदान्ताला निगमान्तविद्या म्हणतात. आगमामध्ये ध्यान, विधी, योग व पूजातंत्र यांचा अंतर्भाव होतो. निगमांचा संबंध मुख्यत्वेकरून ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्याशी असून आगमांचा संबंध अथर्ववेदाशी आहे. आगम हे प्रत्यक्ष शिवाने दुर्वास ऋषींना सांगितले असे म्हणतात. शैव पंथात बहुधा आगम हाच शब्द प्रमाणग्रंथांना वापरला जातो. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथातील अनेक पदांत, विशेषत: वीरशैव संतांच्या पदांत, आगम हा शब्द आला आहे यात आश्चर्य नाही.

२० (पृ. ५९) पाच भूमिचोर म्हणजे काम, क्रोध, लोभ, मोह व मत्सर.

२१ (पृ. ५९) हल्ला करणारे आठ योद्धे म्हणजे अष्टमद; टिपण क्रमांक ४ पाहा.

२२ (पृ. ५९) दहा योद्धे म्हणजे दशेंद्रिये. ५ ज्ञानेंद्रिये व ५ कर्मेंद्रिये. डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा ही ज्ञानेंद्रिये; हात, पाय, जीभ, पायू व उपस्थ ही कर्मेंद्रिये.

२३ (पृ. ६९) टिपण क्रमांक ७ पाहा.

२४ (पृ. ६९) टिपण क्रमांक १९ पाहा.

२५ (पृ. ६९) टिपण क्रमांक ८ पाहा.

२६ (पृ. ६९) आपल्या चारी बाजूंना चार अग्नी पेटवून व डोक्यावर सूर्याचा ताप सहन करून तपश्चर्या करणे.

२७ (पृ. ७३) आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक ताप.

२८ (पृ. ७५) टिपण क्रमांक २२ पाहा.

२९ (पृ. ७७) सत्त्व, रज व तम यांच्या पलीकडे जाणे म्हणजे त्रिगुणातीत होणे. या पदाबद्दल एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. हे पद मडिवाळयोगि (कडकोळ) यांचे आहे असे म. श्री. देशपांडे यांनी संपादित केलेल्या कन्नड परमार्थसोपानात म्हटले आहे. परंतु अलीकडे जानपद संतकवींबद्दल नवीन माहिती उजेडात येऊ लागली आहे. त्यानुसार ते कृष्णप्प खैनूर यांचे आहे. डॉ. एम. एस. लट्टे यांनी संपादित केलेल्या कडकोळ मडिवाळेश्वर विरचित स्वरवचनगळु या पुस्तकाच्या प्रस्तावनेत (पृ. १८) ते म्हणतात की, मडिवाळेश्वरांच्या शिष्यांपैकी खैनूर कृष्णप्प हे पंडित होते व कडलेवाड सिद्धप्प हे साधेसुधे गृहस्थ होते. दोघांनाही मडिवाळयोगींनी ना (मी) ह्या अक्षराचा उपयोग करून पद करून आणण्यास सांगितले. कृष्णप्पांनी ' ना कडकोळद गुलामा ' (मी कडकोळचा गुलाम आहे) हे पद रचले. सिद्धप्पांनी ' ना एनु वेळेनप्प निम्म कूसु ' (मी तुझे अज्ञानी बालक आहे) असे पद केले. मडिवाळेश्वरांना सिद्धप्पांचे पद फार आवडले व सिद्धप्पांना उद्देशून ' ज्ञानपूर्ण जगज्ज्योति ' हे पद रचून त्यांनी आपल्या शिष्याला आशीर्वाद दिला अशी कथा आहे. जाता जाता हे नमूद करावेसे वाटते की ज्ञानपूर्ण जगज्ज्योति ही आरती निंबाळ येथे केव्हा केव्हा म्हटली जाते.

३० (पृ. ७७) श्री मनोहरराव देशपांडे यांनी केलेली आपल्या सद्गुरूंची म्हणजे श्री अंबुराव महाराज तथा बाबा यांची ही आरती आहे. श्री बाबांनी आपले जीवन सद्गुरू श्री भाऊसाहेब महाराज यांच्या चरणी संपूर्ण वाहिले होते. सद्गुरुवचन त्यांना वेदवाक्य होते. ते परमार्थाच्या कार्यात आपल्या गुरूंच्या हातातील साधनमात्र होते म्हणून त्यांना इथे भाऊरावांच्या हातातील मुरली म्हटले आहे.

३१ (पृ. ७९) दहा प्रकारचा नाद :—

चिणीति प्रथमः । चिंचिणीति द्वितीयः । घंटानादस्तृतीयः । शंखनादश्चतुर्थः । पंचमस्तन्त्रीनादः । षष्ठस्तालनादः । सप्तमो वेणुनादः । अष्टमो मृदंगनादः ।

नवमो भेरीनादः । दशमो मेघनादः । नवमं परित्यज्य दशममेवाभ्यसेत् ।
—हंसोपनिषद्, २

(चिण् हा पहिला नाद, चिण् चिण् हा दुसरा, तिसरा घंटानाद, चवथा शंखनाद, पाचवा एकतारीचा नाद, सहावा टाळीचा, सातवा बासरीचा, आठवा मृदंगाचा, नववा भेरीचा व दहावा मेघनाद. पहिले नऊ सोडून दहाव्याचा अभ्यास करावा). स्थूल नाद ऐकू येत असताना सूक्ष्म नादही ऐकू येत असतात. स्थूल नादावरून लक्ष काढून सूक्ष्मावर लक्ष ठेवावे म्हणजे थोड्याच वेळात स्थूल नाद बंद होतात असा अनुभव येईल (श्री. म. वैद्य, प्रणवोपासना, पृ. १७४). सर्वांपेक्षा श्रेष्ठ व शेवटचा नाद म्हणजे स्पष्ट ओंकार असा ध्वनी उमटणे (तत्रैव, पृ. १७६).

३२ (पृ. ८१) प्राण, अपान, समान, उदान व व्यान. प्राण हृदयाच्या ठिकाणी, अपान गुदाच्या जागी, समान नाभिस्थानी, उदान कंठस्थ असून व्यान सर्व शरीरभर संचार करतो.

३३ (पृ. ८७) टिपण क्रमांक २९ पाहा.

३४ (पृ. ८७) काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर.

३५ (पृ. ८७) टिपण क्रमांक २२ पाहा.

३६ (पृ. ९३) टिपण क्रमांक ३४ पाहा.

३७ (पृ. ९३) टिपण क्रमांक ४ पाहा.

३८ (पृ. ९३) सात = सात व्यसने. निरुक्त, ४.२७ मध्ये सात पातके सांगितली आहेत :—

(१) स्तेयम् (चोरी), (२) तल्पारोहणम् (व्यभिचार), (३) ब्रह्महत्या (ब्राह्मणाची हत्या), (४) भ्रूणहत्या (गर्भाची हत्या), (५) सुरापानम् (दारू पिणे), (६) दुष्कृतकर्मणाम् पुनः पुनः सेवा (पुन्हा पुन्हा दुष्कृत्ये करणे), (७) पातके अनृतोद्यम् (स्वतःची पापे लपवणे). गुरुदेवांनी वेगळ्या सप्त व्यसनांचा उल्लेख केला आहे :— शिकार, मद्यपान, द्यूत, तिरस्कार, दंड, व्यभिचार, शिक्षा (Pathway

to God in Kannada Literature, P. 219). तनुव्यसन, मनव्यसन, धनव्यसन, राज्यव्यसन, उत्साहव्यसन, सेवकव्यसन, व स्त्रीव्यसन अशी सप्त व्यसनेही मोजतात. किंवा मृगया, जुगार, दिवसा झोपणे, परनिंदा, स्त्रीलालसा, मद्यपान, नृत्यगानवादनात अभिरुची घेणे अशीही सांगितली जातात.

३९ (पृ. ९३) टिपण क्रमांक १८ पाहा.

४० (पृ. ९५) भीमाशंकर मठ, सिंदगि (जि. विजापूर) यांनी प्रसिद्ध केलेल्या नित्यभजनमाला संग्रह, संग्राहक, मल्हार व्यंकटेश सोलापूरकर, शके १८९१, यात हे पद असून त्यात काही किरकोळ शब्दांचे फरक आहेत. एक फरक महत्त्वाचा आहे. कन्नड परमार्थसोपानातील १९व्या ओळीचा पाठ या पुस्तकात 'आसन द्वार कवाटव बलिसि श्वासगळेल्ला निलसिदने' असा आहे (आसन दृढ केले, नवद्वारांची कपाटे घट्ट बंद केली व श्वासोच्छ्वासाचा निरोध केला). हठयोगाच्या आसनादी क्रियांच्या दृष्टीने हाही पाठ लक्षात घेण्याजोगा आहे.

४१ (पृ. ९५) या पदाचा कर्ता कोण आहे याबद्दल शंका असल्याचे गुरुदेवांनी म्हटले आहे. शेवटच्या ओळीत ईश, दत्त, महेश, दिगंबर असा जो उल्लेख आहे तो ध्यानात ऐकू आलेल्या दिव्य नामांचा आहे व त्यांपैकी एखादी (उदा. ईश) ही कवीची मुद्रिका असू शकेल असेही ते म्हणतात. अलीकडे झालेल्या संशोधनावरून असे दिसते की हे पद सिंदगि मठाच्या भीमाशंकर नावाच्या संतकवीचे असून भीमाशंकर, सहजानंद किंवा दत्त महेश या मुद्रिका वापरून यांनी अनेक पदे केलेली आहेत (पाहा, कृष्ण कोल्हार-कुलकर्णी, काखंडकि श्री महिपतिरायरु, पृ. ५७).

४२ (पृ. ९७) सर्पभूषणांच्या कैवल्यकल्पवल्लरि या पुस्तकात पृ. १६२ वर हे पद आहे. त्यात व कन्नड परमार्थसोपानातील पदात पाठभेद आहेत. कन्नड परमार्थसोपानातील ३ व ४ या ओळी या पुस्तकात खालीलप्रमाणे आहेत :–

वेदान्तदोळु गोप्य । वाद तत्त्वने सं–
पादिसि मनदि वि– । नोदिसि सुखिसेंदु

कन्नड परमार्थसोपानातील 'बोधिसि' (उपदेश करून) ऐवजी येथील 'संपादिसि' (प्राप्त करून) हाही पाठ योग्य वाटतो.

४३ (पृ. ९७) कैवल्यकल्पवल्लरीतील पदात कन्नड परमार्थसोपानमधील पदातील पहिल्या कडव्याच्या आधी आणखी एक कडवे आहे ते असे :–

तलेवागि वेळदिरुव । पंकेजद
दळदे तिरुगुतिरुव ।
कळहंस शिशुविन । सुळुहनु तडेदु त–
न्नळिनद कर्णिके– । योळ् निंतु नलियेंदु ॥ १ ॥

[मूलाधार चक्रापाशी कुंडलिनी खाली डोके करून निद्रिस्त आहे. तिथला हंसबालकांचा व्यापार थांबवून, सतत चाललेला श्वास–उच्छ्वासाचा व्यापार थांबवून (म्हणजेच कुंभक करून), तिथे उभे राहून मी डोलावे असा अनुग्रह कर.] हे कडवे घातल्यानंतर पुढच्या कडव्यांचे क्रमांक बदलतात. एक कडवे वाढते.

४४ (पृ. ९७) याच पदात कन्नड परमार्थसोपानातील पदाच्या पाचव्या ओळीतील आदि अन्त्यव बोधिसि ऐवजी आदि अन्त्यव भेदिसि असा कैवल्यकल्पवल्लरीचा पाठ आहे. चक्रभेदाचा विषय असल्याने भेदिसि शब्द बोधिसिपेक्षा जास्त सयुक्तिक वाटतो.

४५ (पृ. ९७) टिपण क्रमांक ३१ पाहा.

४६ (पृ. ९७) नवमार्ग म्हणजे नवीन मार्ग. दुसरा अर्थ :– चार प्राण (अपान, उदान, व्यान व समान) तसेच पाच उपप्राण (नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय) या नवविध वायूंना एका प्राणात आणणे.

४७ (पृ. ९९) पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचरमध्ये पृ. १२४ वर गुरुदेव रानडे म्हणतात, 'ह्या पदाची रचना होऊन ते मला वाचून दाखवले

गेले त्या वेळेस माझा भागवताचा खोल अभ्यास नव्हता. तिथे अखेरी-अखेरीस आलेला उद्धव व श्रीकृष्ण यांचा संवाद वाचनात आला असता तर या पदात काही फेरफार केला असता... उद्धव हा भक्तश्रेष्ठ आहे.' नंतर असा बदल करून प्रह्लादाचे दोष दाखविणारे एक कडवे वाढवले गेले आणि पदाच्या पहिल्या व शेवटच्या ओळीत प्रह्लादाऐवजी उद्धवाचे नाव घातले गेले. नव्या पदातील १ ली ओळ :–

भक्तनेंदरे भक्त शुद्ध उद्धवनु (खरा भक्त उद्धवच). नव्या पदात वाढवलेले कडवे :–

भंगियलि तुलसियोळु जनिसि हरियने भजिसि ।
हरिगागिये कष्टराशि सहिसि ।।
तंदेयनु कायेंदु कोनेगे वर वेडुतिह ।
प्रह्लादनेंतु हरिभक्त तानु ।।१।।

(प्रह्लाद भांगेतील तुळस होता. त्याने हरिभक्ती करून देवासाठी पर्वतप्राय कष्ट सोसले. परंतु शेवटी माझ्या बापाचे रक्षण कर असा वर मागून घेतला. असा मागणी करणारा प्रह्लाद श्रेष्ठ भक्त कसा ?) नव्या पदातील शेवटची ओळ :–

भजिप उद्धवनेमगे वंद्यतमनु ।। (...भजन करणारा उद्धवच आम्हाला सर्वाधिक वंद्य आहे).

४८ (पृ. १०७) कन्नड परमार्थसोपानमधील पदातील ६ वी ओळ ' झोलि होगि गुरुपादके होंदिरबेकु ' अशी आहे. पण शरीफसाहेबर चरित्रे हागु तत्त्वपदगळु या पुस्तकात (पृ. १४७) त्या जागी

मोजिले होगि शिशुनाळधीशन

पादके नीनु बिदिरबेको (मोठ्या कौतुकाने तू शिशुनाळधीशांच्या पायांचा आश्रय घे), अशा ओळी असल्याने ते पद शिशुनाळधीशांचेच असावे असा तर्क वाहतो.

४९ (पृ. १०७) कन्नड परमार्थसोपान व शरीफसाहेबर चरित्रे हागु तत्त्वपदगळु या पुस्तकांतील या पदाच्या कडव्यांचा क्रम वेगवेगळा आहे.

कन्नड परमार्थसोपानात पदाची १० वी ओळ, एच्चरदोळगे निद्दि हत्तिरवेकु (जागे असताना झोप लागावी) असून दुसऱ्या पुस्तकात निद्देयोळगे सदा एच्चरवेको (झोपेतही सदा जागे असावे) अशी आहे. वरवर विरुद्ध वाटणाऱ्या या ओळींचा मथितार्थ एकच आहे, कारण झोप म्हणजे साधी झोप नसून योगनिद्रा आहे. जागे असतानाही ती लागावी असे एक पद सांगते व योगनिद्रेत राहून परमेश्वर स्मरणाची जाग ठेवावी असे दुसरे पद सांगते.

५० (पृ. १०९) हौदप्पा हौदप्पा हौदु हे पद Pathway to God in Kannada Literature मध्ये निरुपाधिसिद्ध या कवीचे आहे असे म्हटले आहे पण ते शरीरसाहेबांच्या पदांच्या उपरिनिर्दिष्ट संग्रहात आहे असे वर म्हटलेच आहे. डॉ. एम. एस. लट्टे यांनी संपादित केलेल्या कडकोळ मडिवाळेश्वर विरचित स्वरवचनगळु या पुस्तकात पृ. ६३ वर हे पद आले आहे. तिथली शेवटची ओळ झोलि होगि महांतन मुट्टिरवेकु (झोक जाऊन महांतांच्या पायांवर पडावे) अशी आहे. महांत या या मुद्रिकेवरून हे पद मडिवाळयोगींचेही असू शकते. एकूण या पदाचे कर्तृत्व अनिश्चित आहे.

५१ (पृ. १०९) ढोबळमानाने वेदान्त व सिद्धान्त या शब्दांनी तात्त्विक ज्ञान व प्रत्यक्ष साधन ह्या गोष्टी सुचवल्या जातात. श्रुतिस्मृतिशास्त्रोक्त ज्ञान म्हणजे वेदान्त. गुरुमुखाने मंत्र मिळवून हे ज्ञान साक्षात् अनुभवात उतरवणे म्हणजे सिद्धांत. केवळ शब्दज्ञानाचा उपयोग नाही, खरे आत्म-ज्ञान किंवा अध्यात्म याची नितांत आवश्यकता असते म्हणून सिद्धी साधणे तो सिद्धांत असा याचा अर्थ निघतो. शिवयोग्याला वेदान्तज्ञान हवे व सिद्धान्तशास्त्रात निपुणताही पाहिजे. 'वेदु संपला तें वेदान्त। सीध साधलि ते सीधांत' असा विसोबा खेचरांच्या पट्स्थलसिद्धांत या जुन्या ग्रंथात उल्लेख आहे (पाहा, गुरुमाऊली, संपादक, रा. चि. ढेरे, १९८९, पृ. २०६). वेदान्त म्हणजे शास्त्रप्रचिती, सिद्धांत म्हणजे गुरुप्रचिती व

धादांत म्हणजे आत्मप्रचिती असाही अर्थ केला जातो. तीन्ही सद्गुरु वचनात आहेत असे समर्थ म्हणतात :–

सद्गुरुवचन तोचि वेदान्त । सद्गुरुवचन तोचि सिद्धान्त ।
सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आता ॥ दासबोध, ५.६.५०

५२ (पृ. १२३) शिवाची पाच मुखे :– सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान.

५३ (पृ. १२३) माणिक, मोती, पोवळे, पाचू, पुष्कराज, नीळ (शनि), हिरा, गोमेद व वैडूर्य.

५४ (पृ. १२५) बाहेर चार द्वारे व आत पांच द्वारे :– आतल्या मार्गावर प्राणादी म्हणजे प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे पाच मित्र आहेत. वायुदेवाच्या किंवा मुख्य प्राणाच्या मध्यस्थीने श्री विष्णूकडे जाता येते असे द्वैत संप्रदायाचे मत आहे. म्हणून पाच प्राण हे आतले पाच रस्ते झाले. बाहेरचे चार रस्ते म्हणजे भक्ती, ज्ञान, कर्म व ध्यान हे चार मार्ग. हे पद विजयदासांचे आहे व द्वैत संप्रदायाला अनुसरून असा अर्थ करता येतो.

५५ (पृ. १३२) भूर्लोक, भुवर्लोक, स्वर्लोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक हे सात लोक आणि अतळ, वितळ, सुतळ, महातळ, तळातळ, पाताळ व रसातळ ही सात पाताळे मिळून चतुर्दश भुवने.

५६ (पृ. १३७) मैयेल्ला मुसुकितु याऐवजी शांतरस यांनी संपादित केलेल्या कूडलूरु बसवलिंग शरणर स्वरवचनगळु या पुस्तकात पृ. ५७ वर मैयिल्लदे सोंकुवदु (शरीर नसून स्पर्श करते) असा पाठ आहे. पदात केलेल्या ब्रह्माच्या एकूण वर्णनाला हा पाठ अधिक जवळचा आहे.

५७ (पृ. १३७) कन्नड पदातील ९ व १० या ओळींऐवजी

जिव्हेयिल्लदे रुचि परिपरि सवियुवुदु ।
देहविल्लदे गात्र बहु दोड्डदागिहुदु ॥ (जिभेविना नाना स्वाद

चाखते, देह नसून गात्रे आडदांड आहेत) असा वरच्या टिपणात उल्लेखिलेल्या पुस्तकात पाठ आहे. हाही एकूण वर्णनाला जुळणारा आहे.

५८ (पृ. १३९) टिपण क्रमांक २७ पाहा.

५९ (पृ. १४५) टिपण क्रमांक ५५ पाहा.

६० (पृ. १४५) लकुलीश किंवा नकुलीश हा महेश्वराचा अवतार मानला जातो. हा पाशुपत संप्रदायाचा संस्थापक आहे.

६१ (पृ. १४५) अल्लमप्रभूंच्या नावाप्रमाणे बसवेश्वरांच्या नावाच्या अक्षरांचा अर्थ करता येतो असे गुरुदेव रानडे म्हणतात. बसव या अक्षरांचा एक अर्थ शून्यसंपादने. खंड ५, पृ. ३१३ वर मिळतो :–

व म्हणण्याने माझ्या भवाचा (संसाराचा) नाश झाला.
स म्हणण्याने मी सर्वज्ञानी झालो.
व हे अक्षर वाचेतून आल्यावर मी चैतन्यपूर्ण झालो.

इथेच पृ. ३५८ वर दुसऱ्या तऱ्हेने अक्षरांचा अर्थ सांगितला आहे :–

व म्हणण्याने मी परमेश्वराच्या जवळ गेलो.
स म्हटल्याबरोबर मीच आत्मा झालो.
व उच्चारल्यावर मी निरवयव ब्रह्म झालो.

कन्नड लिपीतील कन्नड परमार्थसोपानात हे वचन हरिहर या कवीचे आहे असे म्हटले आहे. पण हे हरिहरांचे आहे असे वाटत नाही.

६२ (पृ. १४७) या पदाचा आणखी एका तऱ्हेने अर्थ करता येईल. एक, दोन, तीन, चार किंवा पाच अक्षरी वेगवेगळ्या मंत्रांऐवजी पाच अक्षरांचा शिशुनाळधीशाच्या नावाचा एकच मंत्र (ॐ नमः शिवा) घेता येईल. वीरशैव परंपरेत ॐ नमः शिवा किंवा नमःशिवाय या मंत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ॐ नमः शिवा हा मंत्र गृहीत धरून पदाचे विवरण करता येईल :–

शाश्वत मंत्राच्या पहिल्या अक्षराचा (ओ) जप केलातर भक्त तेजात

न्हाऊन निघतो. ओ मध्ये प्रणवाच्या अ व उ या दोन मात्रा येतात. एकाग्र चित्ताने ध्यान केल्यावर या मात्रांचा लय होत जाऊन तेजाचा अनुभव येतो असे योगाच्या अनेक ग्रंथांत सांगितले आहे. दोन अक्षरांच्या मधल्या शून्यावर ध्यान धरलेतर आत्मदर्शन स्थिरावते. मधले शून्य म्हणजे ओ हे पहिले अक्षर व न हे दुसरे अक्षर या मधील अनुस्वार. ॐ नमः शिवा म्हणताना ॐ मधील अर्धा म् म्हणण्याची क्रिया न थांबवता पुढचे न हे अक्षर उच्चारले तर त्या 'म्' ला 'मधले शून्य' (नडुविन शून्य) किंवा अनुस्वार म्हणता येईल.

लिंगाय नमः असा मंत्र घेऊनही लिं म्हटल्यावर न थांबता गा म्हटल्यास तो अनुस्वारही 'मधले शून्य' होऊ शकतो. ॐ नमः शिवा हा मंत्र कन्नड लिपीत पुढीलप्रमाणे लिहितात :— ಓಂ ನಮಃ ಶಿವಾ

इथे पहिल्या दोन अक्षरांमध्ये शून्य येते. यावर ध्यान करण्यास सांगितले आहे. म् ही प्रणवाची अर्धमात्रा असून ती तुरीयावस्थेची द्योतक आहे. ही अद्वैतरूप आहे. म्हणजे जीव-शिवाचे ऐक्य इथे होते. नंतर ॐ नमः अशी तीन अक्षरे जपलीतर कोट्यवधी पापे नाश पावतात. ॐ नमःशि इतक्या चार अक्षरांचा जप केलातर हवी ती गोष्ट प्राप्त होते. ॐ नमः शिवा या पंचाक्षरी मंत्राच्या जपाने सद्वस्तू हातात येते. प्रणवाच्या मात्रा लक्षात घेऊन ॐ नमः शिवा या मंत्राचा असा अर्थ होतो.

६३ (पृ. १४९) या पदाचा आणखी एक पाठ प्रचलित आहे. त्या पाठातील व कन्नड परमार्थसोपानमधील पदातील पहिल्या दहा ओळींत काही फरक नाही. तिथून पुढे नव्या पाठात ओळी वरखाली असून एक कडवे जास्त आहे. नवा पाठ ११ व्या ओळीपासून खालीलप्रमाणे आहे :—

अष्टभोगदिं नित्य लोलुपते पडेवाग ।
नष्ट दारिद्र्यवु बंदागलु मनवे ॥ २ ॥

सुलियुव कळ्ळनु बंदाग । घोरारण्यदोळ् ।
व्याघ्रवु हरियुवाग ॥

छळि ज्वर केम्मु उव्वस रोग बंदाग ।
मळे गाळि सिडिलानार्भटदल्लि मनवे ॥ ३ ॥

विसजाक्षि नोडुवाग । कुळितु नित्य ।
ओसेदु माताडुवाग ॥
बसुरलिं बंद सुमगन मुद्दिसुवाग ।
हसनाद वस्त्रंगळुडुवागलु मनवे ॥ ४ ॥

गुरुसेवे गैय्युवाग । श्री गुरु कोट्ट ।
वरमंत्र जपिसुवाग ॥
गुरुवे गुरुवे कल्पतरुवे । पालिसु ऐंदु । श्री ।
गुरुमहालिंगरंगन नंबो मनवे ॥ ५ ॥

(सर्व सुखोपभोग घेत असताना अथवा दारिद्र्याने गांजले असतानाही, रे मना, नामाची कास धर ॥ २ ॥

लूट करणारा चोर येवो किंवा घोर अरण्यात वाघ पकडून खावो; थंडी, ताप, खोकला येईल किंवा श्वास लागेल; वारा, पाऊस येईल किंवा विजेचा कडकडाट होईल, तरीही, मना, तू नामाला चिकटून राहा ॥ ३ ॥

प्रिय पत्नीबरोबर सुखाने बोलत बसले असताना, पोटातल्या बाळाला कुरवाळत असताना किंवा धौत वस्त्र नेसत असताना, हे मना, नाम सोडू नको ॥ ४ ॥

गुरुसेवा करत असताना नामस्मरण कर. गुरूंनी दिलेला श्रेष्ठ मंत्र केवळ जिभेने न उच्चारता निष्ठेने जपत राहा. हे गुरू, कल्पतरू, कशाही अवस्थेत माझे रक्षण करा, असे म्हणून हे मना, तू गुरुमहालिंगरंगांना शरण जा ॥ ५ ॥).

६४ (पृ. १५७) या पदाचा आशय कुमारव्यासांच्या भारतात एके ठिकाणी स्पष्ट दिसतो. श्रीकृष्ण भीष्मांना मारायला धावले तेव्हा भीष्म उद्गारले :—

देव नी दिट कोलुवडेयु ना
सावेने तानावनेंबुद

देवररियिरेलै वृथा संभिन्न रोषदलि ।
देव नामद जोडु नम्मनु
कावुदै नी मुनिदडेयु निम–
गावु हेदरेवु नामधारिगळतुलबलरेंद ॥ भीष्मपर्व, ६.४३

(देवा, तुम्ही मला मारायला धावलाततरी मी मरणार आहे का ? रागाच्या भरात आपण कोण आहोत तेच तुम्ही विसरला आहात. तुमचे नाम आम्हाला वज्रपंजर आहे. तेच आमचे रक्षण करेल. नामाचे अतुल बळ असल्यावर तुमच्या रागाची आम्हाला काय पर्वा ?)

६५ (पृ. १५९) टिपण क्रमांक २९ पाहा.

६६ (पृ. १६३) वाद्ये चार प्रकारची आहेत. (१) आनद्ध :–आवरण असलेली वाद्ये. उदा. तबला, मृदंग. (२) सुषिर :–श्वास फुंकून स्वर काढण्याची वाद्ये. उदा. बासरी, शंख. (३) तत :–तारा असलेली वाद्ये. उदा. तंबोरा, वीणा. (४) घन :– आपटून वाजविण्याची वाद्ये. उदा. टाळ, झांजा. (पाहा, पुरंदरदासर साहित्य–१, पूजातत्त्व).

६७ (पृ. १६९) टिपण क्रमांक ४ पाहा.

६८ (पृ. १६९) टिपण क्रमांक ३४ पाहा.

६९ (पृ. १६९) या पदातील बंदुकीचा नेम धरण्याच्या रूपकाची कुंडलिनी-उत्थापनाच्या परिभाषेशी पूर्णपणे सांगड घालता येत नाही.

कुर्यादनन्तरं भस्त्रां कुंडलीमाशु बोधयेत् ।
भिद्यन्ते ग्रंथयो वंशे तप्तलोहशलाकया। (योगशिखोपनिषद्, १.११३).

यात तापलेल्या लोखंडाच्या गजाचा (तप्तलोहशलाका) उल्लेख आहे. गुरुदेवांनी गजवनु जडिदु याचा अर्थ 'लोखंडी गजाने मारा' असा दिला आहे. म्हणून तत्सदृश अर्थ भावानुवादात केला आहे.

७० (पृ. १७१) लोकेषणा, वित्तेषणा, पुत्रेषणा.

७१ (पृ. १७३) टिपण क्रमांक ३४ पाहा.

७२ (पृ. १७३) टिपण क्रमांक २९ पाहा.

७३ (पृ. १७३) टिपण क्रमांक १८ पाहा.

७४ (पृ. १७३) टिपण क्रमांक ४ पाहा.

७५ (पृ. १७३) सर्पभूषणर कैवल्यकल्पवल्लरि, संग्राहक, श्री महांतेश शास्त्रि एच. टी., या पुस्तकात पृ. १५६ वर कन्नड पदातील २३ व्या ओळीत मेरेव सर्पद याऐवजी मोरेव सर्पद असा पाठ आहे. मोरेव म्हणजे गुरगुरणारा. कुंडलिनी सर्पिणीच्या संदर्भात हा पाठ ठीक आहे. त्याचप्रमाणे या पुस्तकात प्रत्येक कडव्यात ॐ गुरुसिद्धा याऐवजी ओ गुरुसिद्धा (हे गुरुसिद्धा) असे आहे. शिष्य आपल्या गुरूंना उद्देशून बोलत आहे.

७६ (पृ. १७५) लिंगाच्या विविध भागांच्या वर्णनासाठी पाहाः– सिद्धांत–शिखामणि (मराठी भावानुवाद), वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९०, पृ. १२०. या पदात आरध्व असा एक पारिभाषिक शब्द आला आहे. तसेच इष्टलिंग व प्राणलिंग यांच्या पाठोपाठ येणाऱ्या 'भावलिंग' या पदात, (कडवे ७), या ठिकाणी षडध्व शब्द आहे. आरध्व किंवा षडध्व म्हणजे सहा मार्ग. वर्णाध्व, पदाध्व, मंत्राध्व, तत्त्वाध्व, भुवनाध्वं आणि कलाध्व हे सहा मार्ग आहेत. सहा म्हणजे षट्स्थले असा अर्थ घेतात, त्याचप्रमाणे सहा मार्ग असाही घेतात.

७७ (पृ. १७७) टिपण क्रमांक २९ पाहा.

७८ (पृ. १७७) भगवद्गीता ६.१४ वरील ज्ञानेश्वरांचे भाष्य पाहिलेतर संतांच्या अनुभवातले साम्य डोळ्यात भरेल. विशेषतः 'नादबिंदू नेणिजे कळा ज्योति' (ज्ञा. ६.२८८) हे शब्द लक्ष वेधतात.

७९ (पृ. १८३) निजगुणशिवयोगि यांच्या परमार्थगीते या पुस्तकातील पहिल्या गतीतील (प्रकरणातील) दुसऱ्या श्लोकामधील काही ओळी वेचून कन्नड परमार्थसोपानात घेतल्या आहेत. तो श्लोक असाः—

सुजनशिरोमणि शिष्यने निन्न ।
निजवूहिसव्वारदु संपन्न ॥
अदु वचनके गोचरमल्लेंदु ।
अदु मानसके विषयमल्लेंदु ॥
पेळुत्तं मत्तोंदनुविंद ।
केळुपदेशिसवेकदरिंद ॥
सत्यं ज्ञानसुखात्मकनेंदु ।
नित्यं परिपूर्णं तानेंदु ॥
दृश्य विलक्षणदिं कुरुहिट्ट ।
वश्यमिदेंदेने लक्षिसिकोट्ट ॥
मनसिगे गोचरमेंदेनेसुत्त ।
ज निसि पेळितु श्रुतिगळ मोत्त ॥

(अधिकारचतुष्टयसंपन्न अशा सज्जनशिरोमणी शिष्या, निजस्वरूप अनुमानाच्या म्हणजे तर्काच्या पलीकडे आहे. परतत्त्व शब्दाच्या व्यापारापलीकडे आहे. मनाला त्याची प्रतीती येत नाही. दुसऱ्याच एका उपायाने ते जाणावे लागते. ऐक, ते त्या उपायाने समजावून सांगावे लागते. ते सच्चिदानंद-स्वरूप आहे. ते नित्य (प्रागभाव, ध्वंसाभाव, अन्योन्याभाव व अत्यंताभाव या चार अभावांचा स्पर्श नसलेले) व परिपूर्ण (देश-काल-वस्तू या तीन भेदांपलीकडचे) आहे. असत्-जड-दुःख-अनित्य-परिच्छिन्नात्मक मायातत्त्वाच्या विरुद्ध धर्माचे आहे. परतत्त्व सदोदित आपल्याला प्राप्तच आहे. हे हातावर आवळा डोलावा तसे स्पष्ट दाखवले. हे ज्ञानदृष्टीलाच कळते असे श्रुतींचे सार आहे).

८० (पृ. १८७) टिपण क्रमांक ३८ पाहा.

८१ (पृ. १८७) टिपण क्रमांक ४ पाहा.

८२ (पृ. १८७) टिपण क्रमांक ३४ पाहा.

८३ (पृ. १८७) टिपण क्रमांक २२ पाहा.

८४ (पृ. १८९) टिपण क्रमांक ३४ पाहा.

८५ (पृ. १८९) टिपण क्रमांक २९ पाहा.

८६ (पृ. १८९) सांख्य तत्त्वज्ञानाच्या वर्गीकरणाप्रमाणे जगात एकूण पंचवीस तत्त्वे आहेत. पुरुष, मूलप्रकृती, महत्, अहंकार, मन, ५ ज्ञानेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये, ५ तन्मात्रे व ५ महाभूते. पैकी पुरुष स्वतंत्र व चैतन्य असून प्रकृती स्वतंत्र व जड आहे. उरलेली २३ तत्त्वे तिच्यापासून उत्पन्न झाली आहेत. पदात पंचवीस तत्त्वांचे घर असून शिवाय एका क्षेत्रज्ञाची मोजणी केली आहे. हे वर्गीकरण भगवद्गीतेप्रमाणे आहे. सांख्य, वेदान्त किंवा भगवद्गीतेत पंचवीसच तत्त्वे आहेत. फक्त वर्गीकरणात थोडा भेद आहे. गीतेने जीवाला ईश्वराची परा प्रकृती म्हटले आहे व मूल प्रकृतीला ईश्वराची अपरा प्रकृती म्हटले आहे. परा प्रकृती, अपरा प्रकृती व पुढील महत्पासूनची २३ तत्त्वे मिळवली की एकूण पंचवीस तत्त्वे होतात. म्हणजे पंचवीस तत्त्वांच्या घरात बद्ध जीवाचाही समावेश होतो. हे झाले क्षेत्र किंवा शरीर. जीवाला गीता अक्षरपुरुष व बाकी २४ तत्त्वांना क्षरपुरुष म्हणते. म्हणजे २५ तत्त्वे झाली. गीतेत सांगितलेला उत्तम पुरुष, परमात्मा किंवा शुद्ध चैतन्य हा इथे क्षेत्रज्ञ किंवा शरीराला जाणणारा असा अर्थ होतो (लो. टिळक, गीतारहस्य, पृ. १६८ ते १७२ वर याची सविस्तर चर्चा आहे·). टिपण क्रमांक २ व १०८ पाहा.

८७ (पृ. १९३) टिपण क्रमांक २७ पाहा.

८८ (पृ. १९३) टिपण क्रमांक २९ पाहा.

८९ (पृ. १९३) टिपण क्रमांक १९ पाहा.

९० (पृ. १९७) या कन्नड पदातील पहिल्या कडव्यातील, शेवटची ओळ व दुसऱ्या कडव्यातील शेवटची ओळ यात जी कल्पना आहे तीच गोष्ट रत्नाकरवर्णि सांगतात :–

दिनदिनकात्मानुभव हेच्चिदष्टके । तनु सुख ताने तग्गुवदु ॥
तनगे ताने बाह्यवेल्लुव तोरेवना–। त्मन पोर्दि सुखियहनेंद ॥

(दिवसादिवसागणिक जितका म्हणून आत्मानुभव वाढेल तितकीच विषय-वासना कमी होते. जो आपणहून बाह्य गोष्टींपासून मन काढून घेतो त्यालाच आत्मप्राप्ती होऊन सुख मिळते). पाहा, विश्वकवि रत्नाकरन भरतेशवैभव, संपादकरु, जी. ब्रह्मप्प, हंपे नागराजय्य, श्रीमती सी. आर. कमलम्म हंपना, पृ. ७३६. रत्नाकरवर्णि हे कन्नड साहित्याचे वैभव वाढवणारे एक फार श्रेष्ठ कवी आहेत. १६ व्या शतकाच्या मध्याला पश्चिम किनाऱ्यावर मूडबिदिरे इथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे गुरू हंसनाथ. स्वतंत्र प्रज्ञा जिनभक्ती, ज्ञान, नीती, वैराग्य, आत्मविचार व आत्मानुभव त्यांच्या काव्यात दिसतात.

९१ (पृ. १९९) हे एका मुद्रेचे नाव आहे. मुद्रा म्हणजे शरीराच्या विशिष्ट स्थितीत मनाची एकाग्रता व दृष्टीची स्थिरता साधणे. हठयोगात मुद्रेला फार महत्त्व आहे. विविध मुद्रांचे तिथे वर्णन आहे अनैच्छिक स्नायूंच्या क्रियेवर व मज्जासंस्थेवर ताबा मिळवण्यासाठी तसेच कुंडलिनी-जागृती-साठी मुद्रांचा उपयोग तिथे सांगितला आहे. शांभवी मुद्रेत भ्रूमध्यावर दृष्टी खिळवली जाते. अन्तर्लक्ष्य बहिर्दृष्टि असे त्याचे लक्षण आहे. म्हणजे दृष्टी बाह्य गोष्टींवर खिळलेली असते व मन आतल्या लक्ष्यावर (आत्म्यावर) केंद्रित केलेले असते (पाहा, हठरत्नावली, संपादक, एम. वेंकट रेड्डी, पृ. १५९).

९२ (पृ. १९९) यातील दुसऱ्या कडव्यात वर्णन केलेला अनुभव हरिहर कवींच्या एका पदात वर्णन केलेल्या अनुभवांची प्रतिकृती आहे असे म्हटले तरी चालेल.

तोळगुत्तिर्पकानिंदागसत्रेनितनितं माडिदंतिर्प धात्री – ।
तळमेल्लं चंद्रनिंदं समेदुदेनिसिदंतिर्प दिक् सं –
कुळं निर्मळ विद्युल्लेरेवार्यि निर्मिसिदवोलेसेदिर्पा परंज्योतियेन्नोळ् – ।
वेळगुत्तिर्पंते पंपापुरदरस विरूपाक्ष रक्षिप्पुदेन्नम् ॥ हरिहरन रक्षाशतक, ९४

(प्रज्वलित सूर्याने उभे आकाश व्यापून टाकावे, चंद्रकिरणांनी पृथ्वीला आच्छादावे, विद्युल्लेखेतून दशदिशांची निर्मिती व्हावी त्याप्रमाणे, हे विरूपाक्षा, परंज्योतीने माझे अंतरंग उजळून निघून माझे रक्षण होऊ दे).

९३ (पृ. २०३) टिपण क्रमांक ३४ पाहा.

९४ (पृ. २०३) टिपण क्रमांक २९ पाहा.

९५ (पृ. २०३) टिपण क्रमांक ४ पाहा.

९६ (पृ. २०५) टिपण क्रमांक २९ पाहा.

९७ (पृ. २१३)

आदौ जलधि-जीमूत-भेरी-निर्झर-संभवाः ।
मध्ये मर्दल-शंखोत्था घंटाकाहलकास्तथा ॥
अन्त्ये तु किंकिणी-वंशवीणा-भ्रमरनिःस्वनाः ।
इति नानाविधा नादाः श्रूयन्ते देहमध्यतः ॥ हठरत्नावली, ४.१०-११

(सुरवातीस (१) सागर (२) मेघगर्जना (३) भेरी (४) झरा यांचे नाद ऐकू येतात. मध्यंतरी (५) मृदंग (६) शंख (७) घंटा (८) रणभेरी आणि शेवटी (९) घुंगरू (१०) बासरी (११) वीणा व (१२) भ्रमर-गुंजारव असे नानाविध नाद देहातूनच ऐकू येतात).

९८ (पृ. २१५) शिंशुमारचक्र. संस्कृत शब्द शिशुमार आहे. त्याचे शिंशुमार हे रूप झाले आहे. शिशुमारचक्र हे नक्षत्रपुंजाला दिलेले नाव असून ते अत्यंत तेजस्वी असते. म्हणून कोटिसूर्य-प्रभेपेक्षा जास्त तेजस्वी प्रकाशात झोपतो तो ब्राह्मण असा एक अर्थ होतो. दुसरा अर्थः–शिशुमार-रूपी विश्वात्मक ईश्वराचे ज्याला दर्शन होते तो ब्राह्मण. आकाशातील ज्योतिचक्र उजव्या बाजूला वळलेले वेटोळे घातलेल्या एका मगराप्रमाणे आहे. त्याच्या शेपटीच्या टोकावर ध्रुव आहे. शेपटीच्या मध्यावर प्रजापती, अग्नी, इंद्र, धर्म हे आहेत. शेपटीच्या मुळाशी धाता-विधाता आहेत. कमरेजवळ सप्तर्षी आहेत. त्या वेटोळ्याच्या उजव्या भागाला अभिजित्-

पासून पुनर्वसूपर्यंत उत्तरायणातील चौदा नक्षत्रे व डाव्या भागाला पुष्यापासून उत्तराषाढापर्यंतची दक्षिणायनातील चौदा नक्षत्रे आहेत. त्याची पाठ व पोट म्हणजे आकाशगंगा. छातीवर सूर्य, हृदयात नारायण, मनात चंद्र, नाभिस्थानी शुक्र, स्तनभागी अश्विनीकुमार वगैरे असून रोमरोमांवर सर्व तारागण आहेत. भागवतात (५.२३. ४–७) याचे सविस्तर वर्णन दिले आहे. हे शिंशुमारचक्र एकाग्र चिंतन करीत असताना वासुदेवाला दिसले. गुरुदेव रानडे यांच्या The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints या पुस्तकात पृ. १९–२१ वर शिंशुमारचक्राचे वर्णन आहे. तिसरा अर्थ :– ब्रह्मरंध्रावरील शिंशुमारचक्रात पोचणे असा या ओळीचा अर्थ हठयोगाच्या परिभाषेत देता येईल.

९९ (पृ. २१७) इतकेच आणि अमकेच नाद आहेत असे सांगता येत नाही. नऊ नाद अमकेच अशी माहिती मिळाली नाही. दशविध नाद प्रसिद्ध आहेत. टिपण क्रमांक ३१ मध्ये दशविध नादांची व टिपण क्रमांक ९७ मध्ये बारा नादांची यादी दिली आहे. परंतु यांखेरीज झांजा, नूपुर, पुंगी, सनई, तुतारी, सारंगी, डमरू, ढोल, तबला, डग्गा, किनरी, तंबोरा यांचे नाद, सप्तस्वर, संपूर्ण स्वरमंडल किंवा ओंकारध्वनी हे सर्वच ध्यानावस्थित साधकाच्या अनुभवाला येऊ शकतात. एकूण, या नादांना गणना नाही.

१०० (पृ. २२१) टिपण क्रमांक २९ पहा.

१०१ (पृ. २२३) १९४५ साली अलाहाबादहून श्री गुरुदेवांच्या सांगण्यावरून श्री बाबासाहेब संगोराम यांनी इंचगेरीस श्री काकासाहेब तुळपुळे यांना लिहिलेल्या पत्रात या ओळींबद्दल पुढील उल्लेख आहे :– "'यातील मूल सालि बीजमंत्र ओदु कलियुव मनस। आदि अनादि आचीकिन सुद्दि कद्दु हेळु कूस' ॥ या चरणाचा अर्थ श्री महाराज व श्री बाबा या दोघांच्याही अनुभवाला आला होता. श्री महाराज पूर्वी एकदा पंढरपुरास गेल्यावेळी तेथे दासबोधाचा अर्थ 'मूल सालि बीजमंत्र ओदि

कलियुग मनस ' या न्यायाने सांगितल्याचे श्री रामभाऊंनी कर्णोपकर्णी ऐकिले आहे.'' या न्यायाने म्हणजे श्री महाराज एकदा पंढरपुरास गेले असताना दासबोध सांगत होते. तेव्हा दासबोधाच्या अर्थाच्या ओळींमागून ओळी त्यांच्या डोळ्यांसमोर येत होत्या व त्या वाचून ते अर्थ सांगत होते. त्या दिवशीचे श्री महाराजांचे निरूपण म्हणजे समोर दिसणाऱ्या अर्थाचे वाचन होते. 'मूल सालि बीजमंत्र ओदु कलि मनस' या ओळीचा आणखी एक अर्थ होतो :– मूल सालि म्हणजे मूळ शाळा किंवा ब्रह्माची शाळा. तिथे शिकवलेला मंत्र म्हणजे बीजमंत्र किंवा ॐकार हा तू शिकून घे.

१०२ (पृ. २३१) तुकाराम व नामदेव यांनी हाच अनुभव जवळजवळ याच शब्दात सांगितला आहे :–

अ. निजल्याने गाता उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥
उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें ॥
मारगी चालता मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥
तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाठीं ॥

आ. बैसोनि आसनीं आळविता नाम । उभा सर्वोत्तम तया पुढे ॥
प्रेमाचिया भरें उभ्यानें गर्जतां । नाचे हा अनंत तयासवें ॥
नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी । घालीतसे उडी नेटें पाटें ॥

१०३ (पृ. २३५) टिपण क्रमांक ३४ पाहा.

१०४ (पृ. २३५) टिपण क्रमांक २९ पाहा.

१०५ (पृ. २४३) एक = आत्मा, दोन = जड – जीवातील द्वैत, तीन = त्रिगुण, चार = चार अवस्था, पाच = महाभूते, सहा = विकार, सात = चक्रे, आठ = मद, नऊ = द्वारे, दहा = इंद्रिये असा संख्यांचा अर्थ लावतात. संख्यांना फक्त हेच संकेत असतील असे धरून चालता येत नाही. संख्या विविध अर्थांनी वापरलेल्या आढळून येतात. सहा म्हणजे सहा शास्त्रेही होतात व षट्चक्रेही होतात. संदर्भावरूनच या संज्ञांचा अर्थ जाणावा लागेल.

१०६ (पृ. २४३) ताने सत्ता अत्ता होत्ता। ताने नित्या सत्या अनृता ॥ या ऐवजी श्री लिंगण्ण सत्यंपेटि यांच्या अनुभावि कवि कडकोळ मडिवाळप्प या पुस्तकात पृ. ५६ वर ताने हेत्तु सत्तु चित्तु। ताने नित्य नुत्य सत्य ॥ (तो खरोखर चिन्मय असून जणू काही जन्मला व मेला आणि आपणच नित्य, पूजनीय व सत्य आहे) असा पाठ आहे. हाही अर्थ चांगला आहे.

१०७ (पृ. २४३) सत्यंपेटि यांच्या पुस्तकात शेवटची ओळ, ' ताने महंता ताने नानु ' याऐवजी ' ताने मडिवाळ, ताने मांत ' अशी आहे. यावरून हे पद मडिवाळयोगींचे आहे हे स्पष्ट होते. डॉ. एम. एस. लट्टे यांनी संपादित केलेल्या कडकोळ मडिवाळेश्वर विरचित स्वरवचनगळु या पुस्तकात पृ. २०२ वर हे पद आहे. यातील कडव्यांचा क्रमही कन्नड परमार्थसोपानात घेतलेल्या पदाच्या कडव्यांपेक्षा वेगळा आहे. शेवटची ओळ ' ताने महांत ताने तानु । एनो एनोंदाद मेले ' अशी असून ती कन्नड परमार्थसोपानातील पदाशी बव्हंशी जुळते. डॉ. लट्टे प्रस्तावनेत (पृ. १०) म्हणतात की, मडिवाळप्पांच्या पदांमध्ये महांतगुरु, चिणमगेरियास, चिन्नगुड्डद योगि, कडकोळगुड्डद महान्त इत्यादी मुद्रिका असल्या तरी गुरुमहान्त ही प्रामुख्याने येणारी मुद्रिका आहे. डॉ. लट्टे यांच्या मतावरून हे पद मडिवाळयोगींचे असावे या मताला दुजोरा मिळतो.

१०८ (पृ. २४५) यातील पाच आणि पंचवीस यांचा अर्थ करणे कठीण आहे. विसोबा खेचरांचा पट्स्थल नामक एक ग्रंथ आहे. त्यात असे म्हटले आहे की वटेश्वर शिवाच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान या पाच मुखांपासून पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांची उत्पत्ती झाली. हेच पिंडातील पंचप्राण होत. वटेश्वरापासूनच पंचवीस गुणांची उत्पत्ती होते. पाची महाभूते पुन्हा उत्पत्तीच्या उलट क्रमाने पंचमुखांत विलीन होतात (पाहा, गुरुमाऊली, संपादक, रा. चिं. ढेरे, पृ. १८४, १९२). सूक्ष्म देहाचे पंचवीस गुण समर्थांनीही सांगितले आहेत. त्यात अंतःकरणपंचक, प्राणपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, कर्मेंद्रियपंचक

व विषयपंचक यांचा समावेश आहे. सर्व मिळून सूक्ष्म देह बनतो. ती तत्त्वे वेगळी राहत नाहीत. स्थूल देहाचे पंचवीस गुणही समर्थ सांगतात. त्यात पंचमहाभूतातील प्रत्येकी पाच तत्त्वांचा उल्लेख आहे. (दासबोध द. १७. स. ८). एकूण अर्थ असा दिसतो की पाच असोत की पंचवीस असोत, ही सर्व तत्त्वे एकाच अंतिम तत्त्वातून येतात व ज्ञान झाल्यावर त्यातच लय पावतात किंवा अद्वैतानुभूती येते. टिपण क्र. २ व ८६ पाहा.

१०९ (पृ. २४९) डॉ. शिवानंद गुब्बण्णवर यांच्या पाठात एक महत्त्वाचा फरक आहे. ॐकील हिडिदु चौक पीठदि बंदु याऐवजी ॐकार हिडिदु जवन बाधे गेद्दु (ॐकाराचा आश्रय करून त्याने यमबाधा म्हणजे मृत्यूची भीती मनातून घालवली) असा त्यांचा पाठ आहे. हाही पाठ चांगला आहे.

११० (पृ. २४९) टिपण क्रमांक ४ पाहा.

१११ (पृ. २४९) शरीफ साहेबर चरित्रे हागु तत्त्वपदगळु या पुस्तकात दिलेल्या या पदात थोडे पाठभेद आहेत. शेवटची ओळ 'मनव शिशुनाळधीशनोळु मग्न माडि' अशी आहे. येथील मुद्रिकेवरून हे पद शरीफ साहेबांचे असावेसे दिसते. कन्नड परमार्थसोपानातील पदात शिशुनाळधीशांचे नाव नाही, पण कल्मेश असे नाव आहे. या कल्मेशाची माहिती मिळाली नाही. डॉ. शिवानंद गुब्बण्णवर यांनी शिशुनाळ शरीफ साहेबरु या पुस्तकात पृ. ५३ वर असे म्हटले आहे की हे पद शिशुनाळधीशांचे नसून त्यांचे गुरू गोविंदभट्ट कळस यांचे आहे. त्यांनी आपल्या शिष्याबद्दल हे गौरवाचे उद्‌गार काढले आहेत व आपला शिष्य साक्षात्काराच्या उन्मादावस्थेत असल्याचे वर्णन केले आहे. कन्नड परमार्थसोपानात कवीची मुद्रिका कल्मेश अशी आहे. त्यामुळे पद कुणाचे हा प्रश्न शिल्लक उरतोच.

११२ (पृ. २५१) टिपण क्रमांक १८ पाहा.

११३ (पृ. २५३) तिखट, आंबट, खारट, कडू, गोड व तुरट हे सहा रस (चवी) आहेत.

११४ (पृ. २५७) भवतारक गीतगळु या पुस्तकात आठव्या ओळीचा पाठ कुंभिनिगुदिसुवने (पृथ्वीवर जन्माला येईल का?) असा आहे. कुंभक साधल्यावर मनुष्याला मुक्ती मिळते असे म्हणतात त्याला धरून हा पाठ आहे.

११५ (पृ. २५७) टिपण क्रमांक १९ पाहा.

११६ (पृ. २५७) याच कन्नड पदातील १३ व १४ या ओळींचा पाठ तत्त्वमसि महावाक्यव तिळिदव मिथ्यके मेच्चुवने (तत्त्वमसि महावाक्याचे मर्म जाणणारा अनित्यावर प्रेम करत नाही) असा आहे. हाही पाठ विचारात घेण्याजोगा आहे.

११७ (पृ. २५९) मैसूर युनिव्हर्सिटीने प्रकाशित केलेल्या श्री महिपतिरायर कृतिगळु या पुस्तकात हे पद बरेच मोठे आहे. ते पूर्ण पद व त्याचा मराठी भावानुवाद खाली दिला आहे. यातील मधल्या मधल्या ओळी असलेले पद कन्नड परमार्थसोपानात घेतलेले आहे, ते प्रकरण २० मध्ये पाचवे पद आहे.

इन्नेनिन्नेनु एनगिन्नु इन्नेनिन्नेनु ॥ प. ॥
एन्नोळु गुरु तन्न वर्मवु तोरिद इन्नेनिन्नेनु ॥ १ ॥
मुन्निन कर्मवु निर्मूलवायितु इन्नेनिन्नेनु ॥ २ ॥
एन्नोळु घनब्रह्मवस्तु तानायितु इन्नेनिन्नेनु ॥ ३ ॥
नानु नानेंबुदु नेलियु ता तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥ ४ ॥
एनेंदु तिळियद अनुमान गळेयितु इन्नेनिन्नेनु ॥ ५ ॥
परम तत्त्वद गति नेलेनिभ तोरितु इन्नेनिन्नेनु ॥ ६ ॥
एन्नोळात्मस्थन कुरुहवु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥ ७ ॥
कनसु मनसु एल्ल निन्न सेवे आयितु इन्नेनिन्नेनु ॥ ८ ॥
हगलिरुळेंबुदु हगरणवायितु इन्नेनिन्नेनु ॥ ९ ॥
अरवु मरहिन इरवु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥१०॥
भावद बयलाट निजवागि दोरितु इन्नेनिन्नेनु ॥११॥
जीव शिवद गति सोह्यवु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥१२॥

आयवु दायवु साह्यवु दोरितु इन्नेनिन्नेनु ॥१३॥
जीवन्न जातिय कीलवु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥१४॥
जन्म मरणदा जंत्रवु मुरियितु इन्नेनिन्नेनु ॥१५॥
संदेह संकल्प सूत्रवु हरियितु इन्नेनिन्नेनु ॥१६॥
मरणद गतिगळ मंत्रवु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥१७॥
सुषुम्न नाळद सूक्ष्मवु दोरितु इन्नेनिन्नेनु ॥१८॥
इम्मनविद्दु ओम्मनवायितु इन्नेनिन्नेनु ॥१९॥
आधारचक्रद हादियु तिळियितु इन्नेनिन्नेनु ॥२०॥
सद्गुरु कृपेयादा साधनवायितु इन्नेनिन्नेनु ॥२१॥
भवके गुरियागुव बाधेयु अळियितु इन्नेनिन्नेनु ॥२२॥
अंतरात्मद सुत्रांतवु तिळियेतु इन्नेनिन्नेनु ॥२३॥
महिपति जीवन्न पावन्नवायितु इन्नेनिन्नेनु ॥२४॥
एन्नोळु भास्कर गुरु तानेयादनु इन्नेनिन्नेनु ॥२५॥

मराठी भावानुवाद :–

मला आता मिळवायचे असे राहिले तरी काय? परमार्थाचे रहस्य सद्गुरूंनी मला माझ्या ठिकाणीच दाखवले, आता काय मिळवायचे? ॥ १ ॥
संचिताचा नायनाट झाला, आता काय मिळवायचे? ॥ २ ॥
परतत्त्व माझ्या ठिकाणी प्रकट झाले, आता काय मिळवावयाचे? ॥ ३ ॥
मी कोण आहे याचे रहस्य कळले, आता काय मिळवायचे? ॥ ४ ॥
परवस्तूच्या अज्ञानाने आलेला संशय ब्रह्मांडाबाहेर गेला, आता काय मिळवायचे? ॥ ५ ॥
परतत्त्वाचे मूळ स्वरूप कळले, आता काय मिळवायचे? ॥ ६ ॥
अंतरात्म्यातच परमार्थाची ओळख पटली, आता काय मिळवायचे? ॥७॥
जागेपणी काय किंवा स्वप्नात काय मी सदा तुझ्या-सेवेतच रंगतो; आता काय मिळवायचे? ॥ ८ ॥
दिवस आहे की रात्र आहे हे कळेनासे झाले, आता काय मिळवायचे? ॥ ९ ॥

स्मरण म्हणजे काय व विस्मरण म्हणजे काय याची जाणीव झाली, आता काय मिळवायचे ? ॥१०॥

भावनांचा खेळ खरा खरा कळल्यावर आणि सर्व संकल्प सत्य झाल्यावर, आता काय मिळवायचे ? ॥११॥

जीव–शिव यांच्या सामरस्याची प्रचिती येऊन सोऽहंचा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर, आता काय मिळवायचे ? ॥ १२ ॥

परमेश्वराचे रहस्य व त्याच्या प्राप्तीचे साधन कळले व त्याची कृपा झाली, आता काय मिळवायचे ? ॥१३॥

आत्म्याचे रहस्य उलगडले, आता काय मिळवायचे ? ॥१४॥

जन्ममरणाचे रहाटगाडगे मोडून पडले, आता काय मिळवायचे ? ॥१५॥

संशयाचा धागा तुटला, आता काय मिळवायचे ? ॥१६॥

मरणानंतर काय स्थिती होणार ते कळले, आता काय मिळवायचे ? ॥१७॥

सुषुम्ना नाडीचे सूक्ष्म तत्त्व समजले, आता काय मिळवायचे ? ॥१८॥

मन द्विधा होते ते एकाग्र झाले, जीवशिवांत सामरस्य आले, आता काय मिळवायचे ? ॥१९॥

आधारचक्राची वाट सापडली, आता काय मिळवायचे ? ॥२०॥

सद्‌गुरुकृपेच्या साधनानेच सर्व प्राप्त झाले, आता काय मिळवायचे ? ॥२१॥

भवबाधा नष्ट झाली, आता काय मिळवायचे ? ॥२२॥

अन्तरात्म्याचे सूत्र लक्षात आले, आता काय मिळवायचे ? ॥२३॥

महिपतीचे जीवन पावन झाले, आता काय मिळवायचे ? ॥२४॥

आपले सद्‌गुरू भास्करयती व आपण एकच झाल्यावर, आता काय मिळवायचे ? ॥२५॥

११८ (पृ. २६५) कायारहित–देहाचे भान गेलेला, विदेही
जीवरहित–अहंकार नष्ट झालेला
मायारहित–मायेच्या बंधनातून सुटलेला
षडक्षरि–सहा अक्षरी मंत्र जपणारा किंवा षडक्षरि नावाचा कवी

११९ (पृ. २६७) या पदाची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे. एकदा आपल्या अप्पण्ण भागवत या शिष्याला पाणी आणण्यास पुरंदरदासांनी सांगितले. तो झोपेत असल्याने त्याच्या हातून ते काम झाले नाही. पांडुरंगाने सोन्याच्या भांड्यातून पुरंदरदासांना पाणी आणून दिले पण त्याला उशीर झाल्याने पुरंदरदासांनी त्याला ठोक दिला. नंतर एकदा पांडुरंगाने पुरंदरदासांचा वेष घेऊन आपले रत्नकंकण एका वेश्येला दिले. कंकण नसल्याचे बडव्यांच्या लक्षात आल्यावर त्याचा शोध सुरू झाला. त्याच वेळेस ती वेश्या देवदर्शनासाठी हातात ते कंकण घालून आली. बडव्यांनी तिला छेडले. योगायोगाने पुरंदरदासही तिथे आले होते. तेव्हा लागलीच तिने सांगितले की ह्यांनीच मला रात्री हे कंकण दिले. स्वत:ला मोठा भक्त म्हणवून घेऊन विठ्ठलाचे कंकण चोरतो व वेश्येला देतो असा आरोप पुरंदरदासांवर ठेवून खांबाला बांधून अधिकारी त्यांना मारू लागला. तेवढ्यात एका लहान मुलाच्या अंगात विठ्ठल येऊन त्याने सांगितले की मीच ह्यांचा वेष घेऊन ते कंकण वेश्येला दिले आहे. त्यांना सोडून द्या. ज्या खांबाला त्यांना बांधले आहे त्या खांबाला दासांचा खांब म्हणून त्याची पूजा करा अशी त्याने लोकांना आज्ञा दिली. त्याप्रमाणे पुरंदरदासांना मुक्त केले गेले. आजही विठ्ठलदर्शनाच्या आधी दासांच्या खांबाचे दर्शन घेतले जाते. विठ्ठलाला ठोक दिला होता त्याचे बरोबर फळ पदरात पडले असा पदाचा सारांश आहे.

१२० (पृ. २७१) या पदातील तिसऱ्या कडव्याचा वेगळा अर्थ केला जातो. नुग्गीगिड बुड तग्गिसिदंते याचा 'शेवग्याच्या झाडाचा बुंधा वाकवल्याप्रमाणे' असा अर्थ न करता नुग्गि शब्द वेगळा काढून, ' जोराने ढकलून (नुग्गि) झाडाचा बुंधा हलवण्याचा प्रयत्न केल्याप्रमाणे ' असा अर्थ करतात. म्हणजे संसारवृक्ष आवेशाने बुंध्यापासून हलवण्याचा प्रयत्न केला असा आशय.

१२१ (पृ. २७१) या पदाचा पूर्ण अर्थ कळला नाही. काही विद्वानांना विचारून अर्थ केला आहे. हे पद पुरंदरदासांचे आहे की नाही इथपासून

शंका आहे. वेट्टरु केशवदास यांच्या श्री कर्णाटक भक्तिविजय, तिसरी आवृत्ती, पृ. १०–११ वर खालील हकीकत आहे. साठ आराध्य ब्राह्मण यात्रा करीत पंढरपुरास आले, पण पंढरपूर विष्णुक्षेत्र असल्याने ते गावात आले नाहीत. चंद्रभागेत स्नान करताना त्यांनी डोळे मिटून बुडी मारली व डोके वर करेपर्यंत पांडुरंगाने त्यांना आपल्या देवळाच्या गाभाऱ्यात आणून उभे केले. पांडुरंगाचे दर्शन झाल्याबरोबर त्यांचे मतपरिवर्तन झाले व ते हरिदास झाले. त्यांपैकी एकाने एनु माडिदे मानभंग, जय पांडुरंगा असे पद केले, ते पुढीलप्रमाणे :—

एनु माडिदे मानभंग जय पांडुरंगा ॥प. ॥

भंगन कित्तंतायितु जन्मवु
लिंगव कळकोंडु गंगेय तीरदि
मुंगाणदले मौनदोळिरुतिरे
हैंगिसि भव निन्नंगव तोरि ॥१॥

उद्भविसि बंदूर्वियोळगे ना
सिद्धांतद बगे पद्धति तिळियदे
अद्वैत द्विजाराध्यनागिरे
उद्धरिसिदे मध्वमतदवनेनिसि ॥२॥

श्रीनिधि निन्नय पादव नंबिदे
मानावमानवु निनगोप्पितु जग–
त्राण प्राणपति विठलरेय
मेणु भक्ति ज्ञानवीयेनगिंदु ॥३॥

(हे पांडुरंगा, माझा तू मानभंग केलासतरी तुझा जयजयकार असो. माझा जन्म माकडाहूनही हीन झाला. चंद्रभागेच्या तीरावर माझ्या गळ्यातले शिवलिंग हरवले. पुढे काय करावे हे न कळल्याने मौन धरले. तू मला दर्शन देऊन भवबंध तोडलेस ॥१॥

पृथ्वीच्या पाठीवर जन्माला येऊन मध्वमताची सिद्धांत-पद्धती मला समजली नाही. मी अद्वैती आराध्य ब्राह्मण होतोतरी मध्व संप्रदायात

सामावून घेऊन तू माझा उद्धार केलास ॥२॥

देवा, मी तुझ्या चरणांचा आश्रय घेतला आहे व मान-अपमान तुला वाहून टाकले आहेत. हे प्राणाधिपती विठ्ठला, आज मला ज्ञान व भक्ति दे ॥ ३ ॥)

१२२ (पृ. २७३) टिपण क्रमांक ३४ पाहा.

१२३ (पृ. २७३) कन्नड पदातील तिसऱ्या कडव्याचा अर्थ हठयोगाप्रमाणे करता येईल. तीन बोटांच्या अंतरात म्हणजे इडा, पिंगला व सुषुम्ना यांच्या खालपासून वरपर्यंतच्या मार्गात सहा डोंगर म्हणजे षट्चक्रे आहेत. त्यांचा भेद करून उन्मनीचे शेवटचे दार म्हणजे ब्रह्मरंध्र उघडा. या पदाच्या दुसऱ्या कडव्यात हठयोगाची भाषा वापरली आहे. पूर्वदिशा (मूडलु दिक्कु) किंवा पूर्वमार्गाचा तिथे उल्लेख आहे.

१२४ (पृ. २८७) चिंतायत हा शब्द नेहमीच्या वापरातला नाही. तो शब्द पुरंदरदासांच्या एका पदात आला आहे.

एन्तु निन्न पूजे माडि मेच्चिसुवेनो ॥ प. ॥
चिंतायतने निन्न नाम एनगोंदु कोटि ॥अ. प. ॥

(कशा तऱ्हेने तुझी पूजा करून मी तुला प्रसन्न करू ? हे चिंतायता, तुझे नावच माझी अपार संपत्ती आहे). इथे चिंतायत या शब्दाचा अर्थ 'जसजसे देवाचे चिंतन करावे तसतसा त्याचा महिमा वाढत जातो' असा वेटगेरि व बेंगेरि यांच्या पुरंदरदासर साहित्य–१, पूजातत्त्व, यात पृ. २८३ वर दिला आहे.

१२५ (पृ. २८७) या पदात उल्लेखिलेली औषधे प्रामुख्याने शरीरातील विविध अणुपरमाणूतील ऊर्जा वाढवण्यास आणि त्यायोगे मनाची शक्ती वाढविण्यास मदत करतात. ही सर्व औषधे प्रामुख्याने पारदाच्या संस्काराने तयार झालेली असून अनेक खनिज तथा वनस्पतींवर युक्तीने संस्कार करून निसर्गातील ऊर्जा शरीराच्या अणुपरमाणूमध्ये पोचविण्यासाठीच तयार केलेली आहेत. शरीरातील विषद्रव्ये, कृमिजन्य विष, यांचा नाश करणे व शरीरातील व्याधिक्षमत्व वाढविणे व ऊर्जा तथा चेतना वाढविणे ही त्यांची

महत्त्वाची कामे आहेत. या औषधांची माहिती आयुर्वेदाच्या ग्रंथांतून मिळते.

पदातील नाव	ग्रंथातील नाव	उपयोग
वातविध्वंसिनी	महावातविध्वंसन	–संधिवात-नाशक, वेदना-शामक, पक्षवधनाशक
ज्वरांकुश	महाज्वरांकुश	–ज्वरनाशक, विशेषत: मलेरिया
मंडूर	मंडूरभस्म	–पांडुरोगनाशक, रक्तवर्धक, बल्य
माल्यवसंत	सुवर्णमालिनीवसंत	–बलवर्धक, जीर्ण स्वरूपाचा ज्वरनाश करणारे
त्रैलोक्यचिंतामणि	त्रैलोक्यचिंतामणि	–पचनेंद्रियांचे बल वाढविणे
रसकर्पूर	रसकर्पूर	–श्वास, कांसनाशक, बल्य
दिव्य सिंदूर	स्वर्णसिंदूर, रससिंदूर	–प्राणवह स्रोतसाला बल्य, हृदय, फुफ्फुसविकारनाशक
ताम्रभस्म	ताम्रभस्म	–यकृतदोषनाशक, त्वक् विकारात उपयुक्त, पांडुरोगात उपयुक्त
लोहभस्म	लोहभस्म	–रक्तवर्धक, पांडुरोगनाशक
वंगभस्म	वंगभस्म	–शुक्रवर्धक,मूत्रवहन संस्थात तथा प्रजनन संस्थात बल्य
स्वर्णभस्म	स्वर्णभस्म	–बल्य, हृद्य, विषघ्न इंद्रियांचे बळ वाढविणे
पूर्णचंद्रोदय	पूर्णचंद्रोदय	–विषघ्न, रक्तवर्धक, जंतुघ्न, राजयक्ष्मानाशक
वसंत कुसुमाकर	वसंतकुसुमाकर	–मधुमेह-पक्षाघातनाशक, ओजोवर्धक, राजयक्ष्मानाशक
श्लेष्मकुठार	कफकुठार, श्लेष्मकुठाररस	–श्वासविकार-कांसनाशक

१२६ (पृ. २८९) टिपण क्रमांक ५५ पाहा.

१२७ (पृ. २९१) पक्षिपुत्र या शब्दाने इथे जटायूचा उल्लेख केला असावा असे वाटते. गरुडाचा मोठा भाऊ अरुण हा जटायूचा पिता व श्येनी ही त्याची माता. रावणाने सीतेला उचलून नेल्याची कुवार्ता ह्यानेच श्रीरामांना सांगितली व लगेच त्याचे प्राणोत्क्रमण झाले. श्रीरामांनी त्याचे संरक्षण केले म्हणजे त्याला सद्गती दिली. 'जटायू विमानी सुखी बैसविला' असे वामनांनी एका ठिकाणी म्हटले आहे.

१२८ (पृ. २९७) टिपण क्रमांक १८ पाहा.

परिशिष्ट ३

काही कवींचा अल्प परिचय

कन्नड परमार्थसोपानात ज्या संतकवींची पदे अगर वचने समाविष्ट केली आहेत त्यांपैकी काहींची माहिती मिळू शकली. ती थोडक्यात इथे दिली आहे. गुरुदेव रानडे यांनी आपल्या Pathway to God in Kannada Literature या पुस्तकात आणखीही काही संतकवींचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्यापैकी ज्यांची माहिती मिळाली त्यांचाही अल्प परिचय दिला आहे.

१ अक्क महादेवि. साधारण बारावे शतक हा त्यांचा काळ. उडुतडि (जि. शिवमोग्गे) येथील निर्मलशेट्टि व सुमति या दांपत्याची कन्या. लहानपणीच अक्कांना महावैराग्य प्राप्त झाले. त्यांचे व्यक्तित्व उज्ज्वल असून त्यांनी अनुभवाची उच्च पातळी गाठली होती. भक्तीची भाग्यश्री, मुक्तीचे माहेरघर, शिवभावसंपन्न, पुण्याचा पुंज अशा शब्दांत त्यांचे वर्णन केलेले सापडते. दिव्य तेज, नाद व अमृतरस या अनुभवांची त्यांच्या लिखाणात रेलचेल आहे. वीरशैव वचनकारांत त्यांना श्रेष्ठ स्थान असून वचनकार म्हणून त्यांना बसवेश्वरांच्या खालोखाल गणले जाते. त्यांच्या काव्यात ओज हा गुण प्रामुख्याने दिसतो. श्रीशैलावरील मल्लिकार्जुन ही अक्क महादेवींची इष्टदेवता असून चेन्नमल्लिकार्जुन ही मुद्रिका आहे. श्रीशैलपर्वतावरील कदलीवनात त्या शिवैक्य पावल्या असा इतिहास आहे.

२ अखंडेश्वर. पाहा, षण्मुखस्वामि.

३ अल्लमप्रभु तथा प्रभुदेव. १२ वे शतक. दक्षिण कर्नाटकातील बळ्ळिगावि (जि. शिवमोग्गे) येथे जन्म. यांच्या वडिलांचे नाव निरहंकार व आईचे

नाव सुज्ञानि. वीरशैव संप्रदायाच्या इतिहासात ही एक अलौकिक व्यक्ती होऊन गेली. बसवेश्वर आदीकरून शिवशरणांचा ते आधारस्तंभ असून त्यांनी सर्वांना बोध केला आहे. त्यांचे वैराग्य, प्रज्ञा व ज्ञान अजोड आहेत. अभेदभाव व अद्वैतबुद्धी ही त्यांच्या ठिकाणी दृढमूल झाली होती. आपल्याहून लहान असणाऱ्यांना ते प्रेमाने व बरोबरीने वागवीत, त्यांच्या गुणांचा गौरव करीत पण त्याबरोबरच गोड शब्दांत त्यांचे दोष दाखवून ते सुधारण्याचा मार्ग दाखवीत. त्यांनी वीरशैव मताचा उपदेश केला असला तरी त्यांची वृत्ती कधीच संकुचित नव्हती. सर्वच पंथांची ते निष्ठुर परीक्षा घेत, कारण दांभिक वृत्तीचा त्यांना तिटकारा होता. गोरक्षनाथांसारख्या अत्यंत तेजस्वी सिद्धांसकट सर्व समकालीन साधुसंतांवर अल्लमप्रभूंचा अपार प्रभाव पडला होता. कल्याण येथील अनुभवमंटपात त्यांना अग्रपूजेचा मान होता. तेथील ब्रह्मसाम्राज्याचे किंवा शून्यसिंहासनाचे ते चक्रवर्ती होते. शून्यसंपादने या ग्रंथात त्यांचे इतर संतांशी झालेले संवाद ग्रथित केले आहेत. अरूप अनुभवाला साकार करून त्यांनी तो लोकांसमोर मांडला. अनुभवाची बैठक व ज्ञानाचा साज असलेली त्यांची वचने कन्नड भाषेलाच नव्हे तर जागतिक आध्यात्मिक वाङ्मयाला मिळालेली देणगी आहे. या वचनांतून आत्मविश्वास, ओज, प्रसाद, निर्भयता, अधिकारवाणी, सत्यनिष्ठा याचबरोबर विनयभाव ही खळाळून वाहताना दिसतात. गुहेश्वर ही त्यांची मुद्रिका.

४ ईश. पाहा, भीमाशंकर.

५ कनकदास (१५०८–१६०६). बाड (जि. धारवाड) येथे जन्म. बीरेगौडा व बच्चम्म ही माता-पितरे, व्यासराय हे त्यांचे गुरू. कागिनेले (जि. धारवाड) येथे नंतर वास्तव्य. तेथील आदिकेशव हे आराध्यदैवत. मोहनतरंगिणि या त्यांच्या महाकाव्यात ४२ प्रकरणे असून २६५९ पदे आहेत. त्यांच्या शब्दांतून विचारस्वातंत्र्य विशेष उठून दिसते. त्याचबरोबर अध्यात्म-पूर्णताही स्पष्ट होते. काव्यात सुबोधता व व्यंग्यहास्य आहेत. कनकदासांच्या लेखी बाह्य अवडंबर निरर्थक असून साधकाला अंतःशुद्धीची

नितांत आवश्यकता आहे. कपटवृत्तीचा व दंभाचाराचा ते निषेध करतात. व्यावहारिक चातुर्याबरोबर वैराग्य, नीतिधर्म, तत्त्वज्ञान व ऐकांतिक भक्तीचा त्यांनी उपदेश केला. नामस्मरणानेच मुक्ती मिळते असे त्यांचे आग्रहाचे सांगणे असे. त्यांचे पुराण सांगण्याचे कौशल्य अप्रतिम होते असे म्हणतात. कागिनेलेयादिकेशव ही त्यांची मुद्रिका.

६ काडसिद्ध. कऱ्हाड-कोल्हापूर मार्गावरील रेणावी येथे रेवणसिद्धांचे वास्तव्य काही काल होते असे म्हणतात. हे रेवणसिद्ध म्हणजेच काडसिद्ध असे एक मत आहे. परंतु काडसिद्ध हे रेवणसिद्धांचे शिष्य होते हे मत विशेष प्रचलित आहे. काडसिद्ध हे शेगुणसि (ता. अथणि, जि. बेळगाव) येथील पाटील घराण्यात जन्मले. गुंडेवाडी, येडूर इत्यादी ठिकाणी त्यांनी तपश्चर्या केली. शेवटी ते कोल्हापूरजवळील सिद्धगिरी येथे वास्तव्य करून राहिले. काडसिद्ध या नावाचे स्पष्टीकरण दोन तऱ्हांनी देतात. कोल्हापूर प्राती माई नावाची एक स्त्री सिद्धांचा छळ करी. रेवणसिद्धांनी तेथे जाऊन माईचे विष प्राशन करून तिचा पण जिंकला (कन्नडमध्ये काडु धातूचा अर्थ छळणे, पर्यायाने जिंकणे), म्हणून त्यांना काडसिद्ध म्हणतात. किंवा त्यांनी वनात (कन्नडमध्ये काडु=वन) तपश्चर्या केली म्हणून ते काडसिद्ध. यांनी कर्नाटक व महाराष्ट्र येथे संचार करून ठिकठिकाणी मठ स्थापन केले व अनेक शिष्यांवर अनुग्रह केला. ते एक प्रख्यात अनुभवी होते. त्यांच्या समकालीन लोकांची चरित्रे व मठांतील कागदपत्रे यांच्या प्रमाणावरून त्यांचा काळ १२ वे शतक असा मानण्यास हरकत नाही. श्री निंबरगि महाराजांची गुरुपरंपरा सिद्धगिरी येथील काडसिद्धांपर्यंत जाऊन भिडते.

७ कुमारव्यास. हे गदगजवळील कोळिवाडचे राहणारे राहणारे. डॉ. आर. एस. मुगळि याच्या मते १४ व्या शतकाचा उत्तरार्ध ते १५ व्या शतकाचा पूर्वार्ध हा यांचा काळ. गदगच्या वीरनारायणाचे ते परमभक्त असून त्यांना नारणप्प अशा नावाने संबोधले जाते. वीरनारायणाच्या देवळात नारणप्पांचा खांब म्हणून दाखवतात. त्या खांबाजवळ बसून कुमारव्यासांनी भारत

रचले अशी कथा आहे. गदुगिन वीरनारायण ही त्यांची मुद्रिका आहे. कन्नड भाषेचे भूषण असलेले ते एक महाकवी आहेत. त्यांच्या ठिकाणी विद्वत्तेबरोबर प्रतिभाशक्ती, रसिकता व लोकव्यवहारज्ञान दिसून येतात. कर्णाटभारतकथामंजरि या नावाने लिहिलेले महाभारत हे त्यांचे बृहत्काव्य आहे. याची रचना सुडौल असून लयतालबद्ध पद्यांतून तिथे भक्तीचे महत्त्व परोपरीने आळवले आहे. किंबहुना भगवंताच्या लीलेचे माहात्म्य गाण्यासाठी ही कथा निमित्तमात्र झाली आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. भक्तीबरोबर इथे नीतिबोधही आहे. प्रत्येक पर्वाला उचित रसांचा परिपोष व नाट्याचा उपयोग कुशलतेने केला आहे. वीर, रौद्र, अद्भुत व भक्ती या रसांच्या योजनेत त्यांच्या कवित्वाची झेप दिसते. अलंकारांची, विशेषतः रूपकांची कुमारव्यासांच्या ग्रंथात इतकी कोंदाकोंदी आहे की रूपकसाम्राज्यचक्रवर्ती ही जाणकारांनी त्यांना दिलेली पदवी सार्थ ठरते. पशुवृत्तीपासून स्थितप्रज्ञापर्यंत मनुष्याच्या अंतरंगातील विविध छटांचे चित्रण त्यांच्याइतके परिणामकारक रीतीने कुणी केलेले नाही असे म्हणतात. अर्थस्वारस्य, मधुरध्वनी, विपुल शब्दभांडार यांनी वाचक थक्क होतो. ज्ञानदृष्टी, धर्मदृष्टी व भगवद्भक्ती ही त्यांच्या माहात्म्याची कारणे आहेत. भाषा, शैली व आशय यामुळे कुमारव्यासांची कृती महाभारतावरील साहित्याला ललामभूत झाली आहे.

८ कूडलूरेश. १८ व्या शतकाचे अखेरीस हे होऊन गेले. बळेचक्र (ता. यादगिरि, जि. कलबुर्गि) या गावी जन्म. यांचे मूळ नाव बसवलिंगशरण. कूडलूरेश ही त्यांची मुद्रिका आहे. महादेवप्प व गंगांबे हे आईवडील. लहानपणापासून वीरशैव संतांची वचने वाचण्याची त्यांना गोडी होती. गावाजवळील सिद्धेश्वराच्या डोंगरावर हे बालयोगी गुरे राखण्याचे निमित्त करून ध्यानमग्न होत. तिथे राहणाऱ्या एका साधूकडून उपदेश मिळाल्यावर त्यांचे अध्यात्मसाधन सुरू झाले. मोठेपणी त्यांनी हंपीच्या गुहेत योगाभ्यास केला. भक्ती, वैराग्य, योग ह्या विषयांवर नित्य चिंतन करीत. समाधी कूडलूरु व खानापूर या दोन्ही जागी आहे, परंतु लिंगैक्य खानापूर येथे झाले. उच्च आध्यात्मिक अनुभव व तात्त्विक विचार त्यांनी

बोली भाषेत व सुंदर शैलीत प्रकट केले आहेत. त्यांचा उपदेश जीवनाभिमुख असून प्रत्यक्ष आचरणात आणण्याजोगा आहे. मानवजन्मात परमेश्वरप्राप्ती साध्य होते असे त्यांचे सांगणे आहे. त्यांची गीते भावपूर्ण असून त्यांत नादमाधुर्य व उपमारूपकादी अलंकार यांची रेलचेल आहे.

९ कृष्णप्प खैनूर (१९ वे शतक). शिवभट्ट व काशीबाई यांचे पुत्र. शैव ब्राह्मण. हे शास्त्रपारंगत असून विद्वान होते. कडकोळ मडिवाळयोगींचे शिष्य. सुरुवातीस कृष्णप्प मडिवाळयोगींची चेष्टा करीत. पुढे ते नारूच्या रोगाने आजारी पडले. कृष्णप्पांची आई मडिवाळयोगींची शिष्या असल्याने तिने मुलाला आरोग्यप्रदान करावे अशी आपल्या गुरूंची प्रार्थना केली. त्यावर कृष्णप्पांवर अनुग्रह करून मडिवाळयोगींनी त्यांना आपले शिष्य करून घेतले. कृष्णप्पांनी गुरूंच्या नावाने ठिकठिकाणी मठ स्थापन केले. त्यांनी अनेक पदे रचली आहेत. कन्नड परमार्थसोपानातील 'कडकोळद ना गुलामा' हे पद मडिवाळयोगींचे नसून कृष्णप्पांचे आहे असे डॉ लट्टे म्हणतात.

१० कृष्णराय (काखंडकि). सुमारे १६७२–१७२९. काखंडकि येथील महिपतींचे दुसरे चिरंजीव. त्यांना मातृसुख फार दिवस लाभले नाही. कृष्णराय दोन वर्षांचे होईपर्यंत आई तिम्मव्व वारली. कृष्णरायांना लहानपणी खेळाचा अति छंद असून लिहिण्यावाचण्याचा गंधही नव्हता. कालांतराने महिपतींच्या आशीर्वादाने त्यांच्यात आमूलाग्र बदल झाला. योगानुष्ठान, साधन, भक्ती यात निष्णात होऊन ते पुढे उत्तम काव्य करू लागले. त्यांच्या काव्यात आर्त भक्ती व गहन तत्त्वज्ञान आहे. अनेक विषयांवर कृष्णरायांची पदे असून ती अलंकारयुक्त आहेत. त्यांनी कन्नड सारस्वताची अभिवृद्धी केली. त्यांचे साहित्य जसे पांडित्यपूर्ण आहे तसाच त्यात सामान्यजनांना बोध होईल असा भागही आहे. महिपतिसुत ही त्यांची मुद्रिका आहे.

११ गोपालदास (१७१७–१७६५). मोसरकल्लु (ता. देवदुर्ग, जि. रायचूर) येथे जन्म. वडील मुरारिराय व आई गंगम्म. यांचे मूळ नाव

भागण्ण. लहानपणी हे काहीसे अडाणीच भासत होते. पुढे गायत्री पुरश्चरण केल्यावर गायत्रीने प्रसन्न होऊन त्यांच्या जिभेवर बीजाक्षर लिहिले असे सांगतात. तेव्हापासून त्यांना मंत्रसिद्धी प्राप्त झाली. काशीला गेल्यावर त्यांची विजयदासांशी भेट झाली व त्यांनी भागण्णांवर अनुग्रह करून त्यांना गोपालविट्ठल असे नाम दिले; हीच त्यांची मुद्रिका आहे. गोपालदास हे मोठे प्रतिभाशाली पंडित होते. साहित्याप्रमाणेच त्यांनी संगीत, नृत्य, चित्रकला या ललितकलांचा हरिभक्तीसाठी उपयोग केला. त्यांची भक्ती इतकी तीव्र होती की 'भक्तीमध्ये भागण्ण' असा वाक्प्रचार हरिदास साहित्यात रूढ झाला आहे. त्यांनी मार्मिक, तात्त्विक पदांची रचना केली आहे. रामायण, महाभारत व भागवत यांतील आख्यायिका त्यांनी हृदयंगम शैलीत रचून श्रीहरीचे माहात्म्य गायिले आहे. गोपालदासांनी उपनिषदांतील प्रमेये सुबोध करून लोकांसमोर ठेवली. मोक्षासाठी ज्ञान-भक्ती–विरक्ती यांच्याबरोबर परमात्म्याच्या कृपेची आवश्यकता आहे असे त्यांचे सांगणे आहे.

१२ चामरस. हे १४३० च्या सुमारास होऊन गेले असावेत. काहींच्या मते नागणपुर, काहींच्या मते गदग व इतर काहींच्या मते विजयनगर येथे ते होते. संतांचे चरित्र काव्यरूपाने कसे लिहावे याचा आदर्श यांच्या प्रभु-लिंगलीले या प्रमुख ग्रंथाने उभा केला आहे. या ग्रंथाने वीरशैव कवींत चामरसांना बहुमानाचे स्थान मिळवून दिले आहे. प्रभुलिंगलीलेमध्ये गुंतागुंतीच्या घटनांचे वर्णन नाही, मनातील विकारांचे प्रदर्शन नाही, युद्धप्रसंग नाहीत, तर वैराग्यपूर्ण जीवन जगणाऱ्या प्रभुदेवांचे शांतरस-प्रधान चित्रण आहे. तिथले ध्येय शिवतत्त्वसाधन. तरीही हा ग्रंथ शुष्क नसून साहजिकरीत्या आयुष्यात येणाऱ्या रसांचा अकृत्रिम आविष्कार करणारा आहे. चामरसांची भाषा सरळ, शैली अलंकारपूर्ण व काव्य पारमार्थिक अनुभवांनी भरलेले आहे. प्रभुलिंगलीले या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे संस्कृतमध्ये भाषांतर झाले आहे. तेलगू व तामिळ या आणखी दोन भाषांत ते भाषांतरित झाले आहे.

१३ चिदानंद अवधूत. 'कविचरिते'कारांच्या मते यांचा जन्म १७५० मध्ये झाला. आईचे नाव अण्णम्म व वडिलांचे लक्ष्मीपति. हिरे हरिवाण (ता. अदवानि, जि. कर्नूल) हे जन्मस्थान. यांचे पहिले नाव झंकप्प. ते बगळांबा या देवीचे महाभक्त होते. ब्रह्मनिष्ठ कोंडप्प हे त्यांचे सद्गुरू. चिदानंदांनी अनेक ग्रंथ लिहिले असून ज्ञानसिंधु हा ग्रंथ विशेष विख्यात आहे. या वृहत् ग्रंथात ४९ अध्याय असून पदसंख्या ३६२१ आहे. हा ग्रंथ फार लोकप्रिय आहे. यात चिदानंदांनी अद्वैत वेदान्ताचे सिद्धान्त मांडले आहेत. जग ईश्वराची लीला आहे असे त्यांचे मत आहे. ज्ञानप्राप्ती झाल्यावर जग नाहीसे होते. त्यांचे तत्त्वज्ञान गहन असूनही सरळ, साधी शैली व उपमा, दृष्टांत वगैरे वापरण्याचे कौशल्य यांमुळे ग्रंथ सुबोध झाला आहे. त्यांच्या काव्यात भक्ती व वैराग्य यावर भर आहे. पदांतून तेज, बिंदू व आनंदाचा अतींद्रिय अनुभव दिसून येतो. लोकांनी परस्परांवर प्रेम करावे व आपल्याजवळ असेल त्यात समाधानाने राहावे असे ते सांगत. कनकगिरि (ता. गंगावति) येथे त्यांनी संजीवन समाधी घेतली.

१४ चेन्नबसवेश्वर. १२ वे शतक. प्रभुदेव व बसवेश्वर यांच्यासमवेत वीरशैव संप्रदायात यांचे नाव घेतले जाते. शिवदेव व अक्क नागम्म यांचे ते पुत्र. त्यांची आई म्हणजे बसवेश्वरांची थोरली बहीण. बसवेश्वरांकडून त्यांना दीक्षा मिळाली व बहुतेक काळ ते बसवेश्वरांजवळच असत. अनुभव-मंडपात जी चर्चा चाले त्यात चेन्नबसवेश्वर उठून दिसतात. बसवेश्वर महाभक्त होते; चेन्नबसवेश्वर महाज्ञानी असून त्यानी कर्माचे महत्त्वही ओळखले होते. ते फार स्पष्टवक्ते होते. त्यांनी षट्स्थल सिद्धांताचे सुसंगतीकरण केले व त्यामुळे त्यांना षडुस्थल चक्रवर्ति असे संबोधले जाते. जे दुसऱ्यांना शिकवले ते त्यांनी स्वत: आचरणात आणले. त्यांचा ग्रंथसंभार मोठा आहे. त्यांच्या वचनांत तात्त्विक विषयांची चर्चा असून शैली लालित्यपूर्ण व आलंकारिक आहे. त्यांची मुद्रिका कूडलचेन्न-संगमदेव आहे.

१५ जगन्नाथदास (१७२८–१८०९). हे संतकवी व्यागवट्टि (ता. मानवि, जि. रायचूर) येथील रहिवासी. यांचा मुख्य ग्रंथ हरिकथामृतसार. यात

द्वैतमताचे अधिकारवाणीने केलेले विवेचन आहे. तंत्रसार व तत्त्वसुवालि हे ग्रंथ व अनेक पदेही यांनी रचली आहेत. जगन्नाथदासांच्या काव्यात उत्कट भक्ती, नैतिक सिद्धान्त व पारमार्थिक अनुभव यांचे दर्शन होते. भाषा सुबोध व ओघवती आहे. हे संस्कृतचे पंडित असूनही कन्नड भाषेची थोरवी जाणतात. त्यांची भूमिका सांप्रदायिक असलीतरी मनोवृत्ती विशाल आहे. त्यांच्या काव्यात अपरोक्ष ज्ञानाच्या बरोबरीने भक्तीला स्थान आहे. प्राकृत ग्रंथावर संस्कृत भाष्य सहसा आढळत नाही. पण यांच्या हरिकथामृतसार या कन्नड ग्रंथावर दोन संस्कृत भाष्ये आहेत :– (१) श्री ताम्रपर्णीया (दुसरे नाव पदप्रकाशिका) व (२) श्री व्यासदाससिद्धांतकौमुदी (वादिराजाचार्य जमखंडि यांचे).

१६ नागलिंग (१७९८–१८७८). वडील मौनेश्वर व आई नागम्म. जावळगेरे (ता. मानवि. जि. रायचूर) हे त्यांचे जन्मस्थान; पुढे नवलगुंद (जि. धारवाड) हे त्यांचे कार्यक्षेत्र ठरले. त्यांची समाधी तेथेच आहे. नागलिंग ही उत्तर कर्नाटकातील एक थोर विभूती होऊन गेली. त्यांची तपश्चर्या व योग्यता या भागात सुपरिचित आहे. बालपणीच वैराग्य येऊन त्यांनी संन्यास ग्रहण केला असे म्हणतात. त्यांनी भक्ती व ज्ञानाबद्दल उपदेश करून लोकांना अध्यात्मप्रवण केले. ते अस्पृश्योद्धारासाठी फार झटले. त्यांची पदे सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यातील आहेत.

१७ निजगुणशिवयोगि. साधारण सोळावे शतक हा काळ. मैसूर भागातील कोळ्ळेगाल तालुक्यातील चिलकवाडि येथील गादीचे अधिपती. एका क्षणी मनात परिवर्तन झाले व त्यांनी राज्यत्याग केला. नाना विद्या संपादन करून, शास्त्रसंपन्न होऊन, साहित्य व संगीताचा अभ्यास करून त्यांनी आम जनतेला मुक्तिमार्ग दाखविला. शंभुलिंग डोंगरावर तपश्चर्या केली व शेवटी तिथेच संजीवन समाधी घेतली. आत्मस्वरूपी स्थिर राहणारे व अगाध विद्वत्ता व दीर्घ तपश्चर्या असलेले हे एक साक्षात्कारी योगी होते. त्यांचे गुरू चेन्नसदाशिवयोगि. आपल्या परमार्थ-प्रकाशिका या ग्रंथात त्यांनी षट्स्थल मार्गाचा गौरव केला आहे. यावरून ते वीरशैव होते असे

एक पक्ष प्रतिपादन करतो. उलट कैवल्यपद्धति या ग्रंथात आपण वेदोपनिषदे, भगवद्गीता व शास्त्रे यांना वाट पुसत ग्रंथ लिहिला आहे या त्यांच्या म्हणण्यावरून व विवेकचिंतामणि या विश्वकोषतुल्य ग्रंथातील अद्वैत पुरस्कारावरून ते अद्वैतवेदान्तीच आहेत असे दुसरा पक्ष मानतो. त्यांना सर्वसंग्राहक व समन्वयशील म्हणणे अधिक योग्य आहे. ज्ञानाच्या शिखरावर चढूनही अज्ञ जनांच्या उद्धारासाठी त्यांनी वाङ्मयनिर्मिती केली. आबालवृद्धांना आपले ग्रंथ समजावे अशी त्यांना आर्तता होती. त्यांच्या ग्रंथात तत्त्वबोध, गुरुभक्ती, अद्वैतनिरूपण व भक्तिमाहात्म्य प्रकर्षाने आढळते; तसेच तत्त्वज्ञान व परमार्थ यांचा सुरेख संगम दिसतो. त्यांची रचना छंदोबद्ध असून पारिभाषिक शब्दांचा सढळ हाताने त्यांनी उपयोग केला आहे. ते संगीतज्ञ होते व त्यांच्या काव्यात अनुभवाच्या खोलीबरोबर माधुर्य व प्रसाद हे गुण आहेत. शंभुलिंग ही त्यांची मुद्रिका आहे.

१८ निंबरगि महाराज (१७८९ ते १८८५). हे कर्नाटकातील फार मोठे संत होते. ते गुरुदेव रा. द. रानडे यांचे परमगुरू होत. भीमण्णा मिसळकर हे त्यांचे वडील. जन्म सोलापुरचा. सिद्धगिरी (हल्लीचा कणेरी मठ, जि. कोल्हापूर) येथील मुप्पिन मुनींकडून यांना अनुग्रह मिळाला. गोरवनकोळ्ळ, ता. परसगड, या मूळ गावचे मुप्पिन काडसिद्धस्वामि हे सिद्धगिरी येथील काडसिद्धांच्या गुरुपरंपरेतील बाविसावे गुरू होत. तेविसावे गुरू सिद्धकाडदेवरु हे रायर हुब्बळ्ळि या मूळ गावचे असून ते ११ मार्च १८५० मध्ये शिवैक्य पावले असे श्री चंद्रशेखर शास्त्रि आपल्या श्री काडसिद्धेश्वर वचन या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात. श्री निंबरगि महाराजांचा जीवनकाळ १७८९ ते १८८५ असा आहे, यावरून श्री निंबरगि महाराजांनी मुप्पिन काडसिद्धस्वामि किंवा सिद्धकाडदेवरु या दोघांपैकी एकाकडून अनुग्रह घेतला असावा असा तर्क वाहतो. त्यांनी अत्यंत खडतर साधन केले व परमार्थाचे शिखर गाठले. प्रपंच व परमार्थ दोन्हीचाही समन्वय साधला. आपले दीर्घायुष्य त्यांनी साधन करण्यात व मुमुक्षूंना पारमार्थिक आणि व्यावहारिक उपदेश करण्यात वेचले. महाराजरवर वचन या नावाने त्यांच्या शिष्यांनी

त्यांची वचने एकत्र केली आहेत. ती प्रत्येक साधकाने हृदयावर कोरून ठेवली पाहिजेत. त्यांना अलीकडील काळातील आचारधर्माचे उद्‌गाते असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. आत्मध्यान व सदाचार ह्या दोन गोष्टींवर मनुष्याने भिस्त ठेवावी, आचरणात कुठेही चुकू नये कारण आपण जे करतो त्याचे नेमके फळ आपल्या पदरात पडते, पेरिले ते उगवते, हे त्यांच्या शिकवणुकीचे सार आहे. हे लक्षात ठेवून, डोळ्यांत तेल घालून माणसाने आपले वर्तन जपावे व परमेश्वरप्राप्ती करून घ्यावी, हा निंबरगि महाराजांचा आम जनतेला सांगावा आहे.

१९ पुरंदरदास (१४८०–१५६५). यांचे अधिकतर वास्तव्य तुंगातीरी पंपाक्षेत्रात (हंपे, ता. होसपेट, जि. बळ्ळारि) येथे होते. व्यासराय हे त्यांचे गुरू. दासकूट किंवा भक्तिसंप्रदाय याचा पुरंदरदास हे प्राणच होते. पराविद्या व अपराविद्या हे विषय उपनिषदांप्रमाणे त्यांनी हाताळले आहेत. त्यावरून त्यांच्या गुरूंनी त्यांच्या कृतींना पुरंदरोपनिषद् हे सार्थ नाव दिले. संगीतशास्त्रावरील त्यांचा अधिकार फार मोठा होता. त्यांच्या पदांत मानसशास्त्र, नीती, तत्त्वज्ञान व पारमार्थिक अनुभव यांतील सिद्धांत पदोपदी आढळतात. त्यांच्या काव्यात नादमाधुर्य विशेष आहे. पुरंदरदासांची धार्मिक दृष्टी विशाल असून समाजातील अनीतीवर व दांभिकतेवर त्यांनी धार धरली होती. नाममहिमा, गुरुस्तवन, स्वदोषदर्शन, समाजोन्नती, वैराग्य किंवा समर्पणभाव हे त्यांनी हाताळलेले मुख्य विषय. मनुष्यस्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन त्यांच्या काव्यात होते. हिंदी साहित्यात तुलसीदासांना व मराठी साहित्यात तुकारामांना जे स्थान आहे तेच कन्नड साहित्यात पुरंदरदासांना आहे. पुरंदरविठ्ठल ही त्यांची मुद्रिका.

२० बसवेश्वर (११३१–११६७). इंगळेश्वर बागेवाडी येथील मादरस व मादलांबिके यांचा पुत्र. जातवेद मुनींनी त्यांना वीरशैव संप्रदायाची दीक्षा दिली. कल्याण (जि. गुलबर्गा) येथील बिज्जल राजाच्या पदरी हे प्रधान मंत्री होते. बसवेश्वरांची बुद्धी तल्लख असून विचार स्वतंत्र असत. कर्मकांडाचा त्यांना तिटकारा होता. शुष्क तर्कावर विश्वास नव्हता. ते प्रतिभासंपन्न कवी

होते. भक्तांच्या मालिकेत त्यांचा क्रमांक फार वरचा आहे. हे क्रांतिकारक असून वीरशैव मताची त्यांची संघटना केली व मोठे धार्मिक पुनरुत्थान केले. कल्याण येथे शून्यसिंहासन स्थापन केले. या अनुभवमंटपात किंवा संत-समेत अनेक संत येऊन तात्त्विक व आध्यात्मिक चर्चा करीत. बसवेश्वरांनी सामाजिक विषमता नाहीशी करण्याचा प्रयत्न करून शिवयोगसाधनाचा अधिकार यच्चयावत् जनांना आहे अशा मानवधर्माचा पुरस्कार केला. लोकांना सुधारण्याऐवजी स्वत:ला सुधारावे हा त्यांचा आग्रह होता. श्रम-गौरवाला त्यांच्या विचारात अग्रस्थान होते. कर्मे ईशु भजावा हे तत्त्व त्यांनी रावबले. त्यांच्या वचनात आर्त भक्ती, आत्मनिरीक्षण, परमार्थाची तळमळ, निरहंकारवृत्ती व नम्रता ही ढळढळीतपणे दिसतात. प्रचलित समाजातील ढोंगावर त्यांनी कोरडे ओढले. सदाचार हा स्वर्ग व अनाचार हा नरक, दया धर्माचे मूळ आहे, अशासारखे त्यांचे अनेक उदात्त विचार आबालवृद्धांच्या तोंडी आहेत. कूडलसंगम (जि. विजापूर) येथे ते कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावरील संगमनाथाशी ऐक्य पावले. कूडल-संगमदेव ही त्यांची मुद्रिका.

२१ भगवंतप्प कुलकर्णि (१८८४–१९४६). हे श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचे एक निष्ठावंत शिष्य होते. ध्यान करणे व निंबाळला जे कुणी येतील त्यांची व्यवस्था करणे हे त्यांचे काम. आल्यागेल्याची ते मनापासून सेवा करीत. त्यांच्याकडे काव्यशक्ती होती व चिदानंद या मुद्रिकेने ते काव्य करीत. त्यांच्या भक्तीबद्दल श्री गुरुदेव रानडे यांनी केलेली एक नोंद फार महत्त्वाची आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अलाहाबाद धोक्यात होते. त्या वेळी रोज दुपारी भगवंतप्प अत्यंत भाव-पूर्ण रीतीने पदे म्हणत असत. त्यांचा भाव इतका जबरदस्त होता की आतापर्यंत कधीही न आलेला अनुभव आपल्यासमोर येऊन थडकला असे गुरुदेव म्हणतात (पाथवे टु गॉड इन कन्नड लिटरेचर, पृ. ११३). हा अद्‌भुत पारमार्थिक अनुभव म्हणजे विश्वाच्या रंगफलकावर गुरुदेवांना युद्धाचे पालटते रंग प्रत्यक्ष समोर दिसले तो असावा (पाहा, द भगवद्‌गीता ॲज ए फिलॉसॉफी ऑफ गॉड-रियलायझेशन, पृ. २७६).

२२ भवतारक. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात मल्लिगवाड (ता. गदग, जि. धारवाड) येथे भवतारकांचे वास्तव्य होते. त्यांचे मूळचे नाव नरसप्प. हे गृहस्थाश्रमी असून मल्लिगवाडचे कुलकर्णी होते. तेथील ग्रामदैवत सोमेश्वर याचे ते भक्त होते. त्यांचे सद्‌गुरू किंवा त्यांचे आध्यात्मिक जीवन या-विषयी दुर्दैवाने फारशी माहिती उपलब्ध नाही. नरसप्प अपार वैराग्यशाली होते. प्रपंचात असूनही त्यांनी परमार्थात उच्च स्थान मिळवले होते. त्यांच्या पदांतून अद्वैत सिद्धांताचे विवेचन दिसते. त्यांनी योगाभ्यास केला असावा कारण योगाची परिभाषा त्यांनी वापरली आहे. आसन, भ्रूमध्य-दृष्टी यांचा उल्लेख केला आहे. नादघोष व तेज यांचा त्यांना अनुभव असावा असे अनुमान त्यांच्या पदांवरून काढता येते. किंबहुना विश्वरूप-दर्शनाची पायरीही त्यांनी गाठली होती. भगवद्‌गीतेतील अद्‌भुताच्या (Sublime) अनुभवांचे विश्लेषण करीत असताना गुरुदेव रानडे यांनी आपल्या गीतेवरील पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात ज्ञानेश्वर, कबीर, तुलसीदास यांच्या मालिकेत भवतारकांच्या 'दृष्टियोळगे दृष्टि निंतितु' या प्रस्तुत पुस्तकात घेतलेल्या प्रकरण १९ मधील ४ थ्या पदाचा आवर्जून उल्लेख केला आहे. परमार्थाकडे पाठ वळवून संसारात बुडलेल्या लोकांची ते कठोर वाणीने कानउघाडणी करतात. त्यांची शैली लालित्यपूर्ण व प्रसन्न-गंभीर आहे. तंदे भवतारक, गुरु भवतारक असे उल्लेख नरसप्पांच्या काव्यात येतात. भवतारकांना त्यांनी पूर्णब्रह्म म्हटले आहे. अतः भवतारक हे नरसप्पांचे गुरू होते असे वाटते. भवतारक हीच मुद्रिका त्यांनी घेतली आहे. नरसप्पांची पदे गोळा करण्यासाठी अत्यंत परिश्रम घेऊन श्री विश्वनाथशास्त्रि ति. नरगुंद यांनी ती पदे संग्रहित करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

२३ भीमकवि. यांचा काळ सुमारे १४ वे शतक. वडिलांचे नाव शिवदेव असावे. सिद्धवटपुर हे वास्तव्यस्थान. हे परम शिवभक्त होते. बसवपुराण हा त्यांचा कन्नड भाषेतील बृहत् काव्यग्रंथ आहे. वीरशैव समाजात हा फार लोकप्रिय असून शिवमंदिरात याची पारायणे होतात. त्यांचे काव्य लालित्यपूर्ण आहे.

२४ भीमाशंकर (१६६०–१७३१). नाथसंप्रदायाची एक शाखा सिंदगि (जि. विजापूर) येथे सुरू झाली होती. भीमाशंकर त्या परंपरेतील आहेत. सिंदगि तालुक्यातील बळगानूर येथील कुलकर्णी. यांचे गुरू भृंगवळिळ गुरुनाथ. भीमाशंकर हे वेदशास्त्रांचे अध्ययन केलेले एक विद्वान होते. पंपाक्षेत्र विद्यारण्यपीठस्थ श्रीनृसिंह सरस्वति यांनी आपला निर्याणकाल जवळ आला आहे हे ओळखून भीमाशंकरांना बोलावले व त्यांना संन्यासदीक्षा देऊन १७२२ मध्ये शंकरानंद सरस्वति या नावाने पीठावर बसवले. पण हा व्याप वाढल्यावर तो नको म्हणून भीमाशंकरांनी रामेश्वरच्या एका ब्राह्मण युवकाला पीठाधिपती करून आपण त्यातून मुक्त झाले (१७२६). सिंदगि येथे हरिजनांनी दिलेल्या जागेवरच त्यांनी मठ बांधला. तेथेच संजीवन समाधी घेतली. त्यांनी माणसामाणसांत भेद केला नाही. योगशक्ती मिळवूनही भीमाशंकर सिद्धींच्या मोहापासून दूर राहिले. भक्तिज्ञानाच्या मार्गाने ते गेले व भक्ति-ज्ञान, द्वैत-अद्वैत यांत फरक नाही हे त्यांनी लोकांसमोर ठेवले. त्यांचा प्रभाव समाजातील सर्व थरांच्या लोकांवर पडला. त्यांच्या पदांतून आध्यात्मिक अनुभवांचे, विशेषत: परंज्योतिप्रकाशाच्या अनुभवाचे, स्पष्ट दर्शन होते. योगसाधन व स्वानुभव हे त्यांच्या काव्याचे मुख्य विषय. भीमाशंकर, सहजानंद, दत्तमहेश अशा विविध मुद्रिकांखाली त्यांनी पदरचना केली. प्रस्तुत पुस्तकातील सै सै सद्गुरुविन या त्यांच्या पदाची चर्चा करताना गुरुदेवांनी त्यातील ईश शब्दावरून ईश हे कवीचे नाव असू शकेल असे म्हटले आहे म्हणून सूचीमध्ये ईश असे कवीचे नाव नमूद केले आहे.

२५ मडिवाळयोगि (कडकोळ). डॉ. लट्टे यांच्या मते जन्म सुमारे १७८० व जिवंत समाधी १८५५. बिदनूर (ता. अफझलपूर, जि. गुलबुर्गा) हे यांचे गाव. आईचे नाव गंगम्म. हिच्याकडून तत्त्वज्ञानाचा वारसा मिळाला. लहानपणापासून त्यांना जपतपावद्दल आस्था होती. जीवनाच्या अखेरीस कडकोळ येथे वास्तव्य केले. वीरशैव संतांची शिकवण सामान्य लोकांपर्यंत पोचवून त्यांनी त्या उपदेशाचा गौरव वाढवला. ते खरेखुरे लोककवी होते. जन्माला येऊन मायेत लोळण्याऐवजी सद्गुरुस्मरण करावे व

सत्कृत्ये करावी असे ते सांगत. त्यांच्या जीवनात क्रिया व ज्ञान यांचा सुंदर समन्वय आढळतो. त्यांचे काव्य हृदयस्पर्शी असून त्यात तत्कालीन दुष्ट रूढींचे चित्रण व विडंबन सापडते. सामाजिक अन्यायाला मडिवाळयोगींनी निष्ठुर वाचा फोडली. समाज सुधारावा अशी त्यांना फार तळमळ होती. त्यांनी सदाचरणावर भर दिला. त्यांच्या लोकगीतांतून पारमार्थिक अनुभवांचे सुस्पष्ट दर्शन होते. अलीकडील संशोधनाप्रमाणे गुरु महांत ही त्यांची प्रधान मुद्रिका आहे. म्हणून महंत हे स्वतंत्र कवी नसून त्या मुद्रिकेची पदे मडिवाळयोगींचीच आहेत.

२६ मनोहरराव देशपांडे (१८९९–१९९०). अथणि तालुक्यातील (जि. बेळगाव) एका खेड्यात जन्म. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या विचारांचा तरुणपणी फार प्रभाव पडला. विद्यार्थ्यांत उदात्त विचारांचा प्रसार व्हावा म्हणून अथणि येथे शाळा स्थापन केली व तिथेच शेवटपर्यंत काम केले. श्री अंबूराव महाराज, इंचगेरि हे त्यांचे गुरू होत. मनोहररावांची साहित्यसेवा मोठी असून ते ३०–३५ पुस्तकांचे लेखक आहेत. ते फार व्यासंगी होते. त्यांचे काव्य थोडेच आहे पण फार प्रसादयुक्त आहे. लालित्य व शब्दसौष्ठव हे त्यांच्या काव्याचे विशेष गुण आहेत. मराठी, कन्नड, इंग्रजी, संस्कृत अशा अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

२७ महंत. मडिवाळयोगि (कडकोळ) पाहा.

२८ महिपति (१६११–१६८१). यांचे गाव काखंडकि (जि. विजापूर). सारवाडचे भास्करस्वामि हे यांचे गुरू. समाजातील सर्व थरांना पेलेल अशी त्यांची काव्यरचना असून त्यात स्तोत्रे, स्त्रीगीते, लावण्या, शेतकऱ्यांची पदे असे सर्व काही आहे. पारमार्थिक अनुभवांची त्यांची वर्णने अद्वितीय आहेत. प्रभावी शैली, सखोल तत्त्वज्ञान, भक्तिमाहात्म्य व श्रेष्ठ अनुभव ही त्यांची वैशिष्ट्ये असून त्यांचे काव्य सहज साधलेल्या अनुप्रासांनी नटलेले व हृदयंगम आहे. कर्नाटकातीलच नव्हे तर जगातील एक श्रेष्ठ साक्षात्कारी संत अशी महिपतींची पदवी आहे.

२९ महिपतिसुत. पाहा, कृष्णराय (कारवंडकि).

३० मुप्पिन षडक्षरि. हे निजगुणशिवयोगींचे समकालीन असून त्यांच्याप्रमाणेच ह्यांनीही शंभुलिंगाच्या डोंगरावर तप केले. शिवशरणांची पारमार्थिक पदे रचण्याची परंपरा यांनी पुढे चालवली. षडक्षरींची शैली अत्यंत साधी व मनाला भिडणारी आहे. त्यांचे काव्य फार लोकप्रिय असून सुबोधसार या नावाने पदे संग्रहित झाली आहेत. आर्त भक्तीने त्यांनी देवाची करुणा भाकली. भक्तीला त्यांनी फार प्राधान्य दिले आहे. त्यांच्या काव्यात समर्पणभाव, सत्याची जाणीव हे गुण जसे दिसतात तसेच उच्च पारमार्थिक अनुभवही आढळतात.

३१ राघवेंद्रस्वामि (१६०१ ते १६७१). यांचे घराणे मूळचे कुंभकोणम्चे. तिम्मण्णभट व गोपम्म यांचे ते पुत्र असून कांचीपूरजवळील भुवनगिरि येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्वीचे नाव वेंकटभट्ट. घराण्यात चालत आलेली वीणावादनाची कला त्यांनी हस्तगत केली होती. यांचे गुरू सुधींद्रतीर्थ. राघवेंद्रस्वामि अत्यंत तल्ख बुद्धीचे असून त्यांची ग्रंथरचना विपुल आहे. न्यायसुधा-परिमळ हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ असून यावरून त्यांच्या गुरूंनी त्यांना परिमळाचार्य ही पदवी दिली होती. याशिवाय न्यायमुक्तावली, तंत्रदीपिका, अणुभाष्यटीका वगैरे त्यांचे अनेक ग्रंथ आहेत. त्यांच्या लहान मोठ्या ४७ ग्रंथांची यादी उपलब्ध आहे. वैदिक परंपरेतील ग्रंथांवरील टीका हे यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य आहे. मध्वाचार्यांच्या ग्रंथांवर व त्यांनी लिहिलेल्या टीकांवर राघवेंद्रस्वामींनी टिपणे लिहिली. राघवेंद्रस्वामि गाढे विद्वान असूनही कोरडे वेदान्ती नव्हते. भाव व बुद्धी यांचा अपूर्व संगम त्यांच्या ठिकाणी दिसतो. ते पुरंदरदास व विजयदास यांच्यामधील दुवा आहेत. परंपरागत व्यासकूट व दासकूट यांचे सार त्यांनी पुढील भक्तवृंदाला पोचवले. वेणुगोपाल ही त्यांची मुद्रिका आहे. मंत्रालय (जि. कर्नूल) येथे त्यांनी जिवंतपणी वृंदावन-प्रवेश केला. मंत्रालय हे फार मोठे जागृत स्थान आहे. कर्नाटकातील भक्तिप्रवण मंडळींच्या मनातील राघवेंद्रस्वामींचे स्थान अढळ आहे.

३२ रामराव होर्ति (मृत्यू १९३७). श्री भाऊसाहेब महाराजांचे शिष्य. हे विजापूरचे रहिवासी असून त्यांची समाधी तिथेच आहे. त्यांनी श्री महाराजांना एक पत्र लिहिले होते. ते काव्यसदृश असून मनातले भाव त्यात फार उत्कट रीतीने प्रकट झालेले आहेत. तेच पत्र प्रस्तुत पुस्तकात घेतले आहे. ते एक श्रेष्ठ साधक होते.

३३ विजयदास (१६८३ ते १७५५). चीकलपरवि (जि. रायचूर) येथील राहणारे. वडिलांचे नाव श्रीनिवास, आईचे कूसम्म. यांचे पहिले नाव दासप्प. काशीला गेले असताना पुरंदरदासांनी स्वप्नात येऊन विजय-विट्ठल हा नाममंत्र दिला. विजयविट्ठल हीच त्यांची मुद्रिका आहे. त्यांची पदे विपुल असून अतिशय लोकप्रिय आहेत. त्यांनी दाससाहित्याची खूप वाढ केली व ती परंपरा उज्ज्वल केली. त्यांच्या पदांतून भक्तीच्या जोडीला ज्ञानाची महती गायिलेली आहे. त्यांच्या लिखाणात लोकांना सन्मार्गाला लावण्याचा उपदेश, तत्त्वज्ञान, विरक्ती, ध्यानप्रक्रिया, हरिकृपा व साक्षात्काराने मिळणारा परमानंद हे विषय दिसतात.

३४ व्यासराय (व्यासतीर्थ) (१४४७–१५३९). हे रामाचार्यांचे पुत्र असून मैसूरजवळील बन्नूर गावी जन्मले. त्यांचे गुरू श्रीपादराय. व्यासराय मोठे तत्त्वज्ञ व साक्षात्कारी होते. तात्पर्यचंद्रिका, न्यायामृत, तर्कतांडव ह्या त्यांच्या ग्रंथांना द्वैत संप्रदायातील साहित्यात फार मोठे स्थान आहे. त्यांनी द्वैत संप्रदायाचा महिमा आसेतुहिमाचल वाढवला. कन्नड भाषेतही त्यांनी रसाळ व सुबोध ग्रंथरचना केली. विजयनगर येथील अधिपती कृष्णदेवराय यांच्यावरील अरिष्ट त्यांनी टाळले. दरबारात ते विद्वानांचे अग्रेसर होते. आपले दीर्घ आयुष्य त्यांनी जनहित व धर्मजागृती यांत वेचले. व्यासराय आपल्या पांडित्याने व्यासकूटात व भक्तीने दासकूटात अग्रगण्य आहेत. कर्नाटकातील व्यासकूटाच्या परंपरेत एकापेक्षा एक विद्वान होऊन गेले. वैदिक परंपरेतील ग्रंथांवर त्यांनी पांडित्यपूर्ण संस्कृत ग्रंथांची रचना केली. दासकूट हा भक्ति-संप्रदाय म्हणून नावारूपास आला. त्यातील संतांनी कन्नड भाषेत साहित्य-निर्मिती केली. व्यासतीर्थांच्या लिखाणात संसाराची

असारता, इंद्रियनिग्रह, संतसंग, श्रीकृष्णपरमात्म्यावर अढळ निष्ठा यांवर भर आहे. त्यांची मुद्रिका श्रीकृष्ण.

३५ शंकरानंद. अनुभवामृत या शांकरतत्त्वज्ञानावरील प्रसिद्ध ग्रंथाचे कर्ते जे महलिंगरंग, त्यांचे प्रशिष्य म्हणजे शंकरानंद असे होसकेरे चिदंबरय्य यांचे मत आहे. कैवल्यनवनीत हा शंकरानंदांचा विख्यात ग्रंथ आहे. त्याच्या समाप्तिदर्शक संकल्पात 'गुरुमहलिंगरंग-यतिवरेण्य-चरणकमल-भृंगायमान-श्रीशंकरानंदयोगि' असा शंकरानंदांनी स्वतःचा उल्लेख केला आहे. त्यांची मुद्रिका गुरुमहलिंग अशी आहे. यावरून ते महलिंगरंगांचेच शिष्य असावेत असे वाटते. निगमागमांचे सार असणारा, वेदांतरहस्यावर प्रकाश टाकणारा, मुमुक्षुजनांचे इहपर कल्याण व्हावे या हेतूने लिहिलेला ग्रंथ असे कैवल्यनवनीताचे वर्णन केलेले आहे. शंकरानंदांची शैली मोहक आहे. नीती व साक्षात्कार परस्परांवर अवलंबून आहेत असे ते सांगतात. त्यांच्या काव्यात गुरुभक्ती प्रकर्षाने दिसते.

३६ शरणबसवेश्वर (कलबुर्गि) (१७४६–१८२२). अरळगुंडिगे (ता. जेवरगि, जि. गुलबर्गा) येथे जन्म. आदप्प व मडियम्म या दांपत्याला मूलबाळ नसल्याने आपले भाऊ–भावजय मलकप्प व संगम्म यांचा मुलगा शरणबसप्प याला स्वतःचाच मुलगा मानून त्यांनी त्याचा सांभाळ केला. कलकेरि येथील हिरेमठाच्या मरुळाराध्य या गुरूंकडून दीक्षा मिळाली. लहानपणापासून शरणबसवांचा धार्मिकतेकडे कल होता. वीरशैव सिद्धांतांचा त्यांनी गाढ अभ्यास केला होता. ते फार दानशूर असून कुणी काही मागितले की ते त्याला देऊन टाकीत. आपल्याकडे जे आहे त्यातून सर्वांना वाटा द्यावा असा त्यांचा उपदेश होता. जनता-जनार्दनाची सेवा हीच ईशसेवा समजून ते तत्त्व त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले. प्राणिमात्रांवर दया करावी म्हणून त्यांनी गोवध थांबवण्याचा प्रयत्न केला. जाति–पंथ–मत यांतील भेद नाहीसा केला. अंधश्रद्धेविरुद्ध संघर्ष केला. स्वतः अंतरंगशुद्धी व बहिरंगशुद्धी साधून इतरांनीही ते करावे या प्रयत्नात ते असत.

३७ शरीफ साहेब (१८१९–१८८९). शिशुनाळ (जि. धारवाड) येथील शरीफ साहेब म्हणजे कर्नाटकाचे कबीर. यांच्या वडिलाचे नाव इमाम व आईचे हज्जुमा. कळस गावातील गोविंदभट्ट हे सिद्धपुरुष यांचे गुरू होत. शरीफ साहेबांना लहानपणापासून हिंदू व मुस्लिम धर्मांचा परिचय होता. हे आत्मज्ञानी संत असून अद्वैताचे उपासक होते. त्यांची निःस्पृह-वृत्ती वाखाणण्याजोगी होती. त्यांचे काव्य विपुल असून प्रासादिक व अभिनव रूपकांनी नटलेले आहे. ते बोलीभाषा वापरतात व प्रभावी शब्दांची योजना करतात. काव्यात पारमार्थिक अनुभवांचे चित्रण व देवोन्मादाची स्फूर्ती दिसते. शरीफ साहेबांचे काव्य लोकाभिमुख आहे. लोकांच्या उद्धारासाठी त्यांनी काव्याचा अवलंब केला. तात्त्विक व नीतिपर पदांतून त्यांनी भक्तीच्या घोपटमार्गाचा उपदेश केला. मानवताधर्म सांगून त्यांनी धर्मपालनाचा व ज्ञानप्राप्तीचा अधिकार प्रत्येकाला आहे असा डांगोरा पिटला व सामान्य मनुष्याला जीवन कृतार्थ करून घेण्याचे रहस्य शिकवले. त्यांच्या लिखाणात समन्वयदृष्टी असून त्यांची पदे प्रपंच–परमार्थ, भक्ती–ज्ञान, हिंदू–मुस्लिम यांतील सेतू आहेत. शिशुनाळधीश ही त्यांची मुद्रिका.

३८ शिवलिंगव्व (१८६७–१९३०). जत (जि. सांगली) येथील राहणाऱ्या. त्यांची समाधी जत येथे आहे. श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या त्या एकनिष्ठ शिष्या होत्या. त्यांना संसारसुख फारसे लाभले नाही. दुःखाने पोळलेल्या शिवलिंगव्व परमार्थात अतिशय उत्साही व आनंदी होत्या. त्यांचे साधन अतिशय खडतर असून काव्यशक्ती दांडगी होती. त्यांच्या पारमार्थिक काव्यात आरत्या, पाळणे किंवा संत-सभावर्णन असे विविध विषय येतात. त्यांचा परमार्थातील अधिकार फार मोठा होता. त्यांच्या पदांवरून रंग, तेज, सुवास हे अतींद्रिय अनुभव त्यांना असल्याचे स्पष्ट होते. परमेश्वराचे बालरूपाने त्यांना दर्शन झाले होते.

३९ षण्मुखस्वामि (१७०६–१७८८). या संतकवींचा जन्म मल्लसेट्टेप्प व

दोड्डमांबे यांच्या पोटी जेवरगि (जि. गुलबुर्गा) येथे झाला. अखंडेश्वर ही त्यांची मुद्रिका आहे. हे संस्कृत पंडित होते. त्यांच्या वचनांत नीती, धर्म, भक्ती, वैराग्य व तत्त्वज्ञान प्रकर्षाने दिसतात. षण्मुखस्वामींची वचने रसाळ व प्रसन्न असून लोकांच्या तोंडी आहेत. वीरशैव वचनकारांत यांचे स्थान उच्च आहे.

४० सर्पभूषणशिवयोगि (१७९५–१८३९). बेंगळूरजवळील बाणावर येथील मल्लिकार्जुनप्प व चन्नम्म यांचे पुत्र. जन्म बेंगळूर. गुरुसिद्ध हे त्यांचे गुरू. विद्याभ्यास गुरुसिद्धांच्या मठात झाला. संस्कृत व कन्नड भाषांतील निष्णात पंडित. ते वैराग्यसंपन्न व ब्रह्मनिष्ठ होते. त्यांचा ज्ञानशतकम् हा संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांची पदे कैवल्यकल्पवल्लरि या कन्नड ग्रंथात संकलित झालेली आहेत. त्यांची मुद्रिका गुरुसिद्ध. तत्त्वज्ञान व भक्ती यांचा समन्वय करणाऱ्या परंपरेत ते बसतात. हे संगीतज्ञ होते. त्यांच्या काव्यात साहित्य-सौंदर्य, तत्त्वज्ञानाचे गांभीर्य, गानमाधुर्य व पारमार्थिक अनुभवांची उच्च अवस्था दिसते. शुद्ध लालित्यपूर्ण शब्दरचनेने मन आकर्षित होते. त्यांची वाणी प्रासादिक होती. त्यांनी तात्त्विक सिद्धांत सोप्या कन्नडमध्ये निरूपिले आहेत. पाप-पुण्य, गुण–अवगुण, सुख–दुःख यांचे इतके सुबोध विवेचन त्यांनी केले आहे की ते समजावून घेऊन प्रत्यक्ष आचरणात आणणे सामान्य मनुष्याला सुद्धा सोपे व्हावे.

४१ सर्वज्ञ (अदमासे १६ वे शतक). अंबळूर (ता. हिरे केरूर, जि. धारवाड) येथे वास्तव्य. हे क्रांतिकारक व स्वातंत्र्यप्रेमी कवी असून व्यवहारज्ञान, विवेक व विरक्ती यांची जणू मूर्तीच होते. बोले तैसा चाले हे त्यांचे ब्रीद असे. ते कुणाचीही भीती बाळगीत नसत. त्यांची वचने सूत्रमय व अर्थवाही असून त्यात शाश्वत सिद्धांत जसे आहेत तशीच कर्मठपणावर व ढोंगीपणावर कडक व निर्भीड टीका आहे. सर्वज्ञांच्या वचनांत भक्ती, प्रेम, भूतदया व सर्वसंग्रहवादी मूलगामी दृष्टी असून त्यांना नर्मविनोदाची झालर आहे. त्यांची चैतन्यपूर्ण व स्फूर्तिदायक वचने अनेकांच्या मुखात आहेत.

४२ सिद्धराम. हे बसवेश्वरांचे समकालीन होते म्हणजे १२ वे शतक हा त्यांचा काळ. सोन्नलिगे (हल्लीचे सोलापूर) येथील मुद्दुगौड व सुग्गव्वे यांचा मुलगा. सिद्धराम हे वीरशैव संप्रदायातील श्रेष्ठ कर्मयोगी आहेत. कायकवे कैलास (कर्मानेच मुक्ती) या सिद्धांताचे ते मूर्तरूपच होते म्हटले तरी चालेल. विहिरी–तळी खोदणे, पाणपोया घालणे, देवळे बांधणे अशा कामांत ते व्यग्र असत. एक लक्ष शहाण्णव हजार शिवालये बांधण्याचे काम चालू असतानाच त्यांची व अल्लमप्रभूंची भेट झाली. नुसते दगडावर दगड ठेवून देव भेटत नसतो, त्यासाठी गुरुदीक्षा घ्यावी लागते, आणि देहाचे देऊळ व प्राणाचे लिंग असताना आणखी देवळे हवीत तरी कशाला असे सांगून त्यांनी सिद्धरामांचे मतपरिवर्तन केले व त्यांना कल्याणला नेले. तेथील अनुभवमंटपात संतांचे संमेलन भरत असे. तेथे चेन्नबसवेश्वरांकडून त्यांना दीक्षा मिळाली असे दिसते. सिद्धरामांची वचने अतिशय प्रभावी आहेत. कपिलसिद्धमल्लिनाथ किंवा कपिलसिद्ध-मल्लिकार्जुन ही त्यांची मुद्रिका.

४३ सिद्धेश्वर (कलबुर्गि). पाहा, शरणबसवेश्वर.

४४ हरिहर. ११५०–१२५० या कालावधीत हे होऊन गेले असा अंदाज आहे. वीरशैव कवी. गिरिजाकल्याण, पंपाशतक, रक्षाशतक, शिवगणद रगळेगळु वगैरे ग्रंथ. यांचे साहित्य भक्तिपूर्ण, भावपूर्ण असे आहे. त्यातील तत्त्वज्ञान, पांडित्य व भाषेतील सहजता स्पष्ट दिसते. बसवेश्वरांनी दाखव-लेल्या क्रांतीच्या दिशेने हरिहरांनी प्रवास केला व आपल्या प्रतिभेने व कल्पकतेने एक 'हरिहरमार्ग'च निर्माण केला. हरिहरांनी लिहिलेली 'रगळेगळु' (एक प्रकारचा पद्यबंध) इतकी प्रसिद्ध आहेत की, मराठीत जशी मोरोपंतांची आर्या तशी कन्नडमध्ये हरिहरांची रगळे म्हणता येईल. यात शिवभक्तांची चरित्रे वर्णिली आहेत.

परिशिष्ट ४

पदांची सूची

(१) चवथ्या स्तंभातील पृष्ठ क्रमांक प्रस्तुत पुस्तकातील आहेत. पाचव्या स्तंभातील क्रमांक Pathway to God in Kannada Literature (१९७० आवृत्ती) या पुस्तकात जिथे पदाची चर्चा आहे त्या पृष्ठांचे आहेत.

(२) ज्या पदांचे प्रकरण–पद दिले नाही ती पदे परिशिष्ट १ मध्ये आहेत.

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
ॐ नमः शिवा	पंचाक्षरि (नीरलकेरि)	१२·२	१४०	१७२
ॐ नाम कायुवदु	निंबरगि महाराज		२९०	१८८
अ एंब वर्ण	हरिहर	१२·४	१४४	१७६
अंजीकिन्यातकय्या	पुरंदरदास	९·२	१०२	१२४
अंतरंगद कदवु	विजयदास	११·१	१२४	१५२
अंदवाद श्रीगंधद	बंदे नवाज	१५·३	१८४	२१७
अंदिल्ल स्वामि	निंबरगि महाराज	१०·७	१२२	१४८
अनुगालवु चिंतेयु	पुरंदरदास	३·२	२२	३७
अय्या पाताळवित्तित्त	अक्क महादेवि	११·७	१३४	१६२
अर्तियागि बन्नि	महिपति (काखंडकि)	१८·२	२२६	२६४
अल्लुतिद्या कंदा	कूडलूरेश	२·२	१२	१९
आनंदवाद चिद्घन वस्तु	नागलिंग	१७·१	२१०	२५०
आरिगे काणदी मुत्तु	रेवणसिद्ध	१५·६	१९०	२२४
आरु अक्षर भेद	षडक्षरमुनि	१२·३	१४२	१७४
आव रोगवु एनगे	गोपालदास	२·४	१४	२३
इदरोळारय्य नीनु	कृष्णराय (काखंडकि)	१५·४(अ)	१८६	२२०

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
इदु कोळ्ळि भवरोगकौषधवु	पुरंदरदास		२८६	१८६
इदे अनुभव मंटपवु	वेरटूरपति	२०·७	२६०	३०८
इदे ब्रह्मज्ञान नोडिको	शरीफ साहेब	१२·१	१४०	१६९
इदे समय हरिये	विजयदास	३·५	२८	४३
इद्दरिरली देहा	गिरिमल्लेश	१९·२	२४०	२७६
इंथादेल्लिदे ता नोडि	महिपति (काखंडकि)	१७·२	२१२	२५१
इंदु एनगे गोविंद	राघवेंद्रस्वामि	१०·३	११४	१४०
इन्नेके यमन बाधेगळु	पुरंदरदास		२८८	१८७
इन्नेनिन्नेनु एनगिन्नु	महिपति (काखंडकि)	२०·५	२५८	३०४
इष्टु दिन ई वैकुंठ	कनकदास		२९६	२४९
एंथा गारुडिगा	चिदानंद	५·२	४४	६३
एंथा हुच्चु हिडिदीतिवग	कूडलूरेश	१९·५	२४४	२८७
एंदु मैया मरेसि	संग (नंद्याळ)	२०·२	२५२	२९७
एन्न बिन्नप केळु	गोपालदास		२७८	९५
एलो दारिकारने	पुरंदरदास	२·७	१८	२९
एल्लिद्यो हरि हेळय्य	महिपति (काखंडकि)	३·६	३०	४४
एन भरा नट्टीतप्पा	संग (नंद्याळ)	६·३	६०	८१
एन सवि एन सवि	भीमदास	१३·४	१५६	१८८
एनु अन्याय तिळियदु	रामराव (होर्ति)	६·५	६२	८५
एनु माडिदि केळेन्न	निंबरगि महाराज	१०·५	११६	१४५
एनु हेळलि एन्न	कूडलूरेश	४·६	४०	५८
ओ एन्नवारदे	कृष्णराय (काखंडकि)	१०·४	११४	१४२
कडकोळद ना गुलामा	कृष्णप्प खैनूर	७·४	७४	९७
कंडिरेनो महाकारण	काडसिद्ध		२७२	३२
कंडे ना कनसिनलि	पुरंदरदास	११·३	१२८	१५८
कण्णारे कंडेवु	महिपति (काखंडकि)	१८·६	२३२	२६९
कण्णिनोळगे नोडि कैवल्यव	पुरंदरदास	१८·४	२२८	२६६
कण्णिनोळगे नोडो हरिय	पुरंदरदास	१४·४	१७०	२००
कण्णिनोळु कण्णु कंडे	चिदानंद		२९८	२५९

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
कण्णिलि केळुव	पुरंदरदास	१५·४(आ)	१८८	२२१
करुणिसो गुरु	महिपति (काखंडकि)	५·५	५०	७०
करेयदले बंदिहुदु	कृष्णराय (काखंडकि)	१३·५	१५८	१८९
कर्पुरारतियन्नु	मनोहरराव देशपांडे	७·५	७६	९८
कल्लु मेत्तगे	निंबरगि महाराज	१६·५	२०४	२४१
कल्लुसक्करे कोळिल्लरो	पुरंदरदास		२८४	१८६
काणबारदंथा वस्तु	कूडलूरेश	११·८	१३४	१६३
काणुतिदे परबिंदु	सर्पभूषणशिवयोगि	१६·१	१९८	२३१
कायकांतारव होक्कु	सर्पभूषणशिवयोगि	२·६	१८	२८
काल कर्मव कालिले	भवतारक	२०·४	२५६	३०२
कुरुवरो नावु	कूडलूरेश	८·२	८६	१०६
कूसनु कंडीरा	पुरंदरदास	११·४	१३०	१५८
कृष्णमूर्ति कण्ण मुंदे	पुरंदरदास	११·२	१२६	१५४
केंडक्के गोरलि	पुरंदरदास	९·४	१०४	१३०
केळनो हरि ताळनो	पुरंदरदास	१३·७	१६२	१९२
कोगिले चेल्व कोगिले	निजगुणशिवयोगि		३००	२५९
गुरिया ओगेदेनो	नरसिंह	१४·२	१६६	१९५
गुरुचरणकमलदल्लि	निंबरगि महाराज	८·१	८४	१०४
गुरुता तोरिद	गुरुलिंगजंगम	७·७	८०	१०१
गुरुदेव नी माडिद	सर्पभूषणशिवयोगि	७·१	६८	९२
गुरुरायनंथ करुणाळु	कृष्णराय (काखंडकि)	५·६	५२	७२
गुरुविन हयांग मरेयलि	निरुपाधिसिद्ध	८·३	८८	११०
गुरुवे निम्म स्मरणेय	बसव (दोड्डपेटि)	६·४	६२	८३
गुरुवे निम्माज्ञेयनु	कूडलूरेश	१९·१	२३८	२७४
गोल्लरो नावु	बलभीमयोगि	१४·३	१६८	१९८
गोपालदासराय निन्नय	जगन्नाथदास	७·३	७२	९४
चिंते यातको	पुरंदरदास	३·३	२६	३९
जगव सुत्तिप्पुदु	बसवेश्वर	१०·१	११२	१३७
जंगमरु नावु	पुरंदरदास		२७४	८५

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
जय पांडुरंग एनु	पुरंदरदास		२७०	२७
तन्न ता तिळिद मेले	मडिवाळयोगि (कडकोळ)	१९·३	२४२	२८०
ताळ मान सरिसवनरिये	वसवेश्वर		२८२	१७१
तिळियवेकु निजसुखद	निरुपाधिसिद्ध	४·५	४०	५६
तोरेदु जीविसवहुदे	कनकदास		२७४	८४
दणियदे मलगिदेनो	चिदानंद	२०·३	२५४	३००
दासनेंदरे पुरंदरदास	व्यासराय	१३·६	१५८	१९०
दासरिगुंटे भय शोका	जगन्नाथदास	९·३	१०२	१२९
दृष्टियोळगे दृष्टि निंतितु	भवतारक	१९·४	२४२	२८३
देवगंगेयोळुळळवगे	जगन्नाथदास	९·८	११०	१३५
देवनल्लवेनो सद्गुरु	भवतारक	५·१	४४	६१
देव हिरि गुरुराय	मनोहरराव देशपांडे	७·२	७०	९३
नन्निंद नाने जनिसि	कनकदास	१०.६	११८	१४६
नंवरु नच्चरु	वसवेश्वर		२७२	६३
नयनेंद्रिय विषयदिंद	षण्मुखस्वामि	२·३	१४	२०
नळिननाभन नी	पुरंदरदास		२९४	२०४
नादव केळुत	चिदानंद	१६·६	२०६	२४२
नानु ओलिदु फलवदेनु	मुप्पिन षडक्षरि		२९२	१८९
निज ऊहिसवारदु	निजगुणशिवयोगि	१५·१	१८२	२१३
निज गुह्यद मातु	महिपति (काखंडकि)	१५·२	१८२	२१५
निन्न निजव नी	पंचाक्षरि (नीरलकेरि)	१२·७	१४८	१७९
निम्म नोट अनंत	वसवेश्वर	१७·५	२१८	२५७
नी याको निन्न	पुरंदरदास	१३·३	१५४	१८७
नेल्लु कुट्टुणु	निंवरगि महाराज	१६·७	२०८	२४५
नोडिरि ब्रह्मनाटव	कूडलूरेश	११·९	१३६	१६५
परतर शिवलिंगवेळसि	निजगुणशिवयोगि	१४·६(अ)	१७४	२०९
पाद पूजिय माडि	शंकरानंद	७·६	७८	९९
पेळललवे स्वानुभवद	कल्मेश्वर	१८·३	२२८	२६५
प्राणलिंगविदनु	निजगुणशिवयोगि	१४·६(आ)	१७६	२०९

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
वल्लडी शिशु	चामरस		२८४	१७६
वहु दोड्डदी जन्म	सिद्धलिंगेश (रेवगिपुर)	२·१	१०	१३
वा वा वा एन्न	संग (नंद्याळ)	१७·७	२२०	२५९
विल्वपत्रिय धरिसवेकण्णा	उरगगिरिनिलय	१४·१	१६४	१९३
बोधिसेन्ननु गुरुवे	सर्पभूषणशिवयोगि	८·६	९४	११६
ब्रह्मानंदद सभेयोळगल्लि	पुरंदरदास	११·६	१३२	१६१
ब्रह्मानंदद सुखवेनु	दिनकरप्रसव	२०·१	२५०	२९३
ब्राह्मणनेंदरे ब्रह्मन	पुरंदरदास	१७·३	२१२	२५२
भक्तनेंदरे भक्त	मनोहरराव देशपांडे	९·१	९८	१२२
भावलिंगवनु विडदे	निजगुणशिवयोगि	१४·६(इ)	१७८	२१०
मगा हुट्टिदव्वा	शिवलिंगव्व	१८·७	२३४	२७१
मंगलवागिहुदु	शंकरानंद	५·७	५४	७३
मध्वराया गुरु	पुरंदरदास		२८२	१२६
मनसिन मुरगिय	निंवरगि महाराज	४·२	३४	५१
मलगि परमादरदि	जगन्नाथदास	१८·५(आ)	२३०	२६८
मलगि पाडिदरे कुळितु	पुरंदरदास	१८·५(अ)	२३०	२६७
मातु मातिगे शंकरा	शंकरानंद	१२·६	१४६	१७८
मानव जन्म दोड्डदु	पुरंदरदास	४·१	३४	५०
मुत्तु कोळ्ळिरो जनरु	पुरंदरदास	१५·५	१९०	२२२
मुत्तु वंदिदे कोळ्ळिरण्णा	चिदानंद	१५·७	१९२	२२७
मुय्यके मुय्यि तीरितु	पुरंदरदास		२६६	२६
याके दय माडवल्लि	पुरंदरदास	३·४	२६	४२
याकेन्न ई राज्यके	पुरंदरदास	२·५	१६	२४
यारु विट्टरू कैय	पुरंदरदास		२६८	२६
योगि वंदनो शिवयोगि	भक्तारक	६·१	५६	७६
रत्न वंदिदे नोडिरो	शंकरानंद	१५·८	१९४	२२८
लिंगपूजि आगतदण्णा	गंगाधर	१६·३	२००	२३६
लिंगपूजेय माडिरो	सर्पभूषणशिवयोगि	१६·४	२०२	२३८
वस्तु कंडेनो ओंदु	महिपति (काखंडकि)	१६·२	२००	२३५

पद	कवी	प्रकरण–पद	पृष्ठ	पृष्ठ
शरीरवेंबुव होलन	सर्पभूषणशिवयोगि	४·४	३८	५४
शिवदरुशन नमगायितु	पुरंदरदास		२७६	८५
श्रीगिरिय सुक्षेत्रकिंदु	सर्पभूषणशिवयोगि	१४·५	१७०	२०५
श्रीगुरुमंत्रव रागदि	शरीफ साहेब	१२·५	१४६	१७७
सदा एन्न हृदयदल्लि	विजयदास	१०·८	१२२	१४९
सदा बेळगुतदे ज्योति	निरुपाधिसिद्ध	१८·१	२२४	२६३
सद्गुरु साकिद मद्दानि	कल्मेश्वर	१९·७	२४८	२८९
सारि चल्लिदे मुकुति	आनंदगुहेश्वर	६·७	६६	८९
सुमति घंटाकर्ण	भीमकवि		२९८	२५७
सुम्मनिरु नालिगे	निरुपाधिसिद्ध	४·३	३६	५२
सुम्मने दोरकुवदेनो	पुरंदरदास	१३·२	१५४	१८३
सै शवास गवरु	चिदानंद	६·२	५८	७९
सै सै सद्गुरुविन	ईश	८·५	९२	११३
सै सै सै कुंतिदेने	शिवलिंगव्व	१७·६	२१८	२५८
स्मरणे ओंदे सालदे	पुरंदरदास		२८८	१८७
हरनीव कालक्के	बसवेश्वर	१०·२	११२	१३९
हरिदासर संग	पुरंदरदास	२०·६	२६०	३०७
हरि नारायण गुरु	पुरंदरदास	१३·१	१५२	१८२
हाविन हेडेय	बसवेश्वर	९·५	१०६	१३१
हावु कच्चितम्मा	बलभीमयोगि	५·४	४८	६७
हावु तुळिदेने मानिनि	शरीफ साहेब	५·३	४८	६५
हिंदिल्ला स्वामि मुंदिल्ला	पुरंदरदास		२६८	२७
हुच्चु हिडियितु एनगे	पुरंदरदास	१९·६	२४६	२८८
हुसेनि साहेबर	सिद्धेश्वर (कलबुर्गि)	१७·४	२१६	२५४
हेगिद्दरू चंद ज्ञानियु	शंकरानंद	९·७	१०८	१३३
हेगे इरबेकु	पुरंदरदास	३·१	२२	३५
होळेव केंजेडेगळ	अक्क महादेवि	११·५	१३०	१६०
हौदप्पा हौदप्पा हौदु	निरुपाधिसिद्ध	९·६	१०६	१३२
ह्यांग मरेयली	भगवंतप्प कुलकर्णि	८·४	९०	१११
ह्यांगे तीरितु	मडिवाळयोगि(कडकोळ)	६·६	६४	८७

परिशिष्ट ५

कवींची सूची

अक्क महादेवि	(१) होळेव कॅंजेडेगळ (२) अय्या पाताळवित्तित्त
अखंडेश्वर	पाहा, षण्मुखस्वामि
आनंदगुहेश्वर	(१) सारि चल्लिदे मुक्कुति
ईश	(१) सै सै सद्गुरुविन
उरगगिरिनिलय	(१) विल्वपत्रिय धरिसवेकण्णा
कनकदास	(१) तोरेदु जीविसवहुदे (२) नन्निंद नाने जनिसि (३) इष्टु दिन ई वैकुंठ
कल्मेश्वर	(१) पेळलळवे स्वानुभवद (२) सद्गुरु साकिद मद्दानि
काडसिद्ध	(१) कंडिरेनो महाकारण
कूडलूरेश	(१) अळुतिद्या कंदा (२) एनु हेळलि एन्न (३) कुरुवरो नावु (४) काणवारदंथा वस्तु (५) नोडिरि ब्रह्मनाटव (६) गुरुवे निम्माज्ञेयनु (७) एंथा हुच्चु हिडिदीतिवग
कृष्णप्प खैनूर	(१) कडकोळद ना गुलामा
कृष्णराय (काखंडकि)	(१) गुरुरायनंथ करुणाळु (२) ओ एन्नवारदे (३) करेयदले बंदिहुदु (४) इदरोळारय्य नीनु
गंगाधर	(१) लिंगपूजि आगतदण्णा
गिरिमल्लेश	(१) इद्दरिरली देहा
गुरुलिंगजंगम	(१) गुरुता तोरिद
गोपालदास	(१) आव रोगवु एनगे (२) एन्न विन्नप केळु
चामरस	(१) बल्लडी शिशु

चिदानंद	(१) एंथा गारुडिगा (२) सै शवास गवरु (३) मुत्त वंदिदे कोळिळरण्णा (४) नादव केळुत (५) कण्णिनोळु कण्णु कंडे (६) दणियदे मलगिदेनो
जगन्नाथदास	(१) गोपालदासराय निन्नय (२) दासरिगुंटे भय शोका (३) देवगंगेयोळुळळवगे (४) मलगि परमादरदि
दिनकर वसव	(१) ब्रह्मानंदद सुखवेनु
नरसिंह	(१) गुरिया ओगेदेनो
नागलिंग	(१) आनंदवाद चिद्घन वस्तु
निजगुणशिवयोगि	(१) परतर शिवलिंगवेळसि (२) प्राणलिंगविदनु (३) भावलिंगवनु बिडदे (४) निज ऊहिसवारदु (५) कोगिले चेल्व कोगिले
निंबरगि महाराज	(१) मनसिन मुरगिय (२) गुरुचरणकमलदल्लि (३) एनु माडिदि केळेन्न (४) अंदिल्ल स्वामि (५) ॐ नाम कायुवदु (६) कल्लु मेत्तगे (७) नेल्लु कुट्टणु
निरुपाधिसिद्ध	(१) सुम्मनिरु नालिगे (२) तिळियबेकु निज सुखद (३) गुरुविन ह्यांग मरेयलि (४) हौदप्पा हौदप्पा हौदु (५) सदा वेळगुतदे ज्योति
पंचाक्षरि (नीरलकेरि)	(१) ॐ नमः शिवा (२) निन्न निजव नी
पुरंदरदास	(१) याकेन्न ई राज्यके (२) मुय्यक्के मुय्यि तीरितु (३) यारु बिट्टरू कैय (४) हिंदिल्ला स्वामि मुंदिल्ला (५) जय पांडुरंग एनु (६) एलो दारिकारने (७) हेगे इरबेकु (८) अनुगालवु चिंतेयु (९) चिंते यातको (१०) याके दयमाडवल्लि (११) मानव जन्म दोड्डदु (१२) जंगमरु नावु (१३) शिवदरुशन नमगायितु (१४) अंजीकिन्यातकय्या (१५) मध्वराया गुरु (१६) केंडक्के गोरलि (१७) कृष्णमूर्ति कण्ण मुंदे (१८) कंडे ना कनसिनलि (१९) कूसनु कंडीरा (२०) ब्रह्मानंदद सभेयोळगल्लि (२१) हरि नारायण गुरु (२२) सुम्मने दोरकुवदेनो

(२३) नी याको निन्न (२४) कल्लुसक्करे कोळ्ळिरो
(२५) इदु कोळ्ळि भवरोगकौषधवु (२६) इन्नेके यमन बाधेगळ्ळ
(२७) स्मरणे ओंदे सालदे (२८) केळनो हरि ताळनो
(२९) कण्णिनोळगे नोडो हरिय (३०) नळिननाभन नी
(३१) कण्णिलि केळुव (३२) मुत्तु कोळिळरो जनरु
(३३) ब्राह्मणनेंदरे ब्रह्मन (३४) कण्णिनोळगे नोडि कैवल्यव
(३५) मलगि पाडिदरे कुळितु (३६) हुच्चु हिडियितु एनगे
(३७) हरिदासर संग

बंदे नवाज (१) अंदवाद श्रीगंधद

बलभीमयोगि (१) हावु कच्चितम्मा (२) गोल्लरो नावु गोल्लरो

बसव (दोड्डपेटि) (१) गुरुवे निम्म स्मरणेय

बसवेश्वर (१) नंवरु नच्चरु (२) हाविन हेडेय
(३) जगव सुत्तिप्पुदु (४) हरनीव कालक्के
(५) ताळ मान सरिसवनरिये (६) निम्म नोट अनंत

बेरट्टूरपति (१) इदे अनुभव मंटपवु

भगवंतप्प कुलकर्णि (१) ह्यांग मरेयली

भवतारक (१) देवनल्लवेनो सद्गुरु (२) योगि वंदनो शिवयोगि
(३) दृष्टियोळगे दृष्टि निंतितु (४) काल कर्मव कालिले

भीमकवि (१) सुमति घंटाकर्ण

भीमदास (१) एन सवि एन सवि

मडिवाळयोगि (कडकोळ) (१) ह्यांगे तीरितु (२) तन्न ता तिळिद मेले

मनोहरराव देशपांडे (१) देव हिरि गुरुराय (२) कर्पुरारतियन्नु
(३) भक्तनेंदरे भक्त

महंत पाहा, मडिवाळयोगि (कडकोळ)

महिपति (१) एल्लिय्यो हरि हेळय्य (२) करुणिसो गुरु
(३) निज गुह्यद मातु (४) वस्तु कंडेनो ओंदु
(५) इंथादेल्लिदे ता नोडि (६) अर्तियागि बन्नि
(७) कण्णारे कंडेवु (८) इन्नेनिन्नेनु एनगिन्नु

मुप्पिन षडक्षरि	(१) नानु ओलिदु फलवदेनु
राघवेंद्रस्वामि	(१) इंदु एनगे गोविंद
रामराव (होर्ति)	(१) एनु अन्याय तिळियदु
रेवणसिद्ध	(१) आरिगे काणदी मुत्तु
विजयदास	(१) इदे समय हरिये (२) सदा एन्न हृदयदल्लि (३) अंतरंगद कदवु
व्यासराय	(१) दासनेंदरे पुरंदरदास
शंकरानंद	(१) मंगलवागिहुदु (२) पादपूजिय माडि (३) हेगिद्दरू चंद ज्ञानियु (४) मातु मातिगे शंकरा (५) रत्न बंदिदे नोडिरो
शरीफ साहेब	(१) हावु तुळिदेने मानिनि (२) इदे ब्रह्मज्ञान नोडिको (३) श्रीगुरुमंत्रव रागदि
शिवलिंगव्व	(१) सै सै सै कुंतिदेने (२) मगा हुट्टिदव्वा
षडक्षरमुनि	(१) आरु अक्षर भेद
षण्मुखस्वामि	(१) नयनेंद्रिय विषयदिंद
संग (नंद्याळ)	(१) एन भरा नट्टीतप्प (२) बा बा बा एन्न (३) एंदु मैय मरेसि
सर्पभूषणशिवयोगि	(१) कायकांतारव होक्कु (२) शरीरवेंबुव होलन (३) गुरुदेव नी माडिद (४) बोधिसेन्ननु गुरुवे (५) श्रीगिरिय सुक्षेत्रकिंदु (६) काणुतिदे परविंदु (७) लिंगपूजेय माडिरो
सिद्धलिंगेश (रेवगिपुर)	(१) बहु दोड्डदी जन्म
सिद्धेश्वर (कलबुर्गि)	(१) हुसेनि साहेबर
हरिहर	(१) अ एंब वर्ण

परिशिष्ट ६

संदर्भ ग्रंथ

(कन्नड)

१ कळकण्णवर डॉ. आय. एस., श्री चिदानंदावधूतरु हागु अवर कृतिगळु, उपन्यास ग्रंथमाले २८९, कर्नाटक युनिव्हर्सिटि, धारवाड, १९७८

२ काव्यप्रेमि (प्रधान संपादक), शिशुनाळर गीतमंजरि, समाज पुस्तकालय, धारवाड, पहिली आवृत्ती, १९८५

३ कुवेंपु मत्तु मास्ति वेंकटेश अय्यंगार (संपादकरु), कुमारव्यास महाकविय कर्णाट भारत कथा मंजरि मैसूरु संस्थानद साहित्य मत्तु संस्कृति अभिवृद्धि इलाखे, बेंगळूरु, १९५८

४ कोल्हार कुलकर्णि डॉ. कृष्ण, कासंडकि श्री महिपतिरायरु, प्रकाशक, मराठी कन्नड स्नेहवर्धन केंद्र, ६०४ के. पी. टॉवर नं. १, फातिमा नगर, सोलापूर रोड, पुणे ४११०१३, १९८९

५ कोल्हार कुलकर्णि डॉ. कृष्ण, सिंदगिय बिंदगि, प्रकाशक, श्री भीमाशंकर मठ सिंदगि, जिल्हा विजापूर, १९८७

६ गुब्बण्णवर डॉ. शिवानंद, शिशुनाळ शरीफ साहेबरु, प्रकाशक, लोक शिक्षण ट्रस्ट ग्रंथमाले, हुब्बळ्ळि–बेंगळूरु, १९८९

७ चक्रवर्ति चिदंबरमूर्ति (प्रधान संपादक), सद्बोध चंद्रिकेय अमृत महोत्सवद अमर काणिकेय महाग्रंथ, प्रकाशक, सद्बोध चंद्रिकेय कार्यालय, आनंदवन (अगडि), जिल्हा धारवाड, १९८४

८ चंद्रशेखर शास्त्रि (संपादक), श्री काडसिद्धेश्वर वचन, प्रकाशक, श्री जगद्गुरु मूरु साविर मठ ग्रंथमाले, हुब्बळ्ळि

९ जगन्नाथदासविरचित श्रीमद् हरिकथामृतसार, श्रीहरिविट्ठल प्रकाशन, २–३ फर्स्ट मेन रोड, नरसिंहराज कॉलनी, बेंगळूरु ५६००१९, १९७७

१० जगन्नाथ शास्त्रि के, चिदानंदावधूतरु, आय. बी. एच. प्रकाशन, गांधी नगर, बेंगळूरु ५६०००९, १९८४

११ देशपांडे म. श्री., स्वानंद साम्राज्य, प्रकाशक, अध्यात्म कार्यालय, हुब्बळ्ळि, १९६२

१२ देशपांडे म.श्री., प्रभुविन प्रभे, प्रकाशक, शि. शि. अणेप्पनवर, श्री पुरातनेश्वर प्रेस, अथणि, जिल्हा बेळगाव, १९५५

१३ नरगुंद विश्वनाथ शास्त्रि कोळिवाड (संग्राहक), भवतारक गीतगळु, प्रकाशक, तापस कृष्णराय, सुधा मुद्रणालय, हुबळिकर बिल्डिंग, हुब्बळ्ळि, १९५७

१४ नरसिंहाचार डी. एल., पीठिकेगळु लेखनगळु, प्रकाशक, डी. व्ही. के. मूर्ति कृष्णमूर्तिपुरम्, मैसूरु ४, १९७१

१५ नरसिंहाचार आर., कर्णाटक कवि चरिते, प्रथम प्रकाशन, १९०७, प्रथम संपुट, कन्नड साहित्य परिषत्तु, चामराज पेटे, बेंगळूरु १८, १९६१

१६ नागलिंग स्वामिगळ चरित्रे, प्रकाशक, पि. सि. शाबादिमठ, स्टेशन रोड, गदग

१७ निजगुणशिवयोगिविरचित वेदान्त ग्रंथावळि, प्रकाशक, शांतानंद, सिद्धविलास, १६५ गांधी नगर, बेंगळूरु २, १९५५

१८ निजगुणशिवयोगि हागु अवर कृतिगळु, ऐदु उपन्यासगळु, विशेष वाङ्मय प्रसार ग्रंथमाले, कर्नाटक युनिव्हर्सिटि, धारवाड, १९६६

१९ पंचमुखि रा. स्वा., कर्नाटकद हरिदास साहित्य, प्रकाशक, कन्नड साहित्य परिषत्तु, चामराज पेटे, बेंगळूरु, १९५२

२० पावंजे गुरुराव (संपादक), पुरंदरदासर कीर्तने, ऐदु भागगळु, प्रकाशक, पावंजे गुरुराव अँड सन्स, उडुपि, शके १८८५

२१ वसवनाळ एस. एस. (संपादक), वसवण्णनवर षट्स्थलद वचनगळु, प्रकाशक, साहित्य समिति, लिंगायत अभिवृद्धि संस्थे, धारवाड, द्वितीय मुद्रण, १९५४

२२ वसवलिंगय्य एम. एस. मत्तु श्रीनिवासमूर्ति एम. आर. (संपादकरु), प्रभुलिंग लीलेय संग्रह, मैसूर विश्वविद्यानिलय, मैसूर, १९५७

२३ वेटगेरि कृष्ण शर्मा मत्तु वेंगेरि हुच्चराय, श्री पुरंदरदासर साहित्य, भाग–१, पूजातत्त्व, प्रकाशक, श्री पुरंदरदासर नाल्कु नूरनेव वर्षद उत्सव मंडळ, धारवाड, १९६३

२४ वेलूरु केशवदासरु, श्री कर्णाटक भक्तविजय, प्रकाशक, सुबोध प्रकटनालय, बेंगळूरु १८, मूरनेय आवृत्ति, १९६३

२५ ब्रह्मप्प जि., हंप नागराजय्य, श्रीमति कमलम्म हंपना (संपादकरु), विश्वकवि रत्नाकरन भरतेश वैभव, प्रकाशक, अत्तिमब्बे प्रकाशन, २१३ सुब्बराय चेट्टि रोड, बसवन गुडि, बेंगळूरु, १९६७

२६ महांतेश शास्त्रि एच. टि. (टीकाकर्तरु), निजगुणशिवयोगिविरचित कैवल्य पद्धति, प्रकाशक, मेसर्स पि. सि. शाबादिमठ, स्टेशन रोड, गदग, १९९०

२७ महांतेश शास्त्रि एच. टि. (संग्राहक), सर्पभूषणर कैवल्य कल्पवल्लरि, प्रकाशक, मेसर्स पि. सि. शाबादिमठ, स्टेशन रोड, गदग, १९७६

२८ मुगळि डॉ. आर. एस., कन्नड साहित्य चरित्रे, प्रकाशक, उषा साहित्यमाले, मैसूरु, द्वितीयावृत्ति, १९६०

२९ रंगस्वामि डॉ. सि. व्हि., सिद्धपर्वतवासिनि देवि बगळामुखि, प्रकाशक, डॉ. सि. व्हि. रंगस्वामि, 'श्रीमाता' एल. आय. जि. ४८, के. एच. बी. कॉलनि, बनशंकरि नगर, केलगेरि रस्ते, धारवाड ८, १९९१

३० लट्टे डॉ. एम. एस. (संपादक), जानपद साहित्यदल्लि श्रीशरण बसवेश्वररु, प्रकाशक, श्रीशरण बसवेश्वर संस्थान, कलबुरगि, १९७८

३१ लट्टे, डॉ. एम. एस., कडकोळ मडिवाळेश्वरविरचित स्वरवचनगळु, प्रकाशक, वीरशैव अध्ययन संस्थे, श्री जगद्गुरु तोंटदार्य संस्थान मठ, गदग, १९८२

३२ लक्ष्मीनारायण भट्ट डॉ. एन. एस. (संपादक), शरीफ साहेबर गीतेगळु, क्षमा प्रकाशन, २२६३ इप्पत्तेरडनेय अड्डु रस्ते, बनशंकरि एरडनेय हंत, बेंगळूरु ७०, नाल्कनेय मुद्रण, १९९०

३३ वरदराजराव जि. (संपादक), श्री महिपतिरायर कृतिगळु, प्रकाशक, मैसूरु विश्वविद्यानिलय, मैसूरु, १९७४

३४ शंकरानंदस्वामि सगर, सुरपुर (टीकाकर्तरु), सर्पभूषणशिवयोगिकृत ज्ञानसिंधु, प्रकाशक, मुकुंदस्वामि, श्री कबीरनाथ स्वामीजी ब्रह्म विद्याश्रम, बेंगळूरु, १९५७

३५ शरीफ साहेबर चरित्रे हागु तत्त्वपदगळु, प्रकाशक, मेसर्स पि. सि. शाबादिमठ, स्टेशन रोड, गदग

३६ शांतरस (संपादक), कूडलूरु बसवलिंग शरणर स्वरवचनगळु, वीरशैव अध्ययन संस्थे, श्री जगद्गुरु तोंटदार्य संस्थान मठ, गदग, १९८३

३७ शिवरामशास्त्रिगळु (परिशोधक), श्री. शंकरानंद योगीश्वररिंद विरचितवाद कैवल्यनवनीतवु, प्रकाशक टी. एन. कृष्णय्यशेट्टि अँड सन्स, पुस्तक व्यापारिगळु, चिकपेटे, बेंगळूरु ५६००५३, १९९०

३८ शिवानंद डॉ. व्हि., सगर नाडिन शिवशरणरु, उपन्यास ग्रंथमाले ६९, कर्नाटक युनिव्हर्सिटि, धारवाड, १९६७

३९ सत्यंपेटि लिंगण्ण, अनुभावि कवि कडकोळ मडिवाळप्प, उपन्यास ग्रंथमाले २०५, कर्नाटक युनिव्हर्सिटि, धारवाड, १९७५

४० सहजानंदस्वामि, चिदानंदावधूतर ज्ञानसिंधु, गद्यानुवाद, प्रकाशक, पि. सि. शाबादिमठ, स्टेशन रोड, गदग, १९९०

४१ सिद्धवीरदेवरु (संपादक), श्री षण्मुखस्वामिकृत अखंडेश्वर वचन, प्रकाशक, म. नि. प्र. मृत्युंजय स्वामिगळु, मुरुघा मठ, हावेरि पेटे, धारवाड, १९४४

४२ सिंदगि डॉ. मल्लिकार्जुन, श्री शिशुनाळ शरीफ साहेबर जीवनलीलामृत, श्री शरीफ शिवयोगि प्रकाशन, हुब्बळ्ळि ३१, तृतीय मुद्रण, १९९०

४३ सुंकापुर डॉ. एम. एस. (संपादक), महाकवि हरिहरदेवविरचित रक्षाशतक-पंपाशतक, कर्नाटक युनिव्हर्सिटि, धारवाड, १९७६

४४ सोलापूरकर मल्हार व्यंकटेश (संग्राहक), नित्य भजनमाला संग्रह, प्रकाशक, श्री सद्गुरु दत्तप्पय्य महाराज, भीमाशंकर मठ, सिंदगि, जिल्हा विजापूर, १९५७

४५ हर्डेकर मंजप्प (संग्राहक), मुप्पिन षडक्षरि स्वामिगळ सुबोधसार, प्रकाशक, वीरशैव विद्यालय, आलमट्टि, जिल्हा विजापूर, १९४०

४६ हावनूर डॉ. श्रीनिवास, होसगन्नड अरुणोदय, कन्नड अध्ययन संस्थे, विश्व-विद्यानिलय, मैसूरु ६

४७ हिरेमठ डॉ. आर. सि. (संपादक), बसवण्णनवर वचनगळु, प्रकाशकरु, श्री नि. प्र. महांतप्पगळु मत्तु श्री गुरु मृत्युंजय महास्वामिगळु, श्री मुरुघा मठ, मृत्युंजय नगर, धारवाड ६, १९८८

४८ हिरेमठ डॉ. आर. सि. (संपादक), भीमकविविरचित बसवपुराण, प्रकाशकरु, श्री नि. प्र. स्व. महांतस्वामिगळु, मत्तु श्री गुरु मृत्युंजय महास्वामिगळु, श्री मुरुघा मठ, मृत्युंजय नगर, धारवाड ६, १९७१

४९ होसकेरे चिदंबरय्य (संपादक), श्री महालिंग कविय अनुभवामृत (सर्वार्थ संदर्शिनी एंब टीकेयोडने), एस. एस. एन. बुक डेपो, ३४ न्यू मार्केट, बेंगळूरु सिटि, मूरनेय पुनर्मुद्रण, १९५०

(मराठी)

१ कोल्हटकर कृ. के., भारतीय मानसशास्त्र अथवा पातंजल योगदर्शन, प्रकाशक, धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई ४००००४, सातवी आवृत्ती, १९८९

२ गुणे गंगाधर शास्त्री. वैद्यपंचानन, आयुर्वेदीय औषधिगुणधर्मशास्त्र, भाग १, चतुर्थ आवृत्ती १९५१, भाग २, चतुर्थ आवृत्ती १९५८, भाग ३, चतुर्थ आवृत्ती, १९५६, भाग ४, भाग ५, द्वितीय आवृत्ती, १९५७

३ टिळक बाळ गंगाधर, श्रीमद् भगवद्गीतारहस्य, प्रकाशक, ज. श्री. टिळक, ५६८ नारायण पेठ, गायकवाड वाडा, पुणे, सातवी आवृत्ती, १९५६

४ ढेरे रा. चिं., गुरुमाऊली, 'विदिशा', १० अभिराम सोसायटी, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ४११००९, १९८९

५ पावसे खं. रा. (अनुवादक), श्रीराघवेंद्र चरित्र, प्रकाशक, ए. एम. करडी अँड सन्स, पब्लिशर–बुकसेलर, स्टेशन रोड, हुबळी, १९८९

६ पेंडसे, शं. दा., ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान, केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ सदन, मुंबई ४, १९४१

७ श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचीं जावक पत्रें व टिपणें, प्रकाशक, गुरुदेव रानडे आश्रम, निंबाळ आर. एस., जिल्हा विजापूर, १९५९

८ वेलिंगकर रा. ना., ज्ञानेश्वरीचें शब्द-भांडार, मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई, १९५९

९ वैद्य श्री. म., षट्चक्र–दर्शन व भेदन, प्रकाशक, तुकाराम बुक डेपो, बुकसेलर्स अँड पब्लिशर्स, माधववाग, मुंबई ४, द्वितीयावृत्ती, १९६२

१० सिद्धांत शिखामणि, (मराठी भावानुवाद), वीरशैव साहित्य संशोधन मंडळ, सोलापूर, १९९०

ENGLISH

1 Ranade R. D., Pathway to God in Kannada Literature, Bharatiya Vidya Bhavan, Bombay 7, Second Edition, 1970

2 Ranade R. D., The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi and Hindi Saints, Gujarat Vidya Sabha, Ahmedabad, 1956

3 Ranade, R. D., The Bhagavad-gita as a Philosophy of God-realisation, Nagpur University, 1959

4 Iyengar Srinivas (Translator), Swatmarama Swami's Hatha Yoga Pradipika, The Theosophical Publishing House, Adyar, Madras, First Edition, 1893

5 Shunya - Sampadane, vols. I to V, Karnatak University, Dharwad

6 Venkata Reddi M. (Editor), Hatha Ratnavali, Publisher, M. Ramkrishna Reddi, Arthamuru, District East Godavari, Andhra Pradesh, PIN 533 351, 1982

7 Yogashakti Parivrajika Ma (Commentator), Gheranda Samhita, Jaico Publishing House, 125 Mahatma Gandhi Road, Bombay 1

(Sanskrit)

१ पणशीकर वासुदेव लक्ष्मण (संपादक), ईशाद्यष्टोत्तरशतोपनिषदः, प्रकाशक, तुकाराम जावजी, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९१७

पारमार्थिक वाटचालीला खरी सुरुवात अहंकारनाशापासून होते हे सत्य ग्रंथारंभीच सामोरे येते. नैतिक तयारी, सद्‌गुरुप्राप्ती, नामस्मरण हे साधकाच्या क्रममार्गावरील टप्पे कन्नड संतांच्या राग-तालबद्ध पदांतून स्वच्छ दिसतात. अनंत मंगलगुणांनी युक्त असा सगुण नारायण ही वैष्णवांची आराध्यदेवता. तिच्या वज्रवैडूर्यादी तेजस्वी रत्नांच्या वैभवैश्वर्याने वाचकाचे डोळे दिपतात. श्रीविष्णूच्या अनुग्रहात चिंब भिजत राहणारा भक्त होणे ही वैष्णव संतांची आंतरिक मनीषा. उलट त्रिशूल, नंदी व मूठभर साप या संपत्तीचा दिमाख मिरविणारा शिव हे शैवांचे अखेरचे प्राप्तव्य. सर्व वासनांची राखरांगोळी करणाऱ्या शिवाच्या वैराग्यैश्वर्याने आपले डोळे विस्फारतात. निःसंग असा शिवयोगी होणे ही शिवभक्तांची आस. पण कन्नड संतांना खरा वेध लागला आहे तो केवळ वैकुंठ-कैलास यांचा नव्हे तर त्याहीपलीकडील निरंजन तत्त्वाचा. त्याच्याशी एकरूप होण्याची त्यांची ओढ सोलीव चंद्रबिंबासारखी डोळ्यांत भरते. यथाकाल रूपतेजनादादी अतींद्रिय अनुभवांचा आनंद लुटणारा साधक ग्रंथाच्या अखेरीस समानधर्मी ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत रमलेला दिसतो. या संतसभेतील सदस्यांच्या हृदयवीणेतून झंकारलेले सूर कन्नड परमार्थसोपान या ग्रंथातून ऐकू येतात.